**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ.शी**. राज्यात दरवर्षी दोन लक्ष बालकांचा कुपोषण व तत्सम आजाराने होत असलेला मृत्यू

**मु.शी**.: राज्यात दरवर्षी दोन लक्ष बालकांचा कुपोषण व तत्सम आजाराने होत असलेला मृत्यू या विषयावर सर्वश्री हेमंत

, टकले,माणिकराव ठाकरे, विनायक मेटे, संजय दत्त, ॲड. उषा दराडे, डॉ. सुधीर तांबे, श्री. अरुण गुजराथी,श्रीमती अलका देसाई, सर्वश्री सतीश चव्हाण, जयप्रकाश छाजेड, प्रकाश बिनसाळे,मोहन जोशी,रामेश शेंडगे, भाई जगताप प्रा.सुरेश नवले,सर्वश्री राजन तेली,जैनुद्दीन जव्हेरी, एस.क्यु.जमा, सुभाष चव्हाण,श्रीमती दीप्ती चवधरी,वि.प.स.यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे चालू)

**उपसभापती** : माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांनी प्रस्तावावरील आपले अपूर्ण असलेले भाषण पुढे सुरु करावे.

श्रीमती दिप्ती चवधरी (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, कुपोषण आणि त्यामुळे होणारे बालमृत्यू या समस्येवर बोलत असतांना राज्य सरकार दरवर्षी करोडो रुपये या समस्येच्या निवारणासाठी असलेल्या वेगवेगळया योजनांवर खर्च करीत आहे तरीसुध्दा दरवर्षी बालमृत्यू होत आहेत ही अतिशय चिंताजनक बाब आहे हे मला याठिकाणी आवर्जून सांगावेसे वाटते. गेल्या अनेक वर्षामध्ये अंगणवाडीच्या माध्यमातून किंवा पोषण आहार योजनेच्या माध्यमातून, त्याचप्रमाणे नव संजीवनी योजना, गरोदर माता योजना, मातृत्व अनुदान योजना, दाई बैठक योजना, पाडा स्वयंसेवक योजना इत्यादी योजना राज्य शासनाने राबविल्या आहेत.परंतु त्या योजनांना फारसे यश आलेले नाही. कुपोषण कमी व्हावे यासाठी शिजविलेल्या अन्नाच्या स्वरुपामध्ये त्यांना सकस आहार दिला जातो. 1975 साली आयसीडीएस योजनेला सुरुवात होऊन 35 वर्षे झाली असतांना व



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्रीमती दिप्ती चवधरी....

योजनेवर मोठया प्रमाणात खर्च केला जात असतांना कुपोषणाच्या समस्येवर आपल्याला संपूर्णपणे मात करता आलेली नाही. कुपोषित बालकांमध्ये ठेंगणेपणा आणि बौध्दिक मतिमंदत्व ही गंभीर समस्या आहे. जवळ जवळ 50 टक्के बालकांमध्ये ही समस्या आढळून येते. जगामध्ये तीन कुपोषित बालकांपैकी एक कुपोषित बालक भारत देशात आढळते. हे कुपोषण केवळ ग्रामीण भागातील आदिवासी पाडयामध्ये आढळून येत नाही तर शहरी भागामध्ये सुशिक्षित, समृध्द, प्रतिष्ठित कुटुंबामध्ये सुध्दा आढळून येते. कुपोषणामुळे बालक शारिरीकदृष्टया कमजोर राहिले तरी भारताला दरवर्षी 72 कोटींचे नुकसान सोसावे लागते. या महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी कुपोषणाची समस्या अतिशय गंभीर आहे. त्यामुळे राज्य सरकारच्या माध्यमातून अनेक तज्ज्ञांनी अनेक उपाय योजना सुचविल्या आहेत. त्याचप्रमाणे या विषयावर मी काल भाष्य केले आहे. त्यामुळे गंभीरपणे या बाबीकडे लक्ष देऊन त्यावर तातडीने उपाय योजना होणे आवश्यक आहे एवढे बोलून माझे भाषण संपविते. धन्यवाद.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, कुपोषित बालकांच्या संदर्भातील चर्चेमध्ये काही मुद्दे मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, आपण कुपोषित बालकांची संख्या पाहिली तर महाराष्ट्रामध्ये ती 85 लाख आहे. त्यामुळे केवळ हा महाराष्ट्र राज्याच्या संदर्भातील प्रश्न आहे अशातला भाग नाही. भारतात देखील हा प्रश्न आहे, जगात देखील हा प्रश्न आहे. काही प्रगत राष्ट्रांमध्ये देखील कुपोषित बालकांचा प्रश्न आहे. परंतु त्यांची टक्केवारी कमी आहे. कुपोषित बालकांची भारतात विशेषतः महाराष्ट्रात टक्केवारी मोठया प्रमाणात आहे. विशेषतः नंदूरबार, धुळे या दोन जिल्हयामध्ये कुपोषित बालकांची संख्या जास्त आहे. महाराष्ट्राच्या ज्या जिल्हयांमध्ये ह्युमन डेव्हलपमेंट इंडेक्स कमी आहे, त्यामध्ये नंदूरबार व धुळे हे दोन जिल्हे आहेत.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ...

त्याच्यामध्ये विदर्भातील देखील काही जिल्हे आहेत. त्यांचा विकास इतर समाजापेक्षा कमी आहे, ही वस्तुस्थिती आहे. त्या जिल्हयांच्या विकासाची टक्केवारी देखील कमी आहे. आदिवासी विकासाच्या संदर्भात जास्त महत्व देत असताना या जिल्हयांच्या विकासाच्या संदर्भात महत्व देणे अत्यंत महत्वाचे आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय आदिवासी विकास मंत्री बसलेले आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, अर्थसंकल्प माझ्या हातात आहे. 3844 कोटी रुपयांचा हा अर्थसंकल्प आहे. यामध्ये महसुली खर्च 3125 कोटी रुपये आहे. भांडवली खर्च 760 कोटी रुपये आहे. भारित खर्च फक्त 8.99 कोटी रुपये आहे. दत्तमत्त खर्च 3835 कोटी रुपये आहे. माननीय श्री. शरद पवार या राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी वेगळा अर्थसंकल्प केला. 9 टक्के रक्कम आदिवासी खात्यासाठी आरक्षित केली. आदिवासी विकासाची फाईल दुसऱ्यांदा वित्त विभागाकडे जाणार नाही असे आदेश काढण्यात आले. गेल्या दहा वर्षापासून दर वर्षी 4 हजार कोटी रुपये खर्च करण्यात येत आहेत. गेल्या दहा वर्षामध्ये 40 हजार कोटी रुपये खर्च केल्यानंतर देखील कुपोषित मुलांची संख्या का हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. निधीची उपलब्धता हा प्रश्न नाही. पण निधी कशा पध्दतीने खर्च करण्यात येत आहे याला अत्यंत महत्व आहे. म्हणून या प्रश्नाविषयी मला माननीय आदिवासी विकास मंत्र्यांना सांगावयाचे आहे की, या संदर्भातील यंत्रणा सक्षम करणे हे महत्वाचे आहे.

सभापती महोदय, आदिवासींचा संबंध कोणाशी येतो? आदिवासींचा संबंध शिक्षण खात्याशी येतो, आरोग्य खात्याशी येतो, बांधकाम खात्याशी येतो व कृषी खात्याशीही येतो. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून शासनाला अशी विनंती करीन की, हा संबंध पैसा जो त्या त्या खात्यामार्फत खर्च करण्यात येतो त्या ऐवजी आदिवासी विकास खात्याकडे हा निधी देऊन किंवा त्या खात्याचा आदिवासी विकास खात्याशी समन्वय केला तरच हा प्रश्न सुटू शकेल. अन्यथा निधी उपलब्ध आहे. खर्च केला जात नाही. केलेला खर्च कुपोषित बालकांपर्यंत पोहचत नाही ही वस्तुस्थिती आहे. 85 लाख आदिवासींसाठी 3800 कोटी रुपये खर्च करण्यात येतात. या 85 लाख आदिवासीमधून 12 ते 14 या वयोगटातील मुलांची संख्या वेगळी काढावी कारण यातील सर्वच मुले कुपोषित नाहीत. त्यामुळे तो निधी कुपोषित मुलांना देण्याच्या संदर्भातील योजना आखण्यात यावी. सन्माननीय मंत्री महोदय श्री. पाचपुते यांना मी डायनामिक मंत्री म्हणून गेल्या अनेक वर्षापासून पहातो. आदिवासी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ KTG/

श्री. अरुण गुजराथी...

विकास खाते हे एक आव्हान आहे असे मी समजतो. आदिवासी विकास खाते सोपे नाही. निधी असल्यानंतर देखील विकास होत नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणून हा निधी खर्च करण्याची जबाबदारी आपल्यावर येऊन पडते. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांच्याशी मी यासंदर्भात बोलत होतो. त्यांचा मतदारसंघ आदिवासींचा नाही. मुंबईतील सुशिक्षित पदवीधरांचा त्यांचा मतदारसंघ आहे. तरी देखील ते आदिवासीं विषयी कार्य करतात. आमच्या जळगाव जिल्हयात देखील आदिवासी आहेत आणि ज्या तालुक्यातून मी येतो त्या चोपडा तालुक्यात देखील आदिवासींची संख्या जास्त असल्यामुळे तो मतदारसंघ आरक्षित झालेला आहे. म्हणून एक सेल तयार करता येईल काय? कुपोषित बालकांचा वेगळा सेल आदिवासी विकास खात्यात निर्माण केला आणि त्याबाबतीतील समन्वयासाठी ज्या ज्या खात्याचा संबंध येतो त्या त्या खात्यातील सचिवांना बैठकीस बोलावून हा प्रश्न सुटत असेल तर मी आपल्याला विनंती करीन की, आपण या संदर्भातील कार्यवाही करावी.

यानंतर श्री. बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाचे कार्यक्रम अंदाजपत्रात असे म्हटले आहे की, आदिवासी लोकांना पुरेशा प्रमाणात प्राथमिक आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून 1976 पासून शासनाने आदिवासी उपयोजना स्वतंत्रपणे राज्यातील 15 जिल्ह्यांमध्ये राबविण्याचे ठरविले. आदिवासी योजना राबविण्यासाठी ध्येय आणि साध्य यामध्ये ज्या बाबी दिलेल्या आहेत त्यात आदिवासी लोकांचे जीवनमान सुधारणे, त्यांच्या आणि इतरांच्या विकासातील तफावत कमी करणे, प्रत्येक पाचव्या प्राथमिक आरोग्य केंद्रामागे 30 खाटा असलेले एक ग्रामीण रुग्णालय स्थापन करणे अशा बाबी यामध्ये आहेत. आपण किती ग्रामीण रुग्णालये स्थापन केली हे माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये सांगावे. पाच प्राथमिक आरोग्य केंद्रामागे एक ग्रामीण रुग्णालय स्थापन करावयाचे आहे. 20 हजार आदिवासी व डोंगरी लोकसंख्येमागे 1 उपकेंद्र स्थापन करणे, 1 हजार आदिवासी लोकसंख्या किंवा प्रत्येक खेड्यामध्ये 1 आरोग्य मार्गदर्शक नेमणे आणि प्रत्येक खेड्यामागे एका दाईस प्रशिक्षण देणे या बाबी सुध्दा यामध्ये आहेत. यापैकी आपण किती बाबी करु शकलो याची माहिती शासनाने सभागृहाला द्यावी. जर करु शकला नसाल तर का करु शकला नाही आणि पुढे काय करणार याची माहिती शासनाने द्यावी.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाचे कार्यक्रम अंदाजपत्रक माझ्याकडे आहे. त्यामध्ये बालवाड्या, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, आश्रमशाळा, वसतिगृहे यामध्ये अधिक शालेय सोयी उपलब्ध करुन देणे., सहाय्य व प्रोत्साहनात्मक कार्यक्रम, गुणवत्ता सुधार कार्यक्रम, अधिक बौध्दिक शैक्षणिक सुविधा कार्यक्रम अशा अत्यंत चांगल्या योजना शासनाने दिलेल्या आहेत. इयत्ता पाचवी ते दहावी मधील आदिवासी विद्यार्थ्यांना आपण विद्यावेतन देतो. आदिवासी विद्यार्थ्यांना विशेष सवलती, लेखन साहित्य व गणवेश पुरवठा करणे, आदिवासी मुलांना शिक्षकांच्या कुटुंबात राहण्याची सुविधा देणे तसेच आदिवासी भागात उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्याची योजना आहे. या योजना चांगल्या आहेत, उत्तम आहेत परंतु त्या योजना राबविण्याच्या संदर्भात आपले खाते काय करीत आहे ? मागच्या काळात हे झाले नसेल तर पुढच्या काळात शासन काय



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ....

करणार याचे देखील उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात दिले पाहिजे.

सभापती महोदय, तंत्र शिक्षणाच्या संदर्भात एक वेगळा निधी आपण उपलब्ध करुन दिलेला आहे. यामध्ये मुरबाड, जि. ठाणे, इगतपुरी , जि. नाशिक, नंदुरबार, तळोदा, जि. धुळे, धारणी, जि. अमरावती, पांढरकवडा, जि. यवतमाळ, गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा,आरमोरी यांचा उल्लेख केलेला आहे. या सबंध बाबी यामध्ये दिलेल्या आहेत. 10 टक्के निधी आपल्या हातामध्ये आहे. मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, या दहा टक्के निधीचा उपयोग चांगल्या पध्दतीने झाला तर येत्या चार पाच वर्षामध्ये कुपोषित बालकांची संख्या निश्चितपणे कमी होईल. कुपोषित बालके केवळ काही आदिवासी जिल्ह्यामध्ये आहेत असे नाही तर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये कुपोषित बालके आहेत. मी माननीय मंत्रिमहोदया यांना सांगू इच्छितो की, जशी आदिवासी क्षेत्रात कुपोषित बालके आहेत तशीच मुंबई, पुणे, नागपूर आणि इतर जी शहरे आहेत त्या ठिकाणी असलेल्या झ ोपडपट्टयांमध्ये देखील कुपोषित बालके आहेत. म्हणून आरोग्य आणि शिक्षण हे या प्रश्नावर उत्तर आहे. जनजागृती निर्माण करणे हे यावरील उत्तर आहे. बऱ्याच कमी वयामध्ये लग्न होतात. दोन मुलांमधील अंतर कमी असते. मुलांची संख्या तीन पेक्षा जास्त असते. मग आपण जनजागृती का करु शकत नाही ? ही जनजागृती करणे, शिक्षण आणि आरोग्य ही तीन उत्तरे यासंदर्भात आहेत. मी असे म्हणतो की, या आदिवासी खात्यामध्ये आपण जे अधिकारी देतो ते डिव्होटेड आणि डेडिकेटेड असे द्यावेत. ते जिल्ह्याच्या ठिकाणी कोठे तरी राहतात आणि सातपुड्याच्या आदिवासी भागातील देवगड, देव्हारी या सारख्या गावांमध्ये येऊन तेथे शिक्षक राहतात की नाही याबाबत एखादा शेरा मारतात. हे आपण बघितले पाहिजे. खाजगी आश्रमशाळा असतील किंवा शासकीय आश्रमशाळा असतील त्या ठिकाणी जे धान्य देतो त्याची प्रत चांगली असली पाहिजे. मी विधानसभेचा अध्यक्ष असताना माझ्या मतदारसंघातील शासकीय व इतर ज्या आश्रमशाळा आहेत त्यांच्या धान्याची प्रत मी तपासली होती. ते सॅम्पल्स मी आदिवासी विकास मंत्र्यांना पाठविले होते.कोठेही दिला जात नाही इतका हलका माल त्या आदिवासी आश्रमशाळांमध्ये

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ....

द्यावयाचा हे बरोबर नाही. आपण रस्त्यांचा दर्जा बधा. शहरामध्ये रस्ते चांगले दिसतात. पण आदिवासी भागामध्ये आपण पैसे देतो पण त्या ठिकाणी पाहणारे कोणी नाही. त्यामध्ये त्या पध्दतीची प्रत नसते. त्या ठिकाणी अधिकारी असतील, ठेकेदार असतील पण यामध्ये मोटिव्हेशन हे फार महत्वाचे आहे. ते कशा पध्दतीने करणार यादृष्टीने माननीय मंत्रिमहोदयांनी प्रयत्न करावा अशी माझ ी विनंती आहे.

सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून शासनाला परत एक विनंती करणार आहे की, आपण महाराष्ट्रात दोन विद्यापीठे सुरु करावीत. एक आदिवासी आरोग्य विद्यापीठ हे विदर्भामध्ये द्यावे. ते कोठे द्यावे हे मी सांगणार नाही. दुसरे आदिवासी शैक्षणिक विद्यापीठ स्थापन करावे. ते नंदुरबार, धुळे ज्या ठिकाणी स्थापन करावयाचे असेल त्या ठिकाणी करावे. नाशिक किंवा ठाणे हा एक पट्टा आहे आणि विदर्भात मेळघाट हा एक भाग आहे. ही दोन विद्यापीठे आपण निर्माण केली तसेच त्यांचे कोर्सेस सुरु केले तर आदिवासींच्या संदर्भातील आरोग्य विषयक प्रश्न आणि आदिवासींच्या संदर्भातील शैक्षणिक प्रश्न सोडविण्यासाठी त्याचा आपल्याला कोठे तरी उपयोग होऊ शकेल.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी....

माझ्याकडे वर्तमानपत्राचा अंक आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, औरंगाबाद जिल्हा आरोग्य संघटनेच्या हिट लिस्टवर आलेला एक जिल्हा आहे. नव्या निकषानुसार या जिल्हयात 11,515 कुपोषित बालके आहेत. ज्या जिल्हयात आदिवासी नाहीत, ज्या जिल्हयात आदिवासींची लोकसंख्या जास्त नाही अशा जिल्हयाची ही आकडेवारी आहे. त्यामुळे हा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. महाराष्ट्रातील सर्वात महत्वाचा प्रश्न म्हणून कुपोषित बालकांचा प्रश्न हाती घेतला पाहिजे. एखाद्या खात्याकडे निधी दिला आणि सर्व खात्यांनी त्या खात्याशी समन्वय ठेवला किंवा कुपोषित बालकांसाठी वेगळा विभाग निर्माण केला तरी त्याचा उपयोग होऊ शकेल. आणखी बरेच मुद्दे आहेत, परंतु वेळ कमी असल्यामुळे मी एवढेच सांगून माझे भाषण संपवितो.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, या सदनाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी अतिशय गंभीर विषय सभागृहामध्ये चर्चेला आणलेला आहे. महाराष्ट्राच्या दृष्टीने हा अतिशय ज्वलंत व जीवंत विषय आहे. एका आर्थिक पाहणीमध्ये काही निष्कर्ष बाहेर आलेले आहेत. एकीकडे हेलिपॅड बांधून हेलिकॉप्टर उतरविले जाते आणि दुसरीकडे हेलिकॉप्टरचा आवाज कानावर पडताच क्षणी आदिवासी भागातील काही माणसे झोपडीत लपून बसतात. त्यांच्या वाटयाला झुरळांची चटणी येते आणि दुसरीकडे काही लोक सुगंधी बासमतीची लज्जत अनुभवतात. हे चित्र बदलण्यासाठी राज्य शासनाने जाणीवपूर्वक व हेतूपूर्वक प्रयत्न करावे अशी मी विनंती करणार आहे. ही आर्थिक विषमता दूर करण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत. आम्ही चंद्रावर गेलो, परंतु चंद्रमोळी बांधून राहणा-याला अन्न देऊ शकलो नाही. आम्ही चंद्रावरील खडक आणला, त्याच्यावर संशोधन केले परंतु खडकावर राहणा-याला अन्न व पाणी देऊ शकलो नाही ही वस्तुस्थिती आहे. शासनाची इच्छाशक्ती दांडगी आहे. शासनाने प्रयत्न केले तरी असलेली यंत्रणा अकार्यक्षम, निष्क्रीय व अतिशय भ्रष्ट आहे. या भ्रष्ट यंत्रणेला वठणीवर आणण्यासाठी माननीय मंत्री महोदय, श्री.पाचपुते साहेब आपण त्यांच्या अंगावर पाच पोती टाकली पाहिजेत, ते त्याच्या खाली दबले गेले पाहिजेत, तरच हे दुरुस्त होऊ शकेल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

महाराष्ट्रातील विशेषत: आदिवासी भागातील चित्र विदारक आहे. आपली शासकीय यंत्रणा संस्कारक्षम असणे अगत्याचे आहे. त्यांच्यावर संस्कार करण्याचा प्रयत्न शासनाने करावा. महाराष्ट्रात जे कर्मचारी नियुक्त होतात त्यांच्यावर 5 वर्षे आदिवासी भागात सेवा करण्याचे बंधनकारक केले पाहिजे. आदिवासींची त्यांनी सेवा केली नाही तर त्यांना शासकीय सेवेत राहता येणार नाही, असे अनिवार्य केले पाहिजे. हा नियम महाराष्ट्रात लागू करावा आणि कर्मचारी सेवेमध्ये आल्यानंतर त्यांचे किमान एक वर्षे संस्कार वर्ग घेण्यात यावे. प्लेटो असे सांगतो की, लोभी माणसे प्रशासनामध्ये राहिली तर त्यांचा आदर्श इतर लोक घेतल्याशिवाय रहात नाहीत. परंतु अशी लोभी माणसे प्रशासनामध्ये येताच कामा नये आणि आली तर या माणसांवर संस्कार करण्याचा प्रयत्न केला तर निश्चितपणे काही उपयुक्त घडू शकेल, यासाठी मी आग्रहाची विनंती करतो.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

सभापती महोदय, यापूर्वी डॉ.आरोळे समिती स्थापान करण्यात आली होती, या समितीची आरोळी कोठपर्यत आली आहे की त्यांची चारोळी झाली ते समजले पाहिजे. या समितीच्या 11 बैठका झाल्या आहेत. या समितीचा अहवाल सभागृहासमोर आला पाहिजे. कुपोषण, बालमृत्यू आता मेळघाट, धारणी या भागापुरते मर्यादित राहिले नसून ते आता मुंबईपर्यंत येऊन ठेपले आहेत.

यानंतर श्री.शिगम......

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

:

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 11:20

प्रा. सुरेश नवले....

त्यामुळे त्यामध्ये बदल होणे आवश्यक आहे. औरंगाबाद जिल्ह्यामध्ये 11515 कुपोषित बालके आढळली. नाशिक जिल्ह्यामध्ये 152 मृत्यू झालेले आहेत. हे चित्र राज्य शासनाला भूषणावह नाही. महात्मा फुलेंचे नाव घेऊन आपण राज्य करीत आहात. छत्रपती शिवाजी महाराजांचे आपण रात्रंदिवस स्मरण करीत आहात. मग या महाराष्ट्रामध्ये कुपोषणामुळे बालके मृत्यूमुखी पडत असतील तर ते चित्र बदलण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, या राज्यातील जवळ जवळ 30 टक्के लोकांना 1700 कॅलरीज अन्न देखील मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणून हे चित्र देखील बदलण्याचा प्रयत्न करणे अगत्याचे आहे. राज्यातील 55 टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. या शेती करणा-या वर्गाचे उत्पन्न 10 टक्के आहे. त्याचे उत्पन्न 100 रुपये असेल तर शेतातून मिळणारे उत्पन्न केवळ 10 रुपये आहे. आपण साडेसतरा टक्क्यापर्यन्त सिचंन क्षमता वाढविली. त्यापुढे आपण जावू शकलो नाही. या सिंचन क्षमतेतून मालगुजारी तलाव वगळले तर ही सिंचन क्षमता आणखी खाली गेल्या शिवाय राहाणार नाही.

सभापती महोदय, कुपोषणाच्या बाबतीत आपण ओरिसा राज्याच्या बरोबरीने आहोत. महाराष्ट्रामध्ये 1 वर्षाच्या आतील मुलांच्या मृत्यूचे प्रमाण हजारी 42 आहे. केरळ राज्यामध्ये हे प्रमाण हजारी 16 आहे. आपण किमान केरळ राज्याच्या बरोबरीने जाण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात मानवी विकास निर्देशांकामध्ये मुंबईचा क्रमांक पहिला लागतो तर मराठवाड्यातील नांदेड, विदर्भातील गडचिरोली, खानदेशातील नंदूरबारचा शेवटचा क्रमांक लागतो. हे चित्र बदलण्याचा प्रयत्न शासन करणार आहे की नाही ? या सदनाचे बुध्दीमान आणि मार्गदर्शन करणारे सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी आर्थिक विवेचन केले. आर्थिक विवेचन करण्यामध्ये ते निष्णात आहेत, आर्थिक विवेचन करण्यामध्ये त्यांचा कोणीही हात धरु शकणार नाही. आदिवासी विकासासाठी जर 10 कोटी खर्च झाले असतील आणि चित्र बदलले नसेल तर ते चित्र बदलण्याचा प्रयन करावा अशी मी राज्य शासनाला विनंती करतो. जागतिक आरोग्य संघटनेने सर्वेक्षण केलेले आहे. त्यामध्ये नमूद केलेले आहे की आपण 1/3 लोकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करु शकत नाही. ग्रामीण भागातील 81टक्के कुटुंबांकडे शौचालये

..2..

प्रा. सुरेश नवले...

नाहीत. शहरामध्ये हे प्रमाण 45 टक्के आहे. यादृष्टीने शासनाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. महाराष्ट्र इकॉनॉमी सर्व्हेमध्ये मानवी विकास निर्देशांकामध्ये महाराष्ट्र राज्य भारतात दुस-या क्रमांकावर आहे. दरडोई उत्पन्नामध्ये महाराष्ट्र राज्य भारतात दुस-या क्रमांकावर आहे, शिक्षणाच्या बाबतीत पाचव्या क्रामांकावर आहे, प्रत्येक गावाच्या ठिकाणी डॉक्टर असणे यामध्ये पाचव्या क्रमांकावर आहे, आयुर्मर्यादेत चौथ्या क्रमांकावर आहे, क्षय रोगाच्या बाबतीत 7व्या क्रमांकावर आहे, लोकसंख्येच्या प्रमाणात डॉक्टरची उपलब्धता असणे यामध्ये नवव्या क्रमांकावर आहे. गर्भवती मातांची पूर्ण तपासणी यामध्ये 17व्या क्रमांकावर आहे, बाळंतपण दवाखान्यात होण्यामध्ये 14व्या क्रमांकावर आहे, तीन वर्षाखालील मुलांच्या कुपोषणामध्ये 10व्या क्रमांकावर आहे, एक वर्षाच्या आतील बालकांच्या मृत्यूदरामध्ये दहाव्या क्रमांकावर आहे. 18 वर्षाखालील मुलगी आणि 21 वर्षाखालील मुलाच्या विवाहाच्या बाबतीत 20व्या क्रमांकावर आहे. सर्वांना पिण्याचे पाणी उपलब्ध होण्याच्या बाबतीत सव्वीसाव्या क्रमांकावर आहे. शौचालयाच्या व्यवस्थेच्या बाबतीत सव्वीसाव्या क्रमांकावर आहे. हे क्रमांक उंचावण्याच्या बाबतीत आपण प्रयत्नशील रहावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यामध्ये जी खाजगी रुग्णालये आहेत त्यांचे नियमन आणि व्यवस्थापन करण्यासाठी राज्य शासनाने सर्वंकष कायदा करण्याची गरज आहे. ही खाजगी रुग्णालये लुटारु बनली आहेत. सर्वसामान्य लोकांचे शोषण आणि त्यांची आर्थिक लूट ही रुग्णालये करीत आहेत. दरपत्रके ठरलेली आहेत.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ KTG/ 11:25

प्रा.सुरेश नवले............

त्यामुळे महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागामध्ये, विशेषत: शहरी भागात काम करणारी जी खाजगी रुग्णालये आहेत त्यांची दरपत्रके निश्चित करण्याच्या दृष्टीने एखादा कायदा करावा. राज्य शासनाला तो अधिकार नसेल तर केंद्र शासनाला कायदा तयार करण्यासाठी विनंती करणारा प्रस्ताव पाठवावा अशी मी या निमित्ताने आग्रहाची विनंती राज्य शासनाला करीत आहे.

सभापती महोदय, अंगणवाडी व्यवस्थेमध्ये सुधारणा होणे गरजेचे आहे. लहान बालके अंगणवाड्यांपर्यंत येत नाहीत, अशा सर्व बालकांना आयसीडीएस मार्फत योजनांचा लाभ पुरविणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे. सर्वसामान्य माणसाच्या राजकारणी व्यक्तिविषयीच्या भावना तितक्याशा चांगल्या नाहीत. सत्ताधारी वा विरोधी पक्षातील राजकारणी लोक म्हणजे दुर्लक्षित करण्यासारखे लोक आहेत असे ते समजतात. राजकारणी माणूस कसा आहे याविषयी विदर्भातील एक कवी असे म्हणतो की......

आम्ही मेंढरं मेंढरं, यावं त्यानं हाकलावं
पाचा वर्षाच्या बोलीनं, होतो आमुचा लिलाव
बाप लेक गाजोतात, माय लेक गाजोतात
आमच्याच कातडयाचं, ढोल सारे वाजोतात
रवी लावता लावता, घाम गळते गल्लीत
हाती ताकाचंच पाणी, लोणी लुटते दिल्लीत.

सभापती महोदय, या कविने ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्या अतिशय महत्वाच्या आहेत. या भावना बदलविण्याच्या दृष्टीने राज्य शासनाच्या मंत्री मंडळातील माननीय मंत्री प्रा.वर्षा गायकवाड आणि श्री.बबनराव पाचपुते यांनी प्रयत्न केले पाहिजेत. माननीय मंत्री प्रा.वर्षा गायकवाड यांचे भाग्य उज्ज्वल आहे. राज्यमंत्री पदावरुन कॅबिनेट मंत्री म्हणून त्यांची बढती झाली आहे. उंच्र पदावर जाऊन बसल्या आहेत. त्याच पध्दतीने त्यांनी या बालकांना निरोगी आयुष्य मिळवून देण्याचा प्रयत्न करावा एवढीच विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

---------------

..2...

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सर्वश्री हेमंत टकले व इतर माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, राज्याचा सुवर्ण महोत्सव साजरा करीत असताना स्वातंत्र्य मिळून 62 वर्षे उलटली तरी सुध्दा मागील अनेक वर्षाच्या कामकाजातील विषय पत्रिका पाहिल्यानंतर राज्यातील कुपोषित बालकांचे प्रमाण आणि भेडसावत असलेली गंभीर समस्या यावर सावतत्याने चर्चा झाल्याचे दिसून येते. परंतु याबाबत अपेक्षेप्रमाणे कुठल्याही प्रकारची सुधारणा झालेली नाही. कालपासून सुरु झालेली ही चर्चा आहे. महाराष्ट्रामध्ये असलेली वास्तवता यावरुन आपल्याला पहावयास मिळते. म्हणून महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन काम करीत असलेल्या महाराष्ट्र सरकारचे स्वप्न साकार करण्याचा धोरणांच्या माध्यमातून, योजनांच्या माध्यमातून शासनाकडून प्रयत्न होत आहे. तळमळीने, जिद्दीने वेगवेगळ्या योजना तयार केल्या जातात, योजना जाहीर केल्या जातात. हजारो कोटी रुपये प्रत्येक वर्षी या योजनांच्या अंमलबजावणीसाठी उपलब्ध करुन दिले जातात. संबंधित यंत्रणांच्या अधिकाऱ्यांकडे योजना राबविण्यासाठी तिजोरीची चावी दिली जाते आणि ज्यावेळेला या सर्व योजनांचा आणि खर्चाचा, अपेक्षित परिणामांचा आढावा घ्यायचा प्रयत्न करतो.............

नंतर जी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे ........

त्यावेळेस लक्षात येते की, शासन तळमळीने योजना तयार करते, इतरांच्या तसेच प्रगतीशील व विकसनशील भागाच्या ताटातून काही निधी काढून आदिवासी, ओबीसी, एस.सी. अथवा एनटी समाजासाठी हजारो कोटीचा निधी वर्ग करते.....

**उप सभापती** : ही चर्चा 12.45 वाजेपर्यंत संपवावयाची आहे. तसेच अजून दोन तीन सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे व त्यानंतर दोन मंत्री महोदयांना उत्तरासाठी प्रत्येकी अर्धा तास लागणार आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांना आणखी बोलावयाचे असल्याने सदस्यांनी आपले मुद्दे थोडक्यात मांडावेत.

श्री. रमेश शेंडगे : महोदय, असा निधी वर्ग केल्यानंतर त्यातून ज्या ज्या योजना आदिवासी व इतर मागास भागासाठी शासन राबविते त्याचा आढावा घेतला तर या सर्व दुर्गम भागाचा विकास मात्र झालेला पहायला मिळत नाही. परिणामी शेकडो व हजारो कुपोषित बालके प्रत्येक वर्षी मृत्युमुखी पडतात. सभागृहातील सन्माननीय सदस्य, कार्यकर्ते किंवा समाजसेवी संस्था केवळ त्याकडे हताशपणे पाहण्यापलिकडे व हळहळण्याच्या पलिकडे काहीही करु शकत नाही. त्यामुळे मनात एक प्रकारची चीड निर्माण होत असते. आदिवासी विकास विभाग तसेच महिला व बालकल्याण विभाग, आरोग्य विभाग अशा सर्व विभागांमार्फत आजही हजारो कोटीचा निधी खर्च होताना आपण पाहतो परंतु अपेक्षित असे यश मात्र येत नाही. आजही कुपोषणाच्या प्रमुख कारणांचा विचार केला तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, दुर्गम, डोंगराळ तसेच आदिवासी भागात अंधश्रध्देचे प्रमाण फार मोठे आहे. कमी वयात होणारे लग्न व त्यानंतर अपत्य, या भागातील जीवन पध्दतीवर मांत्रिकांचा प्रभाव, निरक्षरता, आरोग्याबद्दलचे अज्ञान, आहारातील जीवनसत्त्व व प्रथिनांचा अभाव, माता व बालसंगोपनातील त्रुटी व दोष, वनविषयक कायद्याचे अज्ञान, आरोग्य व रोजगाराचा तुटवडा अशा सर्व गोष्टींकडे अपेक्षेप्रमाणे लक्ष दिले जात नाही. म्हणून मी अशी विनंती करणार आहे की, आज राज्यात 300 पेक्षा जास्त योजना आदिवासी व दुर्गम भागातील कुपोषण रोखण्यासाठी व त्यातून या भागातील लोकांना बाहेर काढण्यासाठी तयार केल्या आहेत. अशा योजनांची अमलबजावणी किंवा त्यांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत जात नाही हीच खरी शोकांतिका आहे. आदिवासी भागात इतर समाज असेल अथवा गवळी समाज सुध्दा

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ KTG/

श्री. रमेश शेंडगे ...........

डोंगरातच राहतो, काठेवाडी, बलाई, कोरकू, गढरिया यासारखे समाज सुध्दा या भागात राहतात. हे लोक गाई-म्हशी व शेळ्या-मेंढया चारतात तसेच वेगवेगळी जनावरे सांभाळतात. या निमित्ताने हे लोक जंगलातून भटकंती करीत असताना त्यांना जेवढी आवश्यक जीवनसत्त्व व प्रथिनयुक्त आहार मिळणे आवश्यक आहे तेवढा मिळत नसल्यामुळे कुपोषणाचे प्रमाण जास्त आहे. हे प्रमाण कमी करावयाचे असेल तर त्याचा सर्वंकष विचार करायला पाहिजे. मला मुद्दाम सांगितले पाहिजे की, अशा प्रकारे हजारो कोटी रुपये खर्च करुन आदिवासी भागातील मुलांसाठी शासकीय आश्रमशाळा बांधतो व त्यावर खर्च करतो पण प्रत्यक्ष भेट दिल्यानंतर केवळ लहान बालकेच नव्हे तर मोठी मुले सुध्दा कुपोषणाने आजारी पडलेली दिसतात. काही योजनांची माहिती आपण माहितीच्या अधिकाराखाली घेतल्यानंतर तसेच त्याची तपासणी केली असता एखादी योजना यशस्वी झालेली दिसेल. परंतु गोंदिया जिल्ह्यातील आमगांव व सालेकसा येथील आदिवासी पट्टयात देवरी प्रकल्प अधिकाऱ्याच्या माध्यमातून तपासणी करण्यासाठी गेलो असता तेथील अधिकारी आपल्यासोबत एक-दोन किलोमीटर येतात आणि सांगतात की, साहेब, आता पुढे नक्षलवाद्यांचा प्रभाव आहे त्यामुळे तिकडे जाता येणार नाही, अशी भीती घालतात. दुसऱ्या बाजूने आपण सांगितले की, या भागातील योजनेवर 19-20 कोटी रुपये खर्च झालेला आहे, म्हणून त्या योजनेची अमलबजावणी झाली किंवा नाही हे पाहण्यासाठी जाण्याचा प्रयत्न केला असता त्या भागातील अधिकारी देखील असेच सांगून प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करता येऊ नये असाच प्रयत्न करतात. काही वेळा तर पोलीस यंत्रणा सुध्दा अशाच प्रकारची कारणे सांगून जागेवर जाण्यासाठी अप्रत्यक्षरित्या मज्जाव करीत असतात. अशा प्रकारे हजारो कोटी रुपये आपण आदिवासी व दुर्गम भागाच्या विकासासाठी खर्च करतो पण त्याची पाहणी करण्यासाठी, तपासणी करण्यासाठी जाता येत नाही.........

यानंतर श्री. जुन्नरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे ....

आणि म्हणून या चर्चेच्या निमित्ताने मला असे सुचवावयाचे आहे की, भौतिक दृष्टया दुर्गम आणि अतिदुर्गम असे जे भाग आहेत त्या ठिकाणी शासकीय योजनांच्या अंमलबजावणीसाठी उपविभाग पाडण्यात यावेत व योजना तयार झाल्यानंतर संपूर्ण योजनांची माहिती प्रत्येक वर्षी जनतेला व पत्रकारांना दिली गेली पाहिजे.

सभापती महोदय, आरोग्य रुग्णालयात फिरती प्रयोग शाळा व फिरत्या "क्ष" किरण यंत्राचा समावेश असणे आवश्यक आहे. तसेच या रुग्णालयात बालरोग व स्त्रीरोग तज्ज्ञ असणे सुध्दा आवश्यक आहे. महिलेने बाळाला जन्म दिल्यानंतर बाळाला स्तनपान कसे द्यावे याची माहिती माझ्या आदिवासी भगिनीला नसते. काही आरोग्य केंद्रात स्तनपान केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे. परंतु राज्यामध्ये ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारच्या स्तनपान केंद्राची आवश्यकता आहे अशा ठिकाणी स्तनपान केंद्राची स्थापना करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मेळघाटमध्ये जन्मदराचे प्रमाण अधिक असल्यामुळे त्या ठिकाणी बालमृत्युचे प्रमाण सुध्दा अधिक आहे. कमी वयात लग्न होणे, शारीरिक वाढ होण्याअगोदर अपत्य प्राप्ती होणे, कुटुंब नियोजनाचा अभाव असणे, दोन अपत्यांमध्ये अंतर असणे तसेच पहिली ते चवथ्या स्थितीत असणा-या कुपोषणाची माहिती अधिका-यांनी घेऊन त्यावर योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे. मला खात्री आहे की, आदरणीय आदिवासी विकास मंत्री श्री. बबनराव पाचपुते व आदरणीय महिला व बालविकास मंत्री श्रीमती वर्षा गायकवाड यांना या सर्वांची कल्पना आहे. आपण आदिवासी व महिला व बालविकासासाठी हजारो कोटी रुपये खर्च करीत असतो. शासन तळमळीने योजना आखत असते व करोडो रुपये खर्च करीत असते परंतु प्रशासन व अधिकारी मात्र योग्य प्रकारे काम करीत नसल्यामुळे या योजनांचा फायदा खालपर्यंत जात नाही. अधिका-यांवर आपण जोपर्यंत वचक निर्माण करीत नाही तोपर्यंत आपण कितीही योजना केल्या तरी त्याचा फायदा गोरगरीब जनतेला होणार नाही. त्यामुळे या योजनांचा फायदा तळापर्यंत पोहचण्यासाठी यासाठी आपण प्रयत्न करावा अशी विनंती करतो व माझे विचार येथेच थांबवतो.

----------------

यानंतर हिंदी भाषण श्री. शर्मा यांच्याकडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जमा (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, बच्चों के कुपोषण के विषय पर इस सभागृह में बहुत चर्चा हुई है और इस चर्चा के दौरान कुछ अच्छे सुझाव सामने आए हैं. मैं भी अपनी तरफ से सरकार को कुछ सुझाव देना चाहता हूँ.

सभापति महोदय, पिछले कुछ सालों में महाराष्ट्र शासन और केन्द्र शासन द्वारा बहुत सारा पैसा दिया गया है, फिर भी हम कुपोषण पर रोक नहीं लगा सके हैं. इसके बारे में टाइम बाउन्ड जांच होनी चाहिए, इस बात की जिम्मेदारी तय होनी चाहिए कि किस वजह से यह स्कीम फेल हुई है. महाराष्ट्र में कुपोषण कम नहीं हुआ है, बल्कि बढ़ा है, इसलिए इस बारे में जांच होनी चाहिए. जब हम अपने देश या दुनिया में बाहर जाते हैं तो हमारा सिर शर्म से झुक जाता है कि हम महाराष्ट्र जैसे प्रगतिशील राज्य में किसानों की आत्महत्या नहीं रोक पाए हैं, कुपोषण को नहीं रोक पाए हैं. यह बात सही है कि कुपोषण की समस्या केवल महाराष्ट्र में ही नहीं है, बल्कि यह समस्या पूरे देश में है और अन्तर्राष्ट्रीय स्तर पर भी यह समस्या हमें दिखाई देती है. हमारे देश में और अन्तर्राष्ट्रीय स्तर पर कुपोषण को रोकने के लिए जितने भी कदम उठाए गए हैं, उनका पॉजिटिव संकेत आया है और वहां पर सुधार हुआ है, लेकिन महाराष्ट्र में नेगेटिव संकेत है. महाराष्ट्र में कुपोषण में बढ़ोतरी हुई है.

सभापति महोदय, मेरे पास बहुत से आंकड़े हैं, एन.जी.ओ. की रिपोर्ट है, एनसायक्लोपीडिया की सन् 2000 से लेकर सन् 2008 तक की लेटेस्ट रिपोर्ट है, जिसमें ग्लोबल, हमारे देश और महाराष्ट्र का जिक्र है. केन्द्र में एक न्यूट्रीशन पॅनल है, जिसके प्रमुख हमारे प्राइम-मिनिस्टर हैं. इस पॅनल की रिपोर्ट हमारे पास है. उन्होंने यह कहा है कि अफ्रीकन देशों में भी जहां कुपोषण है, वह भी हमसे बहुत आगे निकल गए हैं और हम उनसे काफी पीछे हैं. उसके 2-3 कारण हैं. मैं बाल विकास मंत्री और आदिवासी विकास मंत्री से अनुरोध करुंगा कि वेबसाइट से इस पॅनल की रिपोर्ट मंगाए. यह लेटेस्ट रिपोर्ट है. इसमें कुछ डायरेक्शन्स दिए हैं और ये डायरेक्शन्स महाराष्ट्र सरकार को फोलो करने चाहिए. हमारा इन्टीग्रेटेड चाइल्ड डिवलपमेंट का प्रोग्राम है, हमारा मिड-डे मील का प्रोग्राम है. लेकिन ये प्रोग्राम 4 साल के बच्चे जो स्कूल जाते हैं, उनके लिए शुरु होते हैं. लेकिन जो गर्भवती महिलाएं कुपोषण का शिकार होती है, 2 वर्ष तक की उम्र के बच्चे कुपोषण का शिकार होते हैं, इनके बारे में प्राइम-मिनिस्टर पॅनल ने बहुत सारी योजनाएं बताई हैं. उनका मेडीकल केयर होना चाहिए. बच्चो को स्तनपान

. . . H 3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. सय्यद जमा

कराने के लिए माँ को ताकत देनी चाहिए, ताकि वे अपने बच्चों को दूध पिला सकें. इस कार्य के लिए हम अच्छे एन.जी.ओ. को शामिल कर सकते हैं. ग्रामीण क्षेत्र में और विशेष रुप से आदिवासी क्षेत्र में न्यूट्रीशन के बारे में लोगों को मालूम नहीं है कि उन्हें कितनी कैलोरी लेना है, कितनी प्रोटीन लेनी है, इस बारे में गांवों तक जानकारी जानी चाहिए.

सभापति महोदय, कुपोषण की समस्या केवल आदिवासी विभाग तक सीमित नहीं है, बल्कि यह समस्या ग्रामीण विभाग और शहरी विभाग में भी है. गडचिरोली जैसे आदिवासी जिले में कुपोषण का प्रमाण कम है. नंदूरबार, धुलै और मेलघाट में यह समस्या बड़े प्रमाण में है.

सभापति महोदय, मैं आपका ज्यादा समय न लेते हुए यह कहना चाहता हूँ कि प्राइम-मिनिस्टर पेनल ने जो उपाय सुझाए हैं, उनके बारे में महाराष्ट्र सरकार को विचार करना चाहिए. सब से पहले तो महाराष्ट्र के मुख्यमंत्री की अध्यक्षता में एक पेनल बनाना चाहिए. यह प्रश्न कई विभागों से संबंधित है. इसमें आदिवासी विभाग का संबंध है, महिला एवं बाल कल्याण विभाग का संबंध है, हमारे समाज कल्याण विभाग का संबंध है. इसमें कई विभागों का संबंध है, लेकिन इन विभागों का इंटीग्रेटेड एप्रोच नहीं है. हर मंत्रालय के अलग अलग बजट हैं. मैं यह कहना चाहता हूँ कि मुख्यमंत्री की अध्यक्षता में एक पेनल बनना चाहिए और उसको टाइम बाउन्ड कार्यक्रम बनाना चाहिए. अगर हम टाइम बाउन्ड कार्यक्रम के द्वारा इस समस्या को हल नहीं कर पाते हैं तो इसकी जिम्मेदारी तय होनी चाहिए, चाहे वह सरकारी अधिकारी हो, चाहे वह पॉलिटिकल लीडर और चाहे वह एनस.जी.ओ. हो. अगर हम टाइम बाउन्ड कार्यक्रम के द्वारा कुपोषण की समस्या को हल नहीं कर सकते हैं तो इसके बारे में जिम्मेदारी तय होनी चाहिए.

सभापति महोदय, जो लोग इसमें भ्रष्टाचार करते हैं, लोग अगर बच्चों के दूध और दवा का पैसा भी खा लेते हैं तो ऐसे लोगों के लिए फास्ट ट्रेक कोर्ट बनाकर उनको फाँसी की सजा देनी चाहिए. हमारा सभी दल के लोगों से अनुरोध है कि बाकी कामों के लिए तो हम जॉइंट कमेटी की मांग करते हैं लेकिन बच्चों का कुपोषण रोकने के लिए हम लोग जॉइंट कमेटी की मांग क्यों नहीं करते हैं. विधानसभा और विधानपरिषद के माननीय सदस्यों की कमेटी जांच करेगी कि यह कार्यक्रम क्यों फेल हुआ, किसने पैसे खाए, किसने भ्रष्टाचार किया. भ्रष्टाचार को रोकने के लिए हम अलग से कानून क्यों नहीं बना सकते हैं. हम हर जिले के कलक्टर को जिम्मेदार

. . . H 4





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्री. सय्यद जमा

क्यों नहीं बना सकते हैं ? ये सारे पैसे एक जगह आने चाहिए और एक जगह से खर्च होने चाहिए, हम कलक्टर की जबाबदारी क्यों नहीं तय कर सकते हैं? हमारी बहुत तीव्र भावना है कि महाराष्ट्र जैसे प्रगतिशील राज्य में अगर हम कुपोषण की समस्या को हल नहीं कर पाएंगे तो यह हमारे लिए बहुत शर्म की बात है. इसके लिए हमारे शासन, प्रशासन, हमारे राजनैतिक दलों, एन.जी.ओ. को जो भी करना है, इन सब को मिलाकर कदम उठाने चाहिए और टाइम बाउन्ड कार्यक्रम बनाना चाहिए, ऐसा मेरा अनुरोध है.

. . . . . . .

. . . भाषण पूर्ण, नंतर अजित शिगम.

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड उषा दराडे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले आणि अन्य सदस्यांनी एका महत्वाच्या व सामाजिक जिव्हाळ्याच्या प्रश्नावर चर्चा घडवून आणली त्याबद्दल मी त्यांचे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन करते.

सभापती महोदय, भारत देशाची अर्थव्यवस्था ही भांडवली आहे. पश्चिम बंगाल सारख्या साम्यवादी विचाराच्या राज्याला सुध्दा जगातील गुंतवणूक स्वत:च्या राज्यात आणण्यापासून वंचित ठेवता आले नाही. केरळ राज्याला सुध्दा तसे करता आले नाही. तेव्हा ही भांडवली अर्थव्यवस्था आपला अविभाज्य घटक झालेला आहे.

भांडवली अर्थव्यवस्थेचा एक गुण आहे. यामध्ये आर्थिक दरी वाढत असते. गरीब आणि श्रीमंत यांच्यामध्ये दरी निर्माण होत राहते. त्याचे परिणाम आपण भोगत आहोत. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे झाली, परंतु आपण गावकुसा बाहेरील दलित वस्ती गावामध्ये आणण्यात असमर्थ ठरलो. स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे झाली तरी आदिवासी हा आदिवासीच राहिला आहे. आपण विकासाच्या योजना आखत असताना एकूण बजेटच्या 9 टक्के निधी आदिवासी विभागाला देतो. हे जरी खरे असले तरी ज्या प्रमाणात निधी मिळतो त्या प्रमाणात त्याचा विनियोग होताना दिसत नाही. ब्युरोक्रसीवर कोणताही वचक राहिलेला नाही, ही गोष्ट उघड आहे. कोणत्याही गोष्टीची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने राजकारण्यांच्या मनामध्ये जशी राजकीय इच्छाशक्ती पाहिजे, तशी शासनाच्या सेवेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्येही सामाजिक इच्छा शक्ती असली पाहिजे. परंतु त्यांच्यामध्ये ही सामाजिक इच्छाशक्ती नाही.

सभापती महोदय, घटनेमध्ये दुरुस्ती करुन 6 ते 14 वयोगटातील मुलांना शिक्षणाचा मूलभूत अधिकार दिला. 0 ते 6 वयोगटातील मुलांना सुध्दा शिक्षणाचा मूलभूत अधिकार दिला पाहिजे अशी विनंती महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारला केली पाहिजे.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ KTG/ प्रथम श्री.अजित शिगम 11.45

ॲड.उषा दराडे ...

जन्मणारे मूल जर मृत्युमुखी पडत असेल तर ते लोकशाहीचे मोठे अपयश आहे. एका बाजूला भारत हा महासत्ता बनण्याचे स्वप्न पहात आहे आणि दुसरीकडे मात्र कुमारी गर्भवती मातांना आपण संरक्षण देऊ शकत नाही,आदिवासी भागामध्ये मुलींची लहान वयामध्ये लग्ने होतात. त्यामुळे 12 मे 14 वर्ष वयाच्या मुलींना मुले होतात. जगावयाचे कसे आणि कपडे कसे घालावयाचे हे त्या 12 - 14 वर्षाच्या मुलीना माहीत नसते परंतु त्यांना मुले होत असतात. आदिवासी भागातील व्यक्तींना आपण खायला पुरेसे धान्य देऊ शकत नाही डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांना अशा प्रकाराचे राज्य नको होते. महात्मा ज्योतिबा फुले यांचे असे स्वप्न नव्हते विरोधी पक्षाची व्यक्ती असो वा सत्ताधारी पक्षाची व्यक्ती असो . राजकारणात काम करीत असलेल्या व्यक्ती स्वत:ची घराणेशाही सांभाळण्यासाठी मोठी इच्छाशक्ती दाखवत असतात. त्या व्यक्तीचे वय 60 वर्षाचे झ ाले असले तरी त्यांना तरुण आणि तडफदार नेता म्हटले जाते एखादी व्यक्ती 80 वर्षाची झाली तरी त्याला सत्ता सोडावी असे वाटत नाही.अशा परिस्थितीमध्ये मात्र सामान्य माणसाला जगण्याचा अधिकार दिला जात नाही. म्हणूनच राजकीय आणि सामाजिक इच्छाशक्ती ठेवून समाज परिवर्तनाच्या लढयामध्ये विरोधी पक्षाच्या आणि सत्ताधारी पक्षाच्या लोकांनी एकत्र यावे त्याचबरोबर नोकरशाहंनी देखील त्याची इच्छाशक्ती बदलावी आणि आदिवासीसुध्दा माणसेच आहेत याचे दर्शन घडवून द्यावे एवढे बोलून मी माझे भाषण संपविते. धन्यवाद

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड (महिला व बाल विकास मंत्री):सभापती महोदय, सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी कुपोषणाच्या विषयाच्या संदर्भात नियम 260 अन्वये जो प्रस्ताव आणला आहे त्याला उत्तर देण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावावर जवळजळ 11 सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले आणि शासनाला अत्यंत मौलिक अशा सूचना केल्या आहेत. त्याबद्दल सर्व प्रथम मी त्यांचे आभार मानते. सन्माननीय सदस्य श्री हेमंत टकले यांनी हा प्रस्ताव आणल्याबद्दल मी त्यांचे देखील आभार मानते.सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य असोत अथवा विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य असोत दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना असे वाटत होते की, कुपोषण नाहीसे झाले पाहिजे. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना सारख्या होत्या. राजकारण बाजूला ठेवून सर्वांनी समाजकारणातून या प्रश्नाकडे पाहिले व सकारात्मक भूमिका मांडली म्हणून मी त्यांचे आभार मानते.

सभापती महोदय, सर्व प्रथम मी आपल्याला सांगू इच्छिते की, शासन म्हणून काम करीत असतांना आम्ही सुध्दा या प्रश्नाविषयी संवेदनशील आहोत. या विषयावरील चर्चा ऐकत असतांना आम्ही सुध्दा आत्मचिंतन करण्याचा प्रयत्न केला होता तसेच अंतर्मुख होऊन विचार करीत होतो. राज्यातील कुपोषण नाहीसे करण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत या दृष्टीकोनातून काम करण्यास देखील आम्ही येथून पुढच्या काळात अधिक प्रयत्न करणार आहोत या चर्चेच्या निमित्ताने सन्माननीय सदस्यांनी ज्या काही सूचना केल्या आहेत त्यांचा अंतर्भाव निश्चितपणे विविध उपाययोजनांमध्ये पुढच्या काळात करण्यात येणार आहे. या विषयावर चर्चा करीत असतांना मला हे सांगितले पाहिजे की कोणत्याही एका विशिष्ट विभागाशी हा विषय निगडीत नाही, विविध विभागाशी संबंधित असा हा विषय असून त्या दृष्टीने येथे चर्चा झाली आहे.नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाचा विषय पाहिला तर आपल्याला असे दिसून येईल की, अर्भक मृत्यू आणि बालमृत्यू हा विषय सार्वजनिक आरोग्य विभागाकडे आहे, त्याचबरोबर कुपोषणाचा विषय महिला व बाल विकास विभागाकडे आहे. मी सर्वप्रथम सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अंतर्गत येणा-या अर्भक मृत्यूदरासंबंधी आणि बालमृत्यू दरासंबंधीची माहिती देणार आहे.सरासरी

3..



VTG/ KGS/ KTG/ प्रथम श्री.अजित शिगम 11.45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रमाण जर आपण पाहिले तर आपल्याला असे दिसून येईल की महाराष्ट्र राज्यात 2010-11 मध्ये 9 लाख 8 हजार 933 मुले जीवंत जन्माला आली त्यापैकी 16 हजार 921 अर्भकांचा मृत्यू झाला आहे आणि 20 हजार 921 बालकांचा मृत्यू झाला आहे. सरासरी प्रमाण जर आपण पाहिले तर आपल्याला असे दिसून येईल की, राज्याचा अर्भक मृत्यूचा दर हा 33 टक्के आहे.2000 सालाच्या आकडेवारीबरोबर जर आपण 2009 सालच्या आकडेवारीची तुलना केली तर असे दिसून येईल की, 2001 मध्ये भारताचा अर्भक मृत्यूचा दर 66 टक्के होता आणि महाराष्ट्राचा 45 टक्के दर होता तो दर आता कमी होऊन 2009 मध्ये भारताचा हा दर 53 टक्के आणि महाराष्ट्राचा दर 33 टक्के इतका झालेला आहे.अर्भक मृत्यूचे प्रमाण कमी झालेले असले तरी ही बाब निश्चितच भूषणावह नाही असे मला सांगावयाचे आहे.2008-2009 मध्ये 27 हजार 603 अर्भकांचा मृत्यू
झाला होता आणि 33 हजार 12 बालकांचा मृत्यू झाला होता. 2010 च्या ऑक्टोबरपर्यत 16 हजार 921 अर्भकांचा मृत्यू झाला होता आणि 20 हजार 631 बालकांचा मृत्यू झाला होता . सन्माननीय सदस्य श्री अरुण गुजराथी यांनी नंदूरबार जिल्हयाचे उदाहरण दिले त्याचबरोबर इतरही सन्माननीय सदस्यांनी काही जिल्हयांचा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे मी विविध जिल्हयाची माहिती आणली असून ठाणे जिल्हयात 2005-2006 मध्ये एकूण बालमृत्यूची संख्या 1863 होती आता 2009-2010 मध्ये ही संख्या 1 हजार 80 पर्यत कमी झालेली आहे. औरंगाबाद जिल्हयामध्ये 376 अर्भकांचा मृत्यू झाला होता आणि बाल मृत्यूची संख्या 463 होती. अशी नोंद ऑक्टोबर महिन्यापर्यत झालेली आहे.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री रमेश शेंडगे )**

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड....

अमरावती जिल्हयामध्ये सन 2005-06 मध्ये 554 बालमृत्यूंची नोंद झाली होती व सन 2009-10 मध्ये 510 बालमृत्यूंची नोंद झाली आहे. नंदूरबार जिल्हयात सन 2005-06 मध्ये 1893 बालमृत्यू झाले होते तर सन 2009-10 मध्ये 1655 बालमृत्यू झाले आहेत. नाशिकमध्ये सन 2005-06 मध्ये 1091 बालमृत्यू झाले होते तर सन 2009-10 मध्ये 896 बालमृत्यू झाले आहेत. त्याचप्रमाणे यवतमाळ जिल्हयात सन 2005-06 मध्ये 443 बालमृत्यू झाले होते तर सन 2009-10 मध्ये 996 बालमृत्यू झाले आहेत. गडचिरोली जिल्हयात सन 2005-06 मध्ये 525 बालमृत्यू झाले होते तर सन 2009-10 मध्ये 296 बालमृत्यू झाले आहेत. एकंदरीत सन 2009-10 ची आकडेवारी पाहिली तर हे अर्भक व बालमृत्यूंचे प्रमाण कमी झाले आहे. तरीसुध्दा अगोदर सांगितल्याप्रमाणे शासनाला ही बाब शोभादायक नाही. 15 आदिवासी जिल्हयांमध्ये नव संजीवन योजना आहे. सन 2005-06 मध्ये अर्भक व बालमृत्यू यांची संख्या 7,690 होती, व सन 2009-10 मध्ये 3,185 इतकी आहे. आदिवासी विभागामध्ये या योजनेच्या माध्यमातून अर्भक व बालमृत्यूंचे प्रमाण कमी झाले आहे. बालमृत्यू होण्याची जी अनेक कारणे आहेत त्याबाबत माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत हे डॉक्टर असल्यामुळे त्यांनी माहिती सादर केली आहे. बालमृत्यूचे कारण हे केवळ कुपोषण आहे असे नाही तर त्याव्यतिरिक्त जंतूसंसर्ग झाला असेल तर त्यामुळे बालकांचे मृत्यू होतात, त्याचप्रमाणे अर्भकाचे वजन कमी असेल तर त्यामुळे मृत्यू होतात, प्रिमॅच्युअर डिलिव्हरी असेल तर, श्वसनाचे विकार किंवा हृदय विकार असेल तर, बाळंतपणाच्या वेळी गुंतागुंत निर्माण झाली असेल तर, अतिसारामुळे किंवा अस्थि व्यंग असेलतर, अपघात इत्यादी कारणांमुळे बालमृत्यू होतात. याकरिता सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत महिला व बालकांसाठी ज्या काही योजना आहेत...

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, माननीय मंत्री महोदया बाल मृत्यु की दर के बारे में जानकारी दे रही है. हमने कुपोषण से होने वाली मृत्यु के बारे में प्रश्न उपस्थित किया था. अगर माननीय मंत्री महोदया के पास पिछले 5 साल के तुलनात्मक आंकड़े हों, जिससे यह पता चल सके कि कुपोषण की स्थिति में कितना सुधार हुआ है तो वह अधिक उपयोगी होगा.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मी आता याठिकाणी अर्भक व बालमृत्यूचे जे प्रमाण आहे त्याची माहिती देत होते. कुपोषणामुळे होणारे मृत्यू आहेत त्यावर मी नंतर बोलणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत महिलांसाठी चांगल्या योजना घेऊन आम्ही आपणा समोर येत आहोत. यामध्ये महिला व बालकांसाठी ज्या योजना आणल्या आहेत त्यामध्ये मातृत्व योजनेच्या माध्यमातून गरोदर महिलेची डिलिव्हरी होते, त्यावेळी तिला 400 रुपये रोख देतो आणि 400 रुपयांची औषधे देतो. सभापती महोदय, तिला औषधे कोणत्या प्रकारची देतो असे विचारण्यात आले. माझ्या माहितीप्रमाणे आपण त्या मातेला फॉलिक ॲसिडच्या गोळया सहा महिन्यांसाठी देतो. त्याचप्रमाणे कॅल्शियम आयर्नच्या 30 एम.जी. च्या गोळया देतो, जंतनाशकाच्या गोळया देतो. ही औषधे उपलब्ध असलेल्या स्थानिक औषध भांडारामधून देतो. याठिकाणी जननी सुरक्षा योजनेबाबत चर्चा करण्यात आली. त्या योजनेच्या माध्यमातून स्थानिक संस्थेमध्ये त्या महिलेने प्रसूत व्हावे...

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझ्या भाषणामध्ये मी असा उल्लेख केला होता की, जी औषधे देण्यात येतात ती 400 रुपयांची नसतात...

**तालिका सभापती** : मंत्रिमहोदयांचे भाषण पूर्ण झाल्यानंतर आपण प्रश्न विचारावा.

प्रा. वर्षा गायकवाड : या जननी सुरक्षा योजनेंतर्गत त्या महिलेने खाजगी संस्थेमध्ये प्रसूत व्हावे जेणेकरुन तिची प्रसूती सुरक्षित व्हावी आणि सशक्त अर्भक जन्माला यावे यासाठी आज सुध्दा शहरी आणि ग्रामीण भागामध्ये गरोदर महिलेला रोख पैसे दिले जातात. माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी साहेबांनी दाई बैठक योजनेंतर्गत किती बैठका आयोजित केल्या असे विचारले होते. त्यांच्या माहितीकरिता मी सांगू इच्छिते की, सन ऑक्टोबर 2010 पर्यंत 2339 दाई बैठका आयोजित केल्या आहेत. त्या माध्यमातून गरोदर महिलेची प्रसूती कशी केली पाहिजे, अर्भकाची काळजी कशी घेतली पाहिजे याचे दाईंना प्रशिक्षण दिले जाते. माहेरघर योजनेच्या माध्यमातून महिलेला चार दिवसात संस्थेमध्ये आणले जाते. त्या योजनेचे उद्दिष्ट असे आहे की, महिला गरोदर असते त्यावेळी तिला चांगल्या सुविधा मिळाल्या पाहिजेत. तिची डिलिव्हरी आसपासच्या संस्थेत झाली पाहिजे. जेणेकरुन अर्भक मृत्यू व बालमृत्यूचे प्रमाण कसे कमी करता येईल यासाठी योजना तयार केली आहे.

(यानंतर श्रीमती. थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ D/ KTG/ ST/ प्रथम श्री. सरफरे.... 11:55

प्रा. वर्षा गायकवाड...

या दृष्टिकोनातून या योजना बदललेल्या आहेत.

सभापती महोदय, बालकांसाठी विविध योजना केलेल्या आहेत. त्यांचे नियमित लसीकरण झाले पाहिजे. अंगणवाडी सेविकांना लहान मुलांचा आजार ओळखता यावा या दृष्टिकोनातून त्यांना सुध्दा आय.एम.एन.सी. व आय.वाय.सी. यांच्या माध्यमातून प्रशिक्षण दिले जाते. या व्यतिरिक्त बालकांची बालरोग तज्ज्ञांकडून चाचणी केली जाते. सन्माननीय सदस्यांनी जेव्हा पाऊस पडतो तेव्हा दुर्गम भागात, आदिवासी पाडयात कोणते आजार निर्माण होतात त्याचे दुष्परिणाम त्या मुलांवर काय होतात या संदर्भात सांगितले आहे. सभापती महोदय, ग्रामीण बाल विकास शिबिर याच्या अंतर्गत एकूण 13 कोटी 43 लाख रुपयांचे अनुदान 33 जिल्हयामध्ये वितरित करण्यात आलेले आहे. विविध तऱ्हेची शिबिरे आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून घेण्यात आली आहेत. कुपोषणाच्या बाबतीत जी कार्यवाही करण्यात आली, त्यामध्ये आयसीडीएसचा प्रोग्रॅम महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून आणि आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून राबविला जातो. कुपोषणामुळे बालमृत्यूचे प्रमाण किती आहे असे सन्माननीय सदस्यांनी विचारलेले आहे. मी मेळघाटचे आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग यांच्या कार्यालयातून रिपोर्ट आणलेला आहे. त्यांनी मेळघाटच्या बाबतीत असे म्हटलेले आहे की, एप्रिल ते सप्टेंबर,2010 या कालावधीत 289 बालकांचा मृत्यू झालेला आहे. या रिपोर्टमध्ये असेही लिहिलेले आहे की, कुपोषणामुळे ही बालके मृत्यू पावली नसून कुपोषणासंबंधी अन्य आजार त्यांना झाल्यामुळे ते मृत्यू पावले आहेत. सभापती महोदय, हे बालमृत्यू प्रत्यक्ष कुपोषणामुळे झालेले नसून त्यांना दुसरे सुध्दा आजार झालेले होते. तसेच या रिपोर्टमध्ये असे लिहिले आहे की,लो बर्थ वेट, हायपोप्लेसमिया, हायपोथेर्मिया,प्रि-मॅच्युअर डिलिव्हरी, स्पॅटिसमिया,आर.टी.आय.,न्युमोनिया, ॲक्युट डायरिया, डिसेंट्री, ॲनिमिया इतक्या आजारांमुळे मृत्यू झालेले आहेत. सभापती महोदय, यासंदर्भात माझ्याकडे पोलिसांचा रिपोर्ट देखील आहे. पोलिसांच्या रिपोर्टमध्ये जी नोंद मिळाली तीही मी या सभागृहाला सांगू शकते. सभापती महोदय, सभागृहात या अल्पकालीन चर्चेवर बऱ्याच वेळापासून चर्चा सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री. शेंडगे यांनी काही महत्वाच्या गोष्टींवर लक्ष द्यावे लागेल असे सांगितलेले आहे. त्यामध्ये त्यांनी त्याठिकाणी असलेले साक्षरतेचे अल्प प्रमाण, मुलींची लग्ने लहान वयात होणे, दोन मुलांमध्ये अंतर न ठेवणे, परंपरागत पध्दती याबाबत सांगितलेले आहे. लहान मुलांकडे,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड.....

बालपोषणाकडे होत असलेले दुर्लक्ष, स्त्रियांना गरोदर काळामध्ये वैद्यकीय सुविधा न मिळणे, अशी कारणे सांगितलेली आहेत. त्याचबरोबर तेथे असलेला सूर्य प्रकाशाचा अभाव, स्वच्छतेचा अभाव, तसेच जंगल असल्यामुळे तेथे आद्रता जास्त असते आणि आद्रता असल्यामुळे तेथील मुलांना सर्दी-पडशाचा त्रास जास्त होतो. त्याकडे लक्ष दिले नाही तर ती बालके परत न्युमोनियाकडे वळतात. पाण्याच्या बाबतीत लक्ष ्द्यावे लागेल कारण पाण्यामुळे डायरियासारखे आजार होतात. सभापती महोदय, हा सगळा रिपोर्ट मला मेळघाटमधूनच मिळालेला आहे.

सभापती महोदय, कुपोषणाच्या बाबतीत मला सांगावे लागेल की, आपण श्रेणी ठरविलेल्या आहेत त्या श्रेणी नुसार सन 2003-2004 ते 2009-2010 पर्यंत माहे मे,2010 च्या मासिक प्रगती अहवालानुसार सर्वसाधारण बालकांचे पर्सेंटेज पुढील प्रमाणे होते. 2003-2004 मध्ये 45 होते ते आता 2009-2010 मध्ये 61.29 इतक्या प्रमाणात वाढलेले आहे. माहे एप्रिल,2010 पर्यंत ते 62.83 इतके झालेले आहे. ज्यांना आपण कुपोषित मुले म्हणतो त्या श्रेणीतील मुलांचे प्रमाण वाढलेले आहे. जून, 2010 नंतर डब्लूएचओच्या गाईडलाईन्स आल्या. पण त्याच्या आधी ज्या गाईडलाईन्स होत्या. त्यानुसार जे प्रमाण आहे ते 45 वरुन 62 वर गेले आहे. श्रेणी -3 आणि श्रेणी-4 च्या मुलांचे प्रमाणे 0.37 होते ते आता 0.11 पर्यंत सन 2010 च्या एप्रिल महिन्यापर्यंत आलेले आहे. मधल्या काळात डब्लूएचओचे नियम बदलले. केंद्र शासनाने बालविकास संनियंत्रण केले पाहिजे म्हणून डब्लूएचओचे नियम बदलले आणि त्या माध्यमातून ज्या श्रेणी-1,श्रेणी-2,श्रेणी-3, श्रेणी-4 होत्या त्या सर्व एक करुन श्रेणी-3 मध्ये डिव्हाईड करण्यात आल्या आहेत.

यानंतर श्री. बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड ....

यामध्ये सर्वसाधारण श्रेणी, मध्यम वजनाची श्रेणी आणि गंभीर तीव्र कमी वजनाची श्रेणी अशा तीन श्रेणीमध्ये त्यांनी विभागणी केली. श्रेणी 3 आणि 4 मधील सर्व मुले तर त्यामध्ये आलीच पण श्रेणी 2 मधील जी गंभीर तीव्र कमी वजनाची मुले आहेत त्यांनाही यामध्ये घेतलेले आहे. आपण सेन्सस पाहिला तर आपल्याला असे दिसून येईल की, आपली पहिली जी योजना होती त्या योजनेच्या अंतर्गत आम्ही 2010 मध्ये 74 लाख 98 हजार 592 मुलांचे वजन घेतले. यामध्ये सर्वसाधारण श्रेणीमध्ये 63.17 टक्के मुले आली. श्रेणी 1 मध्ये 31.8 टक्के मुले आली आणि श्रेणी 2 मध्ये 5.62 टक्के आणि श्रेणी 3 आणि 4 मध्ये 0.13 टक्के मुले आली. हे प्रमाण आधी केलेल्या गोष्टींमुळे आले. पण डब्ल्यूएचओचे निकष बदलले, केंद्र शासनाचे निकष बदलले त्यानंतर आम्ही पाच ऐवजी तीन श्रेण्या केल्या त्यामुळे सर्वसाधारण श्रेणीमध्ये सुध्दा मुले वाढली. त्यामध्ये 70.75 टक्के मुले आली आणि मध्यम कमी वजनाची मुले 25 टक्के आली.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**तालिका सभापती ( श्री. रमेश शेंडगे )** : माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. त्यानंतर मी आपल्याला संधी देतो.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या चर्चेसाठी वेळ मर्यादित आहे. या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदया आकड्यांचा खेळ करीत आहेत असे दुर्दैवाने सांगावेसे वाटते. कुपोषित रुग्णांसाठी शासन काय करणार याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांकडून अपेक्षित आहे. आतापर्यंत सर्व हेच चालले आहे.

**तालिका सभापती** : माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्या. त्यानंतर आपण बोला.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, माझ्या सांगण्याचे तात्पर्य असे होते की, सन्माननीय सदस्यांनी 30 टक्के प्रमाण सांगितले पण आधीच्या श्रेणी 2, श्रेणी 3 आणि श्रेणी 4 अशा श्रेण्या धरल्या तर ते प्रमाण 5 ते 6 टक्केपर्यंत जाते आणि आता ते प्रमाण 4.2 वर आलेले आहे. आपल्या माहितीसाठी सांगते की, सन्माननीय सदस्यांनी कुपोषणाचा दर 30 टक्के आहे असे सांगितले. पूर्वीच्या गाईडलाईन्स प्रमाणे पाहिले तर तो दर 0.11 टक्के होता. आता

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड ...

डब्ल्यूएचओच्या निकषाप्रमाणे 4.2 असे प्रमाण आहे असे मला सांगावयाचे आहे. या व्यतिरिक्त मी सांगू इच्छिते की, ही जी योजना आहे ती 0 ते 5 वर्षे वयोगटासाठी आहे. पाच ते सहा वर्षे वयोगटातील कुपोषित मुलांना महाराष्ट्र शासन स्वत: सकस पोषण आहार पुरवठा करते. पूर्वीची योजना 0 ते 6 वर्षे वयोगटासाठी होती. आता 0 ते 5 वर्षे वयोगटासाठी योजना आलेली आहे.

सभापती महोदय, मी खूप डाटा आणलेला आहे पण सन्माननीय सदस्यांना डाटा नको आहे. त्यामुळे मी आता थेट उपाययोजनेबाबत सांगणार आहे. यासंदर्भात आम्ही खालीलप्रमाणे उपाययोजना करण्याचा विचार केलेला आहे. चर्चा करीत असताना विविध विभागांशी संबंधित असलेला हा विषय आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, विविध विभागांनी एकत्र येऊन सर्वांनी हे काम केले पाहिजे. माननीय मंत्रिमहोदय श्री. सुरेश शेट्टी साहेबांनी काल सगळ्यांना सांगितले होते की, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुढाकाराने माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक आयोजित करण्यात आली होती. मी हे जे सगळे सांगत आहे ते पुढच्या उपाययोजने बाबत सांगत आहे. ही जी बैठक घेण्यात आली त्यामध्ये विविध प्रश्नांच्या संदर्भात मग शालेय शिक्षण विभाग असो, वैद्यकीय शिक्षण विभाग व औषधी द्रव्ये विभाग असो, आदिवासी विकास विभाग असो, ग्रामविकास विभाग असो, रोजगार हमी योजना विभाग असो, सार्वजनिक आरोग्य विभाग असो, महिला व बालविकास विभाग असो या सगळ्या विभागांचा कुपोषणाच्या बाबतीत संबंध आहे. तत्कालीन मुख्यमंत्री श्री अशोक चव्हाण यांनी त्यांची बैठक आयोजित केली आणि त्यांनी असे सांगितले की, नव संजीवनी योजना असो, राष्ट्रीय बाल आरोग्य कार्यक्रम असो, आदिवासींच्या योजना असो किंवा एकात्मिक बाल विकासाच्या योजना असो, या सगळ्या योजनांसाठी नोडल एजन्सी नेमली पाहिजे. म्हणून त्यांनी या सर्व विभागांना धरुन एक नोडल एजन्सी म्हणून महिला व बालविकास विभागाला नेमले. मला सांगितले पाहिजे की, तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांनी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. त्यामध्ये ग्रुप तयार करण्यात आले. त्यामध्ये सचिवांचे ग्रुप तयार तयार करण्यात आले. ज्या गोष्टी आदिवासी भागात

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ D/ KTG/ ST/

प्रा. वर्षा गायकवाड ...

करावयाच्या आहेत त्याचा उल्लेख मी पुढे करणारच आहे, त्याच्या बाबतीत सचिवांच्या अध्यक्षतेखाली ग्रुप तयार करण्यात आले आणि त्याच्या खाली जिल्हा पातळीवर आयुक्त किंवा जिल्हाधिकारी यांच्या पातळीवरील समित्या करण्यात आल्या. त्याच्याखाली जाऊन तालुक्याच्या पातळीवर जे बाल विकास अधिकारी आहेत त्यांच्या समित्या करण्यात आल्या आणि गाव पातळीवर सुध्दा समित्या करण्यात आल्या ज्यामध्ये व्हिलेज हेल्थ सॅनिटेशन न्युट्रिशन वर्कर्स कमिटी करण्यात आली. अशा समित्या करुन ही योजना खालपर्यंत कशी जाईल आणि त्यावर आम्ही महिला व बालविकास अंतर्गत कसे मॉनिटरींग करु शकू या दृष्टीकोनातून या समित्या निर्माण करण्यात आल्या. यामध्ये सर्वांना काम सुध्दा देण्यात आले. सन्माननीय सभागृहातील सदस्यांच्या ज्या भावना आहेत त्या आमच्या सुध्दा आहेत.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/ पूर्वी श्री.बरवड 12:05

प्रा.वर्षा गायकवाड....

आदिवासी विभागातील मुलींची 18 वर्षापूर्वी होणारी लग्ने थांबविली पाहिजेत.

सभापती महोदय, वेळ कमी असल्यामुळे मी विस्ताराने बोलणार नाही. आदिवासींच्या मुलींची लग्ने लवकर होता कामा नये, दोन मुलांमध्ये अंतर कमी असले पाहिजे, यादृष्टीकोनातून योजना कशी करता येईल त्याचा विचार सुरु आहे. यासंबंधी ग्रामविकास व जलसंधारण विभाग, आदिवासी विभाग, महिला व बालविकास विभाग व आरोग्य विभागाच्या सचिवांना कमिटीत घेतलेले आहे. या पुढील काळात आदिवासी मुलींची 18 वर्षापूर्वी लग्ने होणार नाहीत यासाठी त्यांनी अभ्यास करावयाचा आहे. याठिकाणी कुटुंब नियोजनासंबंधी चर्चा झाली आहे. ज्यांनी कुटुंब नियोजन केलेले आहे त्यांना प्रोत्साहन देण्याच्या संदर्भात दुसरी एक कमिटी निर्माण केली आहे. त्यात बालविकास अधिकारी, आदिवासी विकास विभाग व अन्न व नागरी पुरवठा विभाग यांचा समावेश आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी प्रश्न विचारला होता की, आदिवासींकडे रेशन कार्ड असते, परंतु त्या रेशन कार्डाचे काय होते ? आदिवासी सातत्याने स्थलांतर करीत असल्यामुळे त्यांना दुसरीकडे गेल्यावर रेशन मिळत नाही. अन्न व नागरी पुरवठा विभाग व आदिवासी विकास विभाग या दोन नोडल एजन्सीस नेमण्याचा निर्णय घेतला आहे. यापुढील काळात काय केले पाहिजे यावर सरकार विचार करीत आहे. मग गर्भवती माता असतील, स्तनदा माता असतील. यासंदर्भात विविध प्रश्न असून त्यासाठी प्रत्येक विभागाच्या नोडल एजन्सी करण्यात आल्या असून त्यात प्रत्येक विभागाचे सचिव असणार आहेत. याबाबत नोडल एजन्सी म्हणून किंवा नियंत्रण करण्याचे काम महिला व बालविकास विभागाला दिलेले आहे. महिन्याच्या सुरुवातीला पहिल्या आठवडयामध्ये प्रत्येक प्रश्नासाठी यासंदर्भात प्रत्येक सचिवांबरोबर बैठक घेतली जाईल व व्यक्तीशः या कामावर नियंत्रण ठेवण्याचे काम किंवा नियोजन करण्याचे काम केले जाईल.

सभापती महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांनी टीएचआरबद्दल आपली मते मांडली आहेत. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी आपले मत मांडले आहे. याबाबत मी पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी उत्तर दिले आहे. केंद्र सरकारच्या गाईड लाईन्सनुसार त्याची प्रक्रिया केली आहे. केंद्र सरकारने राज्य सरकारला दिनांक 24.2.2009 रोजी कळविले आहे. सर्वोच्च न्यायालयाने या आदेशाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत त्यानुसार शासनाने टीएचआर योजनेची अंमलबजावणी केली आहे.



NTK/ D/ ST/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड.....

सभापती महोदय, या विभागासाठी आयसीडीएसचे मोठे बजेट मिळते. त्यातून 2010-2011 या वर्षासाठी मानधनासाठी 407 कोटी, आस्थापना व वेतनासाठी 330 कोटी, आहारासाठी 984 कोटी असे एकूण 1721 कोटी रुपये मिळाले आहेत. त्यातील आहारासाठी केंद्र सरकार 50 टक्के व राज्य सरकार 50 टक्के खर्च करते, आस्थापनावर केंद्र सरकार 90 टक्के व राज्य सरकार 10 टक्के खर्च करते. अनेक सन्माननीय सदस्यांनी टेंडरबाबत मते व्यक्त केली आहेत. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्वानुसार जाहिरात दिली होती. या मार्गदर्शक तत्वानुसार एक्सक्ल्यूड 45 अशा पध्दतीचे ते फूड असले पाहिजे. त्यानुसार पूर्ण प्रक्रिया करण्यात आली. 6 महिन्यापासून 3 वर्षापर्यंतच्या बाळाला टीएचआर दिला जातो. 3 वर्षे ते 6 वर्षापर्यंतच्या मुलांना 4 रुपयांचा ताजा आहार व कुपोषित बालके असतील त्यांना 6 रुपयांचा व स्तनदा माता असतील त्यांना 5 रुपयांचा आहार दिला जातो. याप्रमाणे टीएचआरचा आहार देण्यात आला आहे. मधल्या काळात ही योजना बंद होती असे सांगितले गेले. परंतु या योजनेच्या संदर्भात पुष्कळ लोक कोर्टात गेले होते. नंदा ठाकूर, प्रियदर्शनी या महिलांच्या याचिका उच्च न्यायालयाने फेटाळल्या आहेत. हया केसेस आता सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. या योजनेचे कंत्राट एक वर्षासाठी दिलेले आहे. त्यांना आयएसओ प्रमाणपत्र दिलेले आहे. तरी सुध्दा त्यांच्या मालाचा दर्जा बरोबर आहे का हे प्रयोग शाळेमार्फत तपासले जाते. ज्याप्रमाणे फूड प्रोडक्टला एगमार्क दिला जातो किंवा आयएसओ किंवा आयएसआयच्या माध्यमातून सर्टिफाय केले जाते त्याप्रमाणे पुढील वर्षापासून सर्टिफिकेशन पध्दत सुरु करणार आहोत.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड ...

मुलांना जे अन्न दिले जाते ते सर्टिफाईड असले पाहिजे.

सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी प्रयोग शाळा करण्याच्या बाबतीत प्रश्न विचारला. त्याबाबतीत रेप्युटेड आणि सर्टिफाईड कंपनीचे फूड घेण्याचा निर्णय आम्ही घेतलेला आहे. राजमाता जिजाऊ आरोग्य पोषक मिशनच्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी सूचना केली. या मिशनची स्थापना 1 एप्रिल 2005ला झाली. आणि 30 जूनला त्यांचा कार्यकाळ संपला. त्या मिशनच्या रिपोर्ट मधील काही संदर्भ मी देते. त्यांनी जी आकडेवारी दिलेली आहे त्यानुसार सर्वसाधारण श्रेणीतील मुले 48टक्क्यावरुन वरुन 65 टक्क्यावर आली आहेत. श्रेणी-2मधील मुले 13 टक्क्यावरुन 5 टक्क्यावर आली आहेत. श्रेणी-3 आणि श्रेणी-4मध्ये 22000 पेक्षा जास्त मुले होती. ती आता 6300 वर आलेली आहेत. बालविकास केन्द्रामध्ये 15000 पेक्षा जास्त मुलांची सोय करण्यात येणार आहे....(अडथळा).. गरोदर माता, स्तनदा माता यांना आपण आहार देतो. बाळाचे खरे कुपोषण होते ते महिलेच्या पोटामध्ये ती गरोदर असताना होते. त्यामुळे दुस-या मिशनमध्ये आमची प्रायॉरिटी मायनस-9वर आहे. म्हणजे गरोदरपणा पासून ते 2 वर्षापर्यन्त माता आणि बालकाची काळजी घेण्यात येणार आहे. या मिशनची पुनर्रचना होऊन येत्या एक महिन्यामध्ये संबंधित अधिका-याची नियुक्ती करुन हे मिशन आम्ही सुरु करणार आहोत. या मिशन मार्फत गरोदर मातांकडे लक्ष दिले जाईल. त्यांची प्रसुतीपूर्वीची काळजी घेण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी ज्या काही सूचना केल्या त्यानुसार उपाययोजना करण्याचे आम्ही ठरविलेले आहे. शून्य ते 6 वर्षे वयोगटातील शंभर टक्के मुलांचा सर्व्हे करण्यात येणार आहे. तसेच जी गंभीर कमी वजनाची बालके आहेत त्यांच्यासाठी बालविकास केन्द्रे स्थापन करण्यात येणार आहेत. गाव पातळीवर डे केअर सेंटर स्थापन करण्याचा राज्य शासनाचा विचार आहे. याबाबतीत जनजागृती झाली पाहिजे ही सर्वांत महत्वाची गोष्ट आहे. या संदर्भात दरमहा मातांची बैठक आयोजित करुन त्यांचे प्रबोधन केले जाईल. स्तनपानाच्या बाबतीत महिलांमध्ये गैरसमज आहे. त्यामुळे सहा महिन्यापर्यंन्त बालकाला कसे स्तनपान करावे यासंबंधी मातांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. वयोगटानुसार लसीकरण करुन आजारापासून बालकांचे संरक्षण करण्यात येणार आहे. ग्रामीण भागामध्ये लोक सहभागातून दत्तक पालक योजनेद्वारे कुपोषण नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड...

सभापती महोदय, व्हीसीडीसी ही आरोग्याची योजना असली तरी त्यामध्ये आम्ही लक्ष देणार आहोत. या योजनेअंतर्गत जी गंभीर, तीव्र कमी वजनाची मुले असतात त्यांना व्हीसीडीसी सेंटरमध्ये आणून एक महिनाभर त्यांच्यावर लक्ष ठेवले जाते. डॉक्टरांमार्फत अशा मुलांची तपासणी करुन त्यांना योग्य तो आहार दिला जातो. मुलाला कशा प्रकारचा आहार दिला पाहिजे याचे प्रशिक्षण मातेला दिले जाते. या योजनेचा 90 टक्के फायदा झालेला आहे. बालविकास अधिकारी तपासणी करण्यासाठी खालपर्यन्त जात नाहीत असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. आता बालविकास अधिका-यांना अंगणवाडी तपासणीचे उद्दिष्ट ठरवून देण्यात येणार आहे. बाल विकास प्रकल्प अधिका-याने प्रत्येक अंगणवाडीला महिन्यातून कमीत कमी एकदा तरी भेट देऊन त्याचा अहवाल शासनाला दिला पाहिजे. भरारी पथकाच्या संदर्भात सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी मुद्दा मांडला होता. स्वतंत्र भरारी पथक स्थापन करण्याचा आम्ही विचार करीत आहोत.

...नंतर श्री. भोगले...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ ST/ 12:15

प्रा.वर्षा गायकवाड.......

ज्यामध्ये सरकारी कर्मचारी असतील परंतु अशासकीय लोकांना सुध्दा सहभागी करुन घेऊन भरारी पथक केले जाईल. या भरारी पथकाच्या माध्यमातूनही आम्ही प्रयत्न करणार आहोत.

सभापती महोदय, राजीव गांधी किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण ही सबला योजना पुढील एक महिन्यात आम्ही लॉंच करणार आहोत. ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. 11 ते 18 वयोगटातील मुलींसाठी ही योजना आहे. ज्या मुली शिक्षणापासून वंचित आहेत त्यांना अनौपचारिक शिक्षण मिळाले पाहिजे, आरोग्याबद्दल शिक्षण मिळाले पाहिजे. त्या व्यतिरिक्त पोषक आहार सुध्दा मिळाला पाहिजे. या दृष्टीकोनातून केंद्र शासनाची ही योजना आहे. केंद्र शासन 50 टक्के आणि राज्य शासन 50 टक्के आहारावरील खर्च करणार असून आस्थापनेवरील 100 टक्के खर्च केंद्र शासन करणार आहे. मुलींना आहार पुरविणे, आहारामध्ये लोहयुक्त गोळ्या देणे, शिक्षण, जीवनकौशल्य याबाबत त्यांना सहाय्य केले जाणार आहे. प्रत्येक दिवशी मुलींना 5 रुपये आहारासाठी दिले जाणार आहेत. मुलींना प्रशिक्षण दिले जाणार आहे. 3.80 लाखाची योजना सुरु करणार आहोत. या व्यतिरिक्त इंदिरा गांधी महिला सहयोग योजना, टप्पा क्रमांक-2 सुरु करणार आहोत. पूर्वीची योजना टप्पा क्रमांक-1 ही 11 आदिवासी जिल्हयांमध्ये सुरु आहे. इंदिरा गांधी महिला सहयोग योजना राबविण्यासाठी केंद्र शासनाने अमरावती व भंडारा या दोन जिल्हयांची निवड केलेली आहे. गरोदर मातांनी अंगणवाडीमध्ये येऊन नोंद केली पाहिजे. नोंद केल्यानंतर त्या गरोदर महिलेच्या नावावर 1500 रुपये जमा केले जाणार आहेत. त्यानंतर तिचे लसीकरण बघण्याची कामगिरी अंगणवाडी सेविकेची असणार आहे. हे करीत असताना तिचे दवाखान्यात बाळंतपण होईल तेव्हा पुन्हा 1500 रुपये दिले जाणार आहेत. जननी सुरक्षा योजनेंतर्गत 700 रुपये स्वतंत्रपणे दिले जाणार आहेत. त्या व्यतिरिक्त सतत सहा महिने स्तनपान दिले तर आणखी 1000 रुपये दिले जाणार असून एकूण 4000 रुपये या योजनेंतर्गत त्या महिलेला मिळतील हे मला या माध्यमातून सभागृहाला सांगावयाचे आहे. यासाठी 19 वर्षे वयाची मर्यादा घालण्यात आली आहे. सुरक्षित बाळंतपण व्हावे, स्तनपान करावे म्हणून ही योजना सुरु करणार आहोत. महिला शेतमजूर, आदिवासी महिला आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी दहा दिवसाचे मूल घरी सोडून रोजगारासाठी जातात. अशा महिलांसाठी पूर्णवेळ पाळणाघर योजना राबविणार आहोत. 5 जिल्हयांमध्ये मुलांना ठेवण्यासाठी 8 तास पाळणाघराची सोय केली जाणार आहे. या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड.......

व्यतिरिक्त स्तनदा मातांसाठी योजना असणार आहे. स्तनदा मातांना प्रोटिन्स मिळेल, कार्बो हायड्रेट्स मिळतील, कडधान्य मिळेल यादृष्टीने योजना आणीत आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले की, लहान बालकांचे वजन केले जाते ते योग्यरित्या होत नाही. यासाठी विभागामार्फत हिंगोली पॅटर्न राबविला जाणार आहे. इलेक्ट्रॉनिक्स फिजिओ ग्रोथ मॉनिटरिंग सिस्टीम अंमलात आणणार आहोत. बाळाचे ॲक्यूरेट वजन, बायोमेट्रिक डाटा स्टोअर होतो असे मशिन उपलब्ध करुन दिले जाणार आहे. यासाठी जिल्हा परिषदांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. आदिवासी विकास किंवा इतर विभागांच्या माध्यमातून हे मशिन आदिवासी जिल्हयांमध्ये कसे देता येईल यादृष्टीने आम्ही प्रयत्न करणार आहोत एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले व इतर 18 माननीय सदस्यांनी या प्रस्तावावर आपले विचार मांडले, त्यांचे मी मनापासून आभार मानतो.

सभापती महोदय, महिला व बालविकास मंत्री प्रा.वर्षा गायकवाड यांनी अतिशय सविस्तर उत्तर दिलेले आहे. मोठया प्रमाणात आदिवासी भागात किंवा आदिवासी जिल्हयांमध्ये कुपोषण होत आहे. माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांनी सांगितले की, कुपोषण सगळीकडे आहे. फक्त आदिवासी विभागात नव्हे तर इतर भागात देखील कुपोषणाची समस्या दिसून येते. शासनाने हे मान्य केले आहे. कुपोषण म्हटले की, मेळघाट, नंदूरबार किंवा अक्कलकुवा या भागात कुपोषण अधिक प्रमाणात असल्याचे दिसून येते. कुपोषण होण्याची मुख्य कारणे आपल्याला समजली आहेत.

नंतर क्यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ D/ ST/ पूर्वी श्री. भोगले...... 12:20

श्री. बबनराव पाचपुते .......

कशामुळे कुपोषण होते हे समजल्यानंतर ते कमी करण्याच्या दृष्टीने काय करावयाचे यासंबंधीचा निर्णय घेणे आवश्यक आहे. आदिवासींमध्ये कुपोषणाचे प्रमाण वाढण्याची कारणे म्हणजे त्यांची कमी वयात लग्न तर होतातच परंतु बऱ्याच अंशी दोन कुटुंबे अंडरस्टँडिंगने एकत्र येऊन मुलगा आणि मुलीला सांगतात की, तुम्ही दोघे नवरा बायको. तेव्हा लग्न सुध्दा करीत नाहीत. अशा प्रकारे कमी वयातच त्यांना मुलं सुध्दा होतात. ज्यावेळेस शासनाने कन्यादान योजनेचा कार्यक्रम सुरु केला तेव्हा लक्षात आले की कन्यादान योजना ही ज्यांचे लग्न व्हायचे बाकी आहे त्यांच्यासाठीच आहे. पण आदिवासींमध्ये मात्र मी वर सांगितल्याप्रमाणे काही ठिकाणी प्रथा असल्याने या योजनेचा फायदा देण्यात अडचणी येत होत्या. म्हणून आम्ही लग्न करण्यासाठी जे तयार असतील त्यांनाही या कन्यादान योजनेचा फायदा देण्याचा निर्णय घेतला. हे प्रमाण कमी करण्यामध्ये मला पालक मंत्री म्हणून यश आले कारण 18 वर्षाची मुलगी आणि 21 वर्षाचा मुलगा असल्याशिवाय तहसीलदाराने लग्नाची परवानगी देता कामा नये असा दंडक घालून दिला होता. तेव्हा मला पालक मंत्री म्हणून समाजातून तसेच वर्तमानपत्रातून हे सुध्दा ऐकायला मिळाले की, पालक मंत्र्यांचे डोके ठिकाणावर आहे काय ? म्हणून यातून मार्ग काढण्यासाठी सर्वांनीच एकत्र येणे आवश्यक आहे, त्यासाठी कायद्याचा वापर करण्याची गरज आहे. वास्तविक आदिवासी भागात कन्यादान योजनेचा फायदा देण्यासाठी वयाची मर्यादा 35 वर्षे एवढी ठेवलेली आहे. परंतु 18 व 21 वर्षाचा मुलगी आणि मुलगा यांनी देखील पुन्हा लग्न करण्यासाठी होकार दिला तरी त्यांना 10 हजाराची मदत आपण करीत होतो आता ही मर्यादा 15 हजारापर्यंत वाढविली आहे. जेणेकरुन जास्तीत जास्त आदिवासी या योजनेचा फायदा घेतील. सहाजिकच त्याचा फायदा सुध्दा झाला. तसेच गर्भधारणा झाल्यानंतर त्वरित त्या महिलेला आरोग्य केंद्राशी संपर्क साधून ट्रिटमेंट देणे, तिचे हिमोग्लोबीन आवश्यक तेवढे कायम राहील याची काळजी घेणे अशा प्रकारे उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला. वास्तविक आरोग्याविषयीचे अज्ञान हे सुध्दा कुपोषणाचे एक कारण सांगता येईल. मेळघाटमध्ये मध्यंतरी मी गेलो असता तेथे डायरियाचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून आले आणि त्याचे मुख्य कारण म्हणजे माता शौचालयास गेल्यानंतर त्याच हाताने स्वयंपाक करते त्यामुळे हे प्रमाण वाढत असल्याचे दिसून आले. त्यासंबंधीच्या सूचना दिल्या व हात स्वच्छ धुऊनच स्वयंपाक करावा अशाही सूचना दिल्या. त्याचा परिणाम चांगला जाणवल्याचे नंतर लक्षात आले. या भागात

....2...

PFK/ D/ ST/ पूर्वी श्री. भोगले...... 12:20

श्री. बबनराव पाचपुते.......

अनेक एनजीओज सुध्दा काम करताना आढळून येतात. काही एनजीओज मात्र स्वत:च्याच योजना आणि स्वत:चेच प्रॉडक्ट तयार करुन हे आदिवासी भागातील लोकांसाठी शासनाने घ्यावे आणि त्यासाठी एजन्सी म्हणून आमचीच नेमणूक करावी, अशीही मागणी करतात. परंतु अशा प्रकारच्या प्रॉडक्टचा फायदा आदिवासीच्या मुलांना किती होतो हा भाग वेगळा. माझ्याकडे हा विभाग आल्यानंतर अनेक चांगल्या संस्था तसेच अशाही काही संस्था आढळून आल्या. बायफसारख्या नामांकित संस्थेचे अनुदान सुध्दा आम्ही बंद केले. कारण शासनाचे अनुदान अशा संस्था वापरणार, त्यांच्या कामासाठी गाड्या घेणार, त्यांची संस्था वाढविणार पण आदिवासींचा मात्र काहीच फायदा होताना दिसत नव्हता म्हणून अशा संस्थांचे अनुदान बंद करावे लागले. मध्यंतरी माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी माजी मुख्य सचिव श्री.द.म.सुखटणकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. त्या समितीने शिफारस केल्याप्रमाणे आदिवासींच्या विकासासाठी शासनाच्या बजेटमधून 9 टक्के निधी देण्याचे शासनाने मान्य केले होते. त्यानुसार दरवर्षी 9 टक्के रक्कम मिळतच होती असे नाही तसेच ती रक्कम पूर्ण खर्च होत होती असेही नाही. मागील वेळेस अशा मिळणाऱ्या रकमेतून 453 कोटी रुपये शिल्लक होते. माझ्याकडे हा विभाग आल्यानंतर मात्र मागील वर्षीची संपूर्ण रक्कम खर्च झाली. या भागातील अधिकाऱ्यांची उदासीनता हे कारण देखील हा पैसा खर्च न होण्यामागे सांगता येईल. शासनाकडे राज्यातील प्रकल्प अधिकारी आणि सहाय्यक प्रकल्प अधिकाऱ्यांनी एक पत्र पाठवून ही बाब मान्य केलेली आहे. म्हणून या भागात काम करण्यासाठी आयएएस अधिकारी मिळाले पाहिजेत, त्यांनाच नेमले पाहिजे असे मला वाटते. असे अधिकारी मिळाले तर चांगले काम करण्याची संधी देखील त्यांना मिळेल. त्याचबरोबर ज्या अधिकाऱ्यांना मनापासून काम करावयाचे असेल त्यांनी स्वत:हून आदिवासी भागात काम करण्याची इच्छा व्यक्त केली पाहिजे, असेच अधिकारी चांगले काम करु शकतात. अशा प्रकारे आदिवासी भागातील पैशांचा वापर कसा होतो त्यावर एक प्रकारचा अंकुश कसा निर्माण करता येईल हा संशोधनाचा भाग आहे. आदिवासी भागातील दळणवळणाच्या सुविधा चांगल्या व्हाव्यात म्हणून रस्त्यांसाठी शासनाने पैसे दिले, अंगणवाड्यांचे काम चांगले व्हावे, आहारामध्ये सुधारणा व्हावी या दृष्टीने सांगायचे झाले तर आतापर्यंत 10-15 कोटीची तरतूद दरवर्षी केली जात होती. अशा प्रकारे निधी देऊनही कुपोषणाचे प्रमाण वाढत असून जास्तीत जास्त मुले मृत्युमुखी पडतात असे दिसून आले म्हणून यावर्षी 25 कोटी रुपये देण्यात आले....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते..

अंगणवाडया बांधण्याच्यासंदर्भात माझ्याकडे प्रस्ताव आला. प्रस्ताव माझ्याकडे आल्यानंतर मी सांगितले की, तुम्ही अंगणवाडया बांधा, अंगणवाडया बांधण्यासाठी जे काही पैसे लागतील ते दिले जातील. अंगणवाडी बांधण्यासाठी 10 कोटी रुपयांची मागणी असतांना आम्ही 30 कोटी रुपये दिलेले आहेत. अंगणवाडयांना पैसे वाढवून देण्याचे कारण असे आहे की, अंगणवाडया असल्या की, लहान मुले अंगणवाडयात येतील व या मुलांना चांगल्या प्रकारचा आहार अंगणवाडयांच्या माध्यमातून मिळावा, हा त्यामागचा मुख्य उद्देश होता. अंगणवाडयातील तसेच शाळेतील लहान मुलांना दुध, केळी व अंडी असे पोषक अन्न दिले जाते. परंतु यामध्ये सुध्दा काही अडचणी आलेल्या आहेत. योजना चांगल्या आहेत परंतु या योजना राबवितांना थोडयाशा अडचणी निर्माण होत असतात. योजना राबवितांना अडचणी येऊ नयेत यासाठी आपल्याला यंत्रणा उभ्या कराव्या लागणार आहेत. बायोमॅट्रीकची सुध्दा सोय करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, कुपोषणाच्या बाबतीत महिलांच्या स्तनपानाचा आणि आरोग्याचा विषय महत्वाचा आहे. महिला गरोदर राहिली की, त्या महिलेला आम्ही मायनस नऊ धरणार. महिला गरोदर राहिल्याबरोबर त्या महिलांना सकस आहार देण्याची आवश्यकता असते. रोजगार हमी योजनेवर काम करणारी महिला गरोदर राहिली तरी आम्ही अशा महिलांना पैसे दिलेले आहेत. गरोदर महिलांना आम्ही 68 लक्ष रुपये दिलेले आहेत. काही ठिकाणी काही महिला लहान मुलांना कामावर घेऊन येतात परंतु लहान मुलांना कामावर आणू नये यासाठी आम्ही 200 कोटी रुपयांचा निधी ठेवलेला आहे. यामुळे ही लहान मुले आता कामावर न येता शाळेमध्ये यावयास लागली आहे.

सभापती महोदय, आदिवासींचे अज्ञान दूर करणे, आरोग्याची जाणीव करुन देणे, हा विषय महत्वाचा आहे. आदिवासींमध्ये व प्रशासनामध्ये डायलॉग चांगला राहणे आवश्यक आहे, त्यासाठी समित्या तयार करण्यात आलेल्या आहेत. डीपीडीसीमध्ये आदिवासींच्या उपयोजनेसाठी फार कमी वेळ मिळत असतो. कार्यवाही करण्यासाठी आदिवासी विकास विभागाकडे स्वतंत्र यंत्रणा नाही. परंतु गेल्या वर्षापासून मी सांगितले आहे की, आम्ही तुम्हाला पैसे देतो परंतु जो पैसा दिलेला आहे तो कोठे खर्च केलेला आहे हे दाखवल्याशिवाय आम्ही तुम्हाला पैसे देणार नाही. रस्त्यांच्या

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ D/ ST/ 12:25

श्री. बबनराव पाचपुते .........

संदर्भात सुध्दा असाच प्रकार आढळून येतो. आदिवासींचा पैसा घेतात परंतु रस्त्याचे काम बिगर आदिवासी गावातून सुरु करतात व आदिवासी गाव आले की, हा रस्ता संपून जातो. खरे म्हणजे आदिवासी गावे रस्त्यांना जोडावी त्यासाठीच हे पैसे दिले जातात परंतु तसे होतांना दिसत नाही. याचा अनुभव घेतल्यानंतर आम्ही सांगितले की, रस्त्यासाठी आम्ही पैसे देतो परंतु आदिवासी गावापासून गावाच्या रस्त्याची सुरुवात करा. असे करीत नसाल तर आम्ही पैसे देणार नाही. आदिवासींच्या ज्या योजना आहेत त्या आदिवासींसाठी राबविल्या गेल्या पाहिजेत. त्यामुळे यासंदर्भात अधिका-यांच्या बैठकीत मी सांगितले आहे की, आदिवासींचा जो पैसा आहे तो आदिवासींच्या विकासासाठीच खर्च झाला पाहिजे. आदिवासींचा पैसा आदिवासींसाठी खर्च झाला नाही तर अधिका-यांना जबाबदार धरले जाईल, असे सांगितल्या बरोबर त्याचा चांगला परिणाम दिसून यावयास लागला आहे. ज्यांनी अशा प्रकारचे काम केले नाही त्यांना सस्पेंड देखील करण्यात आले आहे. यामध्ये पीओ, एटीसी यांना देखील सस्पेंड करण्यात आलेले आहे. खरे म्हणजे सस्पेंड करणे हा महत्वाचा भाग नाही तर कामामध्ये सुधारणा करणे हा महत्वाचा भाग आहे. कामामध्ये सुधारणा करण्यासाठी सीईओ, जिल्हाधिकारी तसेच आमच्या अधिका-यांमध्ये चांगल्या प्रकारचा समन्वय राहणार नाही तोपर्यंत कामामध्ये सुधारणा होणार नाही. आदिवासींसाठी आम्हाला पैशाची कुठलीही अडचण नाही तर काम करण्याची अडचण आहे, लाभार्थीपर्यंत योजना व तिचे लाभ पोहचण्याची अडचण आहे. दुर्गम भागामध्ये राहणा-या आदिवासींना शासनाच्या योजनांचा फायदा मिळावा यासाठी चांगल्या प्रकारचे नियोजन करण्याची आवश्यकता आहे. खरे तर चार पाच विभाग मिळून यासाठी एकत्रित काम करण्याची आवश्यकता आहे. आदिवासी भागातील मुलांच्या शिक्षणासाठी सुध्दा आपल्याला फार मोठया प्रमाणात काम करावे लागणार आहे. आदिवासींच्या आश्रमशाळा हया आतापर्यंत दुर्गम भागामध्येच काढल्या जात होत्या परंतु आता आदिवासींच्या आश्रमशाळा शहराला लागून काढत आहोत. आदिवासी आश्रमशाळेतील मुलांना आता चांगल्या प्रकारचा आहार मिळू लागला आहे.

सभापती महोदय, आदिवासी आश्रमशाळेसाठी धान्याची जी गाडी येते त्या गाडीतून केवळ सूर्य मावळेपर्यंतच धान्य घेतले जाते तसेच जे काही सॅंपल दिलेले आहेत तशा प्रकारचे धान्य असेल तरच ते घान्य घ्यावे, अशा सूचना आम्ही हेड मास्तरांना दिलेल्या आहेत. सॅंपल प्रमाणे धान्य

....3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचुपते ..........

नसेल आणि तसे धान्य स्वीकारले तर त्यामध्ये हेडमास्तरलाच जबाबदार धरले जाणार आहे. त्यामुळे आता मुलांनाही चांगल्या प्रकारचे अन्न मिळू लागले आहे. यामुळे आम्हाला यावर्षी धान्यामध्ये अडचणी आलेल्या नाहीत. किरकोळ अडचणी आलेल्या आहेत परंतु त्या अडचणी आम्ही सोडवित आहोत.

सभापती महोदय, कुपोषणाचे काय परिणाम होत असतात याबाबत सर्वांना माहिती मिळत आहे. कुपोषणाचा प्रश्न सोडविण्यासाठी आपल्याला मोठया प्रमाणात काम करावे लागणार आहे. कुपोषणाचा प्रश्न सोडवतांना आपल्याला सर्वांना बरोबर घेऊन काम करावे लागणार आहे. आदिवासींसाठी डॉ. अभय बंग साहेब उत्तम प्रकारे काम करतात तसेच काही एनजीओ देखील कार्यरत आहेत, ते सुध्दा चांगल्या प्रकारचे काम करीत आहेत. त्यामुळे जे चांगले काम करतात त्या सर्वांचे सल्ले घेऊन आपण आदिवासींसाठी काम करीत आहोत. जे आदिवासी व्यसनाधीन आहेत त्यांचे व्यसन आपल्याला सोडवावयाचे आहे. आदिवासीमध्ये जे अज्ञान आहे ते आपल्याला पहिल्यांदा बाजूला करावयाचे आहे. आदिवासींसाठी ज्या काही योजना आहेत त्या सर्व योजनांचा फायदा आदिवासींना कशा रितीने मिळेल यासाठी आपल्याला प्रयत्न करावा लागणार आहे. आदिवासींपर्यंत योजना पोहचण्यात वेळ झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री.बबनराव पाचपुते..........

परंतु वेळ गेलेली नाही. निधी ची अडचण नाही फक्त इच्छाशक्ती ठेवून काम करावयाचे आहे.

सभापती महोदय, माझ्याकडे जेव्हा या विभागाचा कारभार सोपविण्यात आला त्यावेळी मी माझ्या पक्षश्रेष्ठींना सांगितले की, माझा आणि आदिवासींचा काय संबंध आहे ? आतापर्यंत या विभागाचा कार्यभार आदिवासी समाजातील मंत्र्यांकडे दिलेला आहे. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, यावेळी आम्ही थोडा बदल करीत आहोत. आपणाकडून या विभागाला चांगला न्याय मिळेल अशी अपेक्षा आहे. तेव्हा मी आव्हान म्हणून या विभागाचा कार्यभार स्वीकारला.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी सांगितल्याप्रमाणे आदिवासींना रोजगार मिळून त्यांचे सबलीकरण झाले पाहिजे. मी त्यांना सांगू इच्छितो की, विधानसभेत त्यांनी तेंदूपत्त्याचा विषय उपस्थित केला होता. महाराष्ट्रामध्ये आदिवासी बांधव कोट्यावधी रुपयांचा तेंदूपत्ता जमा करतात. या तेंदूपत्त्यामुळे शासनाच्या तिजोरीत मोठ्या प्रमाणावर भर पडते. तेव्हा हा जमा झालेला पैसा आदिवासींना बोनस रुपाने देण्याचा निर्णय मी वन मंत्री असताना घेतला होता. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांना माहीत आहे की, त्यांच्या भागात कुपोषण कमी आहे. मी वन उपजावर देखील आदिवासींचा अधिकार ठेवलेला आहे. लाख निर्माण करणे, जेएफएम कमिट्यांना अधिकार देणे, महिला बचत गटांना स्वंपाक करण्याचा अधिकार देणे अशा प्रकारे लोकाभिमुख योजना करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे.

मी याठिकाणी एक गोष्ट सांगू इच्छितो की, मी वन मंत्री असताना धारणी परिसरातील खारी भागात गेलो होतो. त्यावेळी मी तेथील एका कुटुंबाला लाकूडफाडा आणि बिस्तरा दिला. त्यावेळी त्या कुटुंबाला खूप आनंद झाला. मी त्यांना विचारले की, आपल्याला एवढा आनंद होण्याचे कारण काय, मी आपणास जास्त काही दिले नाही. त्यांनी सांगितले की, आमच्या भागात थंडी जास्त असते आणि आमच्याकडे उबदार कपडे नाहीत. आम्ही आमच्या छोट्याशा घरामध्ये शेकोटी पेटवून त्याची ऊब घेतो. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई यांनी सांगितले की, तेथे थंडी जास्त असल्यामुळे तेथील लोक गनीबॅगेत पाय घालून झोपतात. मी देखील ती परिस्थिती पाहिलेली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते..........

आता माझ्याकडे आदिवासी विभागाचा कार्यभार आलेला आहे. मी आदिवासी विभागाच्या अधिकाऱ्यांना सांगितले आहे की, एका कुटुंबाला किमान दोन ब्लँकेट दिली पाहिजेत. त्याप्रमाणे बजेट मंजूर करुन घेतले आहे. आताच्या हिवाळ्यामध्ये आम्ही त्यांना ब्लँकेटस देणार आहोत.

सभापती महोदय, आदिवासी लोकांना तीन-चार महिने काम मिळत नाही. त्यांच्या घरात खावयास धान्य नसेल तर कुपोषण वाढते. तेव्हा कुपोषणाची कारणे शोधून त्यावर कायम स्वरुपी इलाज करण्याचा आमचा प्रयत्न आहे. आम्हाला वरवरची मलमपट्टी करावयाची नाही. मी या विभागाचा कार्यभार स्वीकारुन एक वर्ष झालेले आहे. आणखी एका वर्षामध्ये आपणास रिझल्ट पहावयास मिळतील.

सभापती महोदय, यापूर्वी खावटी कर्जाचे फार कमी प्रमाणात वाटप होत होते. परंतु मी चार कुटुंबांना खावटी कर्जाचे वाटप केलेले आहे. आदिवासींच्या घरात अन्न असेल तर कुपोषण होणार नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी गेल्या वर्षी सांगितले होते की, खावटी कर्ज वाढवावे. खावटी कर्ज दोन लाख रुपयांवरुन चार लाख रुपयांपर्यंत केलेले आहे. त्याशिवाय त्यांना रोख रक्कम देतो. ही रक्कम आदिवासी पर्यंत पोहोचते किंवा कसे .. (अडथळा ).. धान्याच्या संदर्भात मी माहिती घेतलेली आहे. धान्याचे भाव बाजारा भावापेक्षा 25 ते 30 टक्क्यांनी जास्त आहेत ही गोष्ट खरी आहे. ज्या एजन्सीला हे काम दिलेले आहे ती एजन्सी धान्य खरेदी करुन आदिवासीपर्यंत पोहोचविण्याचे काम करते. यामध्ये धान्याची वाहतूक करणे, त्याचे पॅकींग करणे इत्यादी गोष्टींमुळे हे भाव वाढलेले आहेत. यापूर्वी धान्य देताना ते स्वच्छ करुन देण्यात येत नव्हते, परंतु आता तशी परिस्थिती नाही... (अडथळा ) आम्ही जेव्हा विरोधी बाकावर होतो त्यावेळी आमचे देखील तेच मत होते.. काम करीत असताना काही निर्णय घ्यावे लागतात.

सभापती महोदय, आदिवासी समाजातील अनिष्ट रुढी,परंपरा, अंधश्रध्दा आम्हाला कमी करावयाच्या आहेत. त्यामध्ये आम्हाला नक्की यश येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3.

श्री.बबनराव पाचपुते..........

याठिकाणी सन्माननीय मंत्री महोदया प्रा.वर्षा गायकवाड यांनी अतिशय चांगले उत्तर दिलेले आहे. त्यांना सपोर्टींग असलेले काम आम्ही निश्चितपणे करु. आरोग्य, शिक्षण, रोजगार, आर्थिक स्तर उंचविणे, चांगल्या प्रकारचे इंग्रजी शिक्षण देण्याचा निर्णय घेतलेला आहे. तसेच आदिवासी आश्रमशाळा व जिल्हापरिषदेतील शाळांना अनुदान देण्याचा निर्णय घेतलेला आहे. तेव्हा कुपोषण हळूहळू कमी होणार आहे. महाराष्ट्राला लागलेला कुपोषणाचा कलंक धुवून टाकण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत त्यासाठी आपल्या सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा आहे, एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

------

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ D/ ST/ प्रथम श्री.शिगम 12.35

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, राज्यातील कुपोषणाच्या विषयावर या सभागृहात प्रदीर्घ स्वरुपाची चर्चा झाली असून या चर्चेला दोन्हीही सन्माननीय मंत्र्यांनी आपआपल्या परीने चांगल्या प्रकारची उत्तरे देण्याचा प्रयत्न केला परंतु एकूणच व्यवस्थेमुळे अनिवार्य असलेली चौकट सोडून मंत्री म्हणून या चौकटीच्या बाहेर पडावयास आपण तयार नाही हेच पुन्हा या चर्चेच्या उत्तरातून सभागृहासमोर आलेले आहे. आय.ए.एस. अधिकारी हे सर्वज्ञानी असावेत आणि त्यांच्या इतके ज्ञान दुस-या व्यक्तीला कधीच नसते असे मला वाटावयास लागले आहे. शासनाने आपले काम आय.ए.एस. अधिका-यांवर ढकलून दिले आणि एखाद्या समितीची नेमणूक केली की सर्व प्रश्न मार्गी लागतील अशा प्रकारची अंधश्रध्दा आपल्या मनामध्ये दाटली आहे किंवा काय अशा प्रकारचा संशय मला येत आहे.

सभापती महोदय, प्रश्न सर्वांनाच समजतो आणि तो प्रश्न लहान आहे असे मला वाटते. हा प्रश्न सोडविण्यासाठी कोणत्या प्रकारची उपाययोजना करावयास पाहिजे हे प्रत्येक सन्माननीय सदस्य सांगू शकतो परंतु त्यासाठी समिती का नेमली जाते.? आज समितीच्या बाबतीत असे म्हटले जाते की, जर कोणताही निर्णय घ्यावयाचा नसेल तर समिती निर्माण केली जाते आणि समितीच्या बैठका वारंवार घेतल्या जातात. त्यामुळे समितीमध्ये निर्णय होत नाही परंतु समितीच्या बैठका मात्र नियमित होत राहतात.माननीय मंत्री महोदय या ठिकाणी आकडेवारी सादर करीत असतात. या आकडेवारी बाबत असे म्हटले जाते की, जे काही सांगावयाचे आहे ते त्यामधून लपवता येऊ शकते आणि जे लपवावयाचे आहे ते सांगताही येऊ शकते. या प्रश्नाची सोडवणूक करीत असतांना आम्हाला शासनाकडून काही अपेक्षा आहेत. या खात्याची जबाबदारी आपल्या सारख्या एका मंत्र्यांवर टाकण्यात आली आहे आणि एका संवेदनशील मंत्र्याकडे नोडल मंत्री म्हणून हे काम देण्यात आले आहे याबद्दल मला आपले अभिनंदन करावयाचे आहे. त्याचप्रमाणे आपण अधिका-यावर किती अवलंबून राहणार आहात असेही मला आपल्याला विचारावयाचे आहे. मंत्री महोदयांनी स्वत: कुपोषणग्रस्त भागांना भेटी देऊन त्या ठिकाणी कोणत्या प्रकारची औषध योजना आहे आणि त्या औषधांचा दर्जा कसा आहे याची पहाणी केली पाहिजे.. आज राज्यामध्ये भरारी पथकाची नेमणूक करण्यात आली आहे परंतु या भरारी पथकाने भेट देण्यापूर्वीच त्याची माहिती सबंधितांना मिळत असते. भरारी पथकाच्या वेगापेक्षासुध्दा अधिक वेगाने ही माहिती आताच्या आधुनिक विज्ञान युगात त्यांना मिळत असते तेव्हा या भरारी पथकामार्फत पाहणी न करता मला माननीय मंत्र्यांना असे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

सांगावयाचे आहे की, त्यांनी मंत्रालयात कमीत कमी वेळ बसावे आणि कुपोषणग्रस्त भागात जास्तीत जास्त दिवस फिरले पाहिजे .आदिवासीच्या कुटुंबामध्ये जाऊन त्याला कोणत्या प्रकारच्या सुविधा मिळतात त्याच्यासाठी कोणती औषधांची व्यवस्था करण्यात आली आहे याची पहाणी स्वत: मंत्र्यांनी करावी. अधिका-यांच्या समवेत फौजफाटयासह त्यांनी दौरा केला तर त्या दौ-यातून फारसे काहीही निष्पन्न होणार नाही म्हणून माननीय मंत्र्यांनी अधिका-यांवर फारसे विसंबून राहता कामा नये.उत्तर देत असतांना सन्माननीय मंत्री श्री बबनराव पाचपुते यांनी असेही सागितले की," आपल्याकडे भरपूर निधी उपलब्ध आहे." परंतु त्या निधीचा योग्य वापर करावयाचा असेल तर प्रत्येक वाडया बस्त्यांवर जाऊन आपण स्वत: पाहणी केली पाहिजे आणि कामाचे नियोजन व्यवस्थितपणे केले पाहिजे. माननीय मंत्री महोदय अशा प्रकारे काम करीत आहेत हे एकदा जाहीर झाले की झोपलेल्या शासन यंत्रणेला जाग येण्याची अंधुकशी शक्यता आहे.

माननीय मंत्री महोदय नेहमीच असे सांगत असतात की, एखादा अधिकारी चूक करणारा असेल, कामचुकार असेल तर त्याला निलंबित करण्यात येईल. परंतु निलंबन कसे होईल याची काही अधिकारी वाट पहात असतात कारण निलंबित केल्यानंतर ठराविक महिन्यानंतर त्याला ठराविक पगार दिला जातो त्यानंतर काही कालावधी झाल्यानंतर पुन्हा त्यात वाढ केली जाते.त्या अधिका-याला कशासाठी निलंबित केले होते यासाठी समिती नेमली जाते .आय.ए.एस. अधिका-याला त्या समितीच्या प्रमुख पदी नेमले जाते त्या अधिका-याचे निलंबन बरोबर आहे की चुकीचे आहे याबाबतीत त्या समितीमध्ये चर्चा केली जाते..

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

इकडे पगार चालू आहे, माणसे कामावर जात नाहीत आणि मग आदिवासींचे कुपोषण वाढत आहे, बालमृत्यू घडत आहेत अशी ही सर्व परिस्थिती आहे. माझी अशी विनंती आहे की, ही परिस्थिती आपण बदलायला पाहिजे. आपणाकडून सक्रीय आणि सकारात्मकतेची भावना ठेवून मी आपल्यासमोर या सूचना सादर करीत आहे. आपण अत्यंत चांगले काम करु शकाल. पुढील वर्षी हा विषय सभागृहामध्ये पुन्हा उपस्थित करण्याची वेळ आमच्यावर येणार नाही असा विश्वास प्रकट करुन माझे भाषण संपवितो.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मी फक्त एका गोष्टीचा खुलासा करतो की, माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्यक्षात आदिवासी भागामध्ये जाऊन पहाणी करण्यासाठी नामदार प्रा. वर्षाताई गायकवाड यांनी एक कार्यक्रम तयार करावा. त्याप्रमाणे आम्ही कार्यक्रम करु.यामध्ये चांगले रिझल्ट येत आहेत. कुपोषणाचे प्रमाण आपण कमी करीत आलो आहोत. कुपोषण हा विषय सर्वांचा आहे, त्यामुळे त्याबाबत एकत्रित विचार करुन हे प्रमाण कमी करण्यासाठी आपण केलेल्या सूचनेप्रमाणे अंमलबजावणी करण्याची आम्ही तयारी ठेवली आहे.

**उपसभापती** : सर्व माननीय सदस्यांचे प्रश्न विचारुन झाल्यानंतर माननीय मंत्री महोदयांनी त्याला एकत्रितपणे उत्तर द्यावे.

श्री सय्यद जमा : माननीय सभापति जी, माननीय सदस्य श्री टकले साहब ने जो भावना यहां पर व्यक्त की है, उनकी उस भावना पर 100 प्रतिशत सहमति जताते हुए दो प्रश्न मैं मंत्री महोदय से पूछना चाहूंगा. पहली बात तो यह कि पिछली बार माननीय मुख्यमंत्री जी ने जो मीटिंग ली थी ,उस मीटिंग के अहवाल पर कार्रवाई शुरु की गयी है तथा आपके मंत्रालाय को नोडल एजेंसी बनाया गया है, उसकी एक कॉपी तथा आपने जो इन्टिग्रेटेड स्कीम बनायी है उस स्कीम को कैसे लागू करना है, उससे संबंधित जानकारी की एक कॉपी हम सभी माननीय सदस्यों को दे दी जाये ताकि उस स्कीम की मॉनिटरिंग हम भी कर सकें.

दूसरी बात माननीय सदस्य श्री टकले साहब ने कही कि आप वहां पर पेरिफिरिअल डॅवलपमेंट जरुर कीजिए, वहां पर आप आदिवासी स्कूल खोलिए, इंगलिश मीडियम स्कूल आप वहां पर जरुर खोलिए तथा विकास के दूसरे कार्य भी आप वहां पर जरुर कीजिए. लेकिन वहां

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ ST/

श्री सय्यद जमा....

पर टारगेटेड सोशल ऑडिट भी होना चाहिए. वहां पर क्वॉलिटि और क्वॉन्टिटि , इन दोनों ही बातों का ऑडिट होना चाहिए, ताकि आपको पता चल सके कि जो पैसा आप वहां पर कुपोषण को खत्म करने के लिए भेजते हैं, उसमें से कितना पैसा वास्तव में वहां पर पहुंच पाता है. यही मेरे दो प्रश्न हैं. मुझे उम्मीद है कि माननीय मंत्री महोदय, इन प्रश्नों का उत्तर जरुर देंगे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, पहिली गोष्ट अशी की, नोडल एजन्सी म्हणून महिला व बाल विकास विभागाकडे हे काम दिले आहे हा राज्य शासनाचा चुकीचा निर्णय आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग, आदिवासी विकास विभाग व नंतर महिला व बालविकास विभाग येतो. या सर्व प्रश्नांचा संबंध कुपोषण आणि आरोग्याशी आहे. त्यामुळे राज्य सरकारने हा निर्णय बदलणे अत्यंत आवश्यक आहे असे मला वाटते. दुसरे असे की, दाई किटची चौकशी आपण केव्हा करणार आहात, आदिवासी खात्यामधील भ्रष्टाचाराची चौकशी केव्हा करणार आहात ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाला सजेशन फॉर ॲक्शन हे उत्तर आहे. दुसरे असे की, दाई किटच्या चौकशीच्या संदर्भात चौकशी सुरु आहे. आपण सांगितल्याप्रमाणे तिन्ही प्रकरणांची चौकशी सुरु आहे. त्या चौकशीचा अहवाल आल्यानंतर आपण माझ्याकडे आल्यास मी आपणाबरोबर त्या संदर्भात चौकशी करण्यास तयार आहे. तसेच, आम्ही ज्यावेळी आदिवासी विभागामध्ये जाऊ त्यावेळी आम्ही आपणास पत्र पाठवून कळवू आणि आपण आमच्याबरोबर येणार असाल तर आपणास देखील घेऊन जाऊ.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, याठिकाणी सांगण्यात आलेल्या योजना या टारगेटेड योजना आहेत कां? त्यासाठी वेळेचे बंधन असणार आहे कां?. जर वेळेच्या बंधनामध्ये हे टारगेट अचिव्ह झाले नाही तर तुम्ही त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार काय?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मी या सभागृहाला आश्वासित करते की, आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे. त्यासाठी आपण सर्वांनी आम्हाला सहकार्य केले पाहिजे. माननीय सदस्य श्री. जमा यांनी विचारलेल्या प्रश्नाला सजेशन फॉर ॲक्शन असे माझे उत्तर आहे. इतर माननीय सदस्यांना मी सांगू इच्छिते की, मी अगोदर सांगितल्याप्रमाणे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट दिले जाईल आणि त्याप्रमाणे पाठपुरावा केला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माननीय नामदार श्री. पाचपुते साहेबांनी कन्यादान योजनेचा उल्लेख याठिकाणी केला. परंतु माझ्या वाचनात आल्याप्रमाणे त्यांच्या सचिवांनी सांगितले आहे की, आदिवासी विभागामध्ये कन्यादान योजना अंमलात नाही. त्याबाबत मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

श्री. बबनराव पाचपुते : सचिवांनी काय सांगितले हा महत्वाचा प्रश्न नाही. कन्यादान योजनेमध्ये पूर्वी 10 हजार रुपये देत होतो आता 15 हजार रुपये देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, आदिवासी विभागासाठी असलेला 800 कोटींचा निधी मागील वेळी इतर विभागांकडे फिरविण्यात आला. यावेळी तो संपूर्ण निधी आदिवासी विभागासाठीच खर्च करणार काय?

(यानंतर श्रीमती.थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, होय. मी सुरुवातीलाच सांगितले की, यावर्षी आदिवासी विभागाचे पैसे इतरत्र न फिरविता ते आदिवासींसाठीच खर्च होणार आहेत.

**उप सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

सभागृहाची विशेष बैठक आता तहकूब होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन्हा सुरु होईल.

( सभागृहाची बैठक 12.45 ते 1.00 वाजेपर्यंत तहकूब झाली. )

----

यानंतर श्री. बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावासंबंधी**

**उप सभापती** : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये एक प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी दिलेला आहे. त्यामध्ये रायगड जिल्ह्यातील पेण अर्बन बँकेत कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे ऑक्टोबर, 2010 मध्ये उघडकीस येणे, रिझर्व बँकेने या बँकेवर दिनांक 23.10.2010 रोजी आर्थिक निर्बंध आणून 5 सदस्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करणे, बँकेचे अध्यक्ष, सरव्यवस्थापक व काही संचालकांना सी.बी.आय.ने चौकशीसाठी ताब्यात घेणे, त्यांची मालमत्ता जप्त करण्याचे जिल्हाधिकारी यांना आदेश देणे, बँक सुमारे 600 कोटी रुपयांना बुडणे, 1 लाख 82 हजार ठेवीदार संकटात येणे, बँकेच्या बनावट पावत्या करुन केंद्रातील कार्पोरेशनला तारण म्हणून देणे, हवाला रक्कम हस्तांतरणाबाबत बँकेची कोट्यवधी रुपयांची उलाढाल होणे, या सर्व गैरव्यवहारामुळे बँकेचे ठेवीदार, खातेदार आणि गुंतवणूकदार यांच्यामध्ये तीव्र असंतोष निर्माण होणे, याबाबत गुंतवणूकधारकांना व ठेवीदारांना रकमा तातडीने परत देण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्याची आवश्यकता या विषयावर चर्चा करण्यासाठी प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याची सूचना दिलेली आहे. यासंदर्भात सन्माननीय सदस्यांना काही सांगावयाचे असल्यास थोडक्यात सांगावे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, रायगड जिल्ह्यामधील ही चौथी बँक बुडालेली आहे. या बँकेमुळे संपूर्ण उत्तर रायगडमधील ठेवीदारांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झालेली आहे. जिल्ह्यामध्ये जवळजवळ सात ते आठ वेळा रास्ता रोको केला गेला. ठेवीदारांचे 600 कोटी रुपये बुडाले. त्या ठिकाणी 400 कोटी रुपयांच्या खोट्या एल.सी.काढून दुबईतून सोने निर्यात करण्यासाठी त्या ठिकाणी मोठा आर्थिक घोटाळा झालेला आहे. हे करीत असताना त्या ठिकाणी ज्या महामंडळामार्फत एल.सी. ओपन केली होती त्या महामंडळाने सी.बी.आय. कडे तक्रार केली आणि सी.बी.आय. ने त्या बँकेचे विद्यमान चेअरमन, त्यांची पत्नी, 2 संचालक आणि काही अधिकाऱ्यांना ताब्यात घेतलेले आहे. त्या ठिकाणी साडेतीन हजार कोटी रुपयांच्या नगद रकमेचे

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KGS/ ST/ KTG/

श्री. जयंत पाटील .....

ड्राफ्ट काढलेले आहेत. त्या बँकेमध्ये साडेतीन हजार कोटी रुपये रोख रक्कम भरुन त्याचा ड्राफ्ट काढून हवालामार्फत दुबईला पाठविण्यात आल्याचा संशय प्राथमिक चौकशीमध्ये दिसतो. त्यामुळे हे पैसे कोणाचे आहेत हा प्रश्न आहे. त्या जिल्ह्यामध्ये संतापाची लाट उसळलेली आहे. मी बँक क्षेत्रामध्ये काय काम करतो, बँक कशी चालवावी, संस्था कशी चालवावी हे मी महाराष्ट्राला दाखवून दिलेले आहे. या ठिकाणी हा वेगळा विषय आहे. पेण बँकेचे जे 1 लाख 82 हजार ठेवीदार आहेत, ज्यांनी 50 हजार रुपये, एक लाख रुपये, 2 लाख रुपये बँकेत ठेवलेले आहेत असे जे ठेवीदार आहेत ते आज हतबल झालेले आहेत. काही ठेवीदार विष घेऊन बँकेच्या दारामध्ये उभे राहात आहेत. त्यामुळे शासनाने याची चौकशी करावी.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

त्यासाठी प्रश्नोत्तराचा तास बाजूला ठेवून याबाबत चर्चा करावी अशी मी मागणी करतो.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी पेण अर्बन बँकेसंबंधी नियम 289 अन्वये सभागृहात चर्चा व्हावी अशी मागणी केलेली आहे. रायगड जिल्हयातील सामान्य माणसाचे कंबरडे मोडण्याची वेळ आली आहे. 742 कोटींची ठेव बुडाली आहे. यामध्ये जवळपास 2 लाख ठेवीदार आहेत. या ठेवीदारांमध्ये पत संस्थेचे सभासद आहेत, या सभासदांनी धरणे व आंदोलने आजपासून सुरु केली आहेत. मी स्वत: अनेकदा त्या बँकेच्या शाखांना भेटी दिलेल्या आहेत. रायगड जिल्हयातील सामान्य माणूस, शेत मजूर, पत संस्थेचे जे सभासद आहेत ते हवालदिल झाले आहेत, भयग्रस्त झाले आहेत. त्यांच्यात संतापाची लाट पसरली आहे. रायगड जिल्हयातील ही चौथी बँक आहे. अशाप्रकारे लाखो लोकांचे कंबरडे मोडल्यामुळे त्यांच्यात संताप पसरला आहे. शासनाकडून त्यांना न्याय मिळत नाही. त्या बँकेच्या अध्यक्षांना अटक झाली असली तरी संपूर्ण संचालक मंडळ बाहेर फिरत आहे. ज्यांनी आपल्या जमिनी हायपोथेटिकली गहाण ठेवलेल्या आहेत त्या जमिनींच्या नोटिसा वर्तमानपत्रातून येण्यास सुरुवात झ ालेली आहे, जमीन विकत घेण्याचीही सुरुवात झालेली आहे म्हणून सभागृहासमोरील सर्व कामकाज बंद करुन नियम 289 अन्वये या महत्वाच्या विषयावर चर्चा करण्यास अनुमती द्यावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

**उप सभापती** : या विषयाची लक्षवेधी सूचना स्वीकृत करण्यात आलेली आहे. त्यामुळे ती चर्चेला येईल. तथापि, हा विषय अत्यंत महत्वाचा असल्यामुळे नियम 97 अन्वये दीड तासाच्या चर्चेला अनुमती देऊन नियम 289 अन्वयेच्या या प्रस्तावाला अनुमती नाकारीत आहे.

श्री.संजय केळकर : धन्यवाद.

**उप सभापती** : दुसरा एक नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी दिलेला आहे. त्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, जैतापूर येथे होणा-या अणू ऊर्जा प्रकल्पासंबंधी केवळ त्या तालुक्यातच नाही तर संपूर्ण जिल्हयामध्ये तसेच संपूर्ण कोकणपट्टीत असंतोष निर्माण झालेला आहे. या प्रकल्पातून वीज तर निर्माण होईल. परंतु तेथील अनेक पिढयांवर परिणाम

2....

श्री.दिवाकर रावते.....

करणारे किरणोत्सर्ग बाहेर पडणार आहेत याची चिंता तेथील गावक-यांना आहे. या प्रकल्पामुळे तेथील गावकरी विस्थापित होणार आहेत. या गावक-यांना हा प्रकल्प होणार की नाही हे नीट सांगितले जात नाही. समुद्राच्या पाण्यामध्ये या प्रकल्पामुळे होणारी उलाढाल, समुद्रातून होणारी वाहतूक, त्यामुळे मत्स्योत्पादनावर होणारा पारिणाम, कोळी बांधवाच्या धंद्यावर होणारा परिणाम, या सर्व बाबी गंभीर आहेत. हा प्रकल्प तेथे होणार नाही, हे सांगण्याऐवजी त्या लोकांना पोलीस दंडुक्याने बदडणार असतील, ठोकशाहीचा वापर करुन गावक-यांचा आवाज बंद केला जात असेल, हे अत्यंत अश्लाघ्य आहे. ही घटना महाराष्ट्राच्या भूमीमध्ये घडत आहे. या राज्यात अनेक वीज प्रकल्प होऊ घातले आहेत, त्यामुळे जनतेत असंतोष आहे. परंतु जैतापूरसारख्या प्रकल्पाला विरोध करण्यासाठी निदर्शने करण्याचा त्यांना अधिकार असताना सुध्दा दंडुकेशाहीचा वापर करुन म्हाता-या कोताऱ्यांना घरादारातून बाहेर काढून फरफटत नेले जात आहे. ही दडपशाही अत्यंत निषेधार्ह आहे, या प्रश्नाने उग्र स्वरुप धारण केलेले आहे. त्यामुळे सभागृहासमोरील कामकाज बाजूला ठेवून या प्रकल्पाची चर्चा करावी एवढी गंभीर परिस्थिती त्या भागात निर्माण झाली आहे.

अण्णा हजारे म्हणजे सरकारी परब्रम्ह, यांनी हो म्हटले की सगळे ओ.के. आणि बाकीच्यांचा विरोध नाही अशाप्रकारची भूमिका सरकार घेते त्याबाबत सुध्दा येथे चर्चा होणे आवश्यक आहे. त्यांनी पाठिंबा दिला म्हणजे सर्व झाले असे चुकीच्या पध्दतीने चालू आहे. म्हणून आपल्याला विनंती आहे की, या प्रकल्पामुळे होणारे दुष्परिणाम आम्ही आमच्या चर्चेतून मांडू. त्यासाठी आजचे कामकाज थांबवावे. कोकणातील त्या भागाच्या जनतेत प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे त्याला वाव निर्माण करुन देण्यासाठी येथे चर्चा करावी अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जैतापूर प्रकल्पाच्या संदर्भात नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे. हा विषय गंभीर बनलेला आहे. शेकडो शेतकरी या प्रकल्पामुळे उद्ध्वस्त होणार आहेत. यासंदर्भात शेतकरी आपला विरोध दर्शवित असताना त्यांना समजून न घेता त्यांच्यावर लाठीचार्ज करण्यात आला. हा प्रकल्प कोळशावर आधारित नाही. कोळशाचा साठा संपुष्टात आल्यानंतर आपल्याला अशा प्रकारचे न्युक्लिअर प्रकल्प उभारावे लागणार आहेत. परंतु ते उभारत असताना समुद्र किना-यावर या न्युक्लिअर प्रकल्पाचा काय परिणाम होईल, शेतक-यांच्या शेतीवर काय परिणाम होईल, मच्छिमारीवर कोणता परिणाम होईल हे अजून शेतक-यांना समजलेले नाही. जैतापूर अणुउर्जा प्रकल्पासाठी शेतक-यांच्या जमिनी घेतल्या जात आहेत. प्रकल्पबाधित शेतक-यांना अतिशय तुटपुंजे पॅकेज देण्याचा प्रयत्न झालेला आहे. सभापती महोदय, कोकणामध्ये एन्रॉन आणि कोकण रेल्वे हे दोन प्रकल्प झाले. दोन्ही प्रकल्पांच्या बाबतीत अनुभव चांगला नाही. कोकण रेल्वेसाठी ज्या शेतक-यांनी आपल्या जमिनी दिल्या त्या शेतक-यांच्या मुलांना अजून रेल्वेमध्ये नोक-या मिळालेल्या नाहीत. एन्रॉनच्या बाबतीतही तसेच झाले. जैतापूरच्या प्रकल्पाबाबत हाच अनुभव शेतक-यांना येईल. या प्रकल्पामुळे पर्यावरणावर कोणते परिणाम होतील याचा अभ्यास केला पाहिजे. समुद्र किनारी मच्छिमारीचा व्यवसाय चालतो. कोकणामध्ये आंबा-काजूच्या बागा मोठ्या प्रमाणावर आहेत. या फळपिकांवर काय परिणाम होतील याचा अभ्यास झालेला नाही. यामुळे शेतक-यांत प्रचंड असंतोष निर्माण झालेला आहे आणि परिणामी त्यांच्यावर लाठीहल्ला झालेला आहे. हा अत्यंत गंभीर विषय आहे. या विषयाला न्याय देण्यासाठी सभागृहाचे आजचे कामकाज बाजूला सारुन या विषयावर चर्चा घडवून आणावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, या विषयावर मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो. जैतापूर येथे अणुऊर्जा प्रकप होऊ घातला आहे. सबंध देशातील हा सर्वात मोठा प्रकल्प कोकणामध्ये होत आहे. सभापती महोदय, या संदर्भात मी नम्रपणे सांगू इच्छितो की, वीज निर्मितीसाठी एका बाजूला विदर्भ आणि दुस-या बाजूला कोकण आहे. कोकण हा अतिमागासलेला भाग आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. कोकणाला नेहमी विकासापासून वंचित ठेवले गेले आहे. मंत्रीमहोदय श्री. सुनील तटकरे यांना मी विचारु इच्छितो की,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

कोकणामध्ये 200 कि.मी.च्या अंतरामध्ये 55 हजार मे.वॅट.क्षमतेचे विजेचे 32 प्रकल्प उभारण्याचा निर्णय कशासाठी घेत आहात, कोकणाने असे कोणते पाप केले आहे? राज्याला 6 हजार मे.वॅटची गरज असताना 200 कि.मी. च्या अंतरामध्ये 55 हजार मे.वॅट क्षमतेचे वीज प्रकल्प आणून कोकण उद्ध्वस्त करण्याची सुपारी आपण घेतली आहे काय ?...(अडथळा)...

श्री. भाई जगताप : एन्रॉनचा प्रकल्प आणि जैतापूरचा प्रकल्प या दोन्ही प्रकल्पांना युतीच्या काळामध्येच सुरुवात झाली.

श्री. रामदास कदम : याला खेकड्याची प्रवृत्ती म्हटली जाते.एन्रॉन प्रकल्प चालू करण्यासाठी मी गेलो होतो...(अडथळा)...कोकणामध्ये 3000 मे.वॅट वीज निर्माण होते. आज राज्याला विजेची आवश्यकता आहे. लोडशेडींग आम्हाला नको. या गोष्टींची मला जाणीव असून त्या कोणी मला शिकविण्याची गरज नाही. 55 हजार मे.वॅट वीज कोकणातून निर्माण केली जाणार आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम......

हे सगळे कशासाठी चालले आहे, कोणासाठी चालले आहे, कोणाच्या खिशात पैसे घालायचे आहेत, कोणी सुपारी घेतली? एका बाजूला शासनाने रत्नागिरी जिल्हा फलोद्यान जिल्हा म्हणून घोषित केला. सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केला. पर्यटन वाढीच्या दृष्टीने विकासासाठी निधी दिला जातो परंतु तो निधी खर्ची पडत नाही. रत्नागिरी जिल्हा फलोद्यान जिल्हा घोषित केल्यामुळे मोठया प्रमाणात फळबागांची लागवड झाली. निधी खर्ची पडला आहे. आंबा, काजू, आवळा आदी फळ पिकांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होण्याची वेळ आली असताना अणूऊर्जा प्रकल्प आणून फळबागा उद्ध्वस्त करण्याची सुपारी घेतली आहे. कोकणी माणूस कदापि हे सहन करणार नाही. मागील काळात 2-3 ऊर्जा प्रकल्प सुरु करण्यात आले. स्थानिक जनतेच्या विरोधात जाऊन पोलिसांच्या दडपशाहीने त्या प्रकल्पांची उभारणी केली गेली. पुन्हा त्याच पध्दतीने प्रयत्न सुरु झालेला आहे. मी मुद्दाम शासनाला सांगू इच्छितो की, गरज भासली तर लाठ्याकाठ्या झेलल्या जातील. आमच्या छातीवर गोळ्या झेलू. परंतु कोणत्याही परिस्थितीत जैतापूर अणूऊर्जा प्रकल्प होऊ देणार नाही. त्या परिसरातील मच्छिमार बांधवांना, फळबागधारकांना उद्ध्वस्त होऊ दिले जाणार नाही ही आमची भूमिका आहे एवढेच या ठिकाणी सांगून मी माझे दोन शब्द संपवितो.

**उप सभापती** : नियम 289 अन्वयेच्या सूचनेवर अनेक माननीय सदस्य म्हणणे मांडण्याची विनंती करीत आहेत. आतापर्यंत यावर माननीय सदस्य श्री दिवाकर रावते, विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, श्री. रामदास कदम यांनी आपले विचार मांडले आहेत. आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये नियम 260 अन्वये जो प्रस्ताव चर्चेसाठी दर्शविण्यात आला आहे, त्या प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी या विषयासंबंधी माननीय सदस्यांना जरुर बोलता येईल.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

श्री.रामदास कदम : कोकणाला न्याय देण्यासाठी या विषयावरील चर्चेला प्राधान्य द्यावे.

**उप सभापती**: मी नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या सूचनेला अनुमती नाकारीत आहे. आता प्रश्नोत्तरे घेण्यात येतील...................

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

..2..

**उप सभापती** : सभागृहातील परिस्थिती विचारात घेता मला कामकाज करणे अशक्य होत असल्यामुळे मी सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 25 मिनिटांपर्यंत तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.17 ते 1.25 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------

नंतर 2ए.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्यासाठी उभे असतात.)

**उप सभापती** : आजच्या कार्यक्रम पत्रिकेवर नियम 260 अन्वये याच विषयावर चर्चा आपण ठेवलेली आहे. तेव्हा त्या चर्चेच्या वेळी सन्माननीय सदस्यांनी आपले मुद्दे मांडावेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, त्या चर्चेसाठी जो वेळ दिलेला असतो तो सिमीत असतो. त्यामुळे व्यापक स्वरुपाची चर्चा करता येणार नाही म्हणून आमची विनंती आहे की, त्यासाठी चर्चेचा वेळ वाढवून द्यावा.

श्री. विनोद तावडे : महोदय, सभागृहासमोर सध्या जो विषय सुरु आहे तो विषय नियम 289 चा कसा होतो एवढ्यापुरतेच मी बोलणार आहे. कोकणातील जैतापूर अणु उर्जा प्रकल्पासंबंधी स्थानिक लोकांच्या मनात अनेक शंका आहेत. त्या म्हणजे प्रकल्पातूर बाहेर पडणारे गरम पाणी समुद्रात सोडले तर त्यामुळे समुद्रातील माशांच्या बाबतीत अडचण निर्माण होणार आहे. तसेच कॅन्सर, ट्युमर सारखे आजार होण्याची शकयता आहे. त्याचबरोबर आंबा, सुपारी व काजूच्या पिकालाही त्रास होईल. असे असताना केवळ फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष श्री. निकोलस येतात आणि घाईघाईने शासन हा प्रकल्प घेण्याचा प्रयत्न करतो, असे योग्य होणार नाही. या प्रकल्पाच्या बाबतीत जर शासनाकडे मेरिट असेल तर मेरिटवर चर्चा करावी. अशी चर्चा न करता लोकांची केवळ डोकी फोडून प्रकल्प घेता येणार नाही. कारण हे लोकशाहीचे राज्य आहे आणि त्यामुळे लोकांना आपली बाजू मांडता आली पाहिजे. तसेच या प्रकल्पात ज्यांची जमीन व घरे उद्ध्वस्त होतील त्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत योग्य विचार होणे आवश्यक आहे. तुटपुंजी नुकसान भरपाई देऊन चालणार नाही तर त्याला आयुष्यभर दरमहा 8 हजार, 10 हजार किंवा 15 हजार रुपये द्यावेत अशीही आमची विनंती आहे. कारण त्याची आयुष्यभराची रोजीरोटी पुरविणारी जमीन तो या प्रकल्पासाठी कायमची देणार आहे, त्यादृष्टीने योग्य विचार करावा अशी मी विनंती करतो.

श्री. अजित पवार : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोदजी तावडे यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्या अनुषंगाने माझी सभागृहाला विनंती आहे की, प्रश्नोत्तराचा तासावर प्रथम चर्चा करावी. कारण प्रश्नोत्तराचा तास ज्यावेळेस आपण घेतो त्याची तयारी म्हणजे 40-40 दिवस

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .........

अगोदर सदस्यांनी प्रश्न विचारलेले असतात, तेव्हा हे प्रश्न चर्चेला येत असतात. त्या अनुषंगाने काही मतदारसंघातील महत्वाचे व सार्वजनिक प्रश्न सुटावेत अशीही अपेक्षा असते. तसे पाहिले तर आजच्या कामकाज पत्रिकेवर आपण नियम 260 अन्वये याच विषयावर चर्चा देखील ठेवली असून त्यात देखील "माडबन, रत्नागिरी येथे उभारण्यात येत असलेल्या 10 हजार मेगावॅट क्षमतेच्या जैतापूर अणुउर्जा प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्त गावकऱ्यांनी शासनाने जाहीर केलेल्या पुनर्वसन पॅकेजला केलेला विरोध, भोपाळ गॅस दुर्घटनेच्या धर्तीवर जैतापूर जलविद्युत प्रकल्पात देखील किरणोत्सर्ग होण्याचे निर्माण झालेली शक्यता व त्यामुळे होणारे प्रदूषण व पर्यावरणाचा ऱ्हास होण्याचा निर्माण झालेला धोका" या अनुषंगाने उल्लेख केलेलाच आहे. त्यावर सभागृहात चर्चा होणारच आहे. म्हणून माझी विनंती आहे की, आपण यामध्ये वेळ न घालवता सभागृहात चर्चा सुरु होईल तेव्हाच आपले विचार व्यक्त करावेत. तसेच आज खालच्या सभागृहात देखील चर्चा ठेवलेली असल्याने मी अगोदर तेथे जाईन व या सभागृहात माननीय राज्य मंत्री आपल्या भाषणातील मुद्यांचे टिपण करतील. तसेच आपण म्हणालात त्यानुसार शासन कोणत्याही परिस्थिती लोकांची डोकी फोडण्याच्या मन:स्थितीत नाही. चर्चेच्या अनुषंगाने मी राज्य शासनाची भूमिका मांडणारच आहे तसेच आजपर्यंत जेवढे प्रकल्प झाले त्यापेक्षा कितीतरी चांगले पॅकेज या जैतापूर प्रकल्पासाठी दिले जाईल असेही मी सांगू इच्छितो.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी/मु.शी.: तोंडी उत्तरे**

**विदर्भ पाटबंधारे जोडप्रस्तावाकरिता विनानिविदा कामे देण्यात येत असल्याबाबत**

**(१) * ९१७६ श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.जगदीश गुप्ता , श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन आर्थिक कामकाजामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी प्रत्येक शासकीय विभाग वित्तीय नियमावली (अकाऊंट कोड) प्रमाणे काम करीत असते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वित्तीय नियमावली (अकाऊंट कोड) योजना विदर्भ पाटबंधारे महामंडळालाही बंधनकारक असताना जोडप्रस्तावाच्या नावाखाली पूर्वीच्याच कंत्राटदारांना मोठ्या प्रमाणात विनानिविदा कामे देण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विनानिविदा कामे दिलेल्यामध्ये बेंभळा नदी प्रकल्पावरील मुख्य कालव्याचे काम, खामगांव (जि.बुलढाणा) येथील ढोपरगांव लघुपाटबंधारे योजनेचे काम, चिखली (जि.बुलढाणा) येथील पेनटाकळी प्रकल्पाचे काम, मेहकर (जि.बुलढाणा) येथील उतावळी प्रकल्पाचे काम, निम्न वर्धा प्रकल्प मुख्य कालवा, कार नदी प्रकल्प, गोसीखुर्द प्रकल्प इत्यादी कामांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विनानिविदा कामे देऊन अधिकाऱ्यांनी ठेकेदारांशी संगनमत करुन शासनाच्या कोट्यवधी रुपयांचे नुकसान केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेंद्र मुळक, श्री.सुनील तटकरे यांच्या करिता : (१) होय, खरे आहे.

(२) आवश्यकतेनुसार महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावलीच्या परिच्छेद क्रमांक २२९ नुसार कामाचे वैध विस्तारणाबाबतच्या तरतूदीच्या अधीन राहून तसेच क्षेत्रीय परिस्थितीनुसार कामाची निकड व महामंडळाचे आर्थिक हित विचारात घेऊन काही कामाच्या निविदा अंतर्गत अतिरिक्त वाढीव कामे सक्षम स्तरावरुन मान्यता घेऊन खर्चामध्ये बचत होत असल्याने करण्यात आलेली आहेत.

(३) बेंबळा मुख्य कालव्याची ३ कामे, ढोरपगांव ल.पा. योजनेचे धरणाचे काम, पेनटाकळी प्रकल्पांतर्गत कालव्याचे काम, उतावळी प्रकल्पांतर्गत कालव्यावरील बांधकाम, निम्न वर्धा प्रकल्पावरील कालवा, शाखा कालवाची ३ कामे, कार प्रकल्पातील कालवा वितरकांची ३ कामे, गोसीखुर्द प्रकल्पांतर्गत कालवा, वितरिका व पुनर्वसनाची ६ कामे जोडकामे म्हणून करण्यात आली.

(४) जोडून दिलेली कामे आर्थिकदृष्ट्या किफायतशीर असल्यामुळे करण्यात आलेली आहेत.

(५) सदर कामे तातडीने चालू निविदे अंतर्गतच चालू करुन लवकर पूर्ण केल्यामुळे शासनाचे कोणतेही आर्थिक नुकसान झाले नसून उलट पाणीवापर लवकर चालू झाल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात अप्रत्यक्षपणे भरच पडली आहे. त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय, आम्ही हा जो प्रश्न विचारलेला आहे तो विदर्भ पाटबंधारे प्रकल्पामध्ये जोड प्रस्तावात बिना निविदा कामे देण्यात आली आहेत, त्या संदर्भात आहे. एखादा प्रकल्प करावयाचा असेल तर एकदा त्याची निविदा काढल्यानंतर त्या प्रकल्पाची किंमत

...२..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.:९१७६....

श्री. पांडुरंग फुंडकर....

वाढविण्यासाठी त्याला "जोड प्रस्ताव" असे गोंडस नाव देण्यात आलेले आहे. जोड प्रस्ताव किती करावयाचे याला सुध्दा काही मर्यादा आहेत. पहिल्या प्रश्नाच्या उत्तरात म्हटले आहे की, "हे काम कोड प्रमाणे करावयास पाहिजे". आम्ही पहिला प्रश्न असा विचारला होता की, "शासन आर्थिक कामकाजामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी प्रत्येक शासकीय विभाग वित्तीय नियमावली प्रमाणे काम करीत असते हे खरे आहे काय"? "हे खरे आहे" असे आमच्या पहिल्या प्रश्नाला उत्तर देण्यात आले आहे. दुस-या प्रश्नाचे उत्तर "होय" किंवा "नाही" असे अपेक्षित नसतांना त्यांच्या अधिका-यांनी केलेली कार्यवाही कशी योग्य आहे ते दाखविण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. खरे म्हणजे अधिका-यांनी या मध्ये चुका केलेल्या असून त्यामध्ये लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. हा जो काही प्रकार आहे तो विदर्भाच्याच नशिबीच येत असतो. जोड प्रस्तावामुळे ७-७ पट रक्कम वाढविण्यात आलेली आहे. बेंबळा नदी प्रकल्पाच्या कालव्याचा खर्च अशाच प्रकारे वाढविण्यात आलेला आहे.

**उपसभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, बेंबळा प्रकल्प हा विदर्भाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा प्रकल्प असल्यामुळे या प्रश्नाला आपण न्याय देण्याची आवश्यकता आहे. मंजेशा मोरीच्या बांधकामासाठी ९४.३८ लक्ष रुपये खर्च येणार होता परंतु अतिरिक्त कामाची किंमत ११०.८६ लक्ष रुपये करण्यात आली म्हणजे या कामाची किंमत सव्वापट वाढविण्यात आलेली आहे. मुख्य कालवा हा १ ते ४० कि.मी.चा होता या कालव्याचे संकल्प चित्र व अंदाजपत्रक तयार करण्याचे काम सल्लागारामार्फत करण्यात आले होते. ५४.२० लक्ष रुपये यासाठी खर्च येणार होता परंतु "जोड प्रस्तावात" या कामाची किंमत दुप्पट वाढविण्यात आलेली आहे. या कामाची किंमत आता ९१ लाख रुपये करण्यात आलेली आहे. ढोरपगाव लघू पाटबंधारे योजना, ता.खामगाव या प्रकल्पाची किंमत पहिल्यांदा ४५ लाख रुपये होती परंतु आता या कामाची किंमत ३४० लक्ष रुपये करण्यात आलेली आहे. जोड प्रस्तावामध्ये या कामाची किंमत ७ पट वाढविण्यात आलेली आहे. बिना निविदा काढून या कामाची किंमत वाढविण्यात आलेली आहे.

...३...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.:९१७६....

श्री. पांडुरंग फुंडकर....

लेखी उत्तरामध्ये माननीय मंत्रीमहोदयांनी असे सांगितले आहे की, "सदर कामे तातडीने चालू निविदे अंतर्गतच चालू करुन लवकर पूर्ण केल्यामुळे शासनाचे कोणतेही आर्थिक नुकसान झाले नसून उलट पाणीवापर लवकर चालू झाल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात अप्रत्यक्षपणे भरच पडली आहे. सभापती महोदय, ज्या प्रकल्पाची किंमत अगोदर ४५ लक्ष रुपये होती ती आता ३४० लक्षावर पोहचली आहे. ढोरपगाव प्रकल्प माझ्या तालुक्यातील असून या प्रकल्पाचे काम ७ वर्षे सुरु होते. ७ वर्षापर्यंत या प्रकल्पाचे काम सुरु राहिल्यामुळे कोणत्या शेतक-याला त्याचा फायदा झाला असणार याचा तुम्हीच विचार करा. माझ्याकडे कार, गोसीखुर्द, निम्न वर्धा मुख्य कालव्याचे जे काम होते त्या कामामध्ये दुप्पट ते सातपटीने किमतीत वाढ विदर्भ पाटबंधारे मंडळाने बिना निविदा काढून केलेली आहे. माझा असा प्रश्न आहे की, आपल्याला जर बिना निविदाच कामे करावयाची असतील तर "निविदा" हा जो शब्द आहे तोच यातून काढून टाका. कोणत्याही प्रकल्पाचे काम डायरेक्ट ठेकेदाराला देत चला. विदर्भ पाटबंधारे मंडळाकडून मोठया प्रमाणात पैशाचा अपव्यय होतो आहे. एका बाजूला विदर्भाचा बॅकलॉग संपला असे आम्हाला सांगितले जाते परंतु अशा रितीने हा पैसा कोठे चालला त्याची मात्र काही सुध्दा चौकशी होत नाही. माझा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. "जोड प्रस्ताव" असे गोंडस नाव देऊन लाखो रुपयांचा अपहार केला जात असून त्यामध्ये शासनाचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे व पर्यायाने विदर्भाचे नुकसान होत आहे. त्यामुळे माझी माननीय मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, प्रकल्पाची किंमत ७-७ पट किंमत कशी वाढली, बिना निविदा प्रकल्पाची किंमत कशी काय वाढली याची चौकशी आपण करणार आहात काय ?

मागच्या वेळेस मी हा प्रश्न उपस्थित केला होता परंतु तो चर्चेला येऊ शकला नाही. मी यासंदर्भात प्रश्न विचारला असल्यामुळे अधिका-यांनी धास्तीने "जोड प्रस्ताव" देण्याचे काम बंद केलेले आहे. प्रकल्पाची रक्कम दुप्पट करुन मार्ग शोधण्याचा प्रयत्न झालेला आहे. यामध्ये तक्रारी झाल्यामुळे वडनेरे समिती व मेढगिरी समितीची नियुक्ती करण्यात आली होती त्यामुळे माझी मागणी आहे की, या प्रकल्पामध्ये विदर्भाच्या व शासनाच्या पैशाचा अपव्यय झालेला आहे. त्यामुळे "जोड प्रस्ताव" या गोंडस नावाखाली विदर्भ पाटबंधारे विभागाच्या माध्यमातून २-२,३-३,७-७ पट रकमा वाढवल्या गेल्या आहेत अशा प्रकल्पांची चौकशी केली जाणार आहे काय ?

यानंतर श्री. अजित...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9176...

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, बेंबळा प्रकल्पा अंतर्गत जी अतिरिक्त कामे मंजूर असलेल्या निविदेतून करण्यात आली त्याची पूर्ण माहिती माझ्याकडे आहे. यामध्ये मुख्य कालवा कि.मी.3700 चे मातीकाम आणि बांधकाम व कि.मी.3600 चे बांधकाम आणि मातीकाम जोडून घेण्याचा प्रस्ताव होता. सन 1999 मध्ये या कामा संदर्भातील निविदा मंजूर झाली होती. त्यावेळच्या ठेकेदाराला ही निविदा 0.5 टक्के कमी दराने देण्यात आली होती. या निविदे अंतर्गत कि.मी. 3600 चे माती काम आणि बांधकाम त्यामध्ये अंतर्भूत करण्यात आले. या वाढीव कामाची रक्कम 97 लक्ष रुपये होती. आपण नवीन दरसूची प्रमाणे काम केले असते तर एकूण 14 लाख 40 हजार रुपयांचा अधिक निधी खर्च झाला असता. त्यामुळे हे अतिरिक्त काम त्याच ठेकेदाराकडून केल्यामुळे 14 लाख 40 हजार रुपयांची बचत झालेली आहे. बेंबळा मुख्य कालवा सांडवा क्रमांक 655 मध्ये 90 हजार रुपयांची बचत झालेली आहे. बेंबळा मुख्य कालवा क्रमांक 8570मधील मंजूर कामामध्ये 65 हजार रुपयांची बचत झालेली आहे. उतावळी, ढोरपगाव आणि पेनटाकळी या प्रकल्पांतर्गत जी तातडीची कामे करावयाची होती. त्यामध्ये सुध्दा शासनाचे कोणत्याही प्रकारचे आर्थिक नुकसान झालेले नाही. उलट पाणी वापर लवकर सुरु झाल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नामध्ये भर पडलेली आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे या प्रकरणी तत्कालीन राज्यमंत्र्यांनी चौकशी करण्यात येईल असे सांगितले होते. श्री.र.ल.दमाणे,सहसंचालक यांच्यावर दोषारोप ठेवून कारवाई करण्याचे ठरले होते. मी या संदर्भातील माहिती घेतली आहे. दिनांक 29.2.2008 रोजी श्री.दमाणे यांचे निवेदन जलसंपदा सचिवांकडे प्राप्त झालेले आहे. त्यानंतर मुख्य सचिव यांच्या मान्यतेने त्यांची चौकशी करण्यासाठी श्रीमती लीना मेहेंदळे, अप्पर मुख्य सचिव तथा विशेष चौकशी अधिकारी (2), सामान्य प्रशासन विभाग यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांनी या प्रकरणी चौकशी केली. या प्रकरणामध्ये एकूण 96 लाख 68 हजार रुपयांची बचत झाली असा निष्कर्ष त्यांनी नोंदविला असून श्री.दमाणे यांच्या विरोधातील दोषारोप मान्य होणार नसल्याचे त्यांनी कळविले आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9176...

श्री.सुनील तटकरे.......

माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या प्रश्नाची एकूण व्याप्ती सांगितली. माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी गेल्या वर्षी घोषणा केल्याप्रमाणे आता सर्व निविदा ई-टेंडरच्या माध्यमातून केल्या जातात. या प्रकरणाची मी देखील माहिती घेतलेली आहे. यापुढे अशा प्रकारची विस्तारीत कामे करीत असताना शासनाचे नुकसान न होता आणि वेळेची बचत होत असेल तर त्याची सक्षम अधिकाऱ्याकडून मान्यता घेऊनच कामास परवानगी देण्यात येईल.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, गोसीखुर्द प्रकल्पाचे कालवा, वितरिका आणि पुनर्वसनाची सहा कामे जोड कामे म्हणून देण्यात आली आहेत. या सहा कामांचे प्रत्येकी अंदाजपत्रक किती आहे, या कामाची सद्य:स्थिती काय आहे, या कामाचे ठेकेदार कोण आहेत, या कामांची निविदा न काढता कोणत्या आधारावर त्या ठेकेदाराला काम देण्यात आले ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी या संदर्भात अगोदर खुलासा केलेला आहे. काही कामे विहित वेळेत पूर्ण करण्याचा दृष्टीकोन ठेवून निर्णय घेण्यात आला. परंतु त्या सर्व गोष्टींची सर्वंकष चौकशी झालेली आहे. यामध्ये काही पुनर्वसनाचे प्रश्न होते. गोसीखुर्द हा राष्ट्रीय प्रकल्प म्हणून जाहीर झाला. आता त्यास भारत सरकारकडून निधी मिळतो. या प्रकल्पातून सिंचनाचे फार मोठे क्षेत्र या दोन जिल्ह्यामध्ये निर्माण होणार आहे. प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनाचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. गेल्या वर्षी राज्य शासनाने 152 कोटी रुपयांचे अतिरिक्त पॅकेज दिले. या वर्षी पाणीसाठा झ ााल्यामुळे काही गावांना स्थलांतरित व्हावे लागले. म्हणजे काही जमीन पाण्याखाली गेलेली आहे. मी स्वत: अधिवेशन संपण्यापूर्वी याबाबत बैठक घेणार आहे. त्या बैठकीमध्ये राज्यमंत्री, लोकप्रतिनिधी, प्रकल्पग्रस्त उपस्थित असतील, अशाप्रकारे प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.गायकवाड..

ता.प्र.क्र 9176...

श्री.जयंत प्र.पाटील : माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देतांना असे सांगितले की, पैसे वाचणार आहेत म्हणून टेंडर काढण्यात आले नाही. हे चुकीचे उत्तर रेकॉर्डवर राहता कामा नये यासबंधी कायदा करण्यात आला आहे. 9 - 10 वर्षा पूर्वी ज्या कामाचे टेंडर काढण्यात आले होते त्यांना जर कामे देण्यात येणार असतील तर ते चुकीचे आहे. लोकलेखा समितीने याबाबत आक्षेप घेतला होता तसेच महालेखापालांनीसुध्दा आक्षेप घेतला होता, हे खरे आहे काय ?

श्री.सुनील तटकरे : महाराष्ट्र पब्लीक वर्क डिपार्टमेन्टचे मॅन्युअल असून त्यातील कलम 229 मध्ये तरतूद करण्यात आली आहे..

श्री.जयंत प्र. पाटील : मी जो प्रश्न विचारला आहे त्याचे उत्तर देण्यात यावे.

श्री.सुनील तटकरे : सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्या प्रश्नाचे उत्तर देणे हे माझे कामच आहे. सुरुवातीला ज्या निविदा काढण्यात आल्या होत्या त्यामध्ये कोणत्या प्रकारच्या कामाचा समावेश होता याची माहिती मी सभागृहासमोर ठेवली होती त्याचबरोबर जी कामे तातडीने करावयाची होती त्या संदर्भात सुध्दा त्या वेळच्या दरसूची प्रमाणे काम केले असते तर किती अधिकची रक्कम लागली असती याची माहिती मी कामनिहाय सांगितलेली आहे. या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन सरकारने चौकशी समिती नेमली होती त्याचप्रमाणे अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सुध्दा एक चौकशी समिती नेमली होती यामध्ये शासनाच्या पैशाची बचत झालेली आहे असे निदर्शनास आलेले आहे. सान्माननीय सदस्य श्री जयंत प्र. पाटील यांनी तसेच विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर यांनी जो मुद्दा मांडला आहे त्याचे गांभीर्य लक्षात घेऊन या पुढे जुन्या असलेल्या निविदामध्ये विस्तारित काम यापुढे जाणार नाही.

श्री. सय्यद जमा : यह निर्णय आपने आगे के लिए लिया है. गोसीखुर्द प्रकल्प विदर्भ का बहुत ही महत्वपूर्ण प्रोजक्ट है. इस प्रकल्प में बहुत डिले हुआ है, उसके कारण आपको मालूम हैं. इस प्रोजक्ट के कार्य में बहुत गड़बड़ हुई है. यह एक राष्ट्रीय प्रकल्प है और इसके लिए केन्द्रीय सरकार से पैसा मिलता है, लेकिन केन्द्रीय सरकार ने इस प्रकल्प के कार्य में कई क्रेक्स आने से और लो क्वालिटी का काम होने की वजह से पैसा रोक दिया है. इस बारे में एक चौकशी समिति बनाई गई थी, उसने क्या रिपोर्ट दी है ? गोसीखुर्द प्रकल्प के लिए केन्द्रीय

.... DD 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र 9176.... (श्री. सय्यद जमा)

सरकार ने पैसा देना रोक दिया है, इस बारे में आपके पास क्या जानकारी है ? मेरा दूसरा प्रश्न यह है कि गोसीखुर्द प्रकल्प के प्रकल्पग्रस्तों का मोर्चा 2 बजे यहां पर आ रहा है तो क्या आप उनसे मिलकर उनकी समस्याओं को दूर करने और उनको राहत देने की घोषणा करेंगे ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, गोसीखुर्द प्रकल्पाच्या कामाच्या बाबतीत सरकारने चौकशी समिती नेमली होती त्या समितीचा अहवाल सरकारकडे प्राप्त झाला आहे. विधिमंडळाचे अधिवेशन संपण्यापूर्वी त्या चौकशीचा अहवाल सभागृहासमोर सादर करण्यात येणार आहे.सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की गोसीखुर्द हा राष्ट्रीय प्रकल्प म्हणून जाहीर झाल्यानंतर केन्द्र सरकारने त्या प्रकल्पासाठी काही पैसे दिले आहेत. या प्रकल्पाच्या अनुषंगाने ज्या काही तक्रारी करण्यात आल्या होत्या त्याबाबतीत केन्द्र सरकारकडे अहवालसुध्दा पाठविला होता आणि केन्द्र सरकारने यासाठी काही निधी वितरित केला होता.सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला आहे त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, या प्रकल्पग्रस्तांकडून आज मोर्चा काढण्यात येणार असेल तर मी किंवा राज्यमंत्री शिष्टमंडळाची भेट घेतील परंतु मी मघाशी सांगितल्याप्रमाणे प्रकल्पग्रस्तांच्या कामाच्या बाबतीत मी स्वत: बैठक घेणार आहे तसेच आज किंवा येत्या दोन तीन दिवसांमध्ये वर्तमानपत्रामध्ये खास करुन लोकमत या वर्तमानपत्रात गोसीखुर्द प्रकल्पाच्या संदर्भात काही बातम्या प्रसिध्द होत आहेत तेव्हा शक्य झाल्यास अधिवेशनापूर्वी या कामांना भेट देऊन मी कामाची पाहणी करणार आहे आणि जे कोणी दोषी आढळून येतील त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : माननीय मंत्री महोदयांनी बचत कशी झाली असे सांगितले आहे मी एका प्रकल्पाची माहिती विचारणार आहे. ढोरपगाव लघू पाटबंधारे योजनेची मूळ किंमत 45 लाख रुपये असतांना 3 कोटी 40 लाख रुपयापर्यत कशी पोहोचली .

नंतर श्री.सरफरे

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/ 13:45

ता.प्र.क्र. 9176...

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, या प्रकल्पाच्या कामाला सुरुवात केव्हा करण्यात आली प्रकल्पाची मुदत किती वर्षाची होती हा प्रकल्प केव्हा पूर्ण झाला? ही माहिती जर आपण सांगितली तर बचत कशी झ ाली हे आपल्या लक्षात येईल. या जोड प्रस्तावाच्या बाबतीत कॅगने आक्षेप घेतला. त्यामुळे ज्या प्रकल्पाच्या बाबतीत कॅगने आक्षेप घेतला आहे, त्या संबंधित अधिकाऱ्यांवर आपण काय कारवाई केली आहे? सभापती महोदय, या वडनेरे समितीनंतर मेंडगिरी समिती नियुक्त केली होती. त्या समितीच्या शिफारशी काय आहेत? त्या शिफारशीनुसार जर अधिकारी दोषी असतील तर आपण त्यांच्यावर कारवाई करणार काय?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे वडनेरे समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार सरकारने कारवाई सुरु केली आहे. त्यामध्ये कोणत्याही अधिकाऱ्याला पाठीशी घातले जाणार नाही. ढोरपगाव या प्रकल्पाच्या बाबतीत मातीकाम, पेनटाकळी प्रकल्पांतर्गत कालव्याचे काम, उतावळी प्रकल्पांतर्गत कालव्यावरील बांधकाम ही जोडकामे आर्थिकदृष्टया किफायतशीर असल्यामुळे करण्यात आली आहेत. चालू निविदेमधून ही कामे पूर्ण करण्यात आली असल्यामुळे शासनाचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही आणि पाण्याचा वापर सुरु झाल्यामुळे राष्ट्रीय प्रकल्पामध्ये भर पडली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : पेनटाकळी प्रकल्पाचे काम 10 वर्षे लांबल्यामुळे शेतकऱ्याला 10 वर्षे पाणी घेता आले नाही. तर मग तुमची बचत कशी काय झाली?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, राज्यामध्ये सुरु असलेले प्रकल्प पूर्ण होण्यामध्ये सुध्दा अनेक वेळा काही अडचणी निर्माण होतात. प्रकल्पग्रस्तांचे काही प्रश्न असल्यामुळे आज गोसीखूर्द प्रकल्पाचे काम आपल्याला थांबवावे लागले. प्रकल्पाचे काम एकदा सुरु केल्यानंतर ते विशिष्ट दिवसामध्ये पूर्ण झाले तर सिंचनाचे मोठया प्रमाणात लाभक्षेत्र निर्माण होऊ शकते याची सरकारला जाणीव आहे आणि म्हणून अशाप्रकारे हे 80 ते 90 टक्के अपूर्ण असलेले प्रकल्प पूर्ण करण्यावर राज्य शासनाचा निश्चितपणे भर राहील. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत मी स्वत: पुन्हा चौकशी करीन. याबाबत मी त्यांच्याबरोबर चर्चा करीन आणि आवश्यकता असेल तर त्याबाबत उपाय योजना केली जाईल.

---

09-12-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) EE 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कुर्ली, घोणसरी (जि.सिंधुदुर्ग) या प्रकल्पाच्या माती भरावाच्या कामामुळे धरणाला निर्माण झालेला धोका**

**(२) * ९८१४ श्री.परशुराम उपरकर , श्री.किरण पावसकर , डॉ.दिपक सावंत :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्ली व घोणसरी (जि.सिंधुदुर्ग) या प्रकल्पाचे काम पूर्णत्वास जात असतांना, धरणाच्या मुख्य भिंतीजवळ १५० ते २०० मीटर माती भरावाच्या भिंतीला पिंचिंग न केल्यामुळे धरणाला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या भिंतीमुळे या लगतच्या १० गावांना धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धरणाच्या पूच्छ कालव्यातील कामे, दिवाबत्ती, रस्ता, सुरक्षिततेच्या योजना, सुरक्षा रक्षकांच्या चौक्या आदी कामे अपूर्णावस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री.सुनील तटकरे : (१) नाही.

(२) नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) निधी उपलब्धतेनुसार २०११ पर्यंत कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, पहिल्या व दुसऱ्या प्रश्नांना "नाही" असे उत्तर दिले आहे आणि शेवटच्या प्रश्नाला निधी उपलब्धतेनुसार २०११ पर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे, असे उत्तर देण्यात आले आहे. या प्रकल्पाच्या कालव्याच्या कामाला सन २००४ पासून आणि मुख्य धरणाला सन २००७ पासून निधी देण्यात आलेला नाही. त्यामुळे या प्रकल्पाला कोकण पॅकेज अंतर्गत तातडीने निधी देऊन ९५ टक्के पूर्ण झालेला प्रकल्प १०० टक्के पूर्ण करणार काय? दुसरा प्रश्न असा की, या मुख्य धरणाच्या भरावाचे दीडशे् ते दोनशे मीटरचे पिंचिंग वर्क झाले नाही हे खरे आहे काय? तसेच, पिंचिंग वर्क झालेल्या ठिकाणी विशिष्ट वजनाचा दगड वापरावा लागतो तो वापरला नाही याची आपण चौकशी करणार काय?

अप्रसिद्ध प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ९८१४...

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, हा संपूर्ण प्रकल्प ३५ कोटी ३५७ लक्ष रुपयांचा आहे. या धरणाच्या स्थितीमध्ये उभारणीचे काम पूर्ण झाले आहे. माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे या प्रकल्पावर आतापर्यंत २३१ कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. उरलेले काम पूर्ण करण्यासाठी सन २०१०-११ मध्ये ५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय आणखी २१ कोटींच्या अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे. कोकण पॅकेज अंतर्गत कोकणातील प्रकल्पांना जास्तीचा निधी देण्याबाबत मंत्रिमंडळाने ठराव केला असून माननीय राज्यपाल महोदयांची मान्यता मिळाल्यानंतर त्या निधीची उपलब्धता होईल. त्याचप्रमाणे १५० मीटरच्या पिचिंगचे काम राहिले आहे ते येत्या पावसाळयापूर्वी पूर्ण करण्यात येईल.

श्री. विजय सावंत : प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाकरिता आवश्यक असलेली जमीन घेण्यात आली आहे. पुनर्वसनाकरिता जिल्हाधिकाऱ्यांनी घेतलेल्या जमिनीपैकी शिल्लक राहिलेल्या जमिनीच्या बाबतीत "आरक्षित जमीन" असे लिहिलेले शेरे कमी करण्याकरिता मंत्रालयामध्ये दोन वर्षापूर्वी प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. त्याबाबत मंत्री महोदयांची मान्यता मिळून तो प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे अजूनपर्यंत पाठविला गेलेला नाही. त्यामुळे जर शेतकऱ्यांना कर्ज घ्यावयाचे असेल तर आपल्या विभागाची एनओसी घ्यावी लागते. ती शिल्लक राहिलेली जागा आपल्याला नको असल्यास त्या मारण्यात आलेल्या शेऱ्यांना अर्थ काय आहे? त्यामुळे पुनर्वसनाकरिता त्या जागेची गरज नाही अशाप्रकारे रिमार्क मारुन तो प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येईल काय?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला अनुसरुन या प्रकल्पासाठी एकूण किती जमीन घेण्यात आली आहे याची माझ्याकडे माहिती आहे. त्यामुळे माननीय सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे या प्रकल्पामध्ये काही जमीन बाधित होत नसेल व त्या जमिनीच्या ७/१२ वरील सरकारचा हक्क सोडण्याचा प्रस्ताव आलेला असेल तर त्याबाबत येत्या १५ दिवसात उचित कारवाई करण्यात येईल.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, या धरणाचे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. आणि या धरणासाठी तुटपुंजा निधी असल्याचे सांगितले. या धरणाची एकूण पाणी साठविण्याची उंची १९०.१५ मीटर आहे. आणि सध्याचा धरणातील पाणी साठा १८७.५० मीटर आहे. या धरणाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

ता.प्र.क्र. ९८१४...

श्री. किरण पावसकर....

पिचिंगचे काम विशिष्ट वजनाचा दगड न वापरतां झाल्यामुळे त्या धरणाच्या आजूबाजूच्या गावांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या धरणासाठी आवश्यक तेवढा निधी नसल्यामुळे येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी गुण नियंत्रण विभागाकडून तसे आदेश देऊन त्याची तपासणी केली जाणार आहे काय? तसेच, त्या गावांना कोणताही धोका निर्माण होऊ नये याची काळजी घेतली जाणार आहे काय?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, याबाबत मी स्वत: पुन्हा माहिती घेईन आणि आवश्यकता वाटली तर गुण नियंत्रण पथकाकडून त्याची स्वतंत्रपणे चौकशी केली जाईल. परंतु कोणत्याही परिस्थितीत या धरणाच्या भोवतालची गावे या धरणातील पाण्याच्या साठयामुळे बाधित होणार नाही याची दक्षता शासन घेईल.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ KTG/ प्रथम श्री. सरफरे.... 13:50

ता.प्र.क्र.9814...

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, या धरणाचे काम 90 टक्के पूर्ण झालेले आहे. निधी तुटपुंजा आहे. धरणाची पाणी साठवण्याची एकूण उंची 190.15 मीटर एवढी आहे. सध्या त्यामध्ये 187.50 एवढे पाणी साठविण्यात आलेले आहे. माननीय मंत्री महोदयांनी थोडयावेळापूर्वीच सांगितले की, ज्या पध्दतीने विशिष्ट दगडांचे पिचिंग व्हायला पाहिजे होते त्या पध्दतीने झालेले नाही. या धरणाच्या आजूबाजूच्या 10 गावांचे भवितव्य त्यावर अवलंबून आहे. फंड नसल्यामुळे येणाऱ्या अडचणीसाठी गुणनियंत्रण विभागाकडून आदेश देऊन त्याची तपासणी केली जाणार आहे काय आणि त्या गावांना कुठलाही धोका निर्माण होऊ नये याची काळजी घेतली जाणार आहे काय?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, यासंदर्भात मी स्वत: पुन्हा एकदा माहिती घेईन. आवश्यकता वाटली तर गुणनियंत्रण पथकाकडून त्याची स्वतंत्रपणे तपासणी करण्यात येईल पण आवश्यकता वाटली तरच. परंतु कुठल्याही परिस्थितीत भोवतालची कुठलीही गावे या धरणाच्या पाण्याच्या साठयामुळे किंवा पुरामुळे बाधित होणार नाहीत याची खबरदारी शासन निश्चितपणाने घेईन.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, हे धरण जवळ जवळ 20 वर्षापूर्वी सुरु झालले आहे. या धरणाला मुख्य कालवा होता, तो कालवा फुटून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले आहे. गेली चार वर्षे शेतकऱ्यांना भुईभाडे मिळालेले नाही तेव्हा हे भुईभाडे शेतकऱ्याना कधी मिळेल तसेच तेथील कालव्यांचे काम केव्हा पूर्ण करण्यात येईल, सपाटवाडीमध्ये पाणी घुसलेले होते, या संदर्भात तेथील नवीन कालव्याला सुरुवात करुन आणि जुन्या कालव्याची दुरुस्ती करुन हा प्रकल्प प्रत्यक्षात कधी पूर्ण होणार आहे?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, डोंगर परिसरातील डाव्या कालव्यामधील कि.मी.1/086 या कालव्याच्या मोरीवरुन पाणी ओसंडून वाहिल्यामुळे शेतीचे नुकसान निश्चितपणे झालेले आहे. यामध्ये 25 शेतकऱ्यांच्या भातशेतीचे नुकसान झालेले असून एकंदर 4.12 हेक्टर इतकी भातशेती बाधित झाली होती. तहसीलदार कणकवली यांनी दि. 30-7-2010 पर्यंत याचे पंचनामे केले आणि रु.8720 इतकी नुकसानीची रक्कम कळविलेली आहे. ही रक्कम कमी असल्याची शेतकऱ्यांची धारणा असल्यामुळे त्यांनी ही रक्कम स्वीकारलेली नाही. सभापती महोदय, या कालव्याची दुरुस्ती तर होईलच पण कुठल्याही परिस्थितीत हे काम पावसाळयापूर्वी पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून नियोजन निश्चितपणे केले जाईल.

09-12-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) FF-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कंधार (जि.नांदेड) शहरातील ग्रामीण रुग्णालयाबाबत करावयाची कार्यवाही**

**(3) * 9222 श्री.जयंत पाटील , श्री.कपिल पाटील** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कंधार (जि.नांदेड) शहरात ग्रामीण रुग्णालय केंव्हापासून अस्तित्वात आले आहे,

(2) असल्यास, सदर रुग्णालयात अधीक्षक व इतर तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी नाहीत, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, सध्या या रुग्णालयात किती वैद्यकीय अधिकाऱ्यांची कायमस्वरूपी व कंत्राटी पद्धतीवर नियुक्ती करण्यात आली आहे,

(4) असल्यास, सदर रुग्णालय निजामी काळापासून जुने असल्याने येथे 100 खाटांची सोय करावी व उपजिल्हा रूग्णालयाचा दर्जा द्यावा अशी मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे काय ?

**प्रा. फौजिया खान श्री.सुरेश शेट्टी यांच्या करिता**: (1) दिनांक 25.3.1986 च्या शासन निर्णयान्वये नागरी दवाखाना कंधारचे ग्रामीण रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्यात आले आहे.

(2) अंशत: खरे आहे.

वैद्यकीय अधिक्षक वर्ग-1 चे पद दिनांक 6.7.2010 पासून रिक्त असून, वर्ग-2 ची 3 पदे भरण्यात आलेली आहेत.

(3) वैद्यकीय अधिकाऱ्यांची 2 पदे कायमस्वरुपी असून 1 पद अस्थाई स्वरुपात आहे. आयुष अंतर्गत कंत्राटी पध्दतीने आयुर्वेद, होमियोपॅथी व युनानी वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत.

(4) लोकप्रतिनिधींनी 100 खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : या रुग्णालयात अधिक्षक तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची किती पदे रिक्त होती व ती भरण्यासाठी कोणती कारवाई केली आणि ती पदे भरली नसतील तर ती केव्हा भरण्यात येतील, तसेच या रुग्णालयाचे 100 खाटांच्या उप जिल्हा रुग्णालयात रुपांतर करण्याचा शासनाचा प्रस्ताव आहे त्याची कार्यवाही कधी होईल?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, अधिकारी कर्मचाऱ्यांबद्दल जी माहिती विचारलेली आहे. त्यासंदर्भातील माहिती अशी की, एकूण 26 पदांची आवश्यकता असताना 24 पदे भरलेली आहेत. फक्त 2 पदे रिक्त आहेत. 100 खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याची मागणी केलेली आहे. सभापती महोदय, याबाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, ग्रामीण रुग्णालयाच्या बाबतीत असे निकष आहेत की, तेथे 30 आणि त्या रुग्णालयाच्या अंतर्गत चार-पाच पी.एच.सी. असाव्यात. हे निकष कंधार ग्रामीण रुग्णालयाने पूर्ण केलेले आहेत. पण 100 खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याची मागणी केली आहे. याबाबतीत मला असे सांगावयाचे

...3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9222.....

प्रा. फौजिया खान....

आहे की, राज्यामध्ये प्रत्येक मतदारसंघातून अशा प्रकारची मागणी येत आहे. मला याबद्दल असे सांगावयाचे आहे की, कुठे ना कुठे प्रायोराटाईज करण्याची गरज आहे. एक्झिस्टिंग प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत, ग्रामीण रुग्णालये आहेत किंवा उप जिल्हा रुग्णालये, जिल्हा रुग्णालये आहेत त्यांना जास्त मजबूत करण्याची गरज आहे. डॉक्टरांची अपुरी संख्या आहे. इक्वीपमेंट पूर्ण नाहीत. आजच्या परिस्थितीत असलेले निकष अगोदर पूर्ण करावयास पाहिजेत. आज ज्या स्थितीत रुग्णालये आहेत ती अधिक मजबूत करुन पुढच्या टप्प्यात अपग्रेडेशनची पॉलिसी स्वीकारली तरच हे शक्य आहे.

यानंतर श्री. बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 9222.... प्रा. फौजिया खान...

कारण वारंवार प्रत्येक ठिकाणी अशा प्रकारची मागणी येत आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, हा प्रश्न जरी कंधारशी संबंधित असला तरी मराठवाड्यात सगळ्याच ठिकाणी जी ग्रामीण रुग्णालये आहेत त्या ठिकाणी सुध्दा अशाच प्रकारची परिस्थिती आहे. गोरगरीब जनता त्या रुग्णालयांमध्ये औषधोपचार घेत असते. मला आपल्या माध्यमातून माननीय मंत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, मराठवाड्यामध्ये जेवढी ग्रामीण रुग्णालये आहेत तसेच जेवढी प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत त्या सगळ्यांच्या बाबतीत रिक्त पदांचा आढावा घेऊन ही पदे किती दिवसांमध्ये भरणार याबाबतीत कालबध्द मुदत ठरवून ही पदे भरण्याची कार्यवाही शासन करणार काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, यासंदर्भात अनेक वेळा सभागृहात चर्चा झालेली आहे. आपल्याकडे रिक्त पदांचा प्रश्न आहे आणि त्याचे निवारण करण्यासाठी बाय प्रमोशन, बाय नॉमिनेशन...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, यासंदर्भात सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. यासंदर्भात एक दोन वेळा कधी चर्चा झाली हे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, तसे सांगता येणार नाही. परंतु हा प्रश्न सर्व ठिकाणी आहे. रिक्त पदांच्या बाबतीत जास्तीतजास्त लवकर कशी कार्यवाही करता यईल तसेच यामध्ये बाय प्रमोशन, बाय नॉमिनेशन या पध्दतीने हे काम शासन युध्द पातळीवर करणार आहे.

**उप सभापती** : एक गोष्ट मी माननीय मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणून देतो की, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम गाळे यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो खरोखरच गांभीर्याने घ्यावयास पाहिजे. माझ्या स्वत:च्या गावामध्ये तत्कालीन मंत्रिमहोदय डॉ. विमलताई मुंदडा यांच्या कार्यकाळामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र बांधण्यात आले. त्या ठिकाणी सगळ्यांनी मागणी केली होती म्हणून ते प्राथमिक आरोग्य केंद्र बांधण्यात आले. परंतु गेली दोन वर्षे ते प्राथमिक आरोग्य केंद्र उद्घाटनाची वाट पाहात आहे. त्या ठिकाणी स्टाफही आलेला नाही. गावातील लोकांना उपचारासाठी 30-40 किलोमीटर लांब जावे लागते ही वस्तुस्थिती आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ ST/ KGS/ D/

ता. प्र. क्र. 9222....

प्रा. फौजिया खान : ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे 1450 वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बाबतीत मागच्या वेळी सांगितले होते त्या नियुक्त्या आता लवकरच होतील आणि आपल्याला वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरता येतील. एमपीएससीकडून स्पेशालिस्टची पदे, वेगवेगळी पदे, वेगवेगळे केडर्स आहेत त्याबाबतीत ...

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, याबाबतीत आपण आपल्या दालनामध्ये बैठक घ्यावी. या विषयावर सभागृहामध्ये वारंवार चर्चा झालेली आहे.

**उप सभापती** : मी माझ्या दालनामध्ये कोणतीही बैठक घेणार नाही. त्या बैठकीतून काहीही निष्पन्न होत नाही.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करण्यासाठी राज्य शासनाचे काही धोरण आहे काय, असल्यास ते काय आहे ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मी सुरुवातीला त्याबाबत सांगितले आहे की, श्रेणीवर्धनाला नंतर प्रायोरिटी देऊ. कारण या सगळ्या व्यवस्था आधी मजबूत करण्याची गरज आहे आणि त्याला प्रायोरिटी देण्याचे काम शासन करीत आहे. मला आपल्याला विनंती करावयाची आहे की, हा प्रश्न कंधार येथील रुग्णालयाच्या बाबतीत आहे आणि तेवढ्यापुरताच या प्रश्नाचा स्कोप सीमित ठेवावा.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, आपण खाजगीकरण करावयास पाहिजे. मला खेदाने सांगावे लागत आहे की, आपल्याकडे सगळी सामुग्री असताना सुध्दा आपल्याकडे ज्या सी.टी.स्कॅन मशिन आहेत त्या बऱ्याच ठिकाणी बंद पडलेल्या आहेत. माननीय मंत्रिमहोदय जर स्वत:च असे सांगत असतील तर आपण सर्व्हिसेस मधील सर्व्हिस शब्द काढून टाकावा काय, सेवा शब्द काढून टाकावा काय, असा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्या ठिकाणी ओपीडीच्या उत्पन्नाचा जो रकाना असतो त्यामध्ये 300 ते 350 रुपये लिहिले जातात ही बाब खेदाची आहे. कोणाचेही उत्पन्न 350 रुपये ते 400 रुपये नसते.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ ST/ KGS/ D/

ता. प्र. क्र. 9222....

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा काही तरी गैरसमज झालेला आहे. मी खाजगीकरण करणार असा उल्लेख केलेलाच नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, गेल्या पाच सहा वर्षांपासून एमपीएससीच्या नावाखाली डॉक्टरांची भरती होत नाही आणि ज्यांना सेवेत घेतलेले आहे त्यांना अजूनपर्यंत कन्फर्म केलेले नाही. म्हणून डॉक्टर्स शासनाच्या सेवेत येण्यास तयार नसतात. म्हणून एमपीएससी काढून डॉक्टरांची डायरेक्ट भरती करुन डॉक्टरांचा प्रश्न खऱ्या अर्थाने सोडविणार काय ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9222......

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा प्रश्न या प्रश्नाशी संबंधित नसला तरी मी उत्तर देतो. महाराष्ट्र पब्लिक सर्व्हिस कमिशनकडे वैद्यकीय अधिका-यांची मागणी केलेली आहे त्याबाबत या सभागृहात अनेकदा चर्चा झालेली आहे. त्यांच्याकडे 4 वर्षापूर्वीच 400-500 तज्ज्ञ डॉक्टरांची मागणी केलेली आहे. मागील एक महिन्यापासून दररोज या तज्ज्ञ डॉक्टरांच्या मुलाखती सुरु झालेल्या आहेत. त्यामुळे या महिनाअखेरपर्यंत मागणीप्रमाणे डॉक्टर्स उपलब्ध होतील. मग जिल्हा आरोग्य अधिकारी असो, सिव्हिल सर्जन असो किंवा स्पेशालिस्ट डॉक्टर्स असोत, त्यांची यादी करुन ते पाठविणार आहेत अशी मला खात्री आहे. वैद्यकीय अधिका-यांची पदे महाराष्ट्र पब्लिक सर्व्हिस कमिशनतर्फे भरली जात नाहीत, ही पदे सरळ विभागामार्फत भरण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्या अनुषंगाने एमकेसीएलमार्फत ई-इंटरव्ह्यूची प्रक्रिया सुरु केलेली आहे. 1400 पदांची जाहिरात दिली आहे. सन्माननीय सदस्यांनी म्हटले की, राज्यात डॉक्टर्स काम करण्यास तयार होत नाहीत. याबाबत मी सांगेन की, 1400 पदांसाठी 4 ते 5 हजार डॉक्टरांनी ऑनलाईन अर्ज केलेले आहेत. त्यामधून 1100 डॉक्टरांची मेरिट लिस्ट तयार केली असून त्यांच्या नेमणुकीचे आदेश सुध्दा काढले आहेत.

------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ D/ KTG/ ST/

## पाईंट ऑफ प्रोसिजरसंबंधी

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आता 2 वाजले असल्यामुळे प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे. (अडथळा) सभापती महोदय, दररोज अशाप्रकारे प्रश्नोत्तराची वेळ वाढविली जाते. ( अडथळा ) सभापती महोदयांनी प्रश्नोत्तराच्या वेळेत वाढ केल्याचा निर्णय मी ऐकलेला नाही. तसा त्यांनी निर्णय दिलेला नाही. मघाशी माननीय सभापतींनी दुपारी 1.25 पर्यंत सभागृहाची बैठक स्थगित केली होती. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी जैतापूरच्या अणू ऊर्जा प्रकल्पाविषयीचा मुद्दा मांडला होता. त्याबाबत सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले. त्यांनी अशीही विनंती केली की, प्रश्नोत्तराचा वेळ वाया घालवू नये. सन्माननीय सदस्य 45 दिवस अगोदर प्रश्न देत असतात. म्हणून तारांकित प्रश्नांना अधिक प्राधान्य दिले जावे. विधानसभेमध्ये सुध्दा स्थगन प्रस्ताव मांडला जातो त्यावेळी प्रश्नोत्तराच्या तासातील कालावधी वजा केला जातो, तो त्यामध्ये धरला जात नाही. (अडथळा) माझे म्हणणे असे आहे की, नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावावर सतत चर्चा होत राहिली तर प्रश्नोत्तराच्या तासाचे गांभीर्य सुध्दा निघून जाईल. सभागृहामध्ये ठरविले जावे की, अन्य काही तातडीचा व गांभीर्याचा विषय उपस्थित झाला तरच ज्या विषयामुळे नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना मांडली गेली पाहिजे, त्याबाबत मर्यादित चर्चा झाली तरच या प्रस्तावाचे गांभीर्य राहील आणि प्रश्नोत्तराचा तास निर्धारित वेळेत पूर्ण होऊ शकेल. हे एकदा सभागृहाने ठरविले पाहिजे.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य बोलत असतात. )

श्री.जयंत प्र.पाटील : माननीय सभापतींच्या दालनामध्ये बैठक झाली होती त्या बैठकीला मी उपस्थित होतो.

श्री.कपिल पाटील : या सभागृहाच्या नेत्यांनी मघाशी भूमिका मांडली आहे....

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. यामध्ये आणखी वेळ घालवावयाचा आहे काय ? आज नियम 289 अन्वये दोन प्रस्तावाच्या सूचना देण्यात आल्या होत्या. सन्माननीय सदस्यांनी त्या सूचना दिलेल्या होत्या त्यांना त्याबाबत थोडक्यात म्हणणे मांडण्याची मी परवानगी दिली, त्यानंतर मी माझा निर्णय दिला आणि त्यांनी तो मान्यही केला होता. काही अपरिहार्य परिस्थितीत प्रश्नोत्तराचा तास पुढे ढकलावा लागतो, त्यावेळी सभापतींना असलेल्या

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ D/ KTG/ ST/

**उप सभापती**.....

अधिकारामध्ये प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ वाढवून देता येते. एक गोष्ट खरी आहे की, मी हे आधी सूचित करावयास पाहिजे होते. दुपारी 2 वाजता मी ते जाहीर करणार होतो, तत्पूर्वी माननीय मंत्री महोदय आपण हात वर केल्यामुळे मी आपल्याला बोलण्याची परवानगी दिली. आजच्या प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ दुपारी 2.30 पर्यंत आहे हे मी सर्वांच्या माहितीसाठी सांगत आहे.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 14:05

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, माझी एवढीच विनंती आहे की, विधिमंडळाचे नियम हे दोन्ही सभागृहासाठी एकत्रित असावेत. माननीय सभापतींच्या अधिकाराच्या बाबतीत मी बिलकूल बोललो नाही. वेळ वाढवून दिल्याचे आधी सांगितले असते तर हरकत घेण्याचे कारण नव्हते. जेव्हा या सभागृहामध्ये नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिली जाते त्यावेळी तो स्थगन प्रस्तावाचा विषय कसा होतो यावर सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकून घेण्यामध्येच प्रश्नोत्तराचा बराचसा वेळ जातो. त्यामुळे प्रश्नोत्तराच्या तासाचे गांभीर्य रहात नाही एवढेच मला नम्रपणे सांगावयाचे आहे. सभागृहाच्या कामकाजाचे प्रोसिजर हे सर्व पक्षाच्या नेत्यांशी चर्चा करुन निश्चित करावे अशी माझी विनंती आहे.

----

....2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अलिबाग (जि.रायगड) येथील विद्युत वितरण कंपनीमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर करावयाची कारवाई**

**(४) * ९२७७ श्री.संजय केळकर , श्री.विनोद तावडे :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) येथील विद्युत वितरण कंपनीमध्ये फार मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असून या प्रकरणी कारवाई करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी विद्युत वितरण कंपनी अलिबाग तसेच शासनाकडे माहे जुलै, २०१० मध्ये लेखी तक्रार केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेंद्र मुळक,श्री.अजित पवार यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही.
(2),(3) व (4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय केळकर : अलिबाग शहर हे समुद्रकिनारी असल्यामुळे तेथील खारट हवामानामुळे विजेचे खांब आणि तारा तसेच तत्सम यंत्रसामग्री खराब होते. अलिबाग येथील विजेचे खांब आणि तारा मागील 40 वर्षापासून बदलण्यात आलेल्या नाहीत. रायवाडी येथे विजेची तार पडून एक महिला शॉक लागून मृत्यूमुखी पडली. या किनारपट्टीच्या भागासाठी विद्युत वितरण कंपनीने काही पॅकेज जाहीर केलेले आहे काय ? असल्यास त्याचा उपयोग 40 वर्षाच्या तारा आणि खांब बदलण्यासाठी करण्यात येणार आहे काय ? अलिबाग परिसरामध्ये विजेची बिले वेळेवर दिली जात नाहीत, वीज बिले वाढवून दिली जातात. यासंदर्भात तेथील लोकांच्या अनेक तक्रारी आहेत. या तक्रारीबाबत लोकप्रतिनिधींचे पत्र आलेले नाही असे सांगितलेले आहे. परंतु मी जुलै आणि ऑगस्ट महिन्यामध्ये विद्युत वितरण कंपनीला पाठविलेल्या पत्राची प्रत माननीय मंत्री महोदयांकडे देण्यास तयार आहे. तेव्हा ज्या तक्रारी केलेल्या आहेत त्याबाबतीत शासन काय उपाययोजना करणार आहे ?

श्री. राजेंद्र मुळक : मे. साईसिद्धी महिला बचत गटाकडून सदर भागामध्ये वीज बिलाचे वाटप करण्यामध्ये अनियमितता झाली होती. या महिला बचत गटाच्या माध्यमातून ज्या काही त्रुटी राहिल्या असतील त्याबाबतीत शासन तातडीने निर्णय घेईल. शासनाच्या तांत्रिक कर्मचा-याकडून दैनंदिन काम सांभाळून हे काम करुन घेण्याचे नियोजन केले जाईल. सन्माननीय सदस्यांनी पत्राचा उल्लेख केला. ते पत्र शासनाला प्राप्त झालेले आहे. त्या पत्रानुसार कारवाई केली जाईल.

..2..



MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 14:05

ता.प्र.क्र. 9277...

श्री. संजय केळकर : त्या परिसरातील विद्युत खांब आणि तारा ह्या 40 वर्षापासून बदललेल्या नाहीत. विजेची तार पडून एका महिलेचा मृत्यू झालेला आहे. तेव्हा किनारपट्टीसाठी जे पॅकेज दिलेले आहे त्यामधून विद्युत खांब आणि तारांची दुरुस्ती केली जाणार आहे काय ?

श्री. राजेंद्र मुळक : दिनांक 16 जून 2010 रोजी थळगावात आपटा व बाभळीचे झाड पडून अलिबाग फिडरचा  एक कटपॉईण्ट खांब वाकला होता. तो तातडीने बदलण्यात आला.  त्या भागामध्ये काही कटपॉईण्ट खांब दुरुस्त करण्याचे काम हाती घेण्यात आले. भविष्यामध्ये अशा प्रकारच्या घटना घडणार नाहीत यादृष्टीने दक्षता घेतली जाईल.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9277.....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, अलिबाग तालुक्यातील विद्युत पोल आणि विद्युत साहित्य बदलले जाते त्यावेळी मुंबईमधील भांडवलदारांचे अलिबागमध्ये बंगले आहेत त्यांच्या दृष्टीने या कामांना अग्रक्रम दिला जातो. त्या परिसरात चार आदिवासी वाड्या आहेत. अलिबाग तालुक्यातील या आदिवासी वाड्यांचे अद्याप विद्युतीकरण झालेले नाही. त्यासाठी निधी उपलब्ध नाही असे विभागाचे म्हणणे आहे. या आदिवासी वाड्यांचे विद्युतीकरण केव्हा होणार आहे? रायगड जिल्हयात विद्युतीकरणांतर्गत विद्युत तारा व पोल बदलण्यासाठी रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेने 100 कोटी रुपये ऊर्जा विभागाला कर्ज दिले असून हे कर्ज देत असताना अट घातली आहे की, हा निधी रायगड जिल्हयातच वापरला जावा. या 100 कोटी रुपयांपैकी आतापर्यंत किती निधी वापरला गेला आहे?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी विचारलेल्या प्रश्नासंबंधी संपूर्ण माहिती घेऊन त्यांना कळविण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी उपस्थित केला आहे. माननीय मंत्रीमहोदय नवीन आहेत, मी मंत्रीमहोदयांवर दबाव टाकू इच्छित नाही. माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे त्यांना ब्रिफिंग करीत आहेत हे योग्य नाही. मी स्वत: अलिबाग येथे राहतो. तेथील समन्वय समितीमध्ये या प्रश्नासंबंधी आम्ही चर्चा केलेली आहे. विद्युतीकरण आणि तारा व पोल बदलण्याच्या संदर्भात गरिबांच्या दृष्टीने अग्रक्रम दिला जाईल काय?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, या संदर्भातील माहिती संबंधित विभागाकडून घेण्यात येईल आणि तशा प्रकारचा घटनाक्रम घडला असेल किंवा चूक झाली असेल तर ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यात सन २००५ पूर्वी सेवेत नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय**

**(५) * ९४०७ श्री.कपिल पाटील , श्री.जयंत पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी** : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, औरंगाबाद व नागपूर हायकोर्टाने वेगवेगळ्या निर्णयात माहे नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत नियुक्ती झालेल्या शिक्षण सेवक तसेच अंशत: वा पूर्णत: विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचे निर्णय दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाच्या अनुषंगाने सन २००५ पूर्वीच्या सरसकट सर्व शिक्षण सेवक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ देण्यात काय अडचणी आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.राजेंद्र मुळक, श्री.अजित पवार यांच्याकरिता** : (१) दि.१.११.२००५ पूर्वी करार पध्दतीने नियुक्त होऊन दि.१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर नियमित सेवेत आलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांनी त्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करावी यासाठी उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठात दाखल केलेल्या याचिकांवर मा.न्यायालयाने interim relief दिला आहे. अंशत: वा पूर्णत: विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने कोणताही निर्णय दिलेला नाही.

(२) व (३) करिता मा.न्यायालयाने दिलेला interim relief उठविण्याकरिता मुंबई उच्च न्यायालयात शासनामार्फत civil application दाखल करण्यात आले असून ही बाब न्यायप्रविष्ट आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, २००५ पूर्वी सेवेत आलेल्या शिक्षणसेवकांना सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करण्यासंबंधी दुसरा प्रश्न विचारला आहे. त्याबद्दल कोणतेही उत्तर देण्यात आलेले नाही. मागील दोन अधिवेशनात हा प्रश्न सातत्याने चर्चेला आलेला आहे. विनाअनुदानित किंवा कायम विनाअनुदानित संस्थांना अनुदान देण्याबाबत याचिका दाखल झाली त्यावेळी हायकोर्टात सरकारने सांगितले की, निधी उपलब्ध नाही. निधी उपलब्ध होईल त्यावेळी अनुदान देऊ. याचा अर्थ शासनाने कोर्टापुढे पेन्शन योजना लागू करण्याचे मान्य केले. निधी उपलब्ध होईल त्यावेळी पेन्शन दिले जाईल. त्यानुसार पूर्वीची सेवा गृहित धरली जाते. शाळा अनुदानावर आल्यानंतर मागील ५-१० वर्षाची सेवा गृहित धरुन योजनेच्या अनुषंगाने सर्व फायदे दिले पाहिजेत. त्यापासून सरकारला पळ काढता येणार नाही. शासनाने सभागृहात व हायकोर्टात बांधिलकी मान्य केली असून या बांधिलकीचे पालन करणे आवश्यक आहे. २००५ पूर्वीच्या विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित सर्व शाळा आता अनुदानावर आलेल्या आहेत. त्या शाळांमधील सर्व शिक्षकांची पूर्वीची सेवा गृहित धरुन जुनी पेन्शन योजना लागू केली जाईल काय?

..३..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.९४०७....

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, माननीय हायकोर्टाने तात्पुरत्या स्थगितीचे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार शासनाने हायकोर्टात सिव्हिल ॲप्लिकेशन दाखल केलेले आहे. आता हे सिव्हिल ॲप्लिकेशन प्रलंबित आहे. या सिव्हिल ॲप्लिकेशनवर ज्यावेळी निर्णय होईल त्यानुसार या प्रकरणी निर्णय घेण्यात येईल.

नंतर २के.१...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता. प्र. क्र. 9407.........**

श्री. रामनाथ मोते : महोदय,मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की......

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्रश्नाला दिलेल्या उत्तरात "इंटेरियम रिलीफ" असे इंग्रजीतून छापलेले आहे.

श्री. राजेंद्र मुळक : महोदय, मराठीतून "तात्पुरती स्थगिती" असे लिहिणे आवश्यक होते.

श्री. रामनाथ मोते : महोदय, रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून मुद्दाम मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. ते म्हणजे विना अनुदानित, कायम विना अनुदानित शाळातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी, यांना 1 नोव्हेंबर, 2000 पूर्वी स्केलसह मान्यता होती. कारण अंशत: आणि विना अनुदानित शिक्षकांना पेन्शन योजना लागू नाही. कोकण तथा संपूर्ण राज्यात शिक्षण संचालकांनी निर्णय घेतलेला आहे की, जीपीएफ मध्ये जुन्या पध्दतीनेच या शाळातील शिक्षकांनी आपली खाती सुरु करावी तसेच त्यांना जुन्या पध्दतीनेच पेन्शन योजना लागू होणार आहे व तसा आदेशही काढलेला आहे. पण त्या आदेशाची अमलबजावणी मात्र अद्याप झालेली नाही. हेच मला मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे सन 2005 पूर्वी लागलेल्या शिक्षण सेवकांच्या संदर्भात न्यायालयाने केवळ एक-दोनच नव्हे तर 100 याचिकांमध्ये निर्णय दिलेला आहे, स्थगिती दिलेली आहे व ही स्थगिती शासनाच्या धोरणात्मक निर्णयाला दिलेली आहे. 31 ऑक्टोबर, 2005 च्या निर्णयाला सुध्दा स्थगिती आहे. अशा प्रकारे या शासन निर्णयालाच स्थगिती दिल्यामुळे 1 नोव्हेंबर, 2000 पूर्वी लागलेल्या सर्व शिक्षण सेवकांना जुन्याच पध्दतीने पेन्शन योजना व जीपीएफची खाती सुरु करण्याबाबत न्यायालयाच्या आदेशानुसार बंधनकारक आहे. दि. 7 मे, 2010 रोजी सचिवांकडे एक बैठक झाली होती तेव्हा त्यांनी मान्य केले की, याबाबत तातडीने विधि व न्याय विभागाचा सल्ला घेण्यात येईल व पुढील कार्यवाही करण्यात येईल. परंतु अद्यापही असे आदेश काढलेले नाहीत. म्हणून 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वी लागलेल्या शिक्षण सेवकांना सुध्दा न्यायालयाच्या आदेशानुसार आणि शासनाने मान्य केल्याप्रमाणे जुन्याच पध्दतीने पेन्शन योजना व जीपीएफ मध्ये खाती सुरु करण्याबाबतचे आदेश हे अधिवेशन संपण्यापूर्वी शासन देणार आहे काय, तसेच असे आदेश काढणार काय ?

....2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता. प्र. क्र. 9407**.........

श्री. राजेंद्र मुळक : महोदय, मी पुन्हा सभागृहाला सांगू इच्छितो की, यासंदर्भात उच्च न्यायालयात शासनाच्या वतीने सिव्हील अप्लीकेशन केलेले असून त्यात या सर्व गोष्टीं समाविष्ट केलेल्या आहेत. त्यावर उच्च न्यायालयात निर्णय होईलच. तसेच सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे मी सांगू इच्छितो की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी संपूर्ण विभागातून माहिती घेऊन त्याची माहिती सन्माननीय सदस्यांना अवगत करण्यात येईल.

श्री. कपिल पाटील : महोदय, सन 2005 पूर्वीचे जे शिक्षण सेवक होते ते कोर्टात गेले व त्यांना उच्च न्यायालयाने त्यावेळेस स्थगिती दिली ती एक प्रकारे शासनाच्या धोरणालाच स्थगिती दिलेली आहे. त्याचबरोबर विना अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांना शिक्षण सेवक योजना लागू नसते. पण नंतर त्यात ज्या शाळांना अनुदान सुरु झाले त्यांनाही जीपीएफ व पेन्शन योजना सुरु केली नाही म्हणून यापूर्वीचे जे इतर शिक्षक होते अशा शिक्षकांना सुध्दा या योजनेमध्ये समाविष्ट करुन घेतले पाहिजे. तसेच शासनाच्या धोरणाला स्थगिती असेल तर सरसकट सर्वांनाच ही योजना लागू केली पाहिजे. त्याचप्रमाणे जे सेवेत होते व नंतर अनुदानावर आले त्यांना सुध्दा ही योजना लागू करावी अन्यथा हा प्रश्न राखून ठेवावा.

श्री. राजेंद्र मुळक : महोदय, यासंबंधीची माहिती घेऊन पटलावर ठेवण्यात येईल.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ D/ ST/ 14:20

**मुंबईसह राज्यात मलेरिया, डेंग्यू, टायफॉईड आणि स्वाईन फ्ल्यू सारखे पसरलेले साथीचे आजार आटोक्यात आणण्यासाठी करावयाची उपाययोजना**

**(६) * ९५३२ श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.विनोद तावडे , श्री.भगवान साळुंखे , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , श्रीमती उषाताई दराडे , श्री.सतीश चव्हाण , श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.उल्हास पवार , श्री.मोहन जोशी , श्री.राजन तेली , श्री.संजय दत्त , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.हुसेन दलवाई , श्री.संजय केळकर , श्री.सुभाष चव्हाण , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.धनंजय मुंडे , श्री.सय्यद पाशा पटेल :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यात माहे जुलै ते सप्टेंबर, २०१० या तीन महिन्यात मलेरिया, डेंग्यू, टायफॉईड आणि स्वाईन फ्ल्यूसारख्या आजाराने अनेक जणांचा मृत्यू झाला असून, जे.जे.रुग्णालयातील एका डॉक्टराचा डेंग्यू या साथीच्या आजाराने मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात साथीच्या आजाराने एकूण किती लोकांचा मृत्यू झाला आहे,

(३) मुंबईसह राज्यात विविध साथीच्या रोगामुळे जिल्हानिहाय रुग्णालयात दाखल झालेले रुग्ण व रुग्णांचा झालेला मृत्यू याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त विविध रोगांच्या साथीत मृत्यू झालेल्या मृतांच्या कुटुंबियाना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(५) उपरोक्त साथीच्या आजारास आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती तातडीची उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. फौजिया खान, श्री.सुरेश शेट्टी यांच्या करिता :** (१) होय.

(२) मुंबईसह राज्यात माहे जुलै ते सप्टेंबर २०१० या कालावधीत मलेरियाने ११४, डेंग्यु ५ तर स्वाईन फ्ल्यू या आजाराने ४३५ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. तथापि, या कालावधीत टायफाईडमुळे एकही मृत्यू झालेला नाही.

(३) होय.

(४) किटकजन्य, जलजन्य व विषाणूजन्य आजारामुळे मृत्यू पावलेल्या मृताच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्यासाठी कोणतेही धोरण नाही.

(५) राज्यात किटकजन्य, जलजन्य व विषाणूजन्य रोगाच्या नियंत्रणासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना राबविण्यात आल्या व येत आहेत :-

१) सार्वजनिक विहिरी व कुपनलिकाच्या पाण्याची जिल्हा व राज्य आरोग्य प्रयोगशाळेमार्फत नियमित तपासणी करणे.

२) ग्रामपंचायत, नगरपालिका/महानगरपालिका व जिल्हा परिषद यांना ब्लिचींग पावडरच्या उपलब्धतेबाबत पाठपुरावा करणे.

३) आरोग्य कर्मचारी व आरोग्य संस्थामार्फत रुग्णशोध.

४) जिल्हा स्तरावर शिघ्र प्रतिसाद पथकांची स्थापना.

५) राज्यात विषाणूजन्य तापाच्या निदानासाठी १६ सेंटीनल सेंटर्स व एन.आय.व्ही., पुणे येथे व्यवस्था.

६) डासोत्पती स्थानांवर अळीनाशकाची फवारणी.

७) हिवताप उद्रेकग्रस्त भागात तसेच हिवतापासाठी अतिसंवेदनशील गावांमध्ये किटकनाशकाची घरोघर फवारणी.

...२...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : **९५३२....**

८) डेंग्यू उद्रेकग्रस्त ठिकाणी किटकनाशकाची धुरफवारणी.
९) डासोत्पत्ती स्थानांमध्ये डासअळी भक्षक गप्पी मासे सोडणे.

स्वाईन फ्ल्यू नियंत्रणासाठी शासनाने केलेल्या उपाययोजना :-

१) नियंत्रण व विलगीकरण कक्षाची स्थापना.
२) सहवासीतांचा शोध आणि उपचार.
३) खाजगी औषध दुकानात टॅमी फ्ल्यूची उपलब्धता.
४) सरकारी व खाजगी डॉक्टरांचे प्रशिक्षण.
५) राज्य व जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन गटाची स्थापना.
६) डेथ ऑडिट बैठकांचे आयोजन.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, गेल्या ३ वर्षापासून विशेषत: मुंबई सारख्या आंतरराष्ट्रीय शहरात पावसाळयातील पाण्यामुळे जे वेगवेगळे रोग उद्‌भवतात अशा रोगाच्या प्रमाणात प्रचंड वाढ झालेली आहे. मध्यंतरीच्या काळात अनेक ठेकेदारांनी इमारतीच्या बांधकामास सुरुवात केल्यामुळे व त्या ठिकाणच्या पाण्याचा निचरा न झाल्यामुळे अशा पध्दतीचे आजार वाढत असतात. त्यामुळे यासंदर्भात कारवाई करण्यात यावी अशा प्रकारचे आदेश मध्यंतरीच्या काळात दिले गेले होते. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, अशा ठिकाणी नियमित तपासणी होते आहे काय ? नियमित तपासणी होत असेल तर यामध्ये किती लोक दोषी आढळले, किती लोकांवर कारवाई केली गेली ?

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, फॉगींगच्या संदर्भात सुध्दा अनेक ठिकाणी तक्रारी आहेत. जुने उपकरणे असल्यामुळे फॉगींगची फवारणी योग्य होत नाही व त्याचा काही एक परिणाम होत नाही त्यामुळे याबाबत आतापर्यंत काय कारवाई केली गेली आहे ?

सभापती महोदय, माझा तिसरा आणि महत्वाचा प्रश्न असा आहे की, जे आजार निर्माण होतात त्यासाठी ज्या औषधांची गरज असते त्या औषधांचे मार्केटमध्ये आर्टीफिशीअली शॉर्टेज केले जाते व काळया बाजारात अधिक किमतीने विकून नफा कमावला जातो. त्यामुळे हा प्रकार रोखण्यासाठी शासन मेडीकल स्टोअर्सवर बोर्ड लावून आर्टीफिशीअली शॉर्टेजवर नियंत्रण आणणार आहे काय ? त्यामध्ये ज्याला कोणाला अशा पध्दतीचा अनुभव येईल तो टेलीफोनवरुन, इ-मेलद्वारे किंवा अधिका-याकडे तक्रार करु शकेल. जेणे करुन लोकांमध्ये जागरुकता निर्माण होईल याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे.

...३..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : **९५३२....**

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे हे खरे आहे की, खास करुन मुंबईमध्ये यावर्षी मलेरियाच्या रुग्णांची संख्या मोठया प्रमाणात आढळून आलेली आहे. मुंबईमध्ये जुलै महिन्यात १७१३८ मलेरियाचे रुग्ण आढळून आले होते व त्यापैकी १९ रुग्णांचा मृत्यू झाला होता. ऑगस्ट महिन्यात १५ हजार रुग्ण आढळले होते व यामध्ये ४६ रुग्णांचा मृत्यू झाला होता. सप्टेंबर ते नोव्हेंबर महिन्यापर्यंत मलेरियाचे प्रमाण कमी कमी होत गेले. आरोग्य विभागाने पहिल्यांदाच मुंबई महानगर पालिकेच्या अधिका-याबरोबर अनेक बैठका आयोजित केल्या होत्या. तत्कालीन मुंख्यमंत्र्यांबरोबर सुध्दा यासंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती. विमान प्राधिकरण, मुंबई पोर्ट ट्रस्ट तसेच रेल्वे विभागाबरोबर यासंदर्भात बैठका आयोजित करुन समन्वय निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. विभागाच्या माध्यमातून टेक्नीकल इनपुट्स देण्यात आले होते. महानगरपालिकेने सरकारी दवाखान्यात १०६२ अतिरिक्त बेडची व्यवस्था केली होती. ज्या ठिकाणी इमारतीचे काम सुरु आहे अशा ठिकाणच्या ठेकेदाराला जबाबदार धरुन मच्छरदाणी पुरवण्यास सुध्दा भाग पाडले होते. तसेच त्या ठिकाणी काम करणा-या कामगारांना हेल्थ कार्डचा सुध्दा पुरवठा करुन दिलेला होता. यामध्ये सर्व्हेलन्स वाढवल्यामुळे आपल्याला यावर्षी मलेरियाचे जास्त रुग्ण आढळून आलेले आहेत. खाजगी डॉक्टर्स ट्रिटमेंट प्रोटोकॉल पाळत नसल्यामुळे केंद्र शासनाची टीम बोलावून ट्रिटमेंटचे प्रोटोकॉल पाळण्यास भाग पाडले गेले .

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, मी जे प्रश्न विचारले आहेत त्यातील एकाही प्रश्नाचे उत्तर मला मिळालेले नाही.

प्रा. फौजिया खान : महानगरपालिकेने जी काही कारवाई केलेली आहे त्याची माहिती आरोग्य विभाग सांगू शकत नाही. आरोग्य विभागाने मुंबई महानगरपालिकेशी समन्वय साधून कारवाई केलेली असून त्यासंदर्भातील माहिती देण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9532....

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी तीन प्रश्न विचारले. त्यांचा पहिला प्रश्न मुंबईमध्ये इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंटचे काम होत आहे त्यासंबंधीचा आहे. मी याठिकाणी सांगू इच्छितो की, आम्ही एक महिन्यापूर्वी मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुन मुंबई शहरातील मलेरियाच्या प्रादूर्भावाबाबत आढावा घेतला होता. त्यावेळी आम्हाला सांगण्यात आले की, मुंबईत अनेक नवीन इमारतींची बांधकामे सुरु आहेत. त्याठिकाणी परराज्यातील अनेक कामगार काम करीत आहेत. त्यांना मलेरियाची जास्त लागण झालेली आहे. आम्ही त्याठिकाणचा सर्व्हे करुन तेथे काम करणाऱ्या कामगारांना हेल्थ कार्ड दिली आहेत.

सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न होता की, आतापर्यंत किती कंपन्यांवर कारवाई करण्यात आली. त्या संबंधातील माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नाही. माहिती घेऊन ती पटलावर ठेवण्यात येईल. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, गेल्या वर्षी या सभागृहात याच विषयावर चर्चा झ ाली होती. त्यावेळी आम्ही मुंबई महानगरपालिकेच्या महापौर व अन्य अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली होती. त्यावेळी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत हे देखील उपस्थित होते. आम्ही त्यावेळी महानगरपालिकेला एक प्रोटोकॉल तयार करुन दिला होता. महानगरपालिकेने त्याप्रमाणे काम केले. त्यामुळे मुंबईतील मलेरियाचे प्रमाण कमी झालेले आहे. गेल्या वर्षी मलेरियाचा प्रादूर्भाव असताना त्यावरील औषधांची कमतरता होती, केमिस्टवाल्यांनी औषधांचा साठा करुन कृत्रिम कमतरता निर्माण केली ही वस्तुस्थिती आहे. आम्ही अन्न व औषध प्रशासन विभागा बरोबर चर्चा करुन त्याबाबत एक प्रोटोकॉल तयार करणार आहोत.

सन्माननीय सदस्यांनी अशी सूचना केली की, मुंबईतील केमिस्ट दुकानांनी दुकानाच्या बाहेर औषधांचा स्टॉक डीस्प्ले करावा. त्यांची सूचना आम्ही स्वीकारीत आहोत. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी महिनाभरापूर्वी बैठक घेतली होती. त्यावेळी त्यांना पुढील सहा महिन्यात कोणत्या प्रकारचे काम करावयाचे आहे याचा एक ॲक्शन प्लान तयार करुन दिला आहे. त्याची अंमलबजावणी देखील सुरु झालेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9532....

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, याठिकाणी मंत्रीमहोदयांनी अतिशय सविस्तर उत्तर दिलेले आहे. स्वाईन फ्ल्यूचा आजार जास्त आहे. त्यावर शासनाने कशाप्रकारे उपाययोजना केली याबाबतचा उल्लेख केलेला आहे. त्यातील क्रमांक 6 वर 'डेथ ऑडीट बैठकांचे आयोजन' असा एक उल्लेख आहे. 'डेथ ऑडीट' बाबत मंत्रीमहोदय आम्हाला अवगत करतील काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, स्वाईन फ्ल्यू आजाराने या वर्षी 435 जणांचा मृत्यू झाला. 'डेथ ऑडीट' मध्ये मृत्यू झालेल्या व्यक्तीचे वय किती होते, त्यास वेळेत दवाखान्यात दाखल करण्यात आले काय इत्यादी बाबींचा आढावा घेतला जातो. व्हेक्टर कंट्रोल केले नाही त्यांच्यावर लीगल ॲक्शन घेण्यात आली काय, असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्याबाबत सांगू इच्छिते की, याबाबत 481 प्रोसीक्युशन झाले असून एकूण 18 हजार 833 जणांविरुध्द गुन्हा दाखल केलेला आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, याठिकाणी विसंगत उत्तर देण्यात आलेले आहे. पहिल्या प्रश्न इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट किंवा बिल्डींगचे बांधकाम सुरु आहे त्याठिकाणी तळी साचून तेथे डासोत्पत्ती होऊन मलेरियाचा प्रादूर्भाव जास्त झाला आणि त्याठिकाणी काम करणाऱ्या कामगारांस त्याची लागण झाली. तेव्हा कामगारांना दोष देता येणार नाही. महानगरपालिकेने आतापर्यंत किती बिल्डर्सना या प्रकरणी नोटीसा पाठविल्या आहेत, किती बिल्डर्सवर कारवाई करण्यात आली, सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांची बांधकामे सुरु आहेत. या बिल्डर्सची नावे काय आहेत, त्यांना नोटीसा पाठवूनही त्यांनी उपाययोजना केल्या नाहीत त्यांच्यावर शासन कारवाई करणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या संदर्भातील माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

---------

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ D/ ST/ प्रथम श्री.अजित शिगम 14.30

**पृ.शी./मु.शी**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांचा सन 2009-2010 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो

**उप सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2.

**पृ.शी./मु.शी** : औचित्याचा मुद्दा

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.महानगरपालिकेच्या मालमत्ता कराचे सगळीकडे समप्रमाण असावे या संदर्भात एक विधेयक सभागृहासमोर मांडण्यात आले होते ते विधेयक पाच सहा अधिवेशनापर्यंत मंजूर न होता तसेच राहिले होते त्यानंतर हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले होते. त्या समितीने विचारविनिमय केल्यानंतर ते विधेयक सभागृहासमोर मांडण्यात आले होते. त्यानंतर चर्चा होऊन ते विधेयक मंजूर करण्यात आले होते.या सभागृहात हे विधेयक मंजूर झाल्यानंतर ते मुंबई महानगरपालिकेकडे पाठविण्यात आले होते. जोपर्यंत मुंबई महानगरपालिका ते मंजूर करीत नाही तोपर्यंत त्यासबंधीचा कायदा अस्तित्वात येत नाही. आपण जे विधेयक मंजूर केले होते त्या विधेयकाला गेल्या मार्च महिन्यामध्यें मुंबई महानगरपालिकेने मान्यता दिली होती आणि 1 एप्रिल 2010 पासून कायदा अस्तित्वात आला आहे.

या अधिवेशनामध्ये आमच्यासमोर असे एक विधेयक आहे की, त्या विधेयकातील नियम तयार होऊ शकत नसल्यामुळे सध्याची कर प्रणाली एक वर्षासाठी तशीच ठेवण्यात यावी. परंतु त्या संबंधीचा कायदा अस्तित्वात आलेला आहे.मला माननीय मंत्री महोदयांना एक विनंती करावयाची आहे. हा कायदा अस्त्विात आलेला असल्यामुळे कर प्रणालीची पध्दती आता भांडवली मूल्यावर आधारित झालेली आहे.रेटेबल व्हॅल्यू म्हणजेच करपात्र मूल्याप्रमाणे आताची जी काही पध्दत होती ती मोडीत निघालेली आहे. फक्त प्रशासनाला प्रशासकीय कामासाठी काही अवघी हवा आहे. त्यामुळे त्यासंबंधीचे विधेयक या ठिकाणी आणून तात्पुरत्या स्वरुपाची मान्यता आपण आता घेणार आहात. भांडवली मूल्यावर आधारित करप्रणाली 1 एप्रिल 2010 पासून राहील परंतु सध्या महानगरपालिकेकडून लोकांना कराच्या बाबतीत नोटीसेस दिल्या जात आहेत व त्या बाबतीत कारवाई केली जात आहे. त्या पध्दतीने पुन्हा करप्रणाली निर्माण करणे अयोग्य आहे. कायदा अस्तित्वात आला असल्यामुळे दिनांक 1 एप्रिल 2010 पासून जे काही घडेल त्याप्रमाणे परिणामकारक कारवाई होईल अशा प्रकारच्या नोटीस दिल्या जात आहेत, त्याला जर स्थगिती दिली तर या कायद्याचे अस्तित्व राहील अन्यथा कायद्याला आव्हान दिले जाईल.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, पूर्वी रेटेबल व्हॅल्यू बेसिसवर कराची वसुली केली जावयाची परंतु आता कॅपिटल व्हॅल्यू बेसिसवर कर प्रणाली आणली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, पूर्वीची कर प्रणाली आता अस्तित्वात नाही परंतु तशातला भाग नाही.त्या बाबतीत ऐच्छिक निर्णय घेण्याची तरतूद या विधेयकात करण्यात आली होती त्याप्रमाणे रेटेबल व्हॅल्यू बेसिसवर कर वसुली करावयाची की कॅपिटल व्हॅल्यू बेसिसवर कर वसुली करावयाची ही बाब त्या त्या महानगरपालिकेने वा त्या त्या नगरपालिकेने ठरवावयाची आहे. परंतु सर्वानी मिळून कॅपिटल व्हॅल्यू बेसिसवरील कर प्रणाली स्वीकारली आहे. ही कर प्रणाली अत्यंत सुटसुटीत, चांगली आणि सगळयांना समान न्याय देणारी तसेच घर बसल्या माहिती देणारी आहे. या कर प्रणालीत जे काही सूत्र ठरवून दिलेले आहे त्याप्रमाणे आपल्या घरासाठी किती कर द्यावा लागणार आहे हे प्रत्येकाला समजणार आहे.पूर्वी तो अधिका-यांच्या मर्जीचा प्रश्न असल्यामुळे काही लोकांना त्रास होत होता. या संदर्भात आपण जो कायदा केला आहे तो दिनांक 1 एप्रिल 2010 पासून लागू होईल अशा प्रकारची तरतूद करण्यात आली होती. त्यापूर्वी फेब्रुवारी महिन्यापर्यत या मालमत्तेसंबंधी अधिका-यांपर्यत जी माहिती येणे आवश्यक होते ती माहिती येणे शक्य नव्हते म्हणून याबाबतीत संभ्रम निर्माण झाला होता.आता यामध्ये सुधारणा करण्याकरिता सभागृहासमोर एक विधेयक आणले जाणार आहे. सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, त्या अनुषंगाने संबंधितांना नोटीस दिल्या जात आहेत व त्यामुळे गोंधळ होत आहे तसेच त्यातून काही ठिकाणी भ्रष्टाचार सुध्दा होऊ शकतो. त्यामुळे महानगरपालिकेने कोणत्या नोटीस पाठविल्या आहेत त्याची प्रत मागितली आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये कोणाचीही पिळवणूक केली जाणार नाही याची निश्चितपणे काळजी घेतली जाईल. त्याचबरोबर गरज भासल्यास सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले आहे तीही उपाययोजना केली जाईल, एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

-----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अनुसूचित जमाती कल्याण समितीचा पाचवा अहवाल (2010-2011) सादर करणे.

श्री. रमेश शेंडगे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जमाती कल्याण समितीचा पाचवा अहवाल (2010-2011) सादर करतो.

सभापती महोदय, मी हा अहवाल सादर करीत असतांना सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या तत्कालीन समितीने सावंतवाडी नगरपरिषद, अलिबाग नगरपरिषद, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका, पुणे महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका या कार्यालयास दिलेल्या भेटीच्या वेळी व विभागीय सचिवांच्या साक्षीच्या अनुषंगाने समितीला आढळून आलेल्या त्रुटी संदर्भात समितीने पुढील शिफारस केली आहे.

नगरपालिका आणि महानगरपालिकांमध्ये त्या त्या जिल्हयातील अनुसूचित जमातीकरिता ठरवून देण्यात आलेल्या टक्केवारीनुसार आदिवासी उमेदवारांचे आरक्षण ठेवणे आवश्यक आहे. याबाबत नगरविकास विभागाकडून राज्यातील सर्व नगरपालिका व महानगरपालिकेतील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांचा पुन्हा आढावा घेण्यात यावा व त्यानुसार अनुसूचित जमातीसाठी रिक्त असलेली पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. असे करीत असतांना ज्या संबंधित नगरपालिका आणि महानगरपालिका अनुसूचित जमातीच्या रिक्त जागा भरणार नाहीत. अशा संबंधित नगरपालिका व महानगरपालिकांचे अनुदान थांबविण्यात यावे. अशी समितीने शिफारस केली आहे.

**उपसभापती** : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा पाचवा अहवाल (2010-2011) सभागृहाला सादर झाला आहे.

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे व संमत करणे

श्री. दिपक साळुंखे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 10 डिसेंबर, 2010 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय विधेयक व प्रलंबित राहिलेल्या 3 ठरावांना द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 9 डिसेंबर, 2010 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांचे एक अशासकीय विधेयक विचारार्थ आहे. त्यास 45 मिनिटांचा वेळ देण्यात यावा व उर्वरित 105 मिनिटांचा वेळ अशासकीय ठरावांना देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

**<u>अशासकीय विधेयक</u>**

1. सन 2010 चे वि.प.वि. क्रमांक 1 - मुंबई प्राथमिक शिक्षण आणि महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी(सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) विधेयक, 2010- श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांचे - 45 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

**<u>अशासकीय ठराव</u>**

(शुक्रवार दिनांक 3 डिसेंबर, 2010 रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेले अशासकीय ठराव) (अनुक्रमांक 1 ते 3)

1 श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 14 - 35 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

2 श्री. परशुराम उपरकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 68 - 35 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

3 श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 80 - 35 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

यापैकी कोणत्याही ठरावाचा वेळ वाचल्यास तो त्यापुढील क्रमांकाच्या ठरावास देण्यात यावा अशीही शिफारस समितीने केली आहे.

**उपसभापती** : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहास सादर झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिपक साळुंखे : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : नियम 93 अन्वये सूचना

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी "ठाणे जिल्हयातील वाशी येथे नवी मुंबईतील फळे व भाजीपाला कामगार वेल्फेअर असोसिएशन या नावाने बोगस संस्था स्थापन करुन सिडकोकडे घरे मिळण्याबाबत अर्ज केल्याने शासनाने संस्थेविरुध्द कारवाई करणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री किशनचंद तनवाणी, परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्हयातील सावंतवाडी कुटीर रुग्णालयाच्या रक्तपेढीच्या कारभाराबाबत जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडे तक्रारी करुनही संबंधितांविरुध्द कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, धनंजय मुंडे, भगवान साळुंखे, नागो गाणार यांनी "विना अनुदानित माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची सेवा वरिष्ठ श्रेणीसाठी ग्राह्य धरण्याबाबत शासनाने दि. 26 नोव्हेंबर, 2010 रोजी जारी केलेल्या शासन निर्णयातून माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वगळण्यात आल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती....**

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नागो गाणार, भगवानराव साळुंखे, रणजित पाटील यांनी "दिनांक 1 जानेवारी ते 15 मार्च,2011 या कालावधीत राज्यातील जनगणनेचे काम पूर्ण करण्यासाठी शिक्षकांच्या सेवा अधिग्रहीत केल्याने याच कालावधीत शालांत परीक्षा मंडळाच्या इयत्ता 10 वी व 12 वीच्या परीक्षा होणार असल्याने शिक्षकांमध्ये असंतोष निर्माण होत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी "झोपडपट्टी पुनर्विकास योजनेचे सहाय्यक अभियंता यांनी मुंबईतील खार, गोळीबार रोडवरील 40 एकर जागेचा झोपडपट्टी पुनर्विकास योजनेद्वारे विकास करण्यासाठी सैन्यदल, मुंबई महानगरपालिका व म्हाडा यांचे ना हरकत प्रमाणपत्र न घेतल्याबाबत तसेच त्यांनी मुंबईतील 33/14 बी, 3/11 व 3 के प्रकरणाची तपासणी करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "नाशिक जिल्हयातील सिन्नर येथील एमआयडीसी, एसीझेड (सेझ) व दिल्ली, मुंबईतील इंडस्ट्रीयल कॅरीडॉलसाठी सिन्नर तालुक्यातील मुसळगाव, मालेगांव,गुळवंज,कुंदेवाडी, शहापूर, केदारपूर, दातली,देशवंडी, पिंपरी, पास्ते, सोनांबे व कोनांबे इ.गावांतील सुमारे 12,115 हेक्टर शेतजमीन शासनाने संपादित करण्याचा घेतलेला निर्णय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, धन्यवाद.

**उप सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री वसंत खोटरे, कपिल पाटील. यांनी " महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने विद्यार्थ्यांची परीक्षा फी व शाळांची नोंदणी फी यात प्रचंड वाढ केल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती ....**

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील,वसंत खोटरे, जयंत प्र.पाटील यांनी "राज्य शासनाने नोव्हेंबर,2005 नंतर सेवेत रुजू झालेल्या सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षणसेवक यांना नवीन परिभाषित अशंदायी निवृत्ती वेतन योजना लागू करुनही या योजनेचा तपशील राज्यभर न पोहचल्याने सर्व शाळांचे संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यात निर्माण झालेले संभ्रमाचे वातावरण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, रामनाथ मोते यांनी"वाडा (जि. ठाणे) तालुका औद्योगिकदृष्टया डी झोन जाहीर झाल्यापासून या परिसरात मोठया प्रमाणात औद्योगिकरण झालेले असून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी या परिसरात त्यांचे उत्पादन सुरु केले असूनही त्याठिकाणी सुरक्षा यंत्रणा, अग्निशमन यंत्रणा इत्यादी सुविधा नसल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया यांनी "अकोला शहरातून जाणाऱ्या नॅशनल हायवे क्र.6 वर होणाऱ्या गंभीर अपघातात अनेक कुटुंबे उध्वस्त झाली असून अनेकांना अपंगत्व आले असून जनप्रतिनिधींनी आपल्या स्तरावर, शहरातून जाणारा महामार्ग हा गावाबाहेरुन वळसा करण्यात आलेल्या बायपास रस्त्यांत भ्रष्टाचार झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री गोपीकिसन बाजोरिया यांनी "अकोला-वाशिम जिल्हयातील धान्य व्यापाऱ्यांकडून धान्य साठा करण्याचा परवाना असूनही अतिरिक्त जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी यांनी त्यांच्याकडील धान्य साठा जप्त केल्याबाबत व्यापाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करुनही त्यांची दखल घेतली नसल्याबाबत." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..3..

श्री. गोपिकिशन बाजोरिया : सभापती महोदय, धन्यवाद.

**उप सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "श्री. कृष्णा आकाराम जाधव यांनी पनवेल येथील मौजे बारवई, सर्व्हे नं.84 येथील 0 हेक्टर 75 आर ही श्री. सुंदरा युगप्पा पुजारी यांची जमीन अनधिकृतरित्या स्वत:चे नावे करण्यासाठी जमिनीचे खोटे दस्तऐवज तयार केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

....4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अंधेरी पूर्व येथील झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत दुर्वांकूर सहकारी गृहनिर्माण संस्थेतील काही झोपडपट्टीधारक बेघर होण्याची निर्माण झालेली परिस्थिती.

**मु. शी.** : अंधेरी पूर्व येथील झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत दुर्वांकूर सहकारी गृहनिर्माण संस्थेतील काही झोपडपट्टीधारक बेघर होण्याची निर्माण झालेली परिस्थिती याबाबत डॉ. दीपक सावंत व श्री. पांडुरंग फुंडकर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सचिन अहिर( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, डॉ. दीपक सावंत व श्री. पांडुरंग फुंडकर यांनी "अंधेरी पूर्व येथील झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत दुर्वांकूर सहकारी गृहनिर्माण संस्थेतील काही झोपडपट्टीधारक बेघर होण्याची निर्माण झालेली परिस्थिती." या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, अंधेरी पूर्व येथील दुर्वांकूर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या वतीने एसआरए चा प्रकल्प उभा रहात आहे या विषयीचे हे निवेदन आहे. उत्तरात असे म्हटले आहे की, "दिनांक 7-7-2010 रोजी सुनावणी घेतली. प्रस्तुत योजनेच्या परिशिष्ट 2 मध्ये नमूद विषयांकित 9 झोपडीधारकांपैकी 4 झोपडीधारक अपात्र असून उर्वरित 5 झोपडीधारक पात्र आहेत. सुनावणीमध्ये विकासकाने पात्र झोपडीधारकांना संक्रमण शिबिरामध्ये सदनिका देण्याचे मान्य केले. प्रस्तुत योजनेतील पात्र झोपडीधारकांना संक्रमण शिबिरातील सदनिका दिल्याशिवाय त्यांच्याविरुध्द निष्कासनाची कार्यवाही करण्यात येणार नाही "

सभापती महोदय, आपल्या माध्यमातून मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, दि.7-7-2010 रोजी सुनावणी झाली नाही. कोणत्याही प्रकारची प्रश्नोत्तरे झाली नाहीत. त्यांच्याकडील पुरावे तपासून बघितलेले नाहीत.

यानंतर श्री. बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

त्या ठिकाणी 9 लोक बेघर होतील म्हणून माझा पहिला प्रश्न असा आहे की, पुन्हा एकदा त्यांचे पुरावे तपासून सुनावणी घेणार काय ? शासनाने निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, निष्कासनाची कारवाई करण्यात येणार नाही.. अजूनपर्यंत त्यांना कोणत्याही प्रकारचे भाडे दिलेले नाही किंवा त्यांना तात्पुरती राहण्यासाठी घरे देतात ती सुध्दा दिलेली नाहीत. त्यामुळे जे 5 झोपडपट्टीधारक पात्र आहे ते कसे काय शिफ्ट होणार आहेत ? त्यामुळे अशा प्रकारची कार्यवाही होईल काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मी उत्तरामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, त्या ठिकाणी जे पात्र लोक आहेत त्यांना कोणत्याही प्रकारे बेघर होऊ देणार नाही. पर्यायी ट्रान्झीट कॅम्प दिल्याशिवाय निष्कासनाची कारवाई केली जाणार नाही. परंतु जे अपात्र आहेत त्यांचा विचार करताना बाकीची योजना रखडविण्याचा प्रयत्न केला जाणार नाही. सुनावणीबाबत माननीय सदस्यांनी सांगितले. माझ्या माहितीनुसार 7.7.2010 रोजी सुनावणी झालेली आहे. सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे सुनावणी झाली नसेल तर एका आठवड्यात परत सुनावणी घेतली जाईल. जे अपात्र असतील त्यांच्या बाबतीत काही करता येणार नाही. लोकांनी बेघर होण्यासारखी स्थिती त्या ठिकाणी नाही.

----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST

**पृ. शी.** : मतदार याद्या व फोटो परीक्षण याद्या तयार करण्याच्या कामातून शिक्षकांना तातडीने मुक्त करण्याची आवश्यकता

**मु. शी.** : मतदार याद्या व फोटो परीक्षण याद्या तयार करण्याच्या कामातून शिक्षकांना तातडीने मुक्त करण्याची आवश्यकता याबाबत सर्वश्री कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. फौजिया खान ( सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, श्री. कपिल पाटील, यांनी "मतदार याद्या व फोटो परीक्षण याद्या तयार करण्याच्या कामातून शिक्षकांना तातडीने मुक्त करण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, फोटो निरीक्षण याद्यांचे काम आता सुरु होणार आहे आणि याचवेळी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांच्या परीक्षेची तयारी सुरु झालेली आहे. शाळा, परीक्षा, पेपर तपासणी आणि पेपर काढणे अशी बरीच कामे माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांना करावी लागणार आहेत. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, त्यांना वगळून शासन पर्यायी कर्मचाऱ्यांची व्यवस्था करणार काय याचे उत्तर निवेदनामध्ये आलेले नाही. त्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांना वगळून पर्यायी व्यवस्था शासन करणार काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, एस.एस.सी. बोर्ड याबाबतीत सगळे नियोजन करणार आहे.

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

**पृ. शी.** : अकोला विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार करण्याबाबतची बाब प्रलंबित असणे

**मु. शी.** : अकोला विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार करण्याबाबतची बाब प्रलंबित असणे याबाबत श्री. गोपीकिसन बोजोरिया, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. फौजिया खान ( सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, श्री. गोपीकिसन बाजोरिया यांनी "अकोला विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार करण्याबाबतची बाब प्रलंबित असणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, अकोला एअरपोर्टचा हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. नियोजनाचा सत्यानाश कसा होतो याचे उदाहरण या ठिकाणी दिलेले आहे अकोला विमानतळ येथे सध्या अस्तित्वात असलेली 1.32 कि.मी. लांबीची धावपट्टी दोन वर्षापूर्वी 16 कोटी रुपये शासनाने खर्च करुन तयार केली आणि त्या ठिकाणी अद्ययावत एअरपोर्ट सुरु केल्यानंतर आता त्या ठिकाणी कोणतेही एटीआर किंवा बोईंग विमान उतरत नाही. आता नागरिकांची मागणी आहे की, त्या एअरपोर्टच्या ठिकाणी 3.5 कि.मी. लांबीची धावपट्टी तयार केली पाहिजे. या ठिकाणी असे उत्तर दिलेले आहे की, विद्यमान धावपट्टीचा विस्तार करणे शक्य नाही आणि दुसरीकडे एअरपोर्ट तयार करावा लागेल. मग शासनाने 16 कोटी रुपये कशासाठी खर्च केले ? म्हणून माझा असा प्रश्न आहे की, पूर्वी ज्या अधिकाऱ्यांनी खोटे प्रस्ताव दाखल करुन शासनाने 16 कोटी रुपये पाण्यात घातले त्यांच्यावर शासन कारवाई करणार काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, पूर्वीची जी धावपट्टी होती त्याची क्षमता कमी होती. आता विस्तारित धावपट्टी करण्याची मागणी आहे. हा प्रश्न एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडियाच्या अखत्यारित आहे.. आज त्या ठिकाणी जी धावपट्टी आहे त्याच्या बाजूला विद्यापीठ आणि त्यांची इमारत असल्यामुळे त्यांना ते फिजिबल नाही. त्या ठिकाणी त्यांच्या सांगण्यानुसार नॉर्थवर्ड एक्स्टेंशन हे शक्य नाही. दोन ठिकाणी त्यांच्या पध्दतीचे हवामान असले पाहिजे. त्या पध्दतीचे ते नाही. ती जमीन ज्या क्षेत्रात आहे त्या ठिकाणी हा विस्तार शक्य नाही. एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडियाचे असे म्हणणे आहे की,..

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदया अत्यंत चुकीची माहिती देत आहेत. त्या ठिकाणी दोन वर्षापूर्वी आदरणीय श्री. शरद पवार साहेब आणि श्री. प्रफुल्ल पटेल साहेब आले आणि त्यांनी सांगितले की, अकोल्याची धावपट्टी आता आंतरराष्ट्रीय विमाने उतरण्यासारखी आहे. त्यांनी विमाने उतरविली. त्याचे स्वागत केले. उद्घाटन केले. मोठा समारंभ झाला. आता माननीय मंत्रिमहोदय सांगत आहेत की, तशी धावपट्टी नाही. ही अत्यंत चुकीची माहिती माननीय मंत्रिमहोदय सभागृहाला देत आहेत. त्या ठिकाणी आंतरराष्ट्रीय बोईंग, जेट

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

विमाने उतरु शकतात. त्या ठिकाणी सर्व विमाने मुंबईवरुन पार्कींगकरिता येणार होती. त्यामुळे त्या ठिकाणी धावपट्टी वाढविली आणि 16 कोटी रुपये खर्च केले. कोणतेही विमान उतरु शकेल अशी धावपट्टी झालेली आहे, हे आपल्याला माहीत आहे काय ? यामध्ये आणखी कोणत्या पध्दतीची वाढ करावयाची याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, केंद्र शासनाकडून जो अहवाल आलेला आहे तो त्या पध्दतीचा नाही. सन्माननीय सदस्य जी माहिती देत आहेत ती तपासून घेण्यात येईल.

----

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : आदिवासी उपयोजनेतील आर्थिक तरतूद दरवर्षी कमी होणे

**मु. शी.** : आदिवासी उपयोजनेतील आर्थिक तरतूद दरवर्षी कमी होणे याबाबत डॉ.दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.बबनराव पाचपुते ( आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, डॉ.दीपक सावंत यांनी "आदिवासी उपयोजनेतील आर्थिक तरतूद दरवर्षी कमी होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आदिवासी उपयोजनेसंबंधीचे हे निवेदन आहे. या निवेदनामध्ये शासनाने मान्य केले आहे की, आदिवासी जनतेच्या कल्याणासाठी जी आर्थिक तरतूद केली जाते ती दरवर्षी कमी होत आहे. सन 2007-08, 2008-09, 2009-10, 2010-11 या वर्षी सातत्याने आदिवासी उपयोजनांवरील मंजूर नियतव्यय व प्रत्यक्षात झालेला खर्च यामध्ये फरक दिसून येत आहे. त्याचप्रमाणे सन 2010-11 या वर्षातील खर्चाची आकडेवारी दिलेली नाही. आदिवासी उपयोजनेंतर्गत किती योजना हाती घेतल्या होत्या, त्यापैकी किती योजना बंद आहेत ते सांगावे. तसेच सन 2010-11 या वर्षात किती खर्च झाला त्याची माहिती द्यावी.

श्री.बबनराव पाचपुते : आदिवासी उपयोजनेतील एकही योजना बंद झालेली नाही. दोन योजनांना तात्पुरत्या स्वरुपात स्थगिती दिलेली आहे. दुधाळ जनावरांचे वाटप व गॅसचे वाटप या दोन योजना थांबविल्या आहेत, कारण त्यामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. बाकीच्या कोणत्याही योजनांचा पैसा परत पाठविलेला नाही. माझ्याजवळ सुरुवातीपासूनची आकडेवारी आहे. सन 2010-11 ची सुरुवात झालेली आहे, या वर्षातील खर्चाची आकडेवारी नंतर दाखविली जाईल. आतापर्यंत जो खर्च झाला आहे त्याचा दर 3 महिन्यांनी आढावा घेतला जातो. त्यातील एकही पैसा लॅप्स होणार नाही.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबई शहरातील दादर-नायगांव क्रॉस रोडवरील भूखंडाचा विकास करणा-या विकासकाने शासनाची कोटयवधी रुपयांची केलेली फसवणूक

**मु. शी.** : मुंबई शहरातील दादर-नायगांव क्रॉस रोडवरील भूखंडाचा विकास करणा-या विकासकाने शासनाची कोटयवधी रुपयांची केलेली फसवणूक याबाबत श्री.रामदास कदम, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सचिन अहिर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, श्री.रामदास कदम यांनी "मुंबई शहरातील दादर-नायगांव क्रॉस रोडवरील भूखंडाचा विकास करणा-या विकासकाने शासनाची कोटयवधी रुपयांची केलेली फसवणूक" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, नायगांव क्रॉस रोड येथील भूखंडाचा विकास करण्याची परवानगी घेताना या भूखंडातील म्हाडाला 786 चौ.मी., प्रकल्पग्रस्तांसाठी 828.20 चौ.मी. तसेच मुंबई महानगरपालिकेला बाजारासाठी 909.33 चौ.मी.जागा द्यावयाची होती. परंतु संबंधित विकासकाने महानगरपालिकेच्या अधिका-यांना हाताशी धरुन जी जागा प्रकल्पग्रस्तांसाठी आणि म्हाडाला हस्तांतरित करावयाची होती ती न करता अधिकाऱ्यांनी विकासाची परवानगी दिलेली आहे. आता तेथे वीज व पाणी आलेले आहे. म्हणून या अधिका-यांनी भ्रष्टाचार करुन सदर जागा हस्तांतरित करुन न घेता त्यांना परवानगी दिली आहे, त्या अधिका-यांवर कोणती कारवाई केली जाणार आहे, त्या विकासकाने जागा दिली नसेल तर त्यांच्याविरुध्द तत्काळ गुन्हा दाखल केला जाणार आहे काय ?

श्री.सचिन अहिर : या निवेदनामध्ये स्पष्ट उत्तर दिलेले आहे. या विकासकाने जेवढी जागा म्हाडाकडे द्यावयास पाहिजे होती त्याबाबत शासनाकडे प्रस्ताव दिला होता. बाजारासाठी असलेली जागा रिहॅब कॉम्पोनंट मध्ये गृहीत धरावी अशी त्यांनी विनंती केली होती. त्यांची विनंती शासन स्तरावर मान्य करण्यात आली. त्यामुळे म्हाडाला जागा द्यावयाची होती त्यामध्ये ती वळती केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी जो पहिला प्रश्न मांडला आहे त्यात भ्रष्टाचार झालेला नसल्यामुळे दुसरा प्रश्नही उपस्थित होत नाही. परंतु म्हाडाकडे शासनाच्या नियमाप्रमाणे त्यांनी जागा द्यावयाची होती ती त्यांनी दिली नसल्यामुळे त्याबाबत त्या विकासकावर योग्य ती कारवाई केली जाईल.

----

5....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

**पृ. शी.** : गेल इंडिया कंपनीने कामगारांना कामावरुन कमी करणे

**मु. शी.** : गेल इंडिया कंपनीने कामगारांना कामावरुन कमी करणे याबाबत श्री.जयंत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हसन मुश्रीफ ( कामगार मंत्री ) : सभापती महोदय, श्री.जयंत पाटील यांनी "गेल इंडिया कंपनीने कामगारांना कामावरुन कमी करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...6 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या कामगारांच्या संदर्भात अनेक वेळा बैठका झ ाालेल्या आहेत. जिल्हाधिका-यांकडे प्रकल्पग्रस्त शेतकरी आणि कामगारांच्या ज्या ज्यावेळी बैठका झ ाालेल्या आहेत त्या बैठकीला मी त्या भागातील लोकप्रतिनिधी म्हणून उपस्थित होतो.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KGS/ ST/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 14:55

श्री. जयंत प्र. पाटील..

त्याठिकाणी गेल कंपनीचे अधिकारी उपस्थित होते. त्या अधिका-यांनी आश्वासन दिले होते. ज्या महिलांनी 10-12 वर्षे गार्डनमध्ये काम केलेले आहे त्यांना कमी करुन नवीन भरती कंपनीने केलेली आहे. युनियनच्या माध्यमातून केन्द्रीय कामगार आयुक्तासमोर ही केस चालू आहे. राज्याच्या कामगार मंत्र्यांना या प्रकरणी हस्तक्षेप करता येणार नाही. तरीही राज्य शासन म्हणून स्थानिक लोकांना दिलेल्या आश्वासनाची जाणीव कंपनीला करुन देण्यात येईल काय ? तसेच जिल्हाधिका-यांनी तेथील लोकांना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता केली जाईल काय ?

श्री. हसन मुश्रीफ : ही केन्द्र शासनाच्या अख्यत्यारीतील बाब आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे एक बैठक घेऊन त्या बैठकीस गेल कंपनीचे अधिकारी, जिल्हाधिकारी आणि सन्माननीय सदस्य यांना बोलावून मागण्या मान्य करुन घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील नाईक ओशियन एक्स्पोर्ट कंपनीमध्ये झालेली अमोनिया वायूची गळती

**मु. शी**. : तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील नाईक ओशियन एक्स्पोर्ट कंपनीमध्ये झालेली अमोनिया वायूची गळती याबाबत श्री. जयंत प्र. पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री. हसन मुश्रीफ (कामगार मंत्री) : सभापती महोदय, श्री.जयंत प्र. पाटील यांनी "तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील नाईक ओशियन एक्सपोर्ट कंपनीमध्ये झालेली अमोनिया वायूची गळती" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : तळोजा येथील नाईक ओशियन एक्सपोर्ट कंपनीमध्ये अमोनिया वायूची गळती झाल्यानंतर त्या कारखान्याच्या मालकाला अटक करण्यात आलेली नाही. घटनास्थळी अद्याप कामगार खात्याचे अधिकारी गेलेले नाहीत. ही घटना लक्षात आली नसती तर भोपाळ वायू दुर्घटनेसारखी दुर्घटना घडली असती. घटनास्थळी संबंधित अधिकारी गेले नाहीत.त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : नाईक ओशियन एक्सपोर्ट कंपनी हा माशांवर प्रक्रिया करणारा कारखाना आहे. या कारखान्यातील चिलिंग प्लॅण्टमधील वॉल्व्ह उघडा झाला त्यामुळे अमोनिया वायूची गळती सुरु झाली. त्या गावातील लोक आत घुसले आणि तेथील कर्मचारी पळून गेले, त्यामुळे वायू गळतीचे प्रमाण वाढले. लोकांमध्ये घबराट निर्माण झाली. 17 लोकांना उपचार करुन घरी सोडण्यात आले. 2 ऑपरेटर्सना अटक करण्यात आली. एकाला जामीन मिळालेला आहे आणि एकाला 7 दिवसाची मॅजिस्ट्रेट कस्टडी मिळालेली आहे. गुन्ह्याची नोंद केलेली आहे. घटनास्थळाला आमच्या विभागाच्या अधिका-यांनी भेट दिलेली आहे. जो पर्यन्त अधिका-यांनी दिलेल्या सूचनांची पूर्तता होणार नाही तोपर्यन्त कारखाना चालू करु नये असे आदेश दिलेले आहेत.

----

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : पूर्ण वेळ निदेशक पदनामात बदल करुन पूर्ण वेळ शिक्षक पदनाम

करण्याबाबत

**मु. शी.** : पूर्ण वेळ निदेशक पदनामात बदल करुन पूर्ण वेळ शिक्षक पदनाम करण्याबाबत श्री रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री.डी.पी.सावंत (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी "पूर्ण वेळ निदेशक पदनामात बदल करुन पूर्ण वेळ शिक्षक पदनाम करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...6 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : राज्यातील + 2 स्तरावरील आधारित व्यावसायिक अभ्यासक्रमामधील पूर्ण वेळ काम करणा-या निदेशकांचे पदनाम बदलण्याच्या संदर्भातील हा विषय आहे. हे खरे आहे की, सुरुवातीला असे करता येणार नाही असे शासनाने उत्तर दिले होते. मी मंत्री महोदयांना मनापासून धन्यवाद देतो. दिनांक 9.9.2010च्या बैठकीमध्ये दोन विषयाच्या बाबतीत जी चर्चा झाली त्यामध्ये न्याय देण्याची भूमिका घेतलेली आहे. पूर्ण वेळ निदेशकांचे पदनाम पूर्ण वेळ शिक्षक करणे आणि ही टिचिंग पोस्ट असल्यामुळे कायद्यातील तरतुदीप्रमाणे 19 घड्याळी तासापेक्षा जास्त तास असता कामा नये या दोन प्रश्नासंबंधी निर्णय घेण्यासाठी समिती गठित केलेली असून डिसेंबर अखेर त्या समितीची बैठक होणार आहे. समिती गठित केल्याबद्दल धन्यवाद. सभापती महोदय, या दोन विषयाच्या संदर्भात समिती गठित केल्यानंतर दोन-तीन वर्षे निर्णय मिळत नाही असा अनुभव आहे. तेव्हा या समितीच्या माध्यमातून या 2 विषयाच्या संदर्भात किती दिवसात निर्णय होईल ?

श्री. डी.पी.सावंत : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी सांगितल्याप्रमाणे समिती गठित करण्यात आली असून डिसेंबर 2010 मध्ये समितीची पहिली बैठक घेण्यात येईल आणि त्यावेळी यासंबंधी निर्णय घेण्यात येईल.

---

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पातोंडा, जि.बुलढाणा या गावाच्या पुनर्वसनासाठी शेतकऱ्यांची सुपीक जमीन संपादित न करता पडीक जमीन संपादन करणे

**मु. शी.** : पातोंडा, जि.बुलढाणा या गावाच्या पुनर्वसनासाठी शेतकऱ्यांची सुपीक जमीन संपादित न करता पडीक जमीन संपादन करणे याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी "पातोंडा, जि.बुलढाणा या गावाच्या पुनर्वसनासाठी शेतकऱ्यांची सुपीक जमीन संपादित न करता पडीक जमीन संपादन करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, जिगांव प्रकल्पांतर्गत ज्या गावांचे पुनर्वसन केले जाणार आहे त्या गावांच्या पुनर्वसनासाठी जमीन मागितलेली आहे. पातोंडा या गावाचे पुनर्वसन केले जाणार आहे. परंतु बाजूलाच असलेल्या अलमपूर गावातील शेतकऱ्यांच्या जमिनीची मागणी करण्यात आली आहे. ही जमीन उपजाऊ व बागायती शेती असलेली आहे. जाणीवपूर्वक व खोडसाळपणे अलमपूर ग्रामपंचायतीने तीन वेळा ठराव केला. तीन वेळा या राज्याच्या महसूल मंत्र्यांनी स्थगिती दिलेली आहे. पुन्हा पुन्हा अधिकारी जमीन संपादन करण्यासाठी जात आहेत. अलमपूर गावातील शेतकऱ्यांची ही सुपीक जमीन आहे. या गावाच्या आजूबाजूला सरकारी जमीन भरपूर आहे. दोन वेळा मी माननीय महसूल मंत्र्यांना पत्र दिले. या निवेदनाच्या माध्यमातून माझी विनंती आहे की, उपजाऊ जमीन वगळून जे शेतकरी भूमिहीन होणार आहेत त्यांची जमीन न घेता अलमपूर गावाच्या आजूबाजूला असलेल्या सरकारी वा पडीक जमिनीवर त्यांचे पुनर्वसन करावे अशाप्रकारची मागणी अलमपूर गावातील शेतकऱ्यांनी केलेली आहे. त्यादृष्टीने मी ही सूचना उपस्थित केली होती. मंत्री महोदयांनी तीन वेळा या प्रकरणी स्थगिती दिलेली आहे. अलमपूरच्या शेतकऱ्यांना मंत्री महोदय आश्वासन देतील काय? पातोंडा गावाचे पुनर्वसन करण्यासाठी पडीक जमीन उपलब्ध करुन घेऊन त्या जमिनीवर त्यांचे पुनर्वसन करण्यात येईल काय?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी पातोंडा गावाच्या पुनर्वसनासंबंधी प्रश्न उपस्थित केला आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी दिनांक 20.10.2010 रोजी तत्कालीन महसूल मंत्र्यांना पत्र दिले होते, त्या पत्रावर त्यांनी या संदर्भात संबंधितांकडून वस्तुस्थितीदर्शक अभिप्रायासह अहवाल मागविला आहे. तोपर्यंत जैसे थे परिस्थिती कायम ठेवण्याबाबत आदेश दिले आहेत. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सूचित केल्याप्रमाणे पुनर्वसनासाठी पडीक वा सरकारी जमीन उपलब्ध असेल तर निश्चितपणे विचार करुन तसा निर्णय घेण्यात येईल.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील करारानुसार पोलीस गृहनिर्माण मंडळाला विकासकाने जमीन उपलब्ध करुन देणे

**मु. शी.** : झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील करारानुसार पोलीस गृहनिर्माण मंडळाला विकासकाने जमीन उपलब्ध करुन देणे याबाबत श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी "झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील करारानुसार पोलीस गृहनिर्माण मंडळाला विकासकाने जमीन उपलब्ध करुन देणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ताडदेव येथील एम.पी.मिल कंपाऊंड येथे नव महाराष्ट्र नगर सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अन्य वसाहतींचे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे सादर झालेला आहे. त्या पुनर्वसन योजनेमध्ये महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण विभागासाठी काही जागा आरक्षित करण्यात आली होती. सदर व्यवहाराच्या अटी व शर्तीनुसार विकासकाने 3025.75 चौ.मी.जमीन पोलीस गृहनिर्माण विभागाला देणे आवश्यक होते. परंतु अटी व शर्तीनुसार पोलीस गृहनिर्माण विभागाला जमीन न देता त्यांची फसवणूक केली आहे. विनामोबदला बांधकाम करुन द्यावयाचे ठरले होते. अद्याप पोलीस गृहनिर्माण विभागाला जागा देण्यात आलेली नाही. त्यांची निवेदने माझ्याकडे आलेली आहेत. या जागेचा विकास करीत असताना करारातील अटी व शर्तीनुसार विकासकाकडून किती दिवसात कराराचे पालन करण्यात येईल?

नंतर 2यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, पोलिसांच्या गृहनिर्माण सोसायटीसाठी ही जागा आरक्षित होती पण त्या जागेवर मोठ्या प्रमाणात झोपड्या वाढल्या. तरी देखील आजही त्या जागेचा विकास करण्यास विकासक तयार आहे आणि 2267 चौ. मीटर एवढी जागा पोलिसांच्या सोसायटीला देण्यास तयार आहे. त्या अनुषंगाने प्रस्ताव सादर केला असून तो प्रस्ताव सध्या आयुक्तांकडे प्रलंबित आहे. त्यांनी या प्रस्तावाला मान्यता दिल्यानंतर ताबडतोब यासंबंधीचा निर्णय घेण्यात येईल. तसेच पोलिसांच्या सोसायटीसाठी असलेली ही जागा फ्री करुन घेण्यात तरतूद देखील करण्यात आली आहे.

-------

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी औचित्याचे दोन मुद्दे मांडण्याची परवानगी मागितलेली आहे, त्यांनी आपले औचित्याचे मुद्दे मांडावेत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, राज्यातील बालकांसाठी काम करणाऱ्या अनेक संस्था आहेत त्याचबरोबर अनेक आश्रमशाळा सुध्दा आहेत तर बालगृहे सुध्दा कार्यरत आहेत. सर्वात जास्त संख्या ही उस्मानाबाद जिल्ह्यात असून त्या जिल्ह्यातीलच एका बालगृहाच्या अनुषंगाने मी सभागृहाच्या निदर्शनास ही बाब आणून देण्याचा प्रयत्न करणार आहे. शासनाने बाल न्याय अधिनियम, 2000 च्या कलम 68 द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार तसेच त्यानुसार मिळणाऱ्या सर्व अधिकारांचा वापर करुन नियमावली सुध्दा बनविली आहे. अशा प्रकारे काही संस्था एड्सग्रस्त मुलांसाठी देखील काम करीत आहेत. अशाच एका संस्थेला शासनाकडून सांगण्यात आले की, आपण कायम विना अनुदानित तत्वावर काम करणार अशा प्रकारचे हमी पत्र 100 रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड करुन द्यावे, अशा सूचना दिल्या आहेत. एवढ्यावरच शासन थांबले नाही तर त्यांना अनुदान देण्याचेही नाकारलेले आहे. म्हणून या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, यासंदर्भात कायदा जरी असला तरी त्यामध्ये लवचिकता आणून अशा एड्सग्रस्त संस्थांसाठी काम करणाऱ्या संस्थांच्या बाबतीत तरी पुनर्विचार करावा. कारण हा अतिशय संवेदनशील मुद्दा असल्याने कृपया आपणही यामध्ये लक्ष घालावे व अशा एड्सग्रस्त मुलांसाठी काम करणाऱ्या संस्थांना मदत केली तर त्या मुलांना दिलासा मिळेल.

श्री. बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : महोदय, यासंबंधीची नोंद घेण्यात आली आहे.

-------

डॉ. दीपक सावंत :महोदय, माझा आणखी एक मुद्दा असा आहे की, मागील वर्षी नागपूर येथील मेयो हॉस्पिटलबाबत आपण एक बैठक घेतली होती व तीच बैठक मुंबईतही घेतली होती. कालच मी या हॉस्पिटलमध्ये जाऊन आलो. मला तेथे असे दिसून आले की, मार्डचे डॉक्टर्स आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत. कारण त्यांना सांगण्यात आले होते की, दोन दिवसात बैठक घेण्यात येईल, पण अजुनही बैठकीची वेळ दिलेली नाही, म्हणून आपण यामध्ये हस्तक्षेप करावा अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने आपणास करीत आहे.

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : याबाबत माझा अनुभव अत्यंत कटू आहे.  आपण बैठक घेतली व त्याचा पाठपुरावा देखील मी केला परंतु शासन मात्र याबाबतीत पूर्णपणे उदासीन असल्याचे दिसून आले. त्यामुळे या विषयावर बैठक बोलवावी असे मला पुन्हा वाटले नाही.  तसेच आपण उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने शासनाने आवश्यकता वाटत असेल तर दखल घ्यावी, एवढेच मी सांगू इच्छितो.

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, या मुद्याची नोंद घेऊन संबंधित विभागाला कळविण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : आपण काल देखील निदेश दिले परंतु अजुनही त्यावर सही झालेली नाही, हा एक प्रकारे आपला अवमान आहे.

----------

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबई न्यायवैद्यक प्रयोगशाळेतील तीनही विभागात कंत्राटी पध्दतीने तज्ज्ञांची नियुक्ती करणे

**मु. शी.** : मुंबई न्यायवैद्यक प्रयोगशाळेतील तीनही विभागात कंत्राटी पध्दतीने तज्ज्ञांची नियुक्ती करणे यासंबंधी सर्वश्री प्रकाश बिनसाळे, सतीश चव्हाण, अरुण गुजराथी, श्रीमती उषाताई दराडे, श्री. हेमंत टकले ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबईतील न्यायवैद्यक प्रयोगशाळेत (फॉरेन्सीक लॅब) मध्ये नार्को ॲनालिसीस सायबर क्राईम, टेप, रेकॉर्ड महत्वाचे समजले जात असून फॉरेन्सीक लॅबमध्ये सन 2006 मध्ये सदरचे तीन विभागामध्ये तीस तज्ज्ञांना कंत्राटी पध्दतीवर शासनाने नियुक्त करणे, सदर कंत्राटाची मुदत 2009 साली संपुष्टात आल्यानंतर पुन्हा एक वर्षासाठी कंत्राट वाढविण्यात येणे, मात्र सदर कंत्राटाची वाढीव मुदत संपून सदर कंत्राटास मुदत वाढ देण्यात न येणे, त्यामुळे सदर विभाग बंद होण्याची आलेली पाळी, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

श्री.सतेज उर्फ बंटी पाटील (गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, आज गुन्हयाचे प्रमाण वाढते आहे परंतु कन्व्हीक्शन रेट अत्यंत कमी होत आहे. त्यामुळे फॉरेन्सीक लॅबरोटरीला फार महत्व आलेले आहे. संबंधित गुन्हयांमध्ये फॉरेन्सीक लॅबने केलेला तपास आजच्या युगामध्ये फार महत्वाचा असतो. असे असतांना आज या विभागात मोठया प्रमाणात पदे रिक्त आहेत. त्यामुळे माझा पहिला प्रश्न असा आहे की, फॉरेन्सीक लॅबरोटरीमध्ये किती पदे रिक्त आहेत ? रिक्त पदे कधीपर्यंत भरली जाणार आहेत, कर्मचा-यांची पदे रिक्त असल्यामुळे किती इनव्हेस्टीगेशनवर त्याचा परिणाम झालेला आहे, फॉरेन्सीक लॅबरोटरीमधील वेगवेगळया डिपार्टमेंटमध्ये किती केसेस पेंडींग आहेत, एमपीएससीने सिलेक्शन प्रोसेस केलेली आहे असे आमच्या ऐकिवात आहे. एमपीएससीने प्रोसेस केली असेल तर पदे भरण्यास विलंब का होतो आहे, रिक्त पदे भरण्याच्या बाबतीत सामान्य प्रशासन आणि वित्त विभागाकडून विलंब होतो आहे काय ?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, फॉरेन्सीक लॅबरोटरीमध्ये "अ" वर्गाची 30 पदे रिक्त आहेत. सन 2006 मध्ये न्यायवैद्यक प्रयोग शाळा सुरु केल्यानंतर या ठिकाणी लागणा-या स्टाफसाठी सेवा-शर्ती आणि नियम तयार करण्याचे काम करण्यात आलेले आहे. या ठिकाणी काम करणारा वर्ग या ठिकाणी पहिल्यांदाच येत होता. पहिल्या 3 वर्षामध्ये कर्मचा-यांच्या नेमणुका करण्यात आल्या होत्या. पुढील वर्षासाठी कर्मचा-यांची नेमणूक करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता व त्यालाही आता मंजुरी मिळालेली आहे. त्यामुळे येणा-या महिन्यात या ठिकाणी ज्या कर्मचा-यांना कंत्राटी किंवा तात्पुरत्या सेवेवर नेमण्यात आले होते त्यांना मान्यता मिळेल. तसेच कायमस्वरूपी पद मान्यतेचा प्रस्ताव मंजूर झालेला आहे. 72 पदांपैकी 39 पदांना वित्त विभागाने प्राथमिक मंजुरी दिलेली आहे. त्यामुळे येणा-या भविष्य काळात या ठिकाणची सर्व पदे भरली जातील. फॉरेन्सीक लॅबमध्ये कर्मचारी किंवा अधिका-यांमुळे काम थांबलेले आहे असे नसून प्रलंबित केसेस पूर्ण करण्याचे काम सुरु आहे.

डॉ. नीलम गो-हे : ज्यावेळेस अशा प्रकारचे गुन्हे घडतात व पोलिसांच्या तपासाबाबत प्रश्न चिन्ह निर्माण होते त्यावेळी साधारणत: नार्को ॲनालिसीसची मागणी होत असते किंवा फॉरेन्सीक

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे .....

लॅब शिवाय तपासच हाणार नाही असे बोलले जाते. त्यामुळे या ठिकाणचे कंत्राट रद्द होणार आणि नंतर पदे भरणार असाल तर मधील काळात दिरंगाई होणार नाही याबाबत शासनाची काय भूमिका राहणार आहे ?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, आता आम्हाला यासंदर्भात मुदतवाढ मिळालेली आहे. त्यामुळे येणा-या महिन्याभरात या ठिकाणची पदे भरली जाणार असल्यामुळे कोणत्याही प्रकारची अडचण भासणार नाही.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KGS/ KTG/ 15:10

**पृ. शी**. : रत्नागिरी जिल्हयात मोठया प्रमाणात होत असलेले अवैध उत्खनन

**मु. शी**. : रत्नागिरी जिल्हयात मोठया प्रमाणात होत असलेले अवैध उत्खनन यासंबंधी सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, रामनाथ मोते वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"रत्नागिरी जिल्हयातील तालुका लांजा व रत्नागिरी यांच्या सीमेवरील निवसर रेल्वे स्टेशन जवळच्या डोंगरावर मोठया प्रमाणात माती व दगड उत्खननाचे सुरु असलेले काम भर दिवसा रस्त्यावरील वाहतुक थांबवून सुरुंग लावून उत्खनन करणे, दोन तालुक्यांच्या सीमेवर उत्खनन सुरु असल्याने एका तालुक्याच्या तहसीलदाराकडून परवानगी घेऊन दुसऱ्या तालुक्याच्या भागात अवैध उत्खनन करणे, हजारो ब्रास माती व दगडाची रॉयल्टी बुडवणे, जिल्हयातील भरारी पथके भ्रष्ट असल्याने अनधिकृत उत्खनन वाढून पर्यावरणाला निर्माण झालेला धोका, अतिवृष्टी झाल्यास मोठया प्रमाणात वित्त व मनुष्यहानी होण्याची शक्यता, सदर उत्खनन थांबवण्यात यावे म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधीची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. बाळासाहेब थोरात ( महसूल मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----

...4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, रत्नागिरी जिल्हयातील निवसर रेल्वे स्टेशन हे नेहमी वर्तमानपत्रात गाजत असते. या ठिकाणी पावसाळयामध्ये रेल्वेचे रुळ मोठया प्रमाणात खचतात त्यामुळे रेल्वे वाहतूक 6-6 तास बंद पडत असते. कोणवासीयांना बाकीच्या त्रासाबरोबर हा देखील त्रास मोठया प्रमाणात सहन करावा लागत असतो. निवसर रेल्वे स्टेशनच्या रेल्वे ट्रॅकचे काम सुरु आहे. या ठिकाणी भर घालण्यासाठी लागणारी माती, डबर जवळच्याच डोंगरातून घेतली जात असते त्यामुळे त्या ठिक्राणी पावसाळयात पाणी जमा होते व रुळ खचतात त्यामुळे आजुबाजूच्या गावक-यांना मोठया प्रमाणात त्रास सहन करावा लागतो. या ठिकाणी मी स्वत: दोन वेळा भेटीही दिलेल्या आहेत.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रमेश शेंडगे )**

श्री.संजय केळकर....

निवसर रेल्वे स्टेशन बांधण्यापूर्वी त्याठिकाणी चार नैसर्गिक नाले होते. हे नाले बुजवून त्याठिकाणी निवसर रेल्वे स्टेशन बांधण्यात आले. हे नैसर्गिक नाले बुजविल्यामुळे पावसाच्या पाण्याचा निचरा होत नाही, त्यामुळे धोका निर्माण झालेला आहे. तेव्हा याबाबत कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, जे अनधिकृत उत्खनन सुरु आहे त्याबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना वारंवार लेखी निवेदने देऊन व प्रत्यक्ष भेट घेऊनही त्यांनी त्याबाबत कोणतीही कारवाई केलेली नाही. अनधिकृत उत्खनन सुरु आहे. आता अधिकाऱ्यांवर कारवाई केल्याचे निवेदनात सांगण्यात आले आहे. परंतु ही कारवाई लक्षवेधी सूचना दिल्यानंतर करण्यात आली हे खरे आहे काय ? माझा तिसरा प्रश्न आहे की, अनधिकृत गौण खनिज उत्खननामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडला असून त्यामुळे दरडी कोसळणे इत्यादी प्रकार होत आहेत. तेव्हा याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : सन्माननीय सदस्यांनी तीन प्रश्न विचारले. निवसर रेल्वे स्टेशन बांधण्यापूर्वी त्याठिकाणी असलेले चार नैसर्गिक नाले बुजवून त्यावर हे स्टेशन बांधले असे त्यांनी सांगितले. सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचनेमध्ये गौण खनिजा संदर्भातील विषय उपस्थित केल्यामुळे त्या संदर्भातील माहिती माझ्याकडे आहे. सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्ना संदर्भातील माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. त्यांचा दुसरा प्रश्न गौण खनिजा संदर्भातील आहे. गौण खनिजाचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. स्वत:च्या जमिनीतील गौण खनिज काढले तरी त्याबाबतचे स्वामीत्वधन शासनास भरले पाहिजे ही वस्तुस्थिती आहे. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी सातत्याने रेल्वे विभागाला स्मरण पत्रे पाठवून स्वामीत्वधन भरण्यास सांगितल्या नंतर रेल्वेने त्याबाबत दिनांक 17.10.1989 च्या ओरिसा केसचा रेफरन्स देऊन स्वत:च्या जमिनीतील गौण खनिज काढल्यास त्याबाबत स्वामीत्वधन भरण्याची आवश्यकता नाही असे सांगितले.त्यावर आपल्याकडून खुलासा करण्यात आला की, सन 2000 मध्ये केंद्र सरकारने यामध्ये बदल केलेला आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्राने देखील स्वत:च्या जमिनीतील गौण खनिज काढल्यास त्यावर स्वामीत्वधन भरले पाहिजे असा बदल केलेला आहे. तेव्हा रेल्वे विभागाकडून स्वामीत्वधन वसूल करण्याची कार्यवाही केली जाईल.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, निवसर रेल्वे स्टेशन लांजा आणि रत्नागिरी तालुक्याच्या सीमेवर आहे. ठेकेदार लांजा तहसीलदारांची उत्खननासाठी परवानगी घेतो आणि रत्नागिरी तालुक्यातील रेल्वे स्टेशन परिसरातील डोंगरामध्ये उत्खनन करतो. तेव्हा संबंधित ठेकेदारा विरुध्द कारवाई करण्यात येईल काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या संदर्भात पडताळणी करुन त्यामध्ये वस्तुस्थिती आढळल्यास संबंधितांकडून दंड वसूल करण्यात येईल.

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : चंद्रपूर जिल्ह्यातील नक्षलग्रस्त प्रभावित क्षेत्राच्या आरोग्य सेवेकरिता देण्यात आलेल्या निधीमध्ये झालेला अपहार

**मु.शी.** : चंद्रपूर जिल्ह्यातील नक्षलग्रस्त प्रभावित क्षेत्राच्या आरोग्य सेवेकरिता देण्यात आलेल्या निधीमध्ये झालेला अपहार यासंबंधी श्री. दिवाकर रावते ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सन 2002-2003 व 2003-2004" या आर्थिक वर्षाकरिता जिल्हापरिषद, चंद्रपूरच्या आरोग्य विभागाला नक्षलग्रस्त प्रभावित क्षेत्राच्या आरोग्य सेवेकरिता तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी 25 लक्ष रुपयांचा अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देणे, सदर रक्कमेतून कोणतीही औषधे खरेदी न करता सन 1996 पासून थकलेल्या बिलांची रक्कम अदा करणे, या गैरप्रकारांची चौकशी करण्याची मागणी नक्षलग्रस्त क्षेत्र विकास कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. प्रभाकर मामुलकर यांनी करणे, या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशी करुन संबंधितांविरुध्द कारवाई करण्याचा अहवाल जिल्हापरिषदेकडे पाठविण्यात येऊन देखील जिल्हापरिषदेतर्फे कोणतीही कारवाई न होणे, या संदर्भात आरोग्य मंत्री, आरोग्य संचालक, उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर यांच्याकडे वारंवार तक्रारी करण्यात येणे, यासंदर्भात त्वरित कारवाईची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

प्रा.फोजिया खान (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे )**:: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, नक्षलग्रस्त भागात 2002-203 साली बांधकाम आणि फिरत्या आरोग्य पथकासाठी जो निधी मंजूर झाला होता तो निधी या कामासाठी न वापरता औषध खरेदी करण्यासाठी वापरण्यात आला होता. असे निवेदनात सांगण्यात आलेले आहे. या बाबतीत आमचा असा आक्षेप आहे की,त्या भागात बांधकामाची आवश्यकता असतांना जुन्या ठेकेदारांची बिले देण्याकरता हा निधी वापरण्यात आला होता. निवेदनात असे म्हटले आहे की, 13 प्राथमिक आरोग्य केन्द्रांकरिता 9 लाख 91 हजार 36 आणि 45 प्राथमिक आरोग्य केन्द्रासाठी 17 लाख 8 हजार 935 रुपयांची औषधांची खरेदी करण्यात आली होती. चंद्रपूर मध्ये फक्त दहा लाख रुपयांची औषधे खरेदी होऊ शकेल असे जिल्हा नियोजन अधिका-यांना कळविण्यात आले होते असे असतांना 17 लाख 99 हजार 971 रुपयांची औषधे खरेदी का केली होती ? या बाबतीत घोळ निर्माण झाला आहे . एका ठिकाणी दहा लाख रुपयांची औषधे खरेदी करु शकतो असे म्हटल्यानंतर 17 लाख रुपयांची औषधे कशी काय खरेदी करण्यात आली आहेत ? नक्षलग्रस्त क्षेत्र विकास कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री प्रभाकर मामुलकर यांनी या संदर्भात शासनाकडे तक्रार केली होती काय आणि त्या तक्रारीची दखल घेऊन माननीय जिल्हाधिकारी श्री संजय जयस्वाल यांनी चौकशी केली होती काय , त्या चौकशीचा अहवाल शासनाला सादर झाला आहे काय ? हा अहवाल जर शासनास सादर झ ाला असेल तर त्या चौकशीमध्ये त्यांनी कोणत्या त्रृटी दाखविल्या आहेत ?

प्रा.फौजिया खान : नक्षलग्रस्त भागासाठी 2002-2003 या वर्षाकरिता 27 लाख रुपये उपलब्ध करुन देण्यात आले होते. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे ही गोष्ट खरी आहे की बांधकाम आणि फिरते आरोग्य पथक आणि औषध खरेदीसाठी हा निधी होता,परंतु सदरील अनुदान 11.3.2003 रोजी प्राप्त झाल्यामुळे बांधकाम होऊ शकत नाही असा अभिप्राय डीएचओने दिला होता. त्यामुळे संपूर्ण निधी औषधासाठी खर्च करण्यात आला असावा त्यानंतर पालक मंत्र्यांनी या संदर्भात एक बैठक घेतली होती आणि त्या बैठकीत असे ठरले की हा संपूर्ण निधी आता खर्च होऊ शकत नाही त्यामुळे हा निधी औषध खरेदी करण्यासाठीच खर्च करण्यात यावा नक्षलग्रस्त भागातील 13 प्राथमिक आरोग्य केन्द्रासाठी 9 लाख 91 हजार 36 रुपये त्याचबरोबर 45 आरोग्य केन्द्रे नक्षलग्रस्त भागात नाहीत त्यांच्यासाठी 17 लाख 8 हजार 935 रुपये खर्च करण्यात आले होते. त्या ठिकाणी पैसे उपलब्ध झाले होते आणि प्रत्येक प्राथमिक आरोग्य



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केन्द्रासाठी फक्त 80 हजार रुपये खर्च करावेत असे नॉर्म्स ठरविण्यात आले होते. त्याप्रमाणे 13 प्राथमिक आरोग्य केन्द्रामध्ये 80 हजाराप्रमाणे खर्च केले होते.परंतु पैसे उरले असल्यामुळे परवानगी न घेता इतर कामासाठी पैसे खर्च करण्याचा निर्णय जिल्हा आरोग्य अधिका-यानी घेतला होता तो निर्णय घेत असतांना त्यांची चूक झाली होती . हे पैसे बाकीच्या प्राथमिक आरोग्य केन्द्रामध्ये औषधे खरेदी करण्यासाठी वापरण्यात आले होते अर्थात यामध्ये अनियमितता झाली आहे असे म्हणता येणार नाही. परंतु जुनी बिले या पैशातून देण्यात आली नाहीत.

श्री.दिवाकर रावते : नक्षलग्रस्त भागासाठी देण्यात आलेले पैसे इतर कामासाठी वळविण्यात आले होते आणि नक्षलग्रस्त भागासाठी ते वापरण्यात आले नाही हे आपणही मान्य केलेले आहे.याबाबतीत श्री.जयस्वाल यांनी चौकशी केली होती त्यामध्ये काय म्हटलेले आहे ? तत्कालीन जिल्हाधिकारी श्री जयस्वाल यांनी जो अहवाल दिला होता त्यामध्ये या सदर्भात त्यांनी स्पष्ट शब्दात ताशेरे ओढले होते तेव्हा त्या प्रकरणामध्ये नेमके कोण दोषी आहेत या बाबतीत जर त्या अहवालात उल्लेख केला असेल तर त्याबाबतीत तातडीने कारवाई केली आहे काय आणि केली नसेल तर आता कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

प्रा.फौजिया खान : या संदर्भात चौकशी अहवाल सादर करण्यात आला होता परंतु त्यात कोणालाही दोषी धरण्यात आलेले नाही.

श्री.दिवाकर रावते : नक्षलग्रस्त भागासाठी औषधे आणि बाकीच्या साहित्यासाठी पैसे देण्यात आले होते ते पैसे खर्च न करता इतर ठिकाणी वळविण्याचा अधिकार त्यांना आहे काय, जर हा अधिकार नसेल तर त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, त्यांना अधिकार नाही हा प्रश्न नाही. फक्त तो निधी वापरण्यासाठी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेतली नाही. त्यांनी तो निधी जर खर्च केला नसता तर तो दुसरीकडे वर्ग झाला असता. याचे कारण 17 मार्च रोजी प्राप्त झालेला निधी त्यांना खर्च करणे भाग होते.त्यामुळे त्यांनी तो निधी खर्च केला.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दिशाभूल करणारे उत्तर दिले आहे. स्पेशल ॲक्शन प्लॅनचा निधी सरेंडर होत नाही. तो निधी पुढील वर्षीसुध्दा खर्च करता येतो. असे असतांना 10 लाख रुपये स्पेशल ॲक्शन प्लॅनच्या नावाखाली नक्षलग्रस्त विभागात वापरले गेल्यानंतर 17 लक्ष रुपये हे स्पेशल ॲक्शन प्लॅनच्या बाहेरच्या भागाकडे वळते करुन खर्च करण्यात आले. त्यामुळे हा नक्षलग्रस्त भागावर झालेला अन्याय आहे. म्हणून माझे दोन प्रश्न आहेत की, हा निधी सरेंडर होत नसतांनाही नक्षलग्रस्त एरीयाच्या बाहेर कां वापरण्यात आला? दुसरे असे की, आपल्या नियोजन अधिकाऱ्यांनी हा निधी देता येत नाही असे सांगितले होते. परंतु माननीय पालक मंत्री आणि विशेष कृती कार्यक्रमाच्या अध्यक्षांनी हा निधी वळता करण्यास सांगितले. परंतु त्यांना हा निधी वळता करता येत नव्हता. तेव्हा या दोन्ही गोष्टींबाबत पुन्हा एकदा चौकशी करुन जे संबंधित दोषी अधिकारी आहेत त्यांच्यावर आपण कारवाई करणार आहात काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय,जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांनी आपला प्रतिलिपी अहवाल नागपूर विभागाच्या आयुक्तांकडे सादर केला आहे. त्या अहवालावर ते कोणती कारवाई करणार आहेत ते पाहून नंतर ठरविण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मांजराला उंदीर साक्ष असल्यासारखे हे उत्तर आहे. प्रश्न असा आहे की, हा निधी वर्ग करता येत नाही हे खरे आहे काय? हा निधी वर्ग करता येत नाही व तो लॅप्ससुध्दा होत नाही. तो पुढील वर्षी वापरता येतो हे खरे आहे काय ते सांगा? असेल तर तसे करणे गैरे नाही काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, हा निधी वर्ग करता येतो की नाही याबाबत मी माहिती घेते.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ही गंभीर बाब आहे. आपण ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मी याबाबत माहिती घेऊन सभागृहाच्या पटलावर ठेवते.

श्री. दिवाकर रावते : हा निधी लॅप्स होत नाही तर तो पुढील वर्षी वापरता येतो. तसेच, तो परत करावा लागत नाही. औषध खरेदी करण्याकरिता अधिकाऱ्यांनी कां वापरला नाही, हा माझा प्रश्न आहे? पुढील वर्षीच्या बांधकामाकरिता हा निधी खर्च करता आला असता. आपणाकडे आता जर माहिती नसेल तर ही लक्षवेधी सूचना आपण राखून ठेवावी.

**तालिका सभापती (श्री. रमेश शेंडगे)** : माननीय मंत्री महोदय माहिती घेऊन सभागृहाच्या पटलावर ठेवणार आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ही माहिती पटलावर ठेवता येणार नाही. ही आर्थिक गैर व्यवस्था आहे...

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, हा सन 2003 चा निधी आहे...

श्री. दिवाकर रावते : त्यामुळे ही लक्षवेधी सूचना आपण राखून ठेवावी...

**तालिका सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी माहिती पटलावर ठेवतो असे सांगितले आहे.

श्री. दिवाकर रावते : पटलावर ठेवता येणार नाही, त्यामुळे आम्हाला प्रश्न विचारता येणार नाहीत. आपण आम्हाला उद्या किंवा परवा माहिती द्यावी.

प्रा. फौजिया खान : मी आपल्याला उद्यापर्यंत माहिती देईन.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अशाप्रकारे आपल्याला नक्षलग्रस्त भागाच्या निधीमध्ये दुजाभाव करता येणार नाही. सन 2002-03 च्या गैरकारभाराची चौकशी झालेली आहे.

**तालिका सभापती** : माननीय मंत्री महोदयांकडे जी माहिती नसते ते ती माहिती पटलावर ठेवीत असतात, तशी सभागृहाची प्रथा आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, नक्षलग्रस्त भागाच्या बाबतीत आपण आमच्यावर अन्याय करु नका.

**तालिका सभापती** : आपण दुसऱ्या आयुधांचा वापर करुन हा विषय उपस्थित करु शकता.

श्री. दिवाकर रावते :माननीय मंत्री महोदया जर उद्या माहिती देणार असतील तर ही लक्षवेधी उद्यापर्यत राखून ठेवा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : जर अशाप्रकारे हा निधी दुसरीकडे वळता करता येत नसेल तर त्या अनुषंगाने कारवाई करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते :तसे नाही, तर मग याठिकाणी लक्षवेधी सूचना कशासाठी आणली? सभापती महोदय, त्या चौकशी अहवालाच्या संदर्भात माझी चौकशीची मागणी होती. माझे असे म्हणणे आहे की, यामध्ये बरोबर चौकशी झालेली नाही. अधिकाऱ्यांना संभाळण्याचे काम त्या चौकशीमध्ये करण्यात आले. आणि नक्षलग्रस्त भागाच्या कामकाजामध्ये ढवळाढवळ करुन त्या अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक औषधे खरेदीकरिता असलेला निधी गुत्तेदाराना पैसे देण्यासाठी वापरला हा आमचा आक्षेप आहे.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

म्हणून जर याची पुढची चौकशी व्हावयाची असेल तर ते उत्तर यावे लागेल. यामध्ये आर्थिक शिस्तीचा विषय आहे.

श्रीमती शोभाताई फडणवीस : माननीय मंत्रिमहोदया उत्तर देऊ शकत नाहीत.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मी उत्तर देऊ शकत नाही असे नाही. जी माहिती सन्माननीय सदस्यांनी मागितलेली आहे ती उद्यापर्यंत देतो असे मी सांगितले. त्यानुसार जर तसे आढळले तर आम्ही कारवाई सुध्दा करु.

श्री. दिवाकर रावते : ही लक्षेवधी सूचना राखून ठेवावी. आपल्याला न्याय द्यावा लागेल. माननीय मंत्रिमहोदयांकडे माहिती नाही. आपण कृपा करुन शासनाच्या बाजूने सांगू नका.

**तालिका सभापती** : तसे अजिबात नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी कारवाई करु असे उत्तर दिलेले आहे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, चौकशी होऊन त्याचा रिपोर्ट आयुक्तांकडे दिलेला आहे. जर तसे आढळून आले तर कारवाई करण्यात येईल. अधिकाऱ्यांनी आपल्याला चुकीची माहिती दिली असेल तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात )

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांना जे अपेक्षित आहे तसे उत्तर माननीय मंत्रिमहोदया देत आहेत. दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे अशी जी आपली अपेक्षा आहे त्याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिलेले आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय उत्तर कोणत्या माध्यमातून देणार ? ही लक्षवेधी सूचना राखून ठेवली तरच त्यांना उत्तर देता येईल.

**तालिका सभापती** : ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्याची आवश्यकता नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, त्यांना असे उत्तर देता येत नाही. हा पॉइन्ट ऑफ प्रोसीजर आहे.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, बाकीच्या सन्माननीय सदस्यांनी असे उभे राहून बोलणे बरोबर नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, आमच्या हक्काचा हा प्रश्न आहे. नक्षलग्रस्त एरियाचा हा प्रश्न आहे.

श्री. दिवाकर रावते : आम्ही आपल्या पक्षावर टीका केली का ? आपल्या नेत्यांवर टीका केली का ? सन्माननीय सदस्यांनी अशा प्रकारे उभे राहणे आणि बोलणे हे आमच्यावर आक्षेप घेण्यासारखे आहे. आम्ही आपल्या पक्षावर, आपल्या नेत्यांवर टीका केलेली नाही. आम्ही एका प्रश्नाचे उत्तर मागत आहोत. पक्षाची बाजू घेण्याकरिता किती उभे राहावयाचे ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जी लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे त्याबाबत सांगावयाचे म्हणजे 2002-2003 मधील ही बाब आहे. एक तर 2002-2003 मधील विषयावर आता लक्षवेधी सूचना देतात आणि ती आपण सभागृहामध्ये चर्चेला घेतो त्याला आम्ही पॉइन्ट ऑफ प्रोसीजरमध्ये चॅलेंज केले असते पण मी त्या प्रश्नावर जात नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आदर्श सोसायटीची बाब सुध्दा 1999 साली चालू झाली पण तो विषय काल उपस्थित केला. त्यामुळे ही बाब 2002-2003 मधील आहे हे आपण कसे काय सांगत आहात ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन 2002-2003 मध्ये जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांनी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना 27 लाख रुपयांच्या औषध खरेदीला मंजुरी दिली. त्यावेळी जे जिल्हा आरोग्य अधिकारी होते त्यांनी नियोजन अधिकाऱ्याला तेव्हाच कळविले होते की, आम्हाला एवढे औषध नको. आम्हाला तेवढी गरज नाही. नक्षलग्रस्त एरियामध्ये फक्त 10 लाख रुपयांच्या औषधांची गरज आहे असे त्यांनी जिल्हा नियोजन अधिकाऱ्याला कळविले होते. औषध खरेदी झाल्यानंतर नक्षलग्रस्त भागामध्ये जी 13 प्राथमिक आरोग्य केंद्र होती त्यांना 9.91 लाख रुपयांच्या औषधांचे वितरण करण्यात आले आणि बाकीच्या औषधांचा जो साठा होता तो वाया जाऊ नये म्हणून त्याच जिल्ह्यात दुसऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रांना त्याचे वाटप झाले. मी आणि सन्माननीय राज्यमंत्र्यांनी सकाळी ब्रिफिंग घेत असताना संपूर्ण फाईल तपासली. आठ वर्षे जुनी फाईल आहे ती तपासली.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी....

त्यामध्ये असे लक्षात आले की, जिल्हा आरोग्य अधिका-यांनी हे करण्यापूर्वी जिल्हाधिका-यांची लेखी परवानगी घ्यावयास पाहिजे होती. ती त्यांनी घेतली नव्हती. बाकी यामध्ये काही गैरव्यवहार झालेला नाही. औषधे त्याच जिल्हयात वितरित केलेली आहेत, त्याच जिल्हयातील लोकांना दिलेली आहेत. यामध्ये एकच मुद्दा आहे की, नक्षल भागाच्या प्राथमिक आरोग्य केंद्रामधील औषधे काढून संपूर्ण जिल्हयात त्याचे वाटप केले. त्यासाठी जिल्हाधिका-यांकडे लेखी परवानगी घ्यावयास पाहिजे होती ती त्यांनी घेतली नाही. सन 2002-03, 2003-04 या काळात जे जिल्हा आरोग्य अधिकारी होते, त्यांच्या या कृतीबाबत त्यावेळी योग्य ती कारवाई करावयास पाहिजे होती, ती आता केली जाईल.

-----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

**पृ. शी.** : महाड औद्योगिक वसाहतीमधील एक्झॉन लॅबोरेटरीत वायुगळती झाल्याने प्रकल्प प्रमुखाचा मृत्यू होऊन सहा कामगार जखमी होणे

**मु. शी.** : महाड औद्योगिक वसाहतीमधील एक्झॉन लॅबोरेटरीत वायुगळती झाल्याने प्रकल्प प्रमुखाचा मृत्यू होऊन सहा कामगार जखमी होणे यासंबंधी सर्वश्री भाई जगताप, राजन तेली, मोहन जोशी, एस.क्यू.जमा, उल्हास पवार, हुसेन दलवाई,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.भाई जगताप ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दिनांक 16 नोव्हेंबर, 2010 रोजी महाड औद्योगिक वसाहतीमधील एक्झॉन लॅबोरेटरी या कारखान्यामध्ये रासायनिक प्रक्रिया चालू असताना रिॲक्टरमधून वायुगळती झाल्याने कंपनीच्या प्रकल्पप्रमुखाचा (प्लान्ट इन्चार्ज) मृत्यू होऊन अन्य सहा कामगार जखमी होणे, यापैकी एका कामगाराची प्रकृती अत्यंत गंभीर स्थितीत असणे, या घटनेमुळे तेथील कामगारांच्या सुरक्षिततेचा निर्माण झालेला प्रश्न, परिणामी त्यांच्यात पसरलेले भीतीचे वातावरण, सदर घटनेची सखोल चौकशी करुन मृत्यू झालेल्या कामगाराच्या कुटुंबियांना तसेच जखमी कामगारांना तातडीने मदत करण्याची गरज, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही."

श्री.राजेंद्र गावित ( कामगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, महाड एमआयडीसीमधील ही कंपनी आहे. या कंपनीमध्ये हायड्रोजन सल्फाईड वायूची गळती झाल्यामुळे 5 कामगार बाधित झाले तसेच एका सुपरवायझरला आपला जीव गमवावा लागला. "या कामगारांना झालेल्या वायू गळतीची सूचना त्वरित न देणे, गळतीग्रस्त विभागात कामगारांना मज्जाव न करणे, सुरक्षा उपकरणे न वापरताच प्रवेश करु देणे इत्यादी बाबी आढळून आल्या, करिता कारखाने अधिनियम 1948 च्या कलम 7 अ (2) (अ) चा भंग आढळून आला आहे त्याकरिता भोगवटदाराविरुध्द कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे, असे निवेदनात नमूद केले आहे. व्यवस्थापनाने 7,58,240 रुपये न्यायालयात जमा केलेले आहे, तसेच मृत कामगारांच्या नातेवाईकास सानुग्रह अनुदान म्हणून 3 लाख 60 हजार रुपये, तसेच बाधित झालेल्या कामगारास 25 हजार रुपये देण्याचे मान्य केलेले आहे. परंतु या कारखान्यात अनियमितता झालेली असल्यामुळे त्या कालावधीत कारखाना बंद करण्याची नोटीस दिली होती काय ? कारण वायूगळतीचा हा प्रश्न आहे, भोपाळला काय झाले ते सर्वांना माहीत आहे. त्यावेळी एका मिनिटात माणसे मेलेली आहेत. या अनियमिततेमध्ये कारखाना निरीक्षकांनी सुधारणा करुन घेतली आहे काय, मृताच्या नातेवाईकास देय असलेली रक्कम देण्यात आली आहे काय ?

श्री.राजेंद्र गावित : सभापती महोदय, या कंपनीमध्ये हायड्रोजन सल्फाईड हा वायू पाईपलाईनद्वारे वाहून नेला जातो. त्याच्या सेकंडरी कंडेंसरकडून स्क्रबरकडे जाणारी पाईप लाईन गंजल्यामुळे छिद्र पडून दि.16.11.2010 रोजी या वायूची गळती झाली. त्यामुळे प्लॅन्ट इनचार्ज होते ते दगावले. तसेच 5 बाधित कामगारांपैकी 4 कामगार कामावर रुजू होते, एका कामगाराला उपचारानंतर घरी सोडण्यात आले. गळतीग्रस्त विभागात कामगारांना मज्जाव न करणे, सुरक्षा उपकरणे न वापरताच प्रवेश करु देणे इत्यादी बाबी आढळून आल्या, करिता कारखाने अधिनियम 1948 च्या कलम 7 अ (2) (अ) चा भंग आढळून आला आहे त्याकरिता श्री.मंडारे व श्री.नागोरे या भोगवटदाराविरुध्द पोलीस केस दाखल केली आहे. जे इनचार्ज दगावले आहेत त्यांच्या नातेवाईकांना द्यावयाची 7,58,240/- रुपये इतकी रक्कम न्यायालयात जमा केलेली आहे.

श्री.भाई जगताप : सन्माननीय मंत्री महोदय उत्तर देण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु ते केलेल्या कारवाईबाबत बोलत आहेत. परंतु त्या कारवाईवर आधारित मी प्रश्न विचारला आहे. हे घातक रसायन आहे. एक मिनिटात माणसाचा जीव जाऊ शकतो.

यानंतर श्री.शिगम

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 15:40

भाई जगताप..

म्हणून ही प्रक्रिया बंद केली आहे काय ? ही कंटिन्युअस प्रक्रिया आहे. हायड्रोजन सल्फाईड गॅस वाहून नेणे आणि त्याची विल्हेवाट करण्याच्या प्रक्रियेचा पाईप फुटला आणि त्यामुळे गॅस गळती झालेली आहे. म्हणून ही प्रक्रिया थांबविलेली आहे काय ? मृतांच्या वारसांना आर्थिक मदत देण्यात आलेली आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : दिनांक 26.2.2009 रोजी कामगार विभागाच्या अधिका-यांनी त्याठिकाणी भेट दिली होती. त्यावेळी हायड्रोजन सल्फाईड वायूची जी गळती झाली त्याबाबतीत कंडक्टर बसविण्याची सूचना दिली होती. तो कंडक्टर त्यांनी बसविलेला नाही. त्यानंतर कारखाना ताबडतोब बंद करण्याची नोटीस दिली. कारखाना बंद झाला. जोपर्यन्त गॅस कंडक्टर बसविला जाणार नाही आणि कॉम्पिटण्ट ॲथॉरिटीकडून तपासून सर्टिफिकेट घेतले जाणार नाही तोपर्यन्त कारखाना सुरु करु नये अशा सूचना दिलेल्या आहे. व्यवस्थापनाने श्रमीक नुकसान भरपाई कायदा 1923 नुसार देय असलेली नुकसान भरपाईची रक्कम रु. 7,58,240/- आयुक्त, श्रमीक नुकसान भरपाई यांच्या न्यायालयात जमा केलेली आहे.रु. 3,60,953/- इतके सानुग्रह अनुदान देण्याचे मान्य केलेले आहे. गंभीररित्या बाधित झालेल्या कामगारास 25,000/-रु. सानुग्रह अनुदान देण्याचे व्यवस्थापनाने मान्य केलेले आहे.

श्री. हेमंत टकले : हा कामगाराच्या संदर्भातील प्रश्न असला तरी एकूणच महाड आणि अशा प्रकारच्या ज्या औद्योगिक वसाहती आहेत, जेथे रासायनिक कारखाने मोठ्या प्रमाणावर आहेत तेथे वारंवार अशा प्रकारच्या घटना अधिवेशन चालू असताना घडत असतात. आपल्याकडे जी यंत्रणा अस्तित्वात आहे त्या यंत्रणे मार्फत रासायनिक कारखान्यांची तपासणी व्हावयास हवी. तसेच त्यातील तंत्रज्ञांना आधुनिकतेबद्दलचे प्रशिक्षण देऊन असे प्रशिक्षित कामगार आणि अधिकारी आपण त्या भागात पाठवून त्यांच्याकडून तपासणी करुन घ्यावी. जर अशा प्रकारची कारखानदारी येत असेल तर त्या बाबतीत नियमाचे पालन कारखान्याकडून होते की नाही हे पाहाण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा सहभाग यामध्ये घेता येईल. या दोन्ही यंत्रणांनी अशा कारखान्यांवर देखरेख करण्याची आवश्यकता आहे, जेणे करुन भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडणार नाही. तेव्हा अशा प्रकारची उपाययोजना शासन करणार आहे काय ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : कामगार विभागाने असे जे कारखाने आहेत आणि ज्या कारखान्यामध्ये फार मोठ्या प्रमाणात गळती होते, प्रदूषण होते अशा कारखान्यांनी सेफ्टी ऑडिट करुन घेण्याचे आदेश नुकतेच दिलेले आहेत.

श्री. भाई जगताप : सानुग्रह अनुदानाचा उल्लेख मंत्री महोदयांनी केला. या घटनेला एक महिना होत आहे. मृत कामगाराच्या वारसाला सानुग्रह अनुदान मिळालेले नाही. ही रक्कम आयुक्ताकडे जमा आहे असे सांगितले. जे पैसे आपण देणार आहात ते अजून मृताच्या वारसापर्यन्त पोहोचलेले नाहीत. कंपनी अशा प्रकारचे वायदे करते आणि सोयीस्करपणे विसरुन जाते. एका कामगाराचा बळी गेलेला आहे. कॉम्पेन्सेशन ॲक्टनुसार नुकसान भरपाई मिळाली पाहिजे. तेव्हा मृताच्या कुटुंबाला प्रचलित कायद्यानुसार नुकसान भरपाई देण्यात येणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : कॉम्पेन्सेशन ॲक्ट नुसार 7,58,240/- रुपये मिळालेले आहेत. 3,60,953/- रु. सानुग्रह अनुदान देण्याबाबत ताबडतोब बैठक घेतो. शासनातर्फे मदत देण्याची योजना नाही. मृत कामगाराचा मुलगा किंवा पत्नी नोकरी करण्यास तयार असेल तर त्याना नोकरी देण्यास व्यवस्थापनास भाग पाडू.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, अशी तरतूद नाही असे शासनाला कसे म्हणता येईल? त्या कामगाराचा काय दोष होता? कामगार सकाळी कामावर गेला आणि संध्याकाळी त्याचे प्रेत घरी आणले गेले. अशा परिस्थितीत शासनाने उदासिनता दाखविणे योग्य होणार नाही. शासनाने स्वत: पुढाकार घेऊन आर्थिक मदत दिली पाहिजे. अशी आर्थिक मदत दिली जाईल काय?

श्री.हसन मुश्रीफ : त्या कामगाराच्या मुलाला किंवा नातेवाईकाला वा पत्नीला नोकरीची आवश्यकता असेल तर ती देण्यासाठी कंपनीला भाग पाडले जाईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, प्रत्येक अधिवेशनात महाड परिसरातील एखाद-दुसरी घटना सभागृहात चर्चेला येत असते. वारंवार त्या भागात अशा घटना घडत असतात. त्या भागातील विभागीय अधिकारी, जिल्हयाचे जबाबदार अधिकारी यांनी प्रत्यक्ष भेटी देऊन रासायनिक कारखान्यांनी आवश्यक ती दक्षता घेतली आहे का याबाबत कधी कारवाई केल्याचे निदर्शनास आलेले नाही. शासन स्वत: जबाबदारी न घेता परस्पर कारखान्याच्या मालकांवर जबाबदारी ढकलून मोकळे होत असते. कामगारांच्या कुटुंबियांना न्याय मिळत नाही. दोन अधिवेशनाच्या दरम्यान किती ठिकाणी असे स्फोट झाले, त्यात कामगारांचे काय नुकसान झाले याचा आढावा पटलावर ठेवण्यात येईल काय?

श्री.हसन मुश्रीफ : होय. पटलावर ठेवण्यात येईल.

-----

**तालिका सभापती** (श्री.रमेश शेंडगे) : सभागृहाची बैठक दुपारी 4.15 वाजेपर्यंत मध्यंतरासाठी तहकूब करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.46 ते 4.15 वाजेपर्यंत मध्यंतरासाठी स्थगित झाली.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरा नंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. रमेश शेंडगे )**

**<u>सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्याबाबत</u>**

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्याने सभागृहाची बैठक दहा मिनिटांसाठी स्थगित करावी, अशी मी विनंती करते.

**तालिका सभापती** : माननीय मंत्री महोदय सभागृहात येईपर्यंत आपण विशेष उल्लेख मांडण्यास सुरुवात करु या.

श्री. रामदास कदम : महोदय, मंत्री महोदय सभागृहात उपस्थित होईपर्यंत आम्ही त्यांची वाट पहावी काय, हे योग्य नाही. यावरुनच दिसून येते की, सभागृहाची बैठक चालविणे व मंत्री महोदयांनी उपस्थित राहणे ही शासनाची जबाबदारी असली तरी शासन मात्र यात उदासीन दिसून येते. आपण सभागृहाची बैठक मंत्री महोदय येईपर्यंत स्थगित करावी, अन्यथा आम्ही बहिष्कार टाकतो.

**तालिका सभापती** : कामकाज सल्लागार समितीची बैठक नुकतीच संपलेली आहे, त्यामुळे मंत्री महोदय सभागृहात येतच असतील, कृपया सन्माननीय सदस्यांनी समजून घ्यावे.

श्री. दिवाकर रावते : महोदय, सभागृहाची बैठक दहा मिनिटांसाठी स्थगित करावी अन्यथा आम्ही बहिष्कार टाकून सभागृहातून निघून जाऊ.

(माननीय मंत्री महोदय सभागृहात उपस्थित होतात.)

डॉ. विजयकुमार गावित : महोदय, अशी चूक पुन्हा होणार नाही, याची शासनाच्या वतीने दक्षता घेण्यात येईल.

श्री. रामदास कदम : महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. अशा प्रकारे सभागृहात वेगळाच पायंडा पडतो हे चुकीचे आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : माननीय मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, असा प्रसंग पुन्हा येणार नाही याची कृपया आपण काळजी घ्यावी.

श्री. दिवाकर रावते : महोदय, सभागृहात माननीय सभापती हे आमचे विश्वस्त असतात. त्यांनी सत्तारुढ आणि विरोधी पक्ष असा कोणताही भेदभाव न करता न्याय द्यायचा असतो त्यातल्या त्यात विरोधी पक्षाला पूर्ण संरक्षण देण्याचे काम देखील माननीय सभापतींचेच असते. त्यामुळे मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नसताना वास्तविक आपणच उठून शासनाला समज द्यायला पाहिजे. याच आसनावर माजी सभापती माननीय श्री. जयंतराव टिळक यांच्यासारखे पीठासीन अधिकारी सुध्दा बसत होते. माननीय सभापतींनी शासनाला देखील सांगावयाचे असते की, अशा प्रकारे खपवून घेतले जाणार नाही व हा सभापतींचा अधिकार आहे. पण अशा प्रकारे सभापतींना हाजी हाजी करण्याची वेळ येणे हे योग्य नाही. त्यामुळेच शासनातील मंत्र्यांनाही सवय लागली आहे की, काही झाले तरी सभागृहात माफ करतात म्हणून त्यांच्या वागणुकीत बदल होत नाही व हे सभागृहाच्या परंपरेच्या दृष्टीने योग्य नाही. तसेच आम्ही मागणी केली होती की सभागृहाचा वेळ मंत्री उपस्थित नसल्यामुळे किती वाया गेला याचे वाचन देखील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी झाले पाहिजे व त्यानुसार ते होत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ.शी.** : मुलींच्या वसतीगृहांना सुरक्षा व्यवस्था नसल्यामुळे निर्माण झालेले चिंताजनक प्रश्न

**मु.शी** : मुलींच्या वसतीगृहांना सुरक्षा व्यवस्था नसल्यामुळे निर्माण झालेले चिंताजनक प्रश्न याबाबत श्री. सुभाष चव्हाण,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : महोदय मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे.

"राज्यात समाजकल्याणाच्या 271 वसतीगृहे असून त्यापैकी मुलींची जवळपास 150 वसंतीगृहे आहेत. या वसतिगृहात शिक्षणासाठी पालक आपल्या मुलींना वसतिगृहात सुरक्षित राहू शकतील या विश्वासाने पाठवितात. परंतु सुरक्षेच्या अंगाने या वसतिगृहाकरिता ना नियम आहेत ना मार्गदर्शक तत्वे, या वसतिगृहात सुरक्षेच्या दृष्टीने रामभरोसेच कारभार आहे. मुलींच्या सुरक्षेची जबाबदारी सांभाळणा-या महिला गृहपाल नेहमीच गैरहजर असल्याचे आढळून आले आहे. त्याचप्रमाणे रखवालदार सुध्दा वेळेवर उपस्थित राहत नसल्याचे वेळोवेळी आढळून आले आहे. मुलींच्या सुरक्षेविषयी  कोणालाच काही एक देणे घेणे नसल्याची अतिशय चिंताजनक बाब समोर आलेली आहे. यामुळे वसतिगृहातील मुलींच्या पालकांच्या विश्वासाला तडा जात असल्याने त्यांच्यात निर्माण होत असलेले चिंतेचे व संतापाचे वातावरण, या अतिशय महत्वाच्या व गंभीर विषयावर चर्चा होण्यासाठी मी विशेष उल्लेख उपस्थित करीत आहे."

-----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : इंग्रजी शाळांची संख्या वाढल्यामुळे मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांमध्ये होत असलेली घट.

**मु. शी**.: इंग्रजी शाळांची संख्या वाढल्यामुळे मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांमध्ये होत असलेली घट याबाबत डॉ. नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी विशेष उल्ले□संबंधीची सूचना दिली आहे. त्यानी ती मांडावी.

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, गेल्या काही महिन्यांपासून मराठी शाळेच्या अस्तित्वाच्या लढ्यासाठी शाळेतील शिक्षक, विद्यार्थी आणि अनेक सामाजिक संघटना एकत्र आलेल्या आहेत. या मोहिमेमुळे मराठी शाळांबद्दल शासनाची अनास्था दिसून आलेली आहे. खास करुन इंग्रजी शाळांना विना अनुदान परवानगी मिळावयास सुरुवात झाल्यामुळे मोठया प्रमाणात लोकांनी विना अनुदान इंग्रजी शाळा काढण्यासाठी धाव घेतली. जिल्हा परिषद आणि महानगरपालिकेच्या शाळेतील कारभार व्यवस्थित नसणे, प्रयोगशाळा, क्रीडांगणे, वाचनालये, संगणक कक्ष, स्वच्छ हवा पाणी याची काहीही व्यवस्था मराठी शाळांमध्ये नसते. वीज नियामक आयोगाने शाळांना व्यापारी दराने वीज बील भरावे अशा पध्दतीचा निर्णय घेतलेला आहे. प्रा. रमेश पानसे आणि त्यांच्या सहका-यांनी शिवसेना कार्यकारी प्रमुख उध्दवजी ठाकरे यांची भेट घेतली असून मराठी शाळा वाचविण्यासाठी त्यांनी 70 हजारांच्यावर सहयांची मोहीम राज्यामध्ये सुरु केली आहे. अधिवेशन सुरु असल्यामुळे सरकारने याची दखल घ्यावी अशी त्यांची अपेक्षा आहे. शासनाची मराठी शाळांबद्दलची अनास्था शासनाच्या कारभारामध्ये सातत्याने दिसून येत आहे. त्यामुळे अधिवेशन सुरु असतांना मराठी शाळांच्या पाठीमागे राज्य शासनाने उभे रहावे यासाठी सरकारने ठोस असे निर्णय घ्यावे व त्यासाठी बैठक घ्यावी अशा प्रकारे मी विशेष उल्लेखाच्या द्वारे मागणी करीत आहे.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : चिखली नाला प्रकल्प, ता. काटोल येथील शेतक-यांना मोबदला न मिळणे

**मु. शी.**: चिखली नाला प्रकल्प, ता. काटोल येथील शेतक-यांना मोबदला न मिळणे, याबाबत डॉ. दीपक सावंत,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी विशेष उल्ले□संबंधीची सूचना दिली आहे. त्यानी ती मांडावी.

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

चिखली नाला प्रकल्प ता.काटोल, जि. नागपूर या प्रकल्पाकरिता सात गावातील 200 पेक्षा जास्त शेतक-यांच्या 650 हेक्टर बागायती जमीन शासनाने संपादित करणे, सदर जमिनीवरील 1 लाख संत्र्यांच्या झाडांचा मोबदला शेतक-यांना अद्यापि न देणे, जिल्हा न्यायालयाने रु. 48 लाख मोबदल्यापोटी जमा करण्याचा निकाल दिला असता केवळ रु. 39 लाख न्यायालयाकडे जमा करणे, वाढीव मोबदल्याची रक्कम त्वरित देण्याबाबत संबंधित शेतक-यांनी मा. मुख्यमंत्री, मा. जिल्हाधिकारी, यांचेकडे माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, 2010 च्या दरम्यान निवेदने देऊन तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देणे, या संदर्भात शेतक-यांना नुकसानभरपाई मिळण्याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे.

सभापती महोदय, चिखली नाला प्रकल्पातील बुडीत क्षेत्रात गेलेल्या शेत जमिनी, संत्रा झाडाचा वाढीव मोबदला या विषयी हा विशेष उल्लेख आहे. शासन शेतक-यांना नुकसान भरपाई देते, प्रकल्पग्रस्तांना नुकसान भरपाई देते असे बोलले जाते. परंतु माझ्या समोर अशी एक केस आहे की, गेल्या 10 वर्षापासून शेतकरी शासनाकडे न्याय मागत आहेत परंतु शेतक-यांना न्याय मिळत नाही. या केसमध्ये कै. हरिभाऊ शंकरराव हफरे यांना आत्महत्या करावी लागली आहे. सुशिक्षित शेतक-याला शासनामुळे आत्महत्या करावी लागलेली आहे असा हा भयानक प्रकार आहे. काटोल तालुक्यातील चिखली नाला प्रकल्पातील इसापूर, चिखली, मैना, खैरी, मेंडकी, येनवा, कळंबा, मौखेडी या गावातील 200 च्या वरील शेतक-यांच्या 650 एकराच्या वरील जमिनी शासनाने ताब्यात घेतल्या होत्या. हे शेतकरी याबाबत न्यायालयात न्याय मागत आहेत. न्यायालयाने त्यांना

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

वाढीव मोबदला दिला आहे. संत्रा प्रती झाड 2 हजार ते 5 हजार रुपयांपर्यंत दिला आहे. आजपर्यंत जवळ जवळ 160 शेतकरी वाढीव मोबदल्याच्या प्रतिक्षेत आहेत. महत्वाची गोष्ट अशी आहे की, कै. हरिभाऊ हफरे यांनी मोबदला मिळत नाही म्हणून कोर्टात केस केली होती.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.......

तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयावर जप्तीची नोटीस देखील सन 2009 मध्ये आणली होती. तेव्हा नागपूर खंडपीठाने सांगितले होते की,त्यांच्याकडे 48 लाख ऐवजी 39 लाख रुपये जमा करावेत. आजही 150 शेतकरी वाढीव मोबदल्याच्या प्रतिक्षेत आहेत. तेव्हा मदत व पुनर्वसन मंत्र्यांनी हस्तक्षेप करुन या 150 शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यापासून वाचवावे आणि त्यांना त्यांचा योग्य मोबदला द्यावा अशी विनंती मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून करीत आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ठाणे जिल्ह्यातील तारापूर-बोईसर परिसरातील कारखान्यांतून सोडण्यात येणारे विषारी वायू थेट मुरबे खाडीत सोडल्यामुळे त्या खाडीचे पात्र तवंगाने भरणे

**मु. शी.** : ठाणे जिल्ह्यातील तारापूर-बोईसर परिसरातील कारखान्यांतून सोडण्यात येणारे विषारी वायू थेट मुरबे खाडीत सोडल्यामुळे त्या खाडीचे पात्र तवंगाने भरणे याबाबत श्री. संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे )**: माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

तारापूर -बोईसर (जिल्हा ठाणे )परिसरातील 1400 वर असणाऱ्या रासायनिक कारखान्यांनी उत्पादन प्रक्रियेनंतर निर्माण होणारे रासायनिक विषारी द्रव व घनपदार्थ पडणाऱ्या पावसाचा फायदा घेऊन थेट ओहोळ, नाल्यामध्ये सोडल्यामुळे पाण्याचा निचरा होऊन सारवली, आगवण व मुरबे खाडीचे पात्र प्रदूषणकारी तवंगाने भरले आहे. त्यामुळे खाडीपात्रातून मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांवर उपासमारीचे संकट आलेले आहे.तारापूर-बोईसर एम.आय.डी.सी.तील कारखान्यांच्या रासायनिक टाकाऊ पदार्थांवर प्रक्रिया करणाऱ्या केंद्राची क्षमता नसताना नवनवीन रासायनिक कारखान्यांना परवानगी दिलेली आहे. तसेच कारखान्याकडून प्रदूषण विषयक नियमाचे होत असलेले उल्लंघन यावर प्रदूषण नियंत्रण मंडळाचे नियंत्रण नसल्यामुळे त्या परिसरातील पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतावर परिणाम होत आहे. तसेच मच्छिमारांची मासेमारी अभावी उपासमार होत आहे, याबाबत प्राधान्यक्रमाने उपाययोजना करण्यात यावी यासाठी सदर बाब विशेष उल्लेखाद्वारे मी मांडत आहे. तरी याबाबत योग्य ती कार्यवाही व्हावी ही विनंती.

------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शासनाने अनुकंपा तत्वावरील भरतीस घातलेली बंदी

**मु. शी.** : शासनाने अनुकंपा तत्वावरील भरतीस घातलेली बंदी याबाबत ॲड.उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : : माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड.उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

राज्यात दिनांक 5 जून 2010 रोजीच्या शासन निर्णयामध्ये वर्ग अ वर्ग ब तसेच तलाठी, ग्रामसेवक, शिक्षण सेवक, पोलीस दल, आरोग्य विभाग, अपंग यांना अनुशेष भरतीतून सूट देण्यात आली आहे. मात्र अनुकंपा तत्वावरील भरतीस एक वर्षाच्या कालावधीसाठी बंदी घातल्याने शासकीय नोकर असलेल्या तथापि, मृताच्या कुटुंबावर उपासमारीची पाळी आली आहे. अनुकंपा तत्वावरील भरतीस 5 ते 6 वर्षापासून पाठपुरावा करुन सुध्दा मृत व्यक्तीच्या वारसांना नोकरीत घेण्यात आलेले नाही, त्यामुळे त्यांच्यात तीव्र असंतोष व निराशेचे वातावरण पसरलेले आहे. दिनांक 5 जून 2010 रोजी शासनामार्फत काढण्यात आलेल्या शासन निर्णयातून अनुकंपा तत्वावरील नोकर भरती बंदच्या निर्णयातून अनुकंपाधारकांना वगळण्यात यावे म्हणून मागणी होत आहे, तेव्हा त्यांच्या मागणीचा सरकारने सहानुभूतीपूर्वक विचार करावा अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे मागणी करीत आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : परभणी जिल्ह्यातील हमाल व माथाडी कामगारांना पिवळे रेशनकार्ड देणे

**मु. शी.** : परभणी जिल्ह्यातील हमाल व माथाडी कामगारांना पिवळे रेशनकार्ड देणे याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.जयंत प्र.पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

परभणी जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती, शासकीय व निमशासकीय गोदामे तसेच खाजगी गोदामे याठिकाणी अल्प मजुरीवर हमाली काम करणाऱ्या कामगारांना त्यांच्या जवळ हमाली कामाच्या परवान्या शिवाय इतर कोणताच पुरावा नाही. त्यामुळे त्यांना रेशन कार्ड मिळत नाही. शिवाय इतर शासकीय सुविधांपासून वंचित रहावे लागते. तसेच रोजगारासाठी वेळोवेळी स्थलांतरीत व्हावे लागते. तेव्हा शासनाने या परवानाधारक हमालांना विशेष आदेश काढून पिवळे रेशनकार्ड उपलब्ध करुन देण्यासाठी मी हा विशेष उल्लेख मांडत आहे.

-----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गोंदिया जिल्ह्यात शिक्षण विभागातील अनेक पदे रिक्त असणे

**मु. शी.** : गोंदिया जिल्ह्यात शिक्षण विभागातील अनेक पदे रिक्त असणे याबाबत श्री.केशवराव मानकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री.केशवराव मानकर यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.केशवराव मानकर ( विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

गोंदिया जिल्ह्यात एकूण 294 शाळा असून त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शिक्षण विभागात अधिकारी नाहीत. कारण जिल्ह्यात शिक्षणाधिकारी (प्रा.) व शिक्षणाधिकारी (मा.) या दोन्ही कार्यालयात श्रेणी 1 व 2 ची एकूण 21 पदे मंजूर आहेत. परंतु त्यापैकी एकूण 10 पदे रिक्त आहेत. रिक्त असलेल्या पदांमध्ये शिक्षणाधिकारी (प्रा.) व शिक्षणाधिकारी (मा.) आणि उप शिक्षणाधिकारी (प्रा.) पदांचा समावेश आहे. संपूर्ण जिल्ह्यात गट शिक्षणाधिकाऱ्यांची एकूण 8 पदे मंजूर असून त्यापैकी 1 पद अद्यापी रिक्त आहे. लेखाधिकारी (शालेय पोषण आहार) पदाची 7 पदे मंजूर असून त्यापैकी 5 पदे रिक्त आहेत. शिक्षणाधिकारी (प्रा.) कार्यालयात श्रेणी 3 ची 31 पदे मंजूर असून त्यापैकी 2 पदे रिक्त आहेत. उर्वरित 29 पदांपैकी 9 व्यक्तींना प्रतिनियुक्तीवर पाठविल्यामुळे कार्यालयातील 11 पदे रिक्त आहेत. जिल्ह्यात पोषण आहार अधीक्षक व लेखाधिकाऱ्याचे पद रिक्त असल्याने जिल्ह्यातील शाळांमध्ये आर्थिक अडचण निर्माण झाली आहे. शासनाचे गोंदिया जिल्ह्यातील शिक्षण विभागातील रिक्त पदे भरण्याकडे अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे. त्यामुळे 294 शाळांवर नियंत्रण नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण आहारात भ्रष्टाचार होण्याची शक्यता लक्षात घेता गोंदिया जिल्ह्यातील शिक्षण विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याची नितांत आवश्यकता आहे, अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे मागणी करीत आहे. -----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ D/ ST/ प्रथम श्री.अजित शिगम 16.35

**पृ.शी./मु.शी.** पाईट ऑफ इन्फर्मेशन बाबत

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा पॉईट ऑफ इन्फर्मेशन आहे. कायमविना अनुदानित शाळामधील कायम हा शब्द काढल्यानंतरही त्यांचे मूल्यांकन होत नसल्यामुळे व त्या शाळांना अनुदान मिळत नसल्यामुळे त्यांना अनुदान मिळावे या संदर्भात आज हजारो शिक्षकांनी विधिमंडळावर मोर्चा काढला असून मी आताच त्यांना भेट देऊन आलो आहे . आज 5.00 वाजेपर्यंत जर आमच्या गंभीर विषयाकडे शासनाने लक्ष दिले नाही तर 5.00 वाजता विष प्राशन करुन सामूहिक आत्महत्या करु अशा प्रकारे त्यांनी गंभीर स्वरुपाची धमकी दिली आहे तेव्हा अशा प्रकारची माहिती शासनाकडे आली आहे काय आणि आत्महत्येपासून त्यांना रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केलेली आहे ?

**तालिका सभापती** : संबधित खात्याच्या माननीय मंत्री महोदयांनी यासंबंधीची नोंद घ्यावी.

डॉ.विजयकुमार गावित : सबंधित विभागाच्या मंत्री महोदयांना याबाबतीत कळविण्यात येईल.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, कायम विना अनुदानित कृती समितीतर्फे कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक संपूर्ण राज्यभर उपसंचालकाच्या कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसलेले आहेत. अमरावती उप संचालकाच्या कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसलेल्या शिक्षकाना मी भेटावयास गेलो होतो त्यावेळी मला असे सांगण्यात आले की, चार ते पाच शिक्षकांना दवाखान्यात दाखल करण्यात आलेले आहे. कायम हा शब्द वगळण्यात यावा या मागणीसाठी त्यांचे उपोषण सुरु आहे.त्याबाबतीत दखल घेण्याबाबत शासनाला सूचना द्याव्यात .

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते आणि श्री वसंतराव खोटरे यांनी पॉईट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून जो मुद्दा उपस्थित केला आहे तो मुद्दा अत्यंत गंभीर स्वरुपाचा आहे. काही शिक्षक उपोषणाला बसले असून पाच वाजेपर्यंत जर सरकारने त्यांच्या बरोबर चर्चा केली नाही व त्यांच्या मागण्या मान्य झाल्या नाही तर ते विष प्राशन करुन आत्महत्या करणार आहेत, ही अतिशय गंभीर बाब आहे . कायम विना अनुदाना मधील कायम हा शब्द काढून टाकण्यात यावा अशी या शिक्षकांची मागणी असून शासनातील एखाद्या मंत्र्यांनी जाऊन त्यांच्याशी चर्चा करावी. याबाबत आपण शासनाला निदेश द्यावेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी सांगू इच्छितो की, या विषयाची मला माहिती आहे. परंतु जर पाच वाजता माननीय मंत्री महोदय या शिक्षकांना जाऊन भेटले नाहीत तर ते विष प्राशन करणार आहेत, ही बाब आपल्याला कितपत संयुक्तिक वाटते?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सबंधित विभागाच्या माननीय मंत्री महोदयांना या बाबतीत कळविण्यात येईल असे सन्माननीय मंत्री डॉ.विजयकुमार गावित यांनी सागितले आहे.या शिक्षकांना बोलाविण्याची व्यवस्था आपण करु आणि संबंधित विभागाचे मंत्री त्यांच्याशी जरुर चर्चा करतील परंतु विष प्राशन करणे हे कायदेशीरदृष्टया योग्य नाही. तरी देखील त्यांच्या भावनेची दखल निश्चितपणे घेण्यात येऊन त्यांच्याशी चर्चा केली जाईल.

---------------

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : बोनस प्रदान (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

L. C. BILL NO. XI OF 2010 ( A BILL FURTHER TO AMEND THE PAYMENT OF BONUS ACT, 1965, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA ) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO THE JOINT SELECT COMMITTEE

श्री. राजेंद्र गावित (कामगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि. प. वि. क्रमांक 11 बोनस प्रदान अधिनियम, 1965, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**उप सभापती** : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस व सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांचा प्रस्ताव आहे. त्यांच्यापैकी कोणीही एकाने तो मांडावा.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही.)

**उप सभापती** : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 4 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. राजेंद्र गावित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.प.वि. क्रमांक 11 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : सन 2010 चे वि.प.वि. क्रमांक 11 संमत झाले आहे.

----

09-12-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3H 2

DGS/ D/ ST/ 16:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: वि.प.वि. क्र. 10 बाबत

**उप सभापती** : सन 2010 चे वि.प.वि. क्रमांक 10 - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक मंत्रिमहोदयांनी मांडावे.

(माननीय मंत्री अनुपस्थित)

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 74 आपण चर्चेकरिता घ्यावे अशी मी आपणास विनंती करतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, पहिल्या विधेयकावरील चर्चेचा आमचा हक्क बाजूला ठेऊन ते विधेयक संमत करण्यासाठी आम्ही शासनाला मदत केली. आता संबंधित मंत्री महोदयांना सभागृहामध्ये हजर ठेवणे हे कुणाचे काम आहे?

**उप सभापती** : आमचे आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हे काम आपले नाही. आपण ही जबाबदारी अंगावर कशासाठी घेत आहात? आपण सरकारच्या बाजूने कधीच बोलू नका, नाहीतर आपण फसाल. सरकारच्या बाजूला गेलात तर सभापती पदाची अप्रतिष्ठा होईल.

**उप सभापती** : मंत्रिमहोदय, तुमच्यामुळे मला हे ऐकून घ्यावे लागत आहे.

श्री. दिवाकर रावते : दहा ते पंधरा मिनिटे झाली आहेत, या कालावधीत माननीय राज्यमंत्र्यांना तरी सभागृहामध्ये पाठवावयास हवे होते.

**उप सभापती** : यापुढे मी सरकारच्या बाजूने बोलत आहे असे ऐकून घेणार नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, संबंधित मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नसल्यामुळे वि.प.वि. क्रमांक 10 आज चर्चेला घेण्यात येऊ नये.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : माननीय मंत्रिमहोदयांची सभागृहात उपस्थित राहण्याची जबाबदारी होती. आता बिल पुकारल्यानंतर संबंधित माननीय मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित नाहीत त्यामुळे हे विधेयक आज घेण्यात येणार नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

**पृ. शी.** : नगरपालिका आणि महानगरपालिका आणि नगरपरिषदा (तिसरी सुधारणा) विधेयक.

L. A. BILL NO. LXXIV OF 2010 ( A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965. ) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO THE JOINT SELECT COMMITTEE

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि. स. वि. क्रमांक 74 -मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम,1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. भास्कर जाधव : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि. स. वि. क्रमांक 74 -मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम,1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**उप सभापती** : हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी दिलेला आहे. त्यांनी तो मांडावा.

( प्रस्ताव मांडण्यात आला नाही )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मघाशी मी एक औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. आमच्या महापालिकेची 141 वगैरे जी कलमे आहेत त्याची अंमलबजावणी सध्या या विधेयकाचे नियम तयार होईपर्यंत तशीच ठेवावी अशा प्रकारचे विधेयक या ठिकाणी आणलेले आहे. हा कायदा दिनांक 1.4.2010 पासून अस्तित्वात आलेला आहे. मुंबई महानगरपालिकेने तो प्रस्ताव स्वीकारला. त्यांना आपण पर्याय दिला होता की, जुनी पध्दत ठेवावयाची असेल तर ठेवावी किंवा नवीन प्रस्ताव स्वीकारावयाचा असेल तर स्वीकारावा. त्यांनी नवीन प्रस्ताव स्वीकारला. याचा अर्थ मुंबई शहरामध्ये आता मालमत्ता कर हा मालमत्तेच्या किमतीवर आधारित होणार आहे. पण आता अधिकृतपणे माझ्या निदर्शनास आले आहे. जाता जाता काही करावयाचे म्हणून ज्या नवीन इस्टॅब्लिशमेंट येत आहेत त्यांना त्यांच्या भाड्याच्या कराराप्रमाणे नोटिसेस काढावयाच्या आणि त्यांचे करपात्र मूल्य अवाच्यासवा दाखवावयाचे आणि त्या करपात्र मूल्याप्रमाणे तुम्हाला आता 10 लाख रुपये, 15 लाख रुपये भरावे लागतील आणि मग ते कमी करावयाचे त्यासाठी जुनी जी पध्दत आहे ती वापरावयाची. माझी आपल्याला विनंती आहे की, हा कायदा अस्तित्वात आल्यामुळे यासंदर्भातील सगळ्या कार्यवाहीवर शासनाने अधिकृतरित्या स्थगिती द्यावी. कारण हा कायदा सरकारने केला आणि महानगरपालिकेने तो स्वीकारलेला आहे पण आता शासनाच्या माध्यमातून त्याची अंमलबजावणी तात्पुरती पुढे ढकलण्याकरिता आणि आहे ती पध्दत पुढे चालू ठेवण्याकरिता हा कायदा आणलेला आहे, तेव्हा पुढे ज्यावेळी याची कार्यवाही सुरु होईल तेव्हा जे काही मूल्यांकन होईल ते 1.4.2010 पासून धरण्यात यावे आणि चालू असलेल्या कार्यवाहीला आपण स्थगिती द्यावी अशा प्रकारची विंनती करण्याचा प्रयत्न मी सकाळी केला. पण या ठिकाणी आता हे विधेयकच आल्यामुळे शासनाने जर योग्य ते निर्देश संबंधित महानगरपालिकेला दिले तर जाता जाता काही तरी करावयाचे हे जे काही चालले आहे ते थांबेल. एवढी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, हे जे बिल आलेले आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, गेल्या वर्षी याच सभागृहामध्ये आपण कायदा पारित केला होता. यापूर्वी केवळ रेटेबल व्हॅल्यूच्या आधारावर प्रॉपर्टी टॅक्स गोळा केला जात होता. परंतु तशा प्रकारे न होता ऐच्छिक पध्दतीने रेटेबल व्हॅल्यूच्या आधारावर आणि त्याच बरोबर कॅपिटल व्हॅल्यूच्या आधारावर सुध्दा आपल्याला प्रॉपर्टी टॅक्स आकारता येईल अशा प्रकारचे उत्तम प्रकारचे धोरण आणि मी या ठिकाणी मघाशी सांगितल्याप्रमाणे घरबसल्या त्याला माझ्या घराकरिता किती टॅक्स लागणार आहे याबाबत जे सूत्र दिलेले आहे त्यामध्ये त्या घराची वयोमर्यादा, त्या घराचे क्षेत्रफळ, त्या घराचा दर्जा या सगळ्यांचे एकत्रितपणे सूत्र तयार करुन कोणालाही आपल्या घराचा किती प्रॉपर्टी टॅक्स येऊ शकतो याचा हिशेब करता येईल अशा प्रकारचे हे उत्तम बिल विधिमंडळाने मंजूर केले.

सभापती महोदय, हा कायदा 1 एप्रिल, 2010 पासून लागू झाला. या कायद्यामध्ये अशी तरतूद आहे की, 20 फेब्रुवारीपर्यंत या प्रॉपर्टीची सगळी माहिती संबंधित अधिकाऱ्याकडे यावयास पाहिजे होती परंतु ती माहिती येऊ शकली नाही. कारण आपला कायदाच मुळात 1 एप्रिलपासून लागू झाला. आता सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी जे सांगितले ती वस्तुस्थिती आहे. त्याचाच आधार घेऊन काही लोकांना त्रास देण्याचे काम सुरु झालेले आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/ पूर्वी श्री.बरवड 16:45

श्री.भास्कर जाधव....

तो त्रास पुढील काळामध्ये राहू नये याकरिता हे बिल आणले आहे, यामध्ये 1 वर्षाची सूट देण्यात आलेली आहे. गेल्या वर्षी लोकल बॉडी टॅक्स लागू केला होता. त्यावेळी ते बिल राज्यातील मिरा-भाईंदर, जळगांव व नांदेड-वाघाळा या तीन महानगरपालिकांसाठी आणले होते. तेथे सुध्दा 20 फेब्रुवारीपर्यंत आयुक्तांना दर ठरविण्याचे अधिकार दिले होते. परंतु हा कायदा 1 एप्रिलपासून लागू झाल्यामुळे तेथेही अडचण झाली. ही अडचण दूर करण्यासाठी हा कायदा आणला आहे. या दोन्ही ठिकाणी भविष्यातील निर्माण होणा-या अडचणी कायमच्या दूर होतील, या उद्देशाने हा कायदा आणला आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांची तळमळ, त्यांचा अभ्यास हा सर्वांना ज्ञात आहे, त्यामध्ये सामाजिक हित कायम दडलेले असते. त्यांच्या विचारांची दखल मघाशी घेण्यात आली आणि त्यावर उपाययोजना निश्चित करण्यात येतील. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री उपस्थित होते. त्यासंबंधी शासन निर्णय घेत आहे. म्हणून या विधेयकावर अधिक चर्चा न करता हे विधेयक एकमताने मंजूर करावे अशी मी सभागृहाला विनंती करतो.

**उप सभापती** :आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 20 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि.क्र.74 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 74 संमत झाले आहे.

-----

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

**पृ.शी.**: आरोग्य विज्ञान विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक

L. C. BILL NO. X OF 2010 ( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES ACT, 1998 ) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO THE JOINT SELECT COMMITTEE.

डॉ.विजयकुमार गावित ( वैद्यकीय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 10 महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, 1998 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, 1998 अंमलात आला. राज्यात महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 आहे, त्यामध्ये विद्यापरिषद, व्यवस्थापन परिषद व इतर परिषदा आहेत. त्यासाठी काही निकष ठरविले होते, क्वालिफिकेशन ठरविले होते. त्यानुसार त्यांच्या नेमणुका केल्या जातात.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KGS/ ST/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 16:55

डॉ. विजयकुमार गावित...

हे आरोग्य विज्ञान विद्यापीठ स्थापन झाले त्यावेळी कोणत्याही प्रकारच्या अटी नमूद केलेल्या नव्हत्या. वेगवेगळया परिषदा आहेत त्या परिषदावर नेमणूका करीत असताना काय पात्रता असली पाहिजे यासंबंधी कुलगुरु बरोबर चर्चा करुन त्या संदर्भातील नियमावली बनविणार आहोत आणि पात्रतेच्या अटी समाविष्ट करणार आहोत. त्यासाठी हे विधेयक आणलेले आहे. आधी पात्रतेच्या अटी नव्हत्या कोणाचीही नेमणूक परिषदांवर करण्यात येत होती.

लेखा परीक्षण आणि लेखा अहवाल शासनाकडे पाठविणे आणि ते विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहामसोर ठेवणे यासंबंधीची तरतूद या विधेयकामध्ये करण्यात येत आहे.हे विधेयक सभागृहाने विचारात घ्यावे अशी मी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**उप सभापती** : आता विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्य श्रीमती शोभा फडणवीस यांनी प्रस्ताव दिलेला आहे. त्यांनी तो मांडावा.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही.)

यानंतर विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी प्रस्ताव दिलेला आहे. त्यांनी तो मांडावा.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही.)

आता सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी आपले भाषण सुरु करावे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रमेश शेंडगे)**

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ कायद्यामध्ये सुधारणा करण्यासाठी जे विधेयक आणलेले आहे त्यावर मी माझे विचार थोडक्यात मांडणार आहे.

सभापती महोदय, आरोग्य विज्ञान विद्यापीठा संबंधी आमच्याकडे माहिती आहे. हा ख-या अर्थाने अतिशय चांगला उपक्रम आहे. विशेषत: आरोग्य विषयक जी विविध महाविद्यालये, विविध विद्यापीठे विविध अभ्यासक्रम चालवितात त्या सर्व अभ्यासक्रमामध्ये सुसूत्रीकरण करणे आणि संहिताकरण करणे आवश्यक आहे. एका विद्यापीठामधून दुस-या विद्यापीठामध्ये जाताना, एका कोर्समधून दुस-या कोर्समध्ये जाताना ज्याला इण्टर डिसिप्लिनरी किंवा आंतरशाखीय म्हणता येईल अशा प्रकारच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यासाठी आणि अशा प्रकारच्या अभ्यासासाठी या आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा उपयोग होतो. या विधेयकामध्ये केलेली तरतूद योग्य आहे. अनेक जण एम.डी. झाल्यानंतर पुन्हा पोस्टग्रॅज्युएशन करतात, त्यानंतर डॉक्टरेट करतात. अशा वेळी नियमात न बसल्यामुळे त्यांचे रजिस्ट्रेशन लॅप्स होऊ नये यासाठी ही तरतूद उपयुक्त आहे. मला असे सुचवावयाचे आहे की वार्षिक लेखे आणि अहवाल हे दोन्ही सभागृहासमोर ठेवण्यासंबंधी तरतूद केलेली आहे. ही चांगली गोष्ट आहे. अशा प्रकारचे अनेक अहवाल आमच्या समोर येत असतात. अहवाल ठेवण्याच्या संदर्भात आपण जो पर्यन्त मूलभूत स्वरुपात बदल करत नाही तोपर्यन्त केवळ उपचार म्हणून हे अहवाल सभागृहासमोर ठेवले जातील. या सभागृहासमोर जे अहवाल ठेवले जातात त्यापैकी एकाही अहवालाच्या संदर्भात या सभागृहामध्ये एका शब्दाने देखील चर्चा होत नाही. आरोग्य विज्ञान विद्यापीठावर सदस्य पाठविले जातात. सदस्य त्यांचे म्हणणे सिनेटमध्ये मांडतात. अनेक वेळा सिनेट आणि राज्य शाखा यांच्यामध्ये वादविवादाचे प्रश्न असतात आणि मग गटबाजीचा भाग झाल्यासारखी परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे हे अहवाल सभागृहासमोर ठेवले जातील एवढे म्हणणे पुरेसे नाही.

या आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या स्वत:च्या ब-याच तक्रारी आहेत. मी अधिका-यांचे नाव घेणार नाही. परंतु आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या संदर्भातील सोईसुविधांच्या बाबतीत त्यांच्याशी चर्चा होते. मी मंत्री महोदयांना असे सूचवीन की, या आरोग्य विज्ञान विद्यापीठामध्ये आर्थिक

..3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ.नीलम गो-हे...

तरतुदी आणि व्यवस्थापनाच्या संदर्भात मोठ्या प्रमाणात अयोग्य गोष्टी घडलेल्या आहेत. कर्मचारी वर्ग वेगवेगळया ठिकाणाहून फिरुन आलेला आहे. आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या बाबतीत आम्ही आमची भूमिका मांडलेली आहे. या ज्या नोंदी आहेत त्या योग्य आहेत असे वाटत असले तरी ज्यांना विद्यापीठाच्या कामकाजामध्ये विशेष रस आहे त्यांच्या बरोबर चर्चा करुन त्यामध्ये सुधारणाही केल्या पाहिजे एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

----

...नंतर श्री. भोगले...

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2010 चे वि.प.वि.क्रमांक-10 महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, 1998 यात आणखी सुधारणा करण्याकरिता मांडलेल्या विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी या विधेयकावर आपले विचार प्रकट केले आहेत. या बिलाबाबत माझ्या काही रिझर्व्हेशन्स आहेत. माननीय मंत्रीमहोदय त्यावर प्रकाश टाकतील अशी मी अपेक्षा करतो. माननीय मंत्रीमहोदय आणि मी या आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या सिनेटचे सदस्य आहोत. मंत्रीमहोदय प्रो-व्हीसी आहेत तर मी सिनेट सदस्य आहे. आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा पसारा आता वाढत चालला आहे. उद्देश व कारणे यामध्ये नमूद केले आहे की, "आरोग्य विज्ञानाशी संबंधित असलेले सर्व अभ्यासक्रम, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या अधिकारितेत आणण्यात आले होते. तथापि, उक्त अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्व, उक्त अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही विद्यापीठामध्ये यात यापुढे ज्याचा निर्देश 'अनुसूचित विद्यापीठ' असा करण्यात आला आहे."

सभापती महोदय, अनेक अभ्यासक्रम विद्यापीठाच्या अधिकारितेत आणलेले असले तरी अजूनही फार मोठया प्रमाणात अभ्यासक्रम यामध्ये आणण्याची गरज आहे असे माझे स्पष्ट मत आहे. आज अनेक कोर्सेस नव्याने सुरु होत आहेत. नव्याने येत असलेल्या आजाराविषयीचे अभ्यासक्रम, नव्याने येत असलेल्या मेडिकल टेक्नॉलॉजीविषयीचे अभ्यासक्रम, पॅरा मेडिकल सायन्सबद्दलचे अभ्यासक्रम अशा अनेक गोष्टी आहेत. दक्षिण हिंदुस्थानामध्ये आरोग्य क्षेत्रात भरपूर प्रगती झालेली आहे. विविध गोष्टी आरोग्य क्षेत्रात नव्याने होऊ घातल्या आहेत. अनेक विदेशी विद्यापीठांबरोबर सामंजस्य करार होत आहेत. तसे या राज्यामध्ये झाल्याचे दिसून येत नाही. साधे उदाहरण द्यावयाचे झाले तर साथीच्या रोगावर असलेल्या अभ्यासक्रमाचे देता येईल. या अभ्यासक्रमामध्ये जे ग्रॅज्युएट आहेत, पोस्ट ग्रॅज्युएट आहेत अशी हाताच्या बोटावर मोजण्याइतकी माणसे मुंबईमध्ये आहेत. नव्याने काही करणार असाल तर अशी दालने विद्यार्थ्यांना उघडून देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मायक्रोबायॉलॉजी, बॅक्टॉलॉजी, पॅथॉलॉजी या शाखांमध्ये नवीन व्हायरस तयार होत आहेत. व्हायरस म्युटेट होत आहेत. नवीन रुप धारण करीत आहेत. नवीन लक्षणांसह आजार समोर येत आहेत. अशा आजारांचे निदान 'अज्ञात ताप' असे केले जाते. 2010 हे वर्ष सुरु आहे. भारत महासत्तेकडे वाटचाल करीत आहे. अमेरिका, ब्रिटन या देशांबरोबर स्पर्धा करण्याचा





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ D/ KGS/ ST/ 17:00

डॉ.दीपक सावंत.............

भारत देशाचा मनसुबा आहे. परवा माझ्या वाचनात आले की, कृत्रिम किडनीबाबत संशोधन झालेले आहे. असे संशोधन होणार असेल तर आपल्याकडे अशा संशोधनाची दालने उघडली गेली पाहिजेत. दुर्दैवाने सांगावेसे वाटते की, मेडिकल एज्युकेशन अँड मायनर रिसर्च हा विभाग या राज्यामध्ये अस्तित्वात आहे. हे संशोधन कोणी करायचे? या विभागातील संशोधनासाठी इमारत अस्तित्वात आहे, संचालक आहेत, कर्मचारीवर्ग उपलब्ध आहे. परंतु कोणत्याही प्रकारचे संशोधन होत नाही. मलेरियाचे डास मारण्यासाठी औषधे उपलब्ध आहेत, परंतु ती परिणामकारक ठरत नाहीत. फेल ठरत आहेत. डासांच्या अळ्या मारण्यासाठी पाण्यामध्ये औषधांची फवारणी केली जाते. मॅलेथिऑन ऑईल त्यासाठी वापरण्यात येते. परंतु तेही परिणामकारक ठरत नसल्याचे सिध्द झाले आहे. त्यामुळे आज खऱ्या अर्थाने संशोधन होण्याची गरज आहे. असे संशोधन आरोग्य विज्ञान विद्यापीठ का करीत नाही?

सभापती महोदय, आज सकाळी अल्पकालीन चर्चेच्या माध्यमातून कुपोषणाच्या समस्येवर प्रदीर्घ चर्चा झाली. या विषयाचा आवाका फार विस्तृत आहे. आरोग्य विज्ञान विद्यापीठाने आपली टीम पाठवून कुपोषणाचे मूळ काय आहे याचा अभ्यास करण्याचे योजिले आहे का? सिनेटच्या बैठकीमध्ये आम्ही वेगवेगळया विषयावर आपल्याशी वाद घालत असतो. आरोग्य विज्ञान विद्यापीठ फक्त खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांना मान्यता देण्यासाठीच आहे का? खाजगी वैद्यकीय महाविद्यालये तुमचे ऐकत नाहीत. व्ही.सी.नी पाठविलेले पत्र मी आपल्या रेकॉर्डसाठी देतो. व्ही.सी. सध्या प्रभारी आहेत. दुर्दैवाची गोष्ट अशी की, गेले सहा महिने प्रभारी व्ही.सी.आहेत. तत्पूर्वी देखील सहा महिने प्रभारी व्ही.सी.होते. अशा पध्दतीने आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा कारभार सुरु आहे. आता पूर्णवेळ रजिस्ट्रारचे पद भरले गेले आहे.

नंतर 3एम.1...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ..........

ते प्रभारी नाहीत पण बाकीचर आणखी तीन पदे प्रभारीच आहेत, हे मंत्री महोदयांनी कबूल करावे. अशा प्रकारे विद्यापीठात होत असेल तर याकडे लक्ष का दिले जात नाही हा माझा प्रश्न आहे. दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे उक्त अधिनियमाच्या कलम 94 मध्ये हे अंतर्भूत करणार असे म्हटले आहे पण या कलम 94 चा आवाका किती मोठा आहे हे मात्र आपण सांगितले नाही. त्यातून आपल्याला काय काय अपेक्षित आहे याचा खुलासा झाला पाहिजे. तसेच या कलम 94 मध्ये जी तरतूद आहे ती प्रारंभीच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या अनुसूचित विद्यापीठामध्ये नाव नोंदविलेल्या आणि जे अजूनपर्यंत अभ्यासक्रम पूर्ण करु शकले नाहीत अशा सर्व विद्यार्थ्यांना, उक्त अधिनियमाच्या कलम 3 अन्वये स्थापन केलेल्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे विद्यार्थी असल्याचे मानण्यात येईल, असेही उद्देश व कारणे मध्ये सांगितलेले आहे. म्हणजे आपल्याला काय करावयाचे आहे हेच समजत नाही. पूर्वी मुंबई विद्यापीठ होते. आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा कायदा झाला हे चांगले झाले, त्याबद्दल माझी कुठलीच तक्रार नाही परंतु मला दुर्दैवाने म्हणावेसे वाटते की, मी मुंबई विद्यापीठाचा विद्यार्थी आहे. मग तो एमबीबीएस असो अथवा बी.ए. अथवा बी.कॉम. चा विद्यार्थी असो सर्वांना मुंबई विद्यापीठाचा अभिमान आहे. आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या बाबतीत मात्र असे करण्याची का वेळ आली याची कारणमिमांसा मात्र स्पष्ट होणे आवश्यक आहे.

महोदय, दुसरा एक मुद्दा असा आहे की, आपल्याकडे प्रभारी कुलगुरु आहेत, कारण आपली कुलगुरु निवडीची पध्दत व त्यातील अटी व शर्ती कडक आहेत, त्यात लवचिकता आणणे आवश्यक आहे, तरच आपल्याला कुलगुरु मिळू शकतील असे मला वाटते. मी असे म्हणत नाही की पार नियम तोडून आणि मोडून आपण ही निवड करावी पण थोडीसी लवचिकता त्यात आणण्याची गरज आहे. आपल्या माध्यमातून मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, असे अनेक निर्णय आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे प्रलंबित आहेत व त्याचे कारण म्हणजे अनेक अधिकारी प्रभारीच आहेत. मी एका कॉलेजच्या संदर्भातील पत्र मंत्री महोदयांकडे पाठविणार आहे. त्या कॉलेजने स्पष्ट म्हटले आहे की, आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या व्ही.सी. नी जरी सांगितले असले तरी देखील आम्हाला ते मान्य नाही. खाजगी विद्यापीठाच्या एका केसच्या बाबतीतील हिअरिंग व्ही.सी. नी घेतले आणि सांगितले की, आपल्या कॉलेजला हे लागू नाही परंतु ते कॉलेज आपल्या आरोग्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....2...

डॉ. दीपक सावंत......

विज्ञान विद्यापीठाचे म्हणणे ऐकण्यास तयार नाही, आपला निर्णय त्यांना मान्य नाही. आपण म्हणता की हे विद्यापीठ सार्वभौम आहे. अशा सार्वभौम विद्यापीठाला आणि शासनाला एखादे खाजगी कॉलेज अशा प्रकारे आव्हान देत असेल तर ते योग्य नाही.

महोदय, माझा तिसरा मुद्दा म्हणजे उक्त अधिनियमामध्ये विद्यापीठाच्या अशा कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य होण्याकरिता कोणत्याही विषयाच्या पात्रतेच्या शर्ती निर्धारित केलेल्या नाहीत याचा नेमका अर्थ काय आहे याचेही स्पष्टीकरण होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर नवीन कलम 22 (ए) यामध्ये समाविष्ट करण्यात यावे यासाठी उक्त अधिनियमात सुधारणा करण्याची गरज आहे. हे कलम 22 (ए) नेमके काय आहे हे समजून सांगणे गरजेचे आहे. आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा वार्षिक अहवाल केवळ आमच्या माहितीसाठी सभागृहासमोर ठेवणे उपयोगाचे नाही तर या सभागृहातील सदस्यांनी देखील सूचना केल्यास त्यांनाही मान मिळाला पाहिजे. तसेच कक्षेत बसत असेल तर त्याचे पालन सुध्दा करायला सांगणे आवश्यक आहे. कारण हे विद्यापीठ स्वायत्तता उपभोगते आणि लोकप्रतिनिधींना किंमत देत नाही, अशा प्रकारे अनेक अनुभव आपल्याला देखील आले असतील. विधेयक चांगले असले तरी या अनुषंगाने सर्वच गोष्टी स्पष्ट होणे आवश्यक आहे अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजय कुमार गावित (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : महोदय, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, 1998 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी हे विधेयक सभागृहाच्या मान्यतेसाठी आणले असून त्यावर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे तसेच डॉ. दीपक सावंत यांनी अनेक मौलिक व मार्गदर्शनपर सूचना करण्याचा प्रयत्न केला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित....

त्याबद्दल त्यांना मनापासून धन्यवाद देतो. मी सुरुवातीलाच सांगितले आहे की, 1998 मध्ये विद्यापीठाचा कायदा पास झाला होता. त्यावेळेला त्यामध्ये काही त्रुटी राहून गेल्या होत्या. इतर विद्यापीठासारखेच काही नियम बनवावयाचे व नियम बनवून व्यवस्थित पध्दतीने नेमणुका होतील व नेमणुका झाल्यानंतर त्याचा दर्जा वाढण्यास मदत होईल. 1998 मध्ये अधिनियम केला त्यावेळेस त्यामध्ये इतर विद्यापीठाप्रमाणे ज्या काही वेगवेगळया परिषदा आहेत त्या परिषदामध्ये नेमणुका करीत असतांना पात्रतेचे निकष टाकले नव्हते. मग त्यात अॅकॅडेमिक कौन्सील असेल, इकॉनॉमी कौन्सील असेल, बोर्ड ऑफ स्टडीज असेल त्यात पात्रतेसंबंधीचे निकष अंतर्भूत केले नव्हते. बोर्ड ऑफ स्टडीजमध्ये पात्रता, क्वालीफिकेशन्स व्यवस्थित दिले तर त्यातून चांगल्या प्रकारचा मार्ग निघू शकेल. तसेच इतर परिषदा आहेत त्यांचेही चांगल्या प्रकारचे मार्गदर्शन मिळेल. तज्ज्ञ मंडळी आल्यानंतर विद्यापीठाचा दर्जा वाढण्यास चांगली मदत होईल. त्यामुळेच आपण बदल सूचवितो आहोत. या बदलाला आपण मान्यता द्यावी अशा प्रकारची आपल्याला विनंती करतो.

महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी यामध्ये आणखी अभ्यासक्रम आणण्याची गरज आहे, असे सांगितले. जे काही मेडीकल कोर्सेस आहेत ते सर्व मेडीकेल कोर्सेस एका बॅनरखाली आणावयाचे व त्यानंतर त्याच्या माध्यमातून पुढील काम करावयाचे, या हेतूने आपण विद्यापीठ सुरु केलेले आहे. आपण सांगितल्याप्रमाणे अभ्यासक्रमात बायो इंजिनिअरींगचा समावेश करण्याची गरज आहे. तसेच त्यांनी इतर देशातील विद्यापीठांबरोबर कोलॅबोरेशन करण्याचे विचार व्यक्त केलेले आहेत. इन्फेक्शन्स डिसीजेससारख्या रोगांबद्दल किंवा साथीच्या आजारांबद्दल अमेरिकेतील फ्लोरिडा युनिव्हर्सिटी बरोबर कोलॅबोरेशन केलेले आहे. आपण आता पॅरामेडीकल कोर्सेस सुध्दा सुरु केलेले आहेत. यामध्ये काही बाबी राहिल्या असतील तर त्या आपण निश्चितपणे सुचवू शकता. आपण आरोग्य विज्ञान विद्यापीठ सुरु करतो तेव्हा त्यात केवळ देशातीलच नाही तर जगामध्ये जे जे कोर्सेस आहेत ते ते कोर्सेस या ठिकाणी सुरु करण्याची गरज आहे. पॅरामेडीकल कोर्सेस बरोबर इतर डिसीजेसच्या बाबतीत संशोधन करणारे कोर्सेस आहेत, ते कोर्सेस नसल्यामुळे आपल्याला पॅरामेडीकलच्या टेक्नीशियन्सची आज मोठया प्रमाणात गरज आहे आणि असे टेक्नीशियन्स मिळत नसल्यामुळेच आपण हे सुरु

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित ..........
केलेले आहे. एपीडोमोलॉजी सुरु करण्याचे आपण ठरवले आहे व त्यासाठी आपण मंजुरीही दिलेली आहे.

या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी रिसर्च सेलचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. सुरुवातीला मी सुध्दा सन्माननीय सदस्यांच्या मताशी सहमत होतो परंतु आता यासंदर्भातील माहिती घेतली असल्यामुळे त्यांच्या मताशी सहमत होण्याचे कारण नाही. एक गोष्ट खरी आहे की, रिसर्च जवळ जवळ थांबलेले होते. पोस्ट ग्रॅज्यूएट विद्यार्थ्यांनी थिसीस करावयाचे एवढेच या ठिकाणी होत असे परंतु आम्ही आता ठरवले आहे की, वैद्यकीय महाविद्यालयाने त्यांच्या परिसरामधील जे काही प्रश्न असतील किंवा जे काही आजार असतील त्यासंदर्भात रिसर्च करावे. नंदूरबार किंवा गडचिरोली येथे कुपोषणाचे प्रश्न आहेत, थॉयरॉईड सारखे प्रश्न आहेत, सिकलसेल सारखे आजार आहेत, त्या आजारावर त्या त्या वैद्यकीय महाविद्यालयाने रिसर्च करावयाचे आहेत. आपल्या परिसरात जे काही प्रश्न आहेत, जे आजार आहेत ते सोडविण्यासाठी त्यांनी शासनाला मार्गदर्शन करण्यासाठी प्रत्येक कॉलेजला विषय ठरवून देत आहोत. त्यांनी कमीत कमी एक तरी रिसर्च केला पाहिजे. रिसर्च व्हावे यासाठी निधी सुध्दा उपलब्ध करुन दिला जात आहे. अशा प्रकारे विद्यापीठात रिसर्च सेल कार्यान्वित असून त्या माध्यमातून आपण त्यांना निधी सुध्दा देणार असल्यामुळे त्याचा निश्चितपणे फायदा होणार आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित....

याठिकाणी कलम 94 बाबत उल्लेख करण्यात आला. ही गोष्ट खरी आहे की, काही विद्यापीठे नावाजलेली आहेत. त्यांच्या नावाचे प्रमाणपत्र मिळाल्यास विद्यार्थ्यांना धन्यता वाटते. काही विद्यार्थी दहा वर्षे झाली तरी परीक्षेमध्ये पास होत नाहीत. अशा दोन-चार विद्यार्थ्यांसाठी पुन्हा परीक्षा घेणे संयुक्तिक होत नाही. दहा वर्षात पास न झालेल्या विद्यार्थ्यांना आरोग्य विज्ञान विद्यापीठात रजिस्टर्ड करुन त्यांची परीक्षा घेण्यात येईल. असे केले तर योग्य होईल...

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, विद्यार्थ्यांनी किती प्रयत्नामध्ये पास झाले पाहिजे याबाबतची एक डेड लाईन घातली पाहिजे. कारण लोकांच्या आरोग्याचा आणि जीवाचा प्रश्न आहे. एखादा 10 वर्षानी एम.एस. परीक्षा पास झाला तर त्याच्याकडे आपण तपासणीसाठी जाणार का ? तेव्हा आपण माझ्या सूचनेचा विचार करावा अशी विनंती आहे.

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेली सूचना चांगली आहे. विद्यार्थ्यांनी किती प्रयत्नामध्ये उत्तीर्ण व्हावे याबाबतचा निर्णय मेडिकल कॉन्सिल ठरवित असते. तेव्हा याबाबत त्यांच्याकडे हा मुद्दा उपस्थित करण्यात येईल. जे चांगले आहे त्याचा निश्चितपणे विचार करण्यात येईल.

सभापती महोदय, याठिकाणी लेखा परीक्षण अहवाल सादर करण्यात येतात. इतर विद्यापीठांचे अहवाल सभागृहाला सादर होतात. अशा अहवालांवर कधी चर्चा होते किंवा होत नाही. परंतु या विद्यापीठाचा अहवाल सभागृहासमोर आणला तर त्याची सन्माननीय सदस्यांना निश्चितपणे माहिती होईल आणि सदस्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ देखील आम्हाला मिळेल. तेव्हा सभागृहाने हे विधेयक मंजूर करावे अशी मी विनंती करतो.

**तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे ):** विधेयक विचारात घेण्याचा प्रश्न मताला टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 6 (दोन्ही संम्मिलित)विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.प.वि.क्र.10 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2010 चे वि.प.वि.क्र. 10 संमत झाले आहे.

--------

..3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विधान भवन नागपूर येथे महिलांचा आलेला मोर्चा

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, श्रमिक एल्गारच्या अध्यक्षा श्रीमती परमिता गोस्वामी यांच्या नेतृत्वाखाली पाच हजार महिलांचा मोर्चा तब्बल सहा दिवस 125 कि.मी. पदयात्रा करुन विधान भवन जवळ आलेला आहे. गाव पातळीवरील दारुबंदी चांगल्या प्रकारे व्हावी यासाठी हा मोर्चा काढण्यात आलेला आहे. दारुबंदीची गाव पातळीवर चांगल्या प्रकारे अंमलबजावणी होत नाही. तेव्हा या प्रश्नाबाबत त्यांना गृहमंत्री माननीय श्री.आर.आर.पाटील यांना भेटावयाचे आहे. तेव्हा त्यांच्या मागणीचा गांभीर्याने विचार करुन दारुबंदीची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी अशी मी अपेक्षा व्यक्त करते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन 2002 मध्ये राज्यात 2 लाख 84 हजार लीटर दारु विक्री झाली. आता सन 2010 मध्ये 42 लाख लीटरच्यावर विक्री गेली आहे. उत्पादन शुल्क विभाग उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करीत आहे. तर दुसरीकडे महिला दारुबंदीसाठी पदयात्रा काढत आहेत. तेव्हा शासनाने या महिलांची वणवण लक्षात घेतली तर बरे होईल.

----------

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : राज्यात सुरु असलेले विजेचे भारनियमन

मु.शी. : राज्यात सुरु असलेले विजेचे भारनियमन या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, रामदास कदम, विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत, संजय केळकर, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री रामनाथ मोते, परशुराम उपरकर, चंद्रकांत पाटील, किरण पावसकर, वि.प.स. यांचा प्रस्ताव

**तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे)** : आता नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात होईल.सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी सकाळी अशी विनंती केली होती की , या प्रस्तावावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी सन्माननीय सदस्यांना पुरेसा वेळ देण्यात यावा.आता सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी हा प्रस्ताव मांडावा .त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम बोलतील.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेते) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम २६० अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :-

"राज्यात पुरेशा वीज निर्मिती अभावी सुरु असलेले किमान १२ तासांचे वीज भारनियमन, मुळा-प्रवरा वीज वितरण सहकारी संस्थेकडे वीजेच्या बिलाची २००० कोटी रुपयांची थकबाकी अद्यापि वसूल करण्यात न येणे, सभागृहात कृषी पंपाच्या वीज जोडण्याची घोषणा करुनदेखील कृषी पंपाच्या वीज जोडण्या चालू वीज देयक भरल्याशिवाय न जोडण्याचे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने काढलेले परिपत्रक, विदर्भात सर्वात अधिक वीज निर्मीत होत असतानाही तेथे मोठया प्रमाणात सुरु असलेल्या भारनियमनामुळे नव्याने येऊ घातलेले ८५ औष्णिक व जलविद्युत वीज निर्मिती प्रकल्पांना जनतेने केलेला विरोध, अमरावती येथील सोफिया या जलविद्युत प्रकल्पासाठी आधीच सिंचनाचा अनुशेष असताना वळविलेले सिंचनाचे पाणी, राज्यामध्ये ६,००० मेगावॅटची तूट असताना कोंकणामध्ये २०० कि.मी. परिसरात येऊ घातलेले ५५,००० मेगावॅट वीजेचे प्रकल्प , माडबन, रत्नागिरी येथे उभारण्यात येत असलेल्या १० हजार मेगावॅट क्षमतेच्या जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्त गावकऱ्यांनी शासनाने जाहीर केलेल्या पुनर्वसन पॅकेजला केलेला विरोध, भोपाळ गॅस दुर्घटनेच्या धर्तीवर जैतापूर अणुविद्युत प्रकल्पात देखील किरणोत्सर्ग होण्याचे निर्माण झालेली शक्यता व त्यामुळे होणारे प्रदूषण व पर्यावरणाचा ऱ्हास होण्याचा निर्माण झालेला धोका, महाराष्ट्र वीज निर्मिती मंडळातील वरिष्ठ अधिकारी व पुरवठादार यांच्यातील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ..

संगनमतामुळे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये झालेला करोडो रुपयांचा आर्थिक घोटाळा, रिलायन्स, टाटा पॉवर व महावीज निर्मिती कंपन्यांनी वीज बिलात केलेल्या बेसुमार दरवाढीमुळे ग्राहकांवर पडलेला आर्थिक बोजा, त्याकडे शासनाने केलेले दुर्लक्ष, त्यामुळे वीज ग्राहकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

. सभापती महोदय, आज सकाळी 289 संबंधीचा प्रस्ताव देण्यात आला होता आणि त्यावेळी माननीय उप सभापतींनी असे सांगितले की, आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव दाखविण्यात आला असून त्या प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी नियम 289 च्या प्रस्तावाच्या विषयावर सन्माननीय सदस्यांनी बोलावे त्याप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम प्रथम बोलतील आणि त्यांच्या भाषणानंतर मी भाषण करीन.

प्रस्ताव प्रस्तुत झाला

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये नियम २६० अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आला आहे,त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या सभागृहातील माझे सर्व सहकारी माननीय सदस्य विजेचे वाढलेले बिल आणि वाढलेले भारनियमन या विषयावर बोलणार असल्यामुळे मी फक्त कोकणातील जैतापूर येथील अणु ऊर्जा प्रकल्पावर बोलणार आहे. आपल्यामार्फत एक बाब मला शासनाच्या लक्षात आणून दिली पाहिजे की, या राज्याची विजेची भूक १२,७७७ मेगावॅट इतकी आहे. आज आपल्याकडे ८ हजार ४८१ मेगावॅट इतकी वीज उपलब्ध आहे. याचा अर्थ आपल्याकडे साडे चार ते पाच हजार मेगावॅट इतक्या विजेची कमतरता आहे. कोकणामध्ये जे प्रकल्प येतात त्यांना कोकणी माणूस विरोध करतो अशाप्रकारचा संदेश महाराष्ट्रातील जनतेसमोर जाता कामा नये असे आपले मत आहे. या संदर्भातील आकडेवारी मुद्दाम आपणास वाचून दाखवितो. आज आपल्याकडे असलेल्या विजेच्या प्रकल्पामधून फक्त ५० टक्के विजेची निर्मिती होत असते. आपल्याकडे जे विजेचे प्रकल्प आहेत त्यामधून जर १०० टक्के विजेची निर्मिती झाली तर महाराष्ट्राच्या अन्य कोणत्याही भागामध्ये नवीन विजेचे प्रकल्प आणण्याची आवश्यकता नाही. मला कळत नाही की, "हातचे सोडायचे आणि पळत्याच्या मागे जायचे" हे कशासाठी चालले आहे कुणासाठी चालले आहे यामध्ये कुणाचा किती वाटा आहे? यामध्ये जनतेचा घाटा आहे. याचा विचार शासनकर्त्यांकडून होणे गरजेचे व आवश्यक आहे. मला कल्पना आहे की, मागील दहा वर्षात महाराष्ट्र शासनाने एकही मेगावॅट विजेची निर्मिती केलेली नाही. मागील दहा वर्षामध्ये वीज निर्मिती करण्याच्या बाबतीत हे शासन नपुंसक ठरले आहे. असे असतांना या शासनाच्या भोवती १ लाख १० हजार कोटींचे कर्ज आहे. याबाबत आपण श्वेतपत्रिका काढावी अशी मी सतत मागणी करीत असतो. १ लाख १० हजार कोटींचे कर्ज आपण कशासाठी घेतले, कुणाच्या खिशामध्ये हा पैसा गेला हे महाराष्ट्रातील जनतेला एकदा कळू दे. याबाबत स्पष्टता होणे आवश्यक आहे, परंतु ती होत नाही आणि श्वेतपत्रिका निघत नाही. हा पैसा कुठे गेला हे आपण सांगत नाही. म्हणून माझे असे मत आहे की, १ लाख १० हजार कोटींपैकी फक्त २५ हजार कोटी रुपये वीज निर्मितीसाठी खर्च केले असते तर विजेच्या भार नियमनामधून हा महाराष्ट्र बाहेर पडला असता.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री. रामदास कदम....

सभापती महोदय, या राज्यामध्ये शिवशाहीचे सरकार असतांना एक युनिट देखील लोड शेडींग करण्यात आले नव्हते. आणि म्हणून मी याठिकाणी पहिल्यांदा आपल्याला आकडेवारी वाचून दाखवितो. नाशिक वीज केंद्राची क्षमता ८८० मेगावॅट असून प्रत्यक्षात ८१९ मेगावॅट वीजनिर्मिती होत आहे. म्हणजे जवळपास तेव्हढी वीज निर्मिती होत आहे. कोराडी येथील वीज केंद्राची क्षमता १०४० मेगावॅट इतकी असतांना आज प्रत्यक्षात ५४९ मेगावॅट म्हणजे ५० टक्के वीज निर्मिती होत आहे. खापरखेडा येथील केंद्राची वीज निर्मिती क्षमता ८४० मेगावॅट असतांना आज ७६४ मेगावॅट वीज निर्मिती होत आहे. पारस वीज केंद्राची वीज निर्मिती क्षमता ५१५ मेगावॅट असतांना आज ४५२ मेगावॅट वीज निर्मिती होत आहे. परळी येथील वीज केंद्राची वीज निर्मिती क्षमता ११७० मेगावॅट असतांना आज ७३२ मेगावॅट म्हणजे ५० टक्के वीज निर्मिती केली जात आहे. भुसावळ येथील वीज निर्मितीची क्षमता ४७५ मेगावॅट असतांना आज आपण २५४ मेगावॅट इतकी वीज निर्माण करीत आहोत. दाभोळ येथील वीज निर्मितीची क्षमता १९८० मेगावॅट इतकी असतांना आपण १५५२ मेगावॅट इतकी वीज निर्मिती करीत आहोत. चंद्रपूर येथील वीज केंद्राची वीज निर्मिती क्षमता २३४० मेगावॅट इतकी असतांना प्रत्यक्षात ३७६ मेगावॅट वीज निर्मिती केली जात आहे. औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पाची क्षमता ७३०० मेगावॅट असतांना आज ३१४२ मेगावॅट इतकी वीज निर्मिती केली जात आहे. त्याचप्रमाणे जल विद्युत प्रकल्पाची वीज निर्मिती क्षमता ८५२ मेगावॅट असतांना आज ७७१ मेगावॅट इतकी वीज निर्मिती केली जात आहे. उरण येथील वायू वीज निर्मिती प्रकल्पाची क्षमता २३४४ मेगावॅट इतकी असतांना आपण ४७१ मेगावॅट इतकी वीज निर्माण करीत आहोत.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

महाराष्ट्र शासन कशा पध्दतीने चालले आहे, कशा पध्दतीने जनतेची दिशाभूल चालू आहे हे मी सांगत आहे. एका बाजूला आपल्याकडे क्षमता असताना तेवढी वीज निर्माण करण्यामध्ये आपण कमी पडतो. आपण पैसे खर्च करीत नाही, या राज्याच्या डोक्यावर कर्जाचा बोजा वाढत आहे. महाराष्ट्रातील जनता अंधारामध्ये आहे, काळोखामध्ये आहे. राज्यातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत. शेतकरी पाहतो की आपली शेती फुललेली आहे, विहिरीला पाणी आहे परंतु ते पाणी उचलण्यासाठी पंपाला वीज नाही त्यामुळे त्याचे उभे शेत उद्ध्वस्त होत आहे. त्यामुळे शेतकरी शेतामध्ये जाऊन विष प्राशन करुन स्वत:ला संपवून घेत आहे. शेतामध्ये जे झाड असेल त्याला फास घेऊन स्वत:चे आयुष्य संपवून घेत आहे. मला मुद्दाम सांगितले पाहिजे की, ही अवस्था महाराष्ट्र शासनाने निर्माण केली आहे. आज वीज नसल्यामुळे शेती पिकत नाही आणि शेती पिकत नाही म्हणून शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. त्यामुळे ज्या पाच हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या त्या पाच हजार शेतकऱ्यांच्या आत्महत्या नाहीत तर या पाच हजार शेतकऱ्यांचे या शासनकर्त्यांनी पाडलेले हे खून आहेत असे मी म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. हे शासन कशा पध्दतीने लोकांची दिशाभूल करीत आहे हे मी सांगत आहे. एका बाजूला आपली वीज निर्मितीची जेवढी क्षमता आहे तेवढी वीज निर्माण केली असती तर आपल्याला या महाराष्ट्रामध्ये एकही वीज प्रकल्प आणण्याची आवश्यकता नाही. परदेशातून सुध्दा प्रकल्प आणण्याची आवश्यकता नाही. माननीय पंतप्रधानांना दिल्लीत बसून सह्या करण्याची सुध्दा आवश्यकता नाही. ज्यावेळी माननीय पंतप्रधान परदेशासोबत एखाद्या प्रकल्पाबाबत ॲग्रिमेंट करतात त्यावेळी पर्यावरण खाते सुध्दा त्याला ताबडतोब परवानगी देते. ही अवस्था का निर्माण होते, कशामुळे निर्माण होते ?

सभापती महोदय, विदर्भामध्ये विजेचे प्रकल्प किती आहेत आणि किती मेगाॅवॅटचे आहेत याची यादी मी आपल्याला वाचून दाखवितो. या ठिकाणी बसलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांना कळेल की, नेमके हे काम कोणासाठी चालले आहे. नागपूरमध्ये 12180 मेगाॅवॅटचे 17 प्रकल्प आहेत. वर्ध्यामध्ये 1427 मेगाॅवॅटचे 4 प्रकल्प आहेत. गडचिरोलीमध्ये 10 मेगाॅवॅटचा 1 प्रकल्प आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

अकोला-वाशिम-बुलढाणा या ठिकाणी 2 प्रकल्प 500 मेगावॅटचे आहेत. भंडारा आणि गोंदियामध्ये 9875 मेगावॅटचे 9 प्रकल्प आहेत. अमरावती यवतमाळमध्ये 8630 मेगावॅटचे 12 प्रकल्प आहेत. आणि चंद्रपूरमध्ये 22448 मेगावॅचे 44 प्रकल्प आहेत. म्हणजे विदर्भामध्ये 89 प्रकल्प 55070 मेगावॅटचे आहेत.

सभापती महोदय, एका बाजूला आपण चालू असलेले प्रकल्प पाहिले तर 22 हजार मेगावॅट विजेचे प्रकल्प चालू आहेत आणि त्यातून आज आपण 8 हजार मेगावॅट वीज निर्माण करतो. दुसऱ्या बाजूला विदर्भामध्ये 55 हजार मेगावॅट विजेचे प्रकल्प, आणि आता कोकणामध्ये 200 किलोमीटरच्या अंतरामध्ये 55 हजार मेगावॅट विजेचे प्रकल्प आहेत. म्हणजे कोकणाचे 55 हजार मेगावॅट विजेचे प्रकल्प, विदर्भातील 55 हजार मेगावॅट विजेचे प्रकल्प आणि आता सुरु असलेले 20 हजार मेगावॅट विजेचे प्रकल्प असे 1 लाख 40 हजार मेगावॅट क्षमतेचे विजेचे प्रकल्प आहेत त्यामध्ये शासनाला जाळावयाचे आहे काय ? हे सर्व कोणासाठी आणि कशासाठी चालले आहे ? याचे गणित मला कळत नाही. आपल्याला आता फक्त 5 हजार मेगावॅट विजेची आवश्यकता असताना महाराष्ट्रामध्ये 1 लाख 40 हजार मेगावॅट क्षमतेचे विजेचे प्रकल्प कोणासाठी आणि कोणाच्या सोयीसाठी आणले जात आहेत याचे उत्तर मला माननीय मुख्यमंत्र्यांकडून मिळणे आवश्यक आहे. मी आकडेवारीसह मुद्दाम बोलतो.

यानंतर श्री. खंदारे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

कोकणातील माणूस कोणत्याही प्रकल्पाला विरोधच करतो असे नाही. राज्यामध्ये लोडशेडिंग आहे, त्यासाठी राज्यात 4-5 प्रकल्प सुरु आहेत. परंतु हे कटकारस्थान कोणासाठी चालले आहे ? कोकणावर कशाप्रकारे अन्याय सुरु आहे त्याचे मी उदाहरण सांगेन. एका बाजूला विदर्भावर अन्याय सुरु आहे. सबंध महाराष्ट्रामध्ये जेवढा पाऊस पडतो त्याच्या 40 टक्के पाऊस माझ्या कोकणात पडतो. सगळयास जास्त पाऊस कोकणामध्ये आणि सगळयात जास्त पाण्याचे दुर्भिक्ष्य सुध्दा कोकणातच आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. आता कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला सादर केला जाणार आहे.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला सादर करणे व संमत करुन घेणे

श्री.हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

"विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक गुरुवार, दिनांक 9 डिसेंबर, 2010 रोजी दुपारी 3.30 वाजता विधान भवन, नागपूर येथे झाली. सदरहू बैठकीत समितीने विचारविनिमय करुन शुक्रवार, दिनांक 10 ते गुरुवार, 16 डिसेंबर, 2010 पर्यंतचे सभागृहाचे कामकाज पुढीलप्रमाणे असावे असा निर्णय घेतला :-

| | | |
|---|---|---|
| शुक्रवार, दिनांक 10 डिसेंबर, 2010 | : | (1) शासकीय विधेयके<br>(2) अशासकीय कामकाज |
| शनिवार, दिनांक 11 डिसेंबर, 2010 | : | सुट्टी |
| रविवार, दिनांक 12 डिसेंबर, 2010 | : | सुट्टी |
| सोमवार, दिनांक 13 डिसेंबर, 2010 | : | (1) शोक प्रस्ताव<br>(2) शासकीय ठराव - मानवी अवयव प्रत्यारोपण 1994 च्या ( 1994 चा 42) यामध्ये सुधारणा करण्याचा अधिकार संसदेला बहाल करण्याबाबतचा ठराव<br>(3) शासकीय विधेयके |
| मंगळवार, दिनांक 14 डिसेंबर, 2010 | : | (1) शासकीय विधेयके<br>(2) सत्तारुढ पक्षातर्फे सुचविण्यात येणाऱ्या विषयावरील प्रस्तावावर चर्चा |
| बुधवार, दिनांक 15 डिसेंबर, 2010 | : | (1) शासकीय विधेयके<br>(2) अंतिम आठवडा प्रस्ताव |
| गुरुवार, दिनांक 16 डिसेंबर, 2010 | : | (1) विरोधी पक्षातर्फे सुचविण्यात येणा-या विषयावरील प्रस्तावावर चर्चा |



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

------

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4....

**पृ.शी.**: राज्यात सुरु असलेले विजेचे भारनियमन

**मु.शी.**: राज्यात सुरु असलेले विजेचे भारनियमन या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, रामदास कदम, विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत, श्री.संजय केळकर, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री रामनाथ मोते, परशुराम उपरकर, चंद्रकांत पाटील, किरण पावसकर, वि.प.स.यांचा प्रस्ताव.

(चर्चा पुढे चालू)

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सबंध महाराष्ट्रामध्ये जेवढा पाऊस पडतो त्यापैकी 40 टक्के पाऊस माझ्या कोकणात पडतो. सगळयात जास्त पाऊस कोकणात पडतो आणि उन्हाळयामध्ये सगळयात जास्त पाण्याचा दुष्काळ सुध्दा कोकणामध्येच असतो. मी एक बाब शासनाच्या माहितीसाठी सांगेन. सबंध देशामध्ये सिंचनाची सरासरी 52 टक्के आहे, महाराष्ट्रात ती 18 टक्के आहे, त्यापैकी कोकणात केवळ 2 टक्के आहे. सबंध देशाची, राज्याची आणि कोकणाची सिंचनाची सरासरी काढली तर यामध्ये किती विसंगती आहे, किती तफावत आहे ती आपल्या नजरेला येईल. कोकणामध्ये पाऊस जास्त पडत असताना सुध्दा तेथे पाणी अडविण्याचे काम केवळ 2 टक्के झालेले आहे. ज्याच्या हातामध्ये ससा तो पारधी, जिसकी लाठी उसकी भैस, फावडा आपल्यासमोर माती ओढतो असे म्हणतात. त्याचा प्रत्यय कोकणाला येत आहे. यावरुन कोकणावर शासनाच्या माध्यमातून अन्याय होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे कोकणातील माणूस मुंबईत भाकरी मिळविण्यासाठी चाकरी करीत असल्याचे दिसून येते. कोकणामध्ये जर पुरेशा प्रमाणात सिंचनाची व्यवस्था झाली असती तर कोकणातील माणूस मुंबईत चाकरीसाठी आला नसता. कोकणाला निसर्गाने भरपूर देणगी दिलेली आहे, ती शासनाच्या बापाला हिरावून घेण्याचा अधिकार नाही. ही देणगी शासनाची नाही. त्याठिकाणची झाडे, समुद्र, नदी, नाले, डोंगर, हिरवळ हे सर्व सृष्टी सौंदर्य, निसर्ग शासनाने दिलेले नाही.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम पुढे सुरु....

तो हिरावून घेण्याचा तुम्हाला अधिकार नाही.

कोकणामध्ये एन्रॉन प्रकल्प आणला. महाराष्ट्रातील विजेचे भारनियमन थांबले पाहिजे, महाराष्ट्राला वीज मिळाली पाहिजे म्हणून तो आम्ही मान्य केला. दिल्लीतील पर्यावरण मंत्रालयाने अणुऊर्जा प्रकल्पाला मान्यता दिली आणि पंतप्रधानांनी त्यावर सही केली अशी बातमी दिल्लीमधून आली. पंतप्रधानानी आमच्या कोकणाला उद्ध्वस्त करण्याची सुपारी घेतलेली आहे काय ? कोणीही यावे, कोणतेही शासन यावे आणि कोकणाला पैसे न देता, कोकणाचा विकास न करता कोकणाला उद्ध्वस्त करावे ! असा प्रकार होणार असेल तर तो आम्ही खपवून घेणार नाही. कोकणातील जनतेने आम्हाला शिवसेनेच्या माध्यमातून येथे कशासाठी पाठविले आहे ? जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाला शिवसेनेचे कार्याध्यक्ष श्री. उद्धवजी ठाकरे यांनी प्रखर विरोध केलेला आहे. वाटेल ते झाले तरी शिवसेना कोकणातील माणसाला उद्ध्वस्त होऊ देणार नाही, त्यांचे पुनर्वसन होऊ देणार नाही. मग पोलिसांचे कितीही दंडुके पडले तरी हरकत नाही. कोकणाला उद्ध्वस्त होऊ देणार नाही अशी भूमिका उद्धवजी ठाकरे यानी स्पष्ट केलेली आहे आणि तीच भूमिका मांडण्यासाठी मी आपल्यामुढे उभा आहे. हा 10 हजार मे.वॅट विजेचा प्रकल्प असून जगातील सर्वात मोठा प्रकल्प आहे. त्यासाठी या शासनाला कोकणच सापडले काय ? वीज निर्मितीसाठी एका बाजूला कोकण आणि दुस-या बाजूला विदर्भाचा वापर केला जातो. मग असे प्रकल्प पश्चिम महाराष्ट्रामध्ये का घेत नाही ? 55 हजार मे.वॅट विजेचे प्रकल्प कोकणात किंवा विदर्भातच घेण्यात येतात. दोन्ही भाग पूर्ण उद्ध्वस्त होऊ द्या, आम्ही मात्र मोकळे राहू अशी पश्चिम महाराष्ट्राची भूमिका आहे. विदर्भाच्या चाव्या आमच्या हातात आहेत. या प्रकल्पामुळे 10 गावातील 10 हजार एकर जमीन बाधित होणार आहे.

सभापती महोदय, या प्रकल्पाचे गरम पाणी समुद्रामध्ये 2 मीटर अंतरावर सोडण्यात येणार असल्यामुळे पर्यावरण खात्याने या प्रकल्पास मंजुरी दिली. परंतु या गरम पाण्यामुळे मच्छिमारीवर विपरित परिणाम होईल. मग जे पारंपरिक पध्दतीने मच्छिमारीचा व्यवसाय करतात त्यांचे काय ? ते आपला व्यवसाय कुठे करणार ? कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर करण्यात आला. तसेच रत्नागिरी जिल्हा हा फलोत्पादन जिल्हा म्हणून जाहीर करण्यात आला. 1990 पासून शासनाच्या वतीने शंभर टक्के अनुदानातून फळझांडांची लागवड करण्याची योजना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 17:40

श्री. रामदास कदम...

कोकणामध्ये राबविण्यात आली. या योजनेअंतर्गत शेतक-यांनी आंबा, काजू, नारळ, कोकम, चिंच अशी विविध प्रकारची फळ झाडे लावली. आता कुठे त्या झाडांना फळे येऊ लागलेली आहेत. परंतु ही फळे शासन शेतक-याच्या घशातून काढून घ्यायला पहात आहे. कोकणामध्ये जे जे काही शिल्लक राहिलेले आहे तेही संपवून टाकण्याचे काम हे शासन करीत आहे. सभापती महोदय, एक गोष्ट मी पाहिली. मागे जेव्हा सरकारला 8-10 प्रकल्प करावयाचे होते त्यावेळी लोकांचे आंदोलन चिरडून टाकण्यासाठी शासनाने पोलिसांना कामाला लावले होते. पोलिसांनी त्यावेळी रात्री दोन दोन वाजता म्हाता-यांसहीत लोकांना खोलीतून कुत्र्यासारखे फरफरट आणून तुरुंगात डांबले.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...........

आठ-आठ दिवस जामीन दिला जात नाही. लाठ्याकाठ्यांनी बदडून काढले जाते. ही तुमची निती आहे. मी जवळून पहात आहे. दुसऱ्या मार्गाने पुढाऱ्यांना गोंजारायचे. काही पुढाऱ्यांना विमानातून दिल्लीला न्यायचे. तेथे पुढाऱ्यांना मिठाई द्यायची. पुढाऱ्यांना कामाचे वाटप करायचे. प्रकल्पातील काम तूला. हे काम तूला. दहा-पाच पुढाऱ्यांना काम मिळाले, पुढाऱ्यांची पोटे भरली की ते बदलतात आणि प्रकल्प विनासायास उभा राहतो. स्थानिक जनतेचा मात्र सत्यानाश होतो. मी अनुभव घेतला असल्यामुळे जबाबदारीने बोलत आहे. कोकणात अनेक प्रकल्प उभे राहिले आहेत. जाऊन पहा. कोणाचे कॉन्ट्रॅक्ट आहेत. सर्व पुढाऱ्यांना कॉन्ट्रॅक्ट दिले गेले आहेत. मला कोणाचे नाव घ्यायचे नाही. परंतु एका विशिष्ट पक्षाच्या पुढाऱ्यांची कामे आहेत. हे सर्व थांबले पाहिजे. मूठभर पुढाऱ्यांची पोटे भरण्यासाठी शासन जर कोकणातील गरीब माणसाला उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न करणार असेल तर शिवसेना पक्ष आणि मी हे कधीही सहन करणार नाही.

सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांच्याकडून आम्हाला एक आश्वासन हवे आहे. सर्वसामान्य माणसांना बोलावून त्यांच्याशी चर्चा करावी, त्यांना गोडीगुलाबीने कन्व्हीन्स करावे, बैठक घ्यावी, ब्रिफिंग करावे. परंतु दादागिरीने व पोलिसांच्या लाठ्या आणि बंदुकीचा वापर करुन कोकणातील गरीब माणसांना उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला तर आम्ही अजिबात सहन करणार नाही. हा प्रकल्प उभारण्यासाठी आम्ही पोलिसांच्या बळाचा वापर करणार नाही असे माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहाला आश्वासित करावे. आज त्या परिसरात पोलीस सातत्याने बळाचा वापर करीत आहेत. लोकांना पकडून पोलीस कोठडीत टाकले जात आहे. महिलांना लाठ्यांनी मारझोड केली जात आहे. हे कशासाठी? त्यांनी कोणता गुन्हा केला? माझी जमीन द्यायची की नाही याचा निर्णय मीच घेणार आहे. या देशात लोकशाही अस्तित्वात आहे. लोकशाहीमध्ये माझी जमीन द्यायची की नाही हे ठरविण्याचा मला हक्क आहे. मला तो अधिकार आहे.

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये भारनियमन सुरु आहे. महाराष्ट्राला विजेची कमतरता भासली असती तर मी पुढाकार घेतला असता आणि नवीन प्रकल्प आणावेत असे सांगितले असते. कोकणात 1.20 लाख

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...........

मे.वॅटचा प्रकल्प आणून सर्वसामान्य गरीब माणसाला उद्ध्वस्त करण्याचे काम केले जात आहे. हे सगळे कोण आहेत? परदेशी पाहुणे आहेत. या देशातील कोणी नाही. राज्यातील कोणी नाही. परदेशी पाहुण्यांना या राज्यात आणून तुमच्या भल्यासाठी, तुमच्या सोयीसाठी सुपारी घेऊन आमच्या स्थानिकांना उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न करणार असाल तर आम्ही अजिबात सहन करणार नाही. याठिकाणी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित असते तर बरे झाले असते. परंतु मी माननीय उप मुख्यमंत्री यांना सांगू इच्छितो की, हे सगळे थांबवावे. महाराष्ट्राची भूक भागेल एवढे वीज प्रकल्प राज्यात अस्तित्वात आहेत. यापुढे नवीन वीज प्रकल्प उभारण्याची आवश्यकता नाही. आज राज्याच्या डोक्यावर 1.92 लाख कोटी रुपयांचे कर्ज होऊनही राज्यकर्त्यांना शहाणपण सुचत नाही. सभापती महोदय, माझी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती आहे की, स्थानिक जनतेला चांगल्याप्रकारे आपले पुनर्वसन होत आहे, चांगला मोबदला मिळत आहे, आमचे भले होणार आहे असे वाटेल अशा पध्दतीने शासनाकडून निर्णय घेतला जावा. काही पुढाऱ्यांना हाताशी धरुन कन्व्हीन्स करुन प्रकल्प उभारला जाईल. परंतु 50 कि.मी.परिसरातील फळबागा, पिके नष्ट होतील याला जबाबदार कोण? मी मघाशी उल्लेख केल्यानंतर समोरच्या बाकावरील मंडळी हसू लागली. मी म्हटले होते की, वेळ पडली तर आम्ही आमच्या छातीवर पोलिसांच्या गोळ्या झेलू. नाही तरी आम्ही उद्ध्वस्त होणारच आहोत.

एका बाजूला कोकणात पडणारे पावसाचे पाणी अडविले जात नाही. कोकणाचा विकास केला जात नाही. मागील सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी कोकणासाठी 3500 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. 3500 कोटी रुपयांपैकी एक फुटकी कवडीही आजपर्यंत दिली गेली नाही.

नंतर 3व्ही.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .........

एक पैसा सुध्दा कोकणला आतापर्यंत दिला नाही. निवडणुका आल्यानंतर फक्त घोषणा करण्याचे काम हे सरकार करते. कोकणातील माणूस भोळा आहे व तो अशा फसव्या घोषणांवर विश्वास ठेवतो. झाडाच्या सावलीखाली बसणारा कोकणातील माणूस अशा गोष्टींची आठवण ठेवत नाही, अशा प्रकारे घोषणा करुन हे सरकार पुन्हा सत्तेवर आले पण दमडी सुध्दा दिली नाही. म्हणून अशा प्रकारचे पाप हे सरकार करीत असेल तर यापुढे ते कदापि सहन केले जाणार नाही. आतापर्यंत शासनाने पोलिसांचे दंडुके चालविले, दादागिरी चालविली पण यापुढे अशा प्रकारे पोलिसांनी दंडुके काढले तर शिवसेनेच्या भगव्या झेंड्यालाही चांगला दांडा असतो याची आठवण शासनाने ठेवावी, असा इशारा मी या निमित्ताने देतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

-------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ KTG/

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये सभागृहात जो प्रस्ताव चर्चेसाठी आलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, या प्रस्तावामध्ये प्रामुख्याने दोन-चार भाग दिलेले आहेत. आताच सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी जैतापूर येथे होणाऱ्या अणू उर्जा प्रकल्पाच्या बाबतीत आपली मते व्यक्त केली. हा विजेचा विषय मुळात इतका व्यापक बनला आहे, एवढा जटिल बनलेला आहे की, गेली दहा वर्षे भार नियमनामुळे हे राज्य त्रस्त झालेले आहे. अशा प्रकारे त्रस्त झालेला महाराष्ट्र, सरकारच्या दर अधिवेशनातील घोषणा ऐकून ऐकून कंटाळलेला महाराष्ट्र, सन 2010 पर्यंत महाराष्ट्र राज्य विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होणार अशा घोषणा ऐकणारा महाराष्ट्र आज खरोखरच घोषणांना कंटाळलेला आहे. कारण पाच वर्षात असे एकही अधिवेशन गेले नाही की, त्यात विजेच्या प्रश्नावर चर्चा झाली नाही. आजही राज्यात बारा बारा तासाचे भार नियमन सुरु आहे. आजपर्यंत या भार नियमनामध्ये कुठल्याही प्रकारे सुधारणा झालेली नाही आणि किती दिवस राज्यातील शेतकरी माणूस, सर्वसामान्य नागरिक भार नियमनमुक्त वीज पुरवठ्याची वाट पाहणार आहे हेच समजत नाही. मागेल त्याला वीज, मागेल तेवढी वीज अशी घोषणा शासनाने केली परंतु संपूर्ण राज्य अंधारात गेले तरीही विजेच्या बाबतीत सुधारणा नाही याचेच दुःख वाटते.

महोदय, परवा सभागृहात अवकाळी पावसावर चर्चा झाली व त्या चर्चेला सुरुवात करण्यापूर्वी राज्यातील शेतकऱ्यांना कोणत्या प्रकारची मदत शासन करणार आहे याबाबत शासनाने अगोदर घोषणा केली पाहिजे असा आग्रह धरला होता. तो आग्रह यासाठी होता की, झालेल्या घोषणांची अमलबजावणी होत नाही तर केवळ शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली जातात म्हणूनच अगोदर घोषणा करावी अशी आमची मागणी होती. 3 डिसेंबर, 2010 रोजी माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सभागृहात घोषणा केली की, राज्यातील 1.50 लाख शेतकऱ्यांची विजेची कनेक्शन्स जी कपात करण्यात आली ती ताबडतोब जोडली जातील आणि 1 एप्रिल, 2010 पर्यंत, रब्बीचे पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांचे कनेक्शन्स पुन्हा कपात केले जाणार नाहीत. पण तिसऱ्याच दिवशी एमएसईबीने शासनाने केलेल्या घोषणेला केराची टोपली दाखविली. कारण वीज मंडळाने असे कनेक्शन्स कपात करण्यासंबंधी आदेश काढले आणि माननीय उप मुख्यमंत्र्यांनी केलेल्या घोषणेला आडवे केले .....

यानंतर श्री. जुन्नरे .....

SGJ/ KGS/ D/ KTG/ ST/ प्रथम श्री.खर्चे.... 17:55

श्री. पांडुरंग फुंडकर...

आदेश काय निघाला ? की, ज्याचे चालू बिल राहिले असेल त्यांचेच फक्त कनेक्शन तोडले जाण्ार नाही. जो बील भरेल त्याचेच कनेक्शन तोडले जाणार नाही अशा प्रकारचे आदेश वीज मंडळाने काढलेले आहेत. सरकार खरे की, वीज मंडळ खरे हे उत्तराच्या भाषणात मंत्री महोदयांनी सांगितले पाहिजे. शेतक-यांची कनेक्शन्स एप्रिल महिन्यापर्यंत तोडली जाणार नाहीत तसेच ज्यांचे कनेक्शन्स तोडली आहेत ती जोडली जातील अशी घोषणा माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सभागृहात केली होती त्या घोषणेच्या संदर्भातील आदेश निघाले नसतील तर हे आदेश केव्हा काढले जाणार आहेत ? शेतक-यांची तोडलेली कनेक्शन्स कधी जोडली जाणार आहेत ? यासंदर्भातील तारखा शासनाने डिक्लेअर करण्याची आवश्यकता आहे. विजेच्या प्रस्तावाच्या बाबतीत माझी मागणी आहे की, नागपूर अधिवेशन संपण्याच्या आत शासनाने तारखा घोषित कराव्यात की, या तारखा पर्यंत शेतक-यांची तोडली गेलेली सर्व वीज कनेक्शन्स जोडली जातील. ज्या ज्या अधिका-यांनी घोषणा झाल्यानंतर आदेश काढले त्या अधिका-याची चौकशी केली जाईल, अशा पध्दतीची घोषणा माननीय उपमुख्यमंत्र्यांनी केली पाहिजे.

सभापती महोदय, मी सभागृहाचा अधिक वेळ घेणार नाही परंतु महाराष्ट्रात विजेची काय अवस्था आहे, ट्रान्सफॉर्मरची काय अवस्था आहे ? जे ट्रान्सफॉर्मर खरेदी केले गेले ते अतिशय निकृष्ट प्रतीचे खरेदी करण्यात आलेले आहेत. ट्रान्सफॉर्मरच्या खरेदीमध्ये जो घोटाळा झाला त्या घोटाळयाची चौकशी करण्याचे आश्वासन याच सभागृहात ऊर्जा मंत्र्यांनी दिले होते. शेतक-यांनी ट्रान्सफॉर्मर बसविला की, तो आठच दिवसात जळून जातो. मला काल एका शेतक-याचा फोन आला व त्याने सांगितले की, ट्रान्सफॉर्मर जळून दोन महिने झाले तरी आम्हाला ट्रान्सफॉर्मर मिळाला नाही त्यामुळे आम्ही स्वत: जाऊन ट्रान्सफॉर्मर आणला व तो बसविला परंतु बसविल्यानंतर तो ट्रान्सफॉर्मर जळलेला असल्याचे आढळून आले. अशा रितीने अजूनही शेतक-यांची फसवणूक चालू आहे. आज आपल्या राज्याला 14500 मे. वॅ.विजेची आवश्कता आहे.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ इन्फॉर्मेशन. माननीय विरोधी पक्ष नेते विजेच्या संदर्भात आपले विचार मांडत आहेत परंतु त्यांच्या मित्र पक्षाचा एकही सन्माननीय सदस्य त्यांचे भाषण ऐकण्यास सभागृहात उपस्थित नाही. त्यांच्या मित्र पक्षाचा त्यांच्या चर्चेवर बहिष्कार आहे का ? याची आम्हाला माहिती हवी आहे.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सदर माहितीची आवश्यकता नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, राज्याच्या विजेची मागणी 14500 मे.वॅ. असून राज्यात केवळ 8800 मे.वॅ. वीज निर्माण होत आहे. राज्यात जवळपास 6000 मे.वॅ. विजेचा तुटवडा आहे. आज राज्यातील औष्णिक विद्युत केंद्रातून जवळपास 4000 मे.वॅ.वीज निर्मिती होत आहे. नाशिक, कोराडी, खापरखेडा, पारस, परळी व चंद्रपूर व भुसावळ अशा 7 औष्णक वीज केंद्रातून 4400 मे.वॅ. विजेची निर्मिती होत आहे. गॅस व हाइड्रो सारख्या केंद्रातून 850 मे.वॅ.वीज निर्मिती होत आहे. मागील 10 वर्षापासून राज्याची वीज भारनियमनातून सुटका होऊ शकली नाही. विजेवाठी राज्यामध्ये सतत आंदोलने सुरु आहेत. ह महाराष्ट्र राज्याची वीज टंचाईतून कधी सुटका होणार आहे याचेही उत्तर माननीय उपमुख्यमंत्र्यांनी देण्याची आवश्यकता आहे. शासनाने विदर्भात 85 औष्णक वीज प्रकल्प करण्याचे ठरविले आहे. कोराडी, चंद्रपूर, खापरखेडा, पारस हे महाऔष्णक प्रकल्प कार्यरत आहेत. या प्रकल्पातून 4087 मे.वॅ. वीज निर्मिती होते व विदर्भात केवळ 1400 मे.वॅ. विजेचा वापर होत असतो.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सभागृहाची वेळ सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत होती. सभागृहाची वेळ सायंकाळी 7.00 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विदर्भासाठी फक्त 1400 मेगावॅट विजेची आवश्यकता आहे. परंतु विदर्भात त्याच्या तिप्पट वीज निर्मिती होते. एक मेगावॅट वीज निर्मितीसाठी 15 मेट्रीक टन कोळसा लागतो आणि 6 मे.टन राख बाहेर पडते. त्याशिवाय किती तरी कार्बनडाय ऑक्साईड बाहेर फेकला जातो. महाऔष्णिक प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते. त्याचे परिणाम विदर्भाला भोगावे लागणार आहेत. विदर्भातील चंद्रपूर जिल्हा एक नंबरचा प्रदूषित जिल्हा म्हणून प्रसिध्द आहे.

सभापती महोदय, आता विदर्भात नवीन 85 प्रकल्पांना मान्यता देण्याचा प्रयत्न सुरु आहे. सरकारने नवीन प्रकल्पासंाठी विदर्भ आणि कोकण विभागाची का निवड केली ? विदर्भात एकूण 7 प्रकल्प असताना आणखी 85 नवीन प्रकल्पांची काय आवश्यकता होती ? या 85 प्रकल्पांतून 55 हजार मेगावॅट वीज निर्मिती होणार आहे. कोकणातून 50 हजार मेगावॅट वीज निर्मिती होणार आहे. या दोन्ही विभागातून एकूण 1 लाख 10 हजार मे.टन वीज निर्मिती होणार आहे असे स्वप्न राज्य सरकार जनतेला दाखवीत आहे. विदर्भातून 55 हजार मे.टन वीज निर्मिती होईल त्यावेळी रोज 8 लाख मे.टन कोळसा जळणार आहे. दीड लाख कार्बन डायऑक्साईड हवेत फेकला जाणार आहे. तर 3 लाख मे.टन राख बाहेर पडणार असून त्यासाठी 35 हेक्टर जमीन लागणार आहे. एका बाजूला विदर्भातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत. तर दुसऱ्या बाजूला अशा प्रकारच्या होणाऱ्या प्रदूषणामुळे दमा, अस्थमा,कर्क रोगासारखे आजार लोकांना जडावतील. शासनाचा शेतकऱ्यांना स्लो पॉयझन देऊन मारण्याचा विचार तर नाही ना अशाप्रकारची शंका येते. आपण अशाप्रकारे विदर्भ उद्ध्वस्त करु नका.

सभापती महोदय, विदर्भास लागणाऱ्या विजेपैकी तिप्पट वीज विदर्भात होते. असे असताना देखील विदर्भात 15-16 तासांचे भारनियमन आहे. शेतकऱ्यांना सहा-सहा महिने वीज कनेक्शन मिळत नाही. अर्ज दिल्यानंतर शंभर वेळा फेऱ्या माराव्या लागतात. ही विदर्भातील जनतेची परिस्थिती आहे.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.......

सभापती महोदय, विदर्भातील सिंचना अनुशेष 12 लाख हेक्टरपर्यंत गेलेला आहे. तो दूर करणे बाजूलाच राहिले. परंतु त्याठिकाणी नवीन 85 प्रकल्प उभारण्यात येणाार आहेत त्यासाठी लागणारे पाणी कोठून आणणार आहात ? सिंचनाच्या वाट्याचे पाणी प्रकल्पांसाठी घेतले तर विदर्भांचा बॅकलॉग अजून वाढेल. या 85 प्रकल्पांसाठी 25 द.ल.घ.मी. पाण्याची आवश्यकता आहे. सरकार हे पाणी कोठून आणणार आहे ? प्रकल्पांसाठी पाणी वापरले तर सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार नाही.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

सभापती महोदय, या प्रस्तावावर मी जास्त काही बोलणार नाही परंतु यासंबंधी आपल्याला एकच उदाहरण देणार आहे. अप्पर वर्धा नावाच्या सिंचन प्रकल्पातील अमरावती जिल्हयासाठी राखून ठेवण्यात आलेले पाणी इंडिया बुल्स कंपनीव्दारे संचालित सोफिया वीज प्रकल्पाला देण्याबाबतचा निर्णय शासनाने नुकताच घेतला आहे.सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांना निरोप देत असतांना सोफिया कंपनीचा विषय निघाला होता. इंडिया बुल्स कंपनी कोणाची आहे आणि या कंपनीचे कर्ते धर्ते कोण आहेत ? इंडिया बुल्स कंपनीच्या सोफिया वीज प्रकल्पाला पाणी देण्यास मान्यता देण्यात आली होती.वर्धा जिल्हयातील एकमेव अप्पर वर्धा धरण असून वर्धा आणि अमरावती जिल्हयातील शेतक-यांसाठी वरदान ठरणारे हे धरण होते.1976 सालापासून या प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झाली होती आणि हा प्रकल्प पूर्ण होण्यास 25 ते 30 वर्षे लागली होती.अप्पर वर्धा प्रकल्पाचे नियोजन केले होते त्यावेळी अमरावती जिल्हयातील असंख्य शेतक-यांनी आपली जमीन अल्प दराने या प्रकल्पासाठी दिली होती.या शेतक-यांनी अल्पदराने आपली शेती देण्याचे कारण असे होते की, या प्रकल्पासाठी अल्पदराने आपली शेती द्यावी लागली तरी चालेल परंतु एकदा अप्पर वर्धा प्रकल्प पूर्ण झाला पाहिजे असे त्यांना वाटले म्हणूनच त्या शेतक-यांनी अल्प दराने आपली शेती या प्रकल्पासाठी दिली होती. हा प्रकल्प झाल्यानंतर आपल्या शेतकरी बांधवाच्या शेतीला मुबलक पाणी मिळेल अशी त्यांना आशा होती परंतु शासनाने त्या शेतक-याची दिशाभूल केली होती.सभापती महोदय,सिंचन प्रकल्पातून पाणी देत असतांना प्रथम प्राधान्य पिण्याच्या पाण्याला, दुसरे प्राधान्य शेतीला आणि तिसरे प्राधान्य उद्योगाला द्यावयास पाहिजे होते.पुरोगामी महाराष्ट्र राज्याचे असेच धोरण होते परंतु या धोरणाला छेद देण्यात आला आणि जल संपत्ती नियमन प्राधिकरणाची स्थापना करुन धरणातील पाण्याचा प्राधान्यक्रम ठरविण्यासाठी शासनाने एक उच्चाधिकार सामिती नेमली होती. या समितीची स्थापना केल्यानंतर सरकारने एक निर्णय घेतला होता व त्याप्रमाणे प्रथम प्राधान्य उद्योगासाठी देण्यात आले आहे. पूर्वी पिण्याच्या पाण्याला पहिले प्राधान्य होते परंतु ते रद्द करुन आता उद्योगाला प्रथम प्राधान्य देण्यात आले आहे त्यानंतर दुसरे प्राधान्य पिण्यासाठी देण्यात आले आणि शेतीला तिसरे प्राधान्य देण्यात आले आहे.उद्योगाला प्रथम प्राधान्याने पाणी देण्यात आलेले असल्यामुळे हे सिंचन प्रकल्प उद्योगपतींसाठी बांधण्यात आलेले आहेत काय ? सिंचनासाठी आणि सिंचनाचा अनुशेष दूर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

करण्यासाठी तसेच ही भूमी सुजलाम , सुफलाम करण्यासाठी हे सिचन प्रकल्प उभे राहिले होते परंतु आता जणू काही हे प्रकल्प उद्योगासाठीच उभे राहिले आहेत अशा प्रकारचा निर्णय शासनाने घेतला आहे. शेतक-यांना उद्ध्वस्त करणारा हा निर्णय आहे. अप्पर वर्धा प्रकल्पातून पिण्याचे पाणी मिळणे तर आता दुरपास्तच झालेले आहे . अप्पर वर्धा प्रकल्प होण्यापूर्वी अमरावती जिल्हयात पाण्याचा प्रश्न अतिशय गंभीर स्वरुपाचा होता. 1986 साली तत्कालीन नगर विकास मंत्र्यानी विधान परिषदेत असे सांगितले होते की, पुरेशा पाण्याची व्यवस्था न झाल्यास वाढत्या लोकसंख्येमुळे अमरावती शहर हलविण्याचा प्रश्न निर्माण होईल. अमरावती शहर उचलून बाजूला ठेवावे लागेल की काय इतकी त्या शहरामध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली होती. त्या शहराला पाणी पुरवठा करण्याकरिता वेगवेगळे उपाय योजले गेले होते,त्यानुसार कूप नलिकाव्दारे अमरावती शहरातील लोकांची पिण्याच्या पाण्याची तहान भागवली गेली होती.आज त्या ठिकाणी कूप नलिकेव्दारे जे पाणी देण्यात आले होते त्या पाण्याची क्षमतासुध्दा कमी होत गेली आहे.1994 साली अप्पर वर्धा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर अमरावती शहर आणि या शहराच्या आजूबाजूला असलेल्या खेडयांची या संकटातून मुक्तता झाली होती. त्या प्रकल्पाचे पाणी 1994 सालापासून अमरावती शहराला मिळावयास लागले होते.अप्पर वर्धा धरणातून शहरासाठी आणि आजूबाजूच्या खेडयासाठी दिल्या जाणा-या पिण्याच्या पाण्यामध्ये 7 दशलक्ष घनमीटरची कपात करण्यात आली होती. अशा प्रकारे नागरी व ग्रामीण भागातील पाणी कमी करण्यात आले आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, नळाचे एक कनेक्शन जोडावयाचे असेल तर दोन ते तीन महिने लागतात. परंतु याठिकाणी इंडिया बुलच्या सोफिया या कंपनीला 48 तासात 87.60 दशलक्ष घनमीटर पाणी देण्यात आले. या सोफियाला पाणी दिल्यामुळे काय परिणाम होणार आहे? याचा परिणाम सिंचनाचा अनुशेष वाढण्यावर होणार आहे. विदर्भामध्ये एकूण 12 लाख हेक्टर सिंचनाचा अनुशेष आहे. त्यापैकी 7 लाख हेक्टर सिंचनाचा अनुशेष फक्त अमरावती विभागामध्ये आहे. या विभागाच्या पाच जिल्हयांमध्ये 7 लाख हेक्टर इतका अनुशेष असतांना अप्पर वर्धा धरण झाल्यामुळे अमरावती जिल्हयातील 50 हजार हेक्टर व वर्धा जिल्हयातील 25 हजार हेक्टर जमीन पाण्याखाली येणार होती. परंतु शासनाने अमरावती जिल्हयाच्या सिंचनासाठी राखीव असलेल्या कोटयामधून सोफियाला पाणी दिले. त्यामुळे तेथील जनता चिडली, त्याठिकाणी 40 हजार लोकांचा मोर्चा निघाला. याबाबतीत खरे म्हणजे शासनाने शेतकऱ्यांचा अंत पाहू नये. या सोफिया विरोधी आंदोलनाचे नेतृत्व माननीय प्रा. बी. टी. देशमुख सरांनी केल्यामुळे त्यांना हार पत्करावी लागली. परंतु त्याचबरोबर तेथील शेतकऱ्यांनी इशारा दिला की, अप्पर वर्धा धरणामधून आम्हाला पाणी न देता जर सोफियाला पाणी दिले तर शेतकऱ्यांच्या रक्ताचे पाट वाहतील याची सरकारने दखल घेतली पाहिजे.

सभापती महोदय, सोफियाला पाणी दिल्यामुळे 23 हजार 219 हेक्टर शेत जमीन सिंचनापासून वंचित राहिली. म्हणजे 23 हजार 219 हेक्टर शेतीला पाणी मिळणार होते ते आता मिळणार नाही. एकटया इंडिया बुल सोफिया या कंपनीला पाणी दिल्यामुळे 23 हजार 219 हेक्टर जमीन सिंचनापासून वंचित रहाणार आहे. हे शासनाने दिनांक 17 जून 2010 रोजी कबूल केले. एवढेच नव्हे तर अमरावती थर्मल पॉवर कंपनीला 13 हजार 424 हेक्टर जमीन बाधित होईल एवढे पाणी दिले.शासनाच्या या दोन्ही निर्णयामुळे 33 हजार 643 हेक्टर शेत जमीन सिंचनापासून वंचित राहणार आहे. अशाप्रकारे विदर्भावर अन्याय करणारा निर्णय घेऊन या राज्य सरकारने विदर्भातील जनतेवर दरोडाच टाकला आहे. राज्य सरकारच्या या निर्णयाला विरोध होऊ नये यासाठी इंडिया बुल कंपनीने 25 हजार लोकांना रोजगार मिळेल असे जाहीर केले. परंतु माझ्याकडे माहितीच्या अधिकारामध्ये मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार त्यांच्या प्रकल्प अहवालामध्ये कुशल आणि अकुशल रोजगार मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या फक्त 370 आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ ST/

श्री. पांडुरंग फुंडकर ...

इंडिया बुल कंपनीबरोबर ज्यावेळी करार झाला त्यावेळी अमरावती जिल्हयामधील 25 हजार बेरोजगारांना काम मिळेल असे करारात नमूद केले आहे. परंतु त्यांच्या प्रकल्प अहवालामध्ये फक्त 370 अकुशल कर्मचाऱ्यांची संख्या राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

सभापती महोदय, या उलट 36 हजार हेक्टर जमिनीचे सिंचन नष्ट झाल्यामुळे 2 हजार शेतकऱ्यांना या सुलतानी सरकारने रोजगारापासून वंचित केले आहे.दुसरी बाब अशी की, प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे शेती बाधित होणार आहे,त्यामधून हजारो शेतकरी उद्‌ध्वस्त होणार आहेत. विद्युत प्रकल्पामधून निघणा-या धुरामुळे आकाशामध्ये ब्लॅक झोन तयार होतो. त्यामुळे अमरावती जिल्हयातील नांदगाव पेठ येथील विमानतळ बेलोरा येथे हलविण्यात आला आहे. या सोफियाचा किती लोकांना फटका बसणार आहे हे सांगण्याचा मी प्रयत्न केला आहे. माझा सरकारला इशारा आहे की. तुम्ही शेतकऱ्यांचा अंत पाहू नका. अमरावती जिल्हयातील शेतकरी आता खवळलेला आहे. 40 हजार शेतकऱ्यांचा मोर्चा काढून त्यांनी सोफियाविरुध्द आवाज उठविला आहे. एका सोफियाला आपण आणून अमरावती जिल्हयातील 36 हजार हेक्टर जमिनीवरील सिंचन थांबविण्याचे पाप आपण करु नका. ते करण्याचा प्रयत्न केला तर त्यामधून आपल्याला शेतकऱ्यांचे रक्त घ्यावे लागेल. शेतकरी रक्त दिल्याशिवाय राहणार नाही. तो आपल्या रक्ताचे पाट वाहिल्याशिवाय राहणार नाही असा इशारा देतो आणि माझे वक्तव्य याठिकाणी संपवितो.

----

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी विजेच्या संदर्भात नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे. सन 2012 पर्यंत आपले राज्य विजेच्या दृष्टीकोनातून भारनियमनमुक्त करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने या ठिकाणी प्रयत्न सुरु केलेला आहे. भारत हा विकसनशील देश आहे आणि आर्थिक विकासाच्या संक्रमण काळातून देश मार्गक्रमण करीत असताना देशाचा सध्याचा जो आर्थिक विकास दर आहे त्यादृष्टीकोनातून 2012 पर्यंत आपल्याला वीज निर्मिती क्षमता 1 लाख 27 हजार 673 मेगावॅट वरुन 2 लाख 15 हजार 800 मेगावॅटपर्यंत न्यावयाची आहे. पारंपारिक इंधनाचे साठे दिवसेंदिवस कमी होत चालले आहेत. त्यामुळे ऊर्जेच्या किमतीमध्ये जी प्रचंड वाढ होत आहे त्यामुळे त्यातून मार्ग काढण्यासाठी आपल्याला नवीन उपाय शोधावे लागतात. आजपर्यंत उद्योगाच्या क्षेत्रामध्ये आणि विजेच्या क्षेत्रामध्ये देशात महाराष्ट्र हे अग्रेसर राज्य होते. परंतु आपण गेल्या काही वर्षाचा विचार केला तर वीज मिळत नसल्यामुळे महाराष्ट्रातील बरेच उद्योग इतर राज्यांमध्ये जाण्यास सुरुवात झालेली आहे. महाराष्ट्राच्या विकासाच्या बाबतीत त्याचा फार मोठ्या प्रमाणावर परिणाम झालेला आहे.

सभापती महोदय, पूर्वी देशात सर्वात जास्त वीज निर्मिती क्षमता महाराष्ट्र राज्याची होती. असे असूनही आज आपल्या राज्यामध्ये विजेची मागणी आणि पुरवठा यामध्ये जवळजवळ 4 हजार मेगावॅटची तफावत निर्माण झालेली आहे. या सगळ्या भारनियमनामुळे या ठिकाणी वेगवेगळ्या अडचणींना सामोरे जावे लागते. मी माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेबांना मनापासून धन्यवाद देतो. त्यांचे आभार मानतो. जैतापूरसारख्या 9900 मेगावॅट क्षमतेच्या मोठ्या प्रकल्पाला पर्यावरण खात्याची जी मान्यता पाहिजे ती मिळवून देण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी या ठिकाणी जी एक गोष्ट मांडली ती खरी आहे. महाराष्ट्रामध्ये विजेचे जे प्रकल्प होतात ते पूर्ण क्षमतेने चालविले जात नाहीत. फार मोठ्या प्रमाणावर विजेची चोरी होते, मोठ्या प्रमाणावर विजेची गळती होते. या

...2...

RDB/ D/ ST/

श्री. राजन तेली ....

सगळ्यांचा विचार करता ते प्रकल्प व्यवस्थित कसे चालतील या दृष्टीकोनातून शासनाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. जैतापूर प्रकल्पाचे समर्थन मी यासाठीच करतो. या ठिकाणी जैतापूरसारखा प्रकल्प व्हायला पाहिजे पण त्याचबरोबर कोकण पट्टीमध्ये येणारे जे इतर विद्युत प्रकल्प असतील ते सगळे प्रकल्प यापुढे होता कामा नये. फक्त जैतापूर प्रकल्पाच्या संदर्भात जे काही समज, गैरसमज आहेत ते दूर करण्याच्या बाबतीत कंपनीने पुढाकार घेतला पाहिजे. यामध्ये सगळ्या पक्षाचे लोक असतील. आमदार, खासदार, अगदी ग्रामपंचायत सदस्यांपर्यंत सर्वांनी बसून हा प्रकल्प म्हणजे नेमके काय आहे, या प्रकल्पात नेमके काय होणार आहे, या प्रकल्पाचे फायदे काय आहेत, या प्रकल्पाचे तोटे काय आहेत याची माहिती अगदी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपासून राजकीय क्षेत्रातील, सामाजिक क्षेत्रातील सर्व कार्यकर्त्यांना देणे गरजेचे आहे. ज्यावेळी तेथील शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने याची माहिती देऊ त्यावेळी त्या ठिकाणी यासंदर्भात जो विरोध आहे तो मावळल्याशिवाय राहणार नाही अशी माझी खात्री आहे. राज्यात होणारे खाजगी क्षेत्रातील असो किंवा केंद्र शासनाचे असो, जे प्रकल्प येतात त्यांचे आपण स्वागत करावयास पाहिजे. त्याच पध्दतीप्रमाणे त्या ठिकाणी जो विरोध झालेला आहे, लोकांच्या मनामध्ये जी शंका आहे त्या शंकेचे निरसन शासनाने किंवा न्युक्लिअर पावर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या कंपनीने करावयास पाहिजे. त्या ठिकाणी जे समज, गैरसमज आहेत ते दूर करणे आवश्यक आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, खऱ्या अर्थाने या प्रकल्पासाठी जैतापूरची निवड 1984 मध्ये करण्यात आली आणि 2005 मध्ये या प्रकल्पाला तत्वत: मान्यता देण्यात आली. 9900 मेगावॅटचा हा प्रकल्प देशातील आणि आशियातील सर्वात मोठा प्रकल्प आहे आणि जवळजवळ 90 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक त्या ठिकाणी होणार आहे. परंतु हे सर्व होत असताना आपण या ठिकाणी एक विचार केला पाहिजे की, 1984 साली ज्यावेळी या प्रकल्पाची सुरुवात झाली तेव्हापासून या प्रकल्पाची जी माहिती आहे ती वेळोवेळी शेतकऱ्यांपर्यंत, लोकांपर्यंत पोहोचविली जावयास पाहिजे होती. आज या प्रकल्पामध्ये सर्वसामान्य शेतकऱ्यांची 938 हेक्टर जागा जाते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली....

त्याचे पूर्णपणे भूसंपादन झालेले आहे. फक्त 15 कोटी सर्वसामान्य शेतक-यांना मिळत आहेत. 90 हजार कोटींचा प्रकल्प असेल आणि शेतक-यांना फक्त 15 कोटी देत असू तर शासनाने त्याचा विचार केला पाहिजे. एवढया मोठया प्रमाणात शेतकरी तयार व्हावयाचे असतील तर त्या कंपनीत यांना सहभागी करुन घेता येईल काय, त्याचे शेअर्स त्या शेतक-यांना देता येतील काय याबाबत विचार होणे आवश्यक आहे. त्याना किरकोळ पैसे देण्यापेक्षा त्यांना सहभागी करुन घेतले पाहिजे. त्यांना वर्षाला किंवा महिन्याला मोबदला दिला तर निश्चितपणे शेतकरी पुढे येतील. आज अनेक प्रकल्प राज्यात होत आहेत, तेथील भूसंपादनाचा प्रश्न, पुनर्वसनाचा प्रश्न, शेतक-यांचा प्रश्न असतो. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी त्याचा उल्लेख केला आहे. आज प्रकल्प पूर्ण होत आले तरी त्या शेतकऱ्यांचे भूसंपादनाचे पैसे मिळालेले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. म्हणून शेतकरी वर्ग घाबरलेला आहे. या शेतक-यांना जर दिलासा द्यावयाचा असेल, शेतक-यांचे गैरसमज दूर करावयाचे असतील तर शासनाने पुढाकार घेऊन त्यांना या प्रकल्पात सामावून घेतले पाहिजे. या प्रकल्पावर 90 हजार कोटी रुपये खर्च होत असतील आणि त्याच्या तुलनेत केवळ 15 कोटी रुपये देऊन त्यांची चेष्टा केली जात असेल तर तो शेतक-यांवर अन्याय आहे. म्हणून शेतकऱ्यांना यामध्ये सामावून घेण्यासाठी शासनाने आपली भूमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, या प्रकल्पाचा सर्व्हे 1984 साली झाला. या प्रकल्पाचे सर्वेसर्वा अणुऊर्जा आयोगाचे तत्कालीन अध्यक्ष डॉ.काकोडकर हे होते. त्यांनी पुण्यामध्ये स्पष्टपणे सांगितले होते की, या प्रकल्पासाठी ही जागा उत्कृष्ट आहे. या प्रकल्पाचा कोकणातील शेती, पाणी, सागरी जीवसृष्टी यावर कोणताही परिणाम होणार नाही. यासंबंधातील समज, गैरसमज लोकांपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे. अणू ऊर्जेचा जगातील काही देशांनी वापर केलेला आहे. अणू ऊर्जेतून निर्माण होणा-या किरणोत्सर्गापासून मानवाच्या प्रकृतीवर, पिकांवर होणारे परिणाम यासाठी विनाकारण भीती बाळगली जात आहे असे मला म्हणावयाचे आहे.

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली.....

सभापती महोदय, जगाचा विचार केला तर अमेरिकेत 104 अणू ऊर्जा प्रकल्प आहेत. फ्रान्समध्ये 58 प्रकल्प आहेत. अमेरिकेतील 104 प्रकल्पातून 1 लाख 747 मेगावॅट इतकी विजेची निर्मिती केली जाते. फ्रान्समध्ये एकूण लागणा-या विजेपैकी 75 टक्के वीज ही अणू ऊर्जा प्रकल्पाद्वारे उपलब्ध होते. जपानमध्ये 54 प्रकल्प आहेत, रशियात 32, इंग्लंडमध्ये 19 आणि भारतात केवळ 18 प्रकल्प आहेत. आजमितीपर्यंत एकही अपघात झालेला नाही, अशाप्रकारचा हा अहवाल सांगतो. ही माहिती सर्वसामान्य सगळया जनतेला, राजकीय पुढाऱ्यांना व सामाजिक क्षेत्रात काम करणा-यांना दिली तर या प्रकल्पाला होत असलेला विरोध हळूहळू मावळल्याशिवाय राहणार नाही असे मला वाटते. भारतात आतापर्यंत अणू ऊर्जेपासून 4780 मेगावॅट वीजनिर्मिती झालेली आहे, आपल्याकडे एकूण 18 अणुभट्टया आहेत, त्यापैकी 4 तारापूरला, 6 राजस्थानमध्ये, 4 कर्नाटकमध्ये, प्रत्येकी 2 अणुभट्टया तामीळनाडू, उत्तर प्रदेश व गुजरात या राज्यात आहेत. तारापूर येथील एक अणुभट्टी 1973 पासून कार्यरत आहे, दुसरी 1984 पासून कार्यरत आहे. तथापि, सुरक्षिततेच्या उपायांमुळे आजमितीपर्यंत देशात एकही अणू अपघात झालेला नाही. सबब, अणू ऊर्जा विषयक स्थानिक ग्रामस्थांच्या मनातील भीती संवादाद्वारेच काढणे शक्य आहे. अणू प्रकल्प सुरु होण्यापूर्वी प्राथमिक सुरक्षा विश्लेषण अहवाल तयार केला जातो. शक्यशक्यतेचा विचार करुनच तो मांडलेला आहे. पर्यावरण विषयक निरी या संस्थेने अभ्यास केला आहे. कॉलेज ऑफ फिशरीज, रत्नागिरी, कॉलेज ऑफ फॉरेस्ट्री, दापोली, सेंट्रल वॉटर पॉवर रिसर्च स्टेशन, पुणे अशा विविध संस्थांनी विविध बाबींबाबत अभ्यास करुन त्याचे निष्कर्ष योग्य असे आल्यानेच केंद्रीय पर्यावरण विभागाने या प्रकल्पाला पर्यावरण विषयक मंजुरी दिली आहे.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 18:25

श्री. राजन तेली...

2019 मध्ये युनिट 1 व 2 कार्यान्वित झाल्यानंतर पुनश्च इपीअे करण्याची परवानगी घेण्यास सांगितलेले आहे.

अशा प्रकारच्या अणुभट्टया कोकणात प्रथमच उभारण्यात येत आहेत. त्या कितपत यशस्वी होतील तसेच किरणोत्सार झाल्यास मोठ्या प्रमाणावर जीवित हानी होईल अशा प्रकारची भीती स्थानिकांच्या मनात दिसते. परंतु ही भीती निराधार आहे. आता ज्या प्रकारच्या अणुभट्टया उभारण्यात येत आहेत तशा प्रकारच्या अणुभट्टया फ्रान्स, चीन व फिनलँडमध्ये उभारण्यात येत आहेत. किरणोत्साराच्या बाबतीत क्षणोक्षणी मोजमाप करण्यासाठी या प्रकल्पात एक पर्यावरण सर्वेक्षण व वातावरण विज्ञान प्रयोगशाळा उभारण्यात येणार असून त्याद्वारे 30 कि.मी. परिघातील अन्न, हवा, पाणी, जलचर इत्यादींचे सातत्याने नमुने घेऊन किरणोत्सार नियंत्रणात आहे याची खात्री करुन घेण्यात येणार आहे. गावामध्ये विविध सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी प्रत्येक गावाला दोन कोटी रुपये देण्यात येण्ार आहेत. या प्रकल्पामुळे एकाही कुटुंबाचे घर बाधित होणार नाही किंवा एकाही शेतक-याचा नांगर जाणार नाही. पडीक जमिनीवर हा प्रकल्प उभारण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे कुणाचे पुनर्वसन करण्याचा प्रश्न नाही. 1969 पासून भारतात आजमितीपर्यन्त 18 अणुभट्टया असून कोणताही अपघात त्यात झालेला नाही. कारण सुरक्षिततेचे सर्व उपाय तेथे योजले जातात. राज्याची विजेची वाढती गरज भागविण्याच्या दृष्टीने जैतापूरसारखा अणुऊर्जा प्रकल्प राज्याला आवश्यक आहे. भविष्यात कोळसा, गॅस या इंधनांचे साठे कमी कमी होत जाणार असून सौर ऊर्जा, पवन ऊर्जा व अणू ऊर्जा हेच ऊर्जा निर्मितीचे महत्वाचे मार्ग राहणार आहेत. आज राज्याचा विचार केल्यास पवन ऊर्जा निर्माण होण्यासाठी जिथे योग्य साईट आहे तिथे प्रकल्प उभारले गेले असल्याने राज्यात तशा कमी साईट्स उपलब्ध होतील. सौर ऊर्जेचा विचार करावयाचा झाल्यास त्याचा दर प्रति युनिट रु 17.91 असा आहे या दराने वीज खरेदी केल्यास साहजिकच सर्वच ग्राहकांच्या वीज दरात वाढ करावी लागेल. म्हणून या जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पास पाठिंबा दिला पाहिजे.

दाभोळच्या एन्रॉन प्रकल्पाच्या बाबतीत अनेक गैरसमज झाले. 1995ला हा प्रकल्प रद्द करण्याचा घाट घालण्यात आला. त्या विषयामध्ये मी आता जाऊ इच्छित नाही. नंतर तो प्रकल्प पुन्हा होण्यासाठी कोकणातील लोकांनी आंदोलन केले. माझे मित्र आणि माजी आमदार डॉ.विनय

.2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली...

नातू यांनी सांगितले होते की, त्या प्रकल्पामुळे आंबा आणि भात शेतीवर तसेच समुद्रातील माशांवर कोणताही परिणाम झालेला नाही. म्हणून या प्रकल्पाचे मी समर्थन करीत आहे. या निमित्ताने मी दोन-तीन मागण्या करुन माझे भाषण संपवितो. हा जैतापूरचा प्रकल्प झाल्यानंतर कोकण भारनियमनमुक्त केला पाहिजे. या प्रकल्पामुळे जे उद्योग येतील ते जास्तीत जास्त कोकणामध्ये आले पाहिजेत आणि माझी शेवटची मागणी ही आहे की या जैतापूरच्या प्रकल्पानंतर कोकणामध्ये अन्य कोणताही विजेचा प्रकल्प येता कामा नये याची खबरदारी घेतली गेली पाहिजे, शेतक-यांना कंपनीत इक्वीटी देऊन त्यांची मालकी घोषित केली पाहिजे, एवढे बोलून आणि या प्रकल्पाचे समर्थन करुन मी माझे भाषण संपवितो.

----

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, म.वि.प.नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, योगायोगाने ज्या गावात वीज निर्मिती होते त्याच गावातील नागरिक या नात्याने मला याठिकाणी विचार मांडण्यास आनंद होत आहे आणि दु:खही होत आहे. वीज निर्मितीचे चांगले आणि वाईट असे दोन्ही प्रकारचे परिणाम अनुभवणारे आम्ही लोकप्रतिनिधी आहोत. विजेची गरज माणसाला किती आहे हे आपल्या सगळयांना माहिती आहे. अन्न, वस्त्र व निवारा याप्रमाणेच आज मानवाच्या जीवनात विजेची गरज अतिशय महत्वाची ठरली आहे. आजच्या आधुनिक युगामध्ये वीज सुध्दा तितकीच महत्वाची आहे. हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्या जेवढ्या महत्वाच्या आहेत त्या प्रमाणेच माणसाच्या जीवनामध्ये विजेला महत्व प्राप्त झाले आहे. मी सभागृहाला एवढेच सांगू इच्छितो की, ज्याप्रमाणे हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या एखाद्या रक्तवाहिनीमध्ये अडथळा निर्माण झाल्यास हृदयाविकाराचा धक्का बसतो त्याप्रमाणेच महाराष्ट्रातील जनतेला विजेचे धक्के बसू लागले आहेत. नवीन वीज प्रकल्पांबाबत कोणकोणत्या दक्षता घेतल्या पाहिजेत याचे जिवंत उदाहरण पहावयाचे असेल तर परळी वीज निर्मिती केंद्राकडे पहावे लागेल.

सभापती महोदय, माझ्याकडे कागदोपत्री असलेली वस्तुस्थिती मी आपल्याकडे सादर करीत आहे. 1190 मे.वॅट वीज निर्मिती करणारे परळी शहर, परंतु परळी शहरावर वीज निर्मिती केंद्राचे काय काय परिणाम झाले? शेतकऱ्यांची हजारो हेक्टर जमीन या प्रकल्पाच्या उभारणीसाठी संपादित करण्यात आली. वीज प्रकल्प उभारण्यासाठी वीज मंडळाला जमिनीची गरज होती त्यावेळी वीज मंडळाने शेतकऱ्यांकडे जमिनी देण्यासंबंधी भीक मागितली. मला या चर्चेच्या निमित्ताने एका गोष्टीकडे सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे. ज्यावेळी एखादा प्रकल्प उभारावयाचा असतो त्यावेळी शासन शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी प्रकल्पासाठी द्याव्यात म्हणून भीक मागते. शेतकऱ्यांना वेगवेगळी प्रलोभने दाखविली जाऊन त्यांच्या जमिनी संपादित केल्या जातात. एकदा जमिनी संपादित झाल्या की मग मात्र प्रकल्पग्रस्त शेतकरी शासन दरबारी अर्ज करुन बेजार होतो. त्याला शासनाकडून न्याय मिळत नाही. ही वस्तुस्थिती परळी वीज निर्मिती केंद्राच्या माध्यमातून समोर आली आहे. आज राज्यात विजेची टंचाई आहे हे आम्हाला मान्य आहे. परंतु मागील दहा वर्षाच्या काळात आघाडी सरकारला या क्षेत्रात काहीच प्रगती करता आली नाही हे कबूल करावे लागेल. कमीत कमी या चर्चेच्या अंती शासनाच्या उत्तरामधून हे पुढे आले पाहिजे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे................

की, 55-55 हजार मे.वॅट निर्मिती करणारे वीज प्रकल्प कोकण आणि विदर्भ परिसरात उभारण्याचा प्रयत्न होत असताना या जैतापूर अणूऊर्जा प्रकल्पाच्या निमित्ताने चर्चा करण्यासाठी 10 वर्षे वाट पहावी लागली. आजच्या वीज टंचाईच्या परिस्थितीत अनेक प्रकारची संकटे समोर उभी आहेत. सगळ्यात जास्त संकट ग्रामीण महाराष्ट्रावर ओढवले आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात दररोज 12-12 तास भारनियमन केले जात आहे.

नंतर 4इ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे ........

काही ठिकाणी तर 16-16 तास भार नियमन असते. अशा प्रकारे भार नियमन असताना देखील ज्या उपकेंद्रातून विजेचा पुरवठा केला जातो तेथे जर अचानक फॉल्ट झाला तर मात्र आठ आठ तास त्याच कारणामुळे वीज मिळत नाही हे आणखी वेगळेच संकट असते. मग कुठेतरी या सर्व बाबतीत विचार करणार की नाही असा माझा सवाल आहे.

महोदय, उद्या 1.10 लाख मेगावॅट वीज निर्माण होऊन देखील आजचीच परिस्थिती निर्माण होणार नाही हे शासन सांगू शकते काय, याचाही खुलासा झाला पाहिजे. आज 6-7 हजार मेगावॅटचा तुटवडा असताना एवढी भयंकर परिस्थिती आपण पाहतो आहे. म्हणून वीज निर्माण करणे जितके महत्वाचे असते तेवढेच महत्वाचे तिच्या वितरणाची व्यवस्था करणे हे देखील आहे. अशा प्रकारची वीज निर्माण करीत असताना तिच्या वितरणाच्या बाबतीत शासन काय करणार आहे याचे स्पष्टीकरण होणे महत्वाचे आहे. आताच माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, ट्रान्सफार्मर मिळण्यामध्ये किती अडचणी येतात? बऱ्याच ठिकाणी अशी काही सब स्टेशन्स आहेत की, आठ दहा महिने ती बंद पडतात परंतु त्यांना 5 के.व्ही. चा ट्रान्सफार्मर मिळत नाही. अशी अनेक गावे या राज्यात आहेत की, अशा कारणांमुळे ती गावे अंधारात आहेत. अशा प्रकारे वीज असताना सुध्दा वितरणाची व्यवस्था चांगली नसल्यामुळे ती मिळत नाही ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. म्हणून वीज निर्मितीकडे जितके लक्ष शासन देत आहे तेवढेच लक्ष वितरणाकडेही दिले पाहिजे अशी माझी मागणी आहे. हजारो मेगावॅट वीज आपल्या राज्यात भविष्यात निर्माण होणार आहे पण सध्या जे जुने वीज निर्मिती प्रकल्प आहेत त्यांची अवस्था यापूर्वीच्या सन्माननीय सदस्यांनी सभागृहात सांगितलीच आहे. हे प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालविण्यात शासनाला अपयश का येत आहे याचेही उत्तर मिळाले पाहिजे.

सभापती महोदय, परळी येथील औष्णिक वीज केंद्राचा विचार केला तर 6 मिलियन युनिट वीज निर्माण करणारे हे केंद्र आहे पण जाणीवपूर्वक या केंद्राला सांगण्यात आले की, फक्त 4.50 लाख युनिट एवढीच वीज निर्मिती करायची, त्यापेक्षा जास्त करायची नाही. आम्ही तेथील अधिकाऱ्यांना विचारले असता मिनिमम टेक्नीकल लोड अशा प्रकारचे टेक्नीकल कारण आम्हाला ते अधिकारी सांगतात आणि कमी उत्पादन काढतात. यामागील नेमके कारण काय आहे याचाही खुलासा झाला पाहिजे. त्यामुळे अशीही शंका निर्माण होते की, राज्यात खरोखरच विजेची टंचाई



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे ........

आहे की, जाणीवपूर्वक ती निर्माण केली जाते, याचाही कुठेतरी विचार झाला पाहिजे. परळी वीज केंद्रातील संच क्र. 6 हा सन 2007-08 मध्ये तब्बल 221 वेळा म्हणजे ऑफिशियल रेकॉर्डनुसार 4486 तास बंद होता. तसेच सन 2008-09 मध्ये हाच संच, जो आघाडीच्या सरकारने नव्याने तयार केला आहे तो देखील अडीच महिने बंद होता. एकीकडे नवीन वीज निर्मितीच्या बाबतीत विरोधी पक्षांकडून समर्थनाची अपेक्षा करायची, सभागृहात त्यावर चर्चा करायची आणि त्या माध्यमातून हा प्रकल्प व्हावा अशी भूमिका घ्यावयाची आणि दुसऱ्या बाजूला मात्र तुमच्याच काळात हे प्रकल्प झाले आहेत, त्यांची ही अवस्था आहे असे सांगायचे यामुळे संशय निर्माण होतो. राज्यात 55 हजार मेगावॅटचे मोठे प्रकल्प शासन उभे करणार आहे ते सुरळीतपणे चालतील याची खात्री काय याचाही खुलासा झाला पाहिजे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

आपल्या राज्याची विजेची मागणी व तुटवडा याचा विचार करता आपल्याला 6 हजार मे.वॅ. चा तुटवडा आहे. या ठिकाणी मा. उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे की, आपले राज्य सन 2012 मध्ये भारनियमन मुक्त होणार आहे. सन 2012 मध्ये अजून विजेचा किती तुटवडा निर्माण होईल याबाबतीत त्यांच्याकडून कधीच माहिती दिली गेली नाही.

या नवीन वीज निर्मितीच्या प्रकल्पातून जे प्रदूषण होणार आहे त्याचा विचार करण्याची वेळ आता आलेली आहे. परळी तालुक्याचा नागरिक म्हणून मी आपल्याला विनंती करतो की, आपण कधी तरी परळीमध्ये या आणि परळीतील प्रदुषणाची अवस्था पहा. आपण जेव्हा थंड हवेच्या ठिकाणी धुके पाहतो त्यावेळेस आपल्याला आनंद होतो. परंतु परळी तालुका हा बाराही महिने धुराचे धुके पाहतो आहे. परळी तालुक्यातील 35-40 गावात बाराही महिने प्रचंड प्रमाणात धुराचे धुके पडलेले असते. परळी शहरा लगतच्या 25 गावातील 35 टक्के आजार परळीच्या थर्मल पॉवर प्लँटने झालेले आहेत. त्यात 35 टक्के जनता दम्याच्या आजाराने, त्वचेच्या आजाराने व कॅन्सरने आजारी आहेत. एवढेच नाही तर 35 टक्क्यामध्ये 11.5 टक्के मुले ही दोन अडीच वर्षाची आहेत. ही बालके दम्याच्या आजाराने ग्रस्त आहेत. या सर्वांचे कारण फक्त प्रदूषण आहे. प्रदूषणाच्या बाबतीत परळीमध्ये अनेकदा आंदोलने झाली. येथून पुढे नवीन युनीट करतांना आम्ही योग्य ती काळजी घेऊ एवढेच आम्हाला आश्वासन मिळालेले आहे. परंतु पुढील काळजी मात्र कधीच घेतली जात नाही. परळी शहरापासून 4 कि.मी. अंतरावर राखेचे तळे आहे. या प्लँटमधील राख या तळयात सोडली जाते परंतु त्यात पाणी सोडले जात नसल्यामुळे परळी शहरात प्रदुषण होत आहे. परळी शहरापासून 5 कि.मी. अंतराच्या आतच हा प्रकल्प आहे. या प्रकल्पापासून जे प्रदूषण होत आहे ते होऊ नये यासाठी मात्र काहीही होतांना दिसत नाही.

सभापती महोदय, प्रकल्पासाठी जमीन घेत असतांना आम्हाला महामंडळाने सांगितले होते की, तुम्ही आम्हाला जमीन दिली तर आम्ही तुमच्या घरातील एका मुलाला या प्रकल्पामध्ये नोकरी देऊ. त्यावेळेस मात्र नोकरीच्या अटीच्या संदर्भात काहीही उहापोह झाला नव्हता. ज्यावेळी प्रत्यक्षात नोकरी देण्याची वेळ आली तेव्हा मुलाने स्ट्रेस टेस्ट दिली पाहिजे, अशा जाचक अटी लावून

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

हजारो शेतक-यांच्या मुलांना डावलले जात आहे. आता पुन्हा परळीमध्ये आठव्या नवीन संचाला मान्यता मिळाली आहे. सुरुवातीला या प्रकल्पासाठी जवळपास 750 शेतक-यांनी जमिनी दिल्या होत्या. माझ्या कुटुंबातील कोणीही सातवीच्यावर शिकला नसेल आणि शासनाने सांगितले की, प्रकल्पासाठी जमीन दिली तर तुझ्या घरातील एका सदस्याला प्रकल्पामध्ये नोकरी दिली जाईल. अशा प्रकारे नोकरीच्या आशेने या भागातील शेतक-यांनी शासनावर विश्वास ठेवला व त्या विश्वासाच्या आधारे शेतक-यांनी प्रकल्पासाठी जमिनी दिल्या.

सभापती महोदय, मी आपल्याला उदाहरण देतो की, धर्मराज मारुती ठिपकर या शेतक-याने आपली सर्व जमीन या प्रकल्पासाठी दिली परंतु त्याला आजही नोकरी मिळाली नाही. त्याने अनेक वेळा आंदोलन केले परंतु थोडे जरी आंदोलन झाले की, प्रशासनाकडून कठोर कारवाया होतात व आंदोलने मोडून काढली जातात. या प्रस्तावाच्या माध्यमातून माझी शासनाला एकच विनंती आहे की, वीज निर्मितीचे नवीन प्रकल्प तयार करीत असतांना प्रथम ज्यांची जमीन घेतली जाते त्यांना नोकरीत सामावून घेतले पाहिजे, केवळ आश्वासनच नव्हे तर प्रत्यक्ष नोकरी दिली पाहिजे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.......

या सर्व गोष्टींची माहिती विचारात घेऊन माननीय मंत्रीमहोदयांनी त्यांच्या भाषणामध्ये उत्तरे द्यावीत. तसेच नवीन प्रकल्प करीत असताना भविष्याचा वेध घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करावी अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अर्धातास चर्चेच्या सूचनांबाबत**

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेत दाखविण्यात आलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना आज घेण्यात येणार आहेत काय ?

**उपसभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेतील अर्धा तास चर्चेच्या सूचना आज घेतल्या जाणार नाहीत.

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ ST/ D/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 18:45

**पृ.शी.**: राज्यात सुरु असलेले विजेचे भारनियमन

**मु.शी.**: राज्यात सुरु असलेले विजेचे भारनियमन या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, रामदास कदम, विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत, श्री.संजय केळकर, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री रामनाथ मोते, परशुराम उपरकर, चंद्रकांत पाटील, किरण पावसकर, वि.प.स.यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु...)

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी म.वि.स. नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, येणारे नवीन वीज प्रकल्प आणि अस्तित्वात असलेल्या विजेचे वाटप असा या प्रस्तावाचा विषय आहे. मला येथे खेदाने नमूद करावेसे वाटते की, मागील एक आठवडा आम्ही उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या मुद्यावर कामी आणला. विरोधी पक्षाचा असलेला आग्रह आणि त्या आग्रहापोटी सरकारने जाहीर केलेली भूमिका किती योग्य व किती अयोग्य होती हे कालांतराने पहावयास मिळणार आहे. धीराने घेणाऱ्या माननीय मुख्यमंत्री महोदयांचा आदर्श घेऊन आजच त्यांच्या निर्णयावर टीकाटिप्पणी करण्यापेक्षा धीराने त्यांना ती ऐकावयास मिळणार आहे.

सभापती महोदय,सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांच्याकडे लोक एका विश्वासाने पाहत आहे. दादांनी शेतकऱ्यांच्या विजेच्या पंपाची तोडलेली वीज तातडीने जोडण्यात येईल,परंतु शेतकऱ्यांना वीज बील भरावे लागेल असे सांगितले. त्यावेळी मी त्यांचे अभिनंदन केले. कारण शेतकऱ्यांना विजेची तातडीने आवश्यकता होती. परंतु आजही विजेअभावी ग्रामीण भागात कामे सुरु झालेली नाहीत. माननीय वीज मंत्र्यांनी वीज जोडणीचे आदेश दिल्यानंतरही आजही अनेक अधिकारी कालपर्यंत आणि आताही हेच सांगत आहेत की, आम्हाला वरुन आदेश मिळाले नाहीत. मला अधिकाऱ्यांचे वागणे काही समजत नाही. या सार्वभौम सभागृहात माननीय मंत्रीमहोदयांच्या मुखातून एखादे आश्वासन वा आदेश बाहेर पडल्यानंतर तो आदेश आहे असे

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

समजावे. तो आदेश कागदावर कसा गिरवावयाचा ही जबाबदारी अधिकाऱ्यांची आहे.. शेतकऱ्यांच्या उद्ध्वस्ततेची तळमळ आणि तातडी लक्षात घेऊन सभागृहात मंत्रीमहोदयांनी सायंकाळी 6.00 वाजता एखादा आदेश दिल्यास त्या आदेशाच्या अंमलबजावणीस सायंकाळी 7.00 वाजल्यापासून सुरु व्हावयास पाहिजे. कारण आता पूर्वीसारखी परिस्थिती राहिलेली नाही. माननीय मंत्रीमहोदयांचे आदेश सर्व अधिकाऱ्यांना एस.एम.एस.करुन त्यांची अंमलबजावणी करण्याबाबत सूचित करता येईल. अधिकारी मंत्रीमहोदयांना पराभूत करण्यासाठी कष्ट घेत आहेत की माननीय मंत्रीमहोदयांच्या आदेशाची अवलेहना करीत आहेत अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांची 200 कोटी रुपयांची थकबाकी असताना आणि कृषी पंपावरील वीज जोडणीची घोषणा करुन देखील कृषी पंपाना वीज देयक भरल्याशिवाय जोडणी करता येणार नाही असे अधिकारी सांगत आहेत. या सदनामध्ये एखाद्या विषयावर चर्चा होते त्यावेळी त्या चर्चेमध्ये दोन्ही बाजूचे सदस्य भाग घेत असतात. त्या चर्चेच्या अनुषंगाने सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जो काही सामना आणि संघर्ष होत असतो, तो निर्णय घेण्यासाठी होत असतो आणि त्यावेळी झालेल्या निर्णयाची अंमबजावणी करण्याची जबाबदारी अधिकाऱ्यांची असते. याठिकाणी जो कोणी अधिकारी निर्णयाची अंमलबजावणी करणार नाही त्यांना दादांनी सज्जड दम दिलेला आहे. त्याची अंमलबजावणी दादा करणार का हे देखील आम्ही आता पाहणार आहोत. कोणाच्या कर्तृत्वाचा आणि कोणाच्या कृतीचा हा प्रश्न नाही तर सरकारने घेतलेल्या निर्णयाची अशी अवहेलना होणार असेल आणि गेला संपूर्ण आठवडा ज्यांच्याकरिता खर्ची घातला त्यांच्यासाठी काही निष्पन्न होणार नसेल तर ती अतिशय गंभीर बाब आहे.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ D/ ST/ प्रथम श्री.अजित शिगम 18.50

श्री.दिवाकर रावते...

आजच्या चर्चेचा हा प्रमुख विषय मी सुरुवातीलाच मांडत आहे.

सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली या विषयावर कौतुकाने सांगत होते ते ऐकतांना मला बरे वाटले. केन्द्रीय पर्यावरण मंत्री श्री.जयराम रमेश यांनी पर्यावरणाच्या काही अटी घालून जैतापूरच्या प्रकल्पाला मान्यता दिली होती.परंतु ही परवानगी नेमकी कोणी आणली आहे हा महत्वाचा प्रश्न आहे. खालच्या सभागृहामध्ये सन्माननीय मंत्री श्री सुनील तटकरे यांनी अभिमानाने असे सांगितले होते की, माननीय मंत्री महोदयांनी सुत्रे हाती घेतल्यानंतर जैतापूर प्रकल्पाला पर्यावरण विभागाची मान्यता मिळवून दिली होती. त्यांनी रेकॉर्डवर तसे म्हटलेले आहे.तेव्हा पर्यावरणाची मान्यता राष्ट्रवादीची आहे की कॉग्रेसची आहे असा प्रश्न आपणच उपस्थित केलेला आहे.तो प्रश्न आम्ही उपस्थित केलेला नाही. जेव्हा आम्ही प्रश्न उपस्थित करतो तेव्हा भांडणे लावतो असे म्हटले जाते.तेव्हा या प्रकल्पाला पर्यावरणाची जी मान्यता मिळवून दिली गेली ती नेमकी कोणी दिली होती हा प्रश्न आपल्याच माध्यमातून निर्माण होतो. एका एका प्रकल्पाच्या बाबतीत प्रकल्प निर्मितीतील गहन प्रश्न आपण सोडविणार आहात की निर्माण करणार आहात असा प्रश्न निर्माण होतो.

जैतापूर प्रकल्पाच्या बाबतीत येथे चर्चा सुरु आहे. माझ्या पक्षाच्या वतीने जैतापूर प्रकल्पासंबंधी बोलावे असे मला सांगितले आहे असे सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी मघाशी सांगितले होते.अॅटोमिक विषयावर बोलणे हे फार अवघड काम आहे. ते आमचे काम नाही. कॉलेजमध्ये असतांना अॅटम या शब्दाबद्दल आम्ही एवढेच शिकले आहे की, "Neither it can be destroyed nor created" एवढे लिहिल्यानंतर आम्हाला दोन मार्क्स मिळत होते. त्या व्यतिरिक्त आम्हाला त्याचे काहीही ज्ञान नाही. परंतु अॅटोमिक ज्ञान ते आम्हाला सांगत होते.त्यावेळी मला त्यांच्याबद्दल खूपच आदर वाटला होता. या सभागृहामध्ये प्रगल्भ,
वैज्ञानिक,परीक्षण करणारे,निरीक्षण करणारे,अणु स्फोटाबाबत भाष्य करणारे सदस्य पाहिल्यानंतर मला बरे वाटले होते.ते असे म्हणाले की, या प्रकल्पामुळे सागरावर काहीही परिणाम होणार नाही. 99 हजार कोटी रुपयांचा ते सारखा उल्लेख करीत होते.एवढा मोठा प्रकल्प तेथे उभा राहणार असल्यामुळे समुद्राच्या मार्गावर किती आरमार चालणार आहे.? हा प्रकल्प झाल्यामुळे जहाजांची वर्दळ मोठया प्रमाणावर वाढणार आहे. हा अणु उर्जा प्रकल्प समुद्राच्या किना-यावरच का

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

असावा,तो सातारा सांगालीमध्ये का नसावा, हा प्रकल्प मराठवाडयाच्या आणि विदर्भाच्या कुशीत का नसावा ? या प्रकल्पातून वीज निर्मिती करीत असतांना मोठया प्रमाणावर पाण्याची गरज भासत असल्यामुळे आणि ही गरज समुद्रातील पाण्यामुळे भागणार असल्यामुळे समुद्र किना-याजवळ हा प्रकल्प उभा केला जात आहे.त्या प्रकल्पामुळे जहाजांची जी वर्दळ वाढणार आहे तो एक वेगळा विषय आहे. या विषयासबंधी मला काही फारसे ज्ञान नाही परंतु मला जी माहिती मिळालेली आहे त्याप्रमाणे या प्रकल्पासाठी 10 कोटी लिटर्स पाणी दररोज खेचले जाणार आहे आणि प्रक्रिया झालेले पाणी पुन्हा समुद्रात सोडले जाणार आहे. अशा प्रकारे दररोज दहा कोटी लिटर्स पाणी समुद्रातून खेचणे आणि पुन्हा ते पाणी समुद्रात सोडणे यामुळे समुद्र मंथन कसे होईल याची कल्पना करण्यास काहीच हरकत नाही. या प्रकल्पातून उष्ण पाणी सोडले जाणार आहे त्यामुळे त्या पाण्याचा परिणाम सागरी जीवनावर काय होणार आहे.मासेमारीवरसुध्दा त्याचा काय परिणाम होणार आहे,हे विचारात घ्यावे लागेल.

श्री.जयराम रमेश यांनी सांगितलेल्या अनेक अटी पैकी एक अट माझ्या लक्षात आहे. त्यांनी असे सांगितले की, खारफुटीची विशेष काळजी घ्यावी लागेल. त्या भागात जहाजांची वर्दळ वाढल्यामुळे खारफुटी विखुरली जाणार आहे आणि खारफुटी नष्ट होणार आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

माझ्याकडे डॉ. माधव गाडगीळ समितीने पर्यावरणासंबंधी दिलेला अहवाल आहे. माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी तो वाचला आहे. त्यांनी आपल्या दौऱ्यामध्ये पर्यावरणावरील प्रकल्पाच्या प्रभावाचा अंदाज घेऊन प्रतिकूल असा शेरा मारला. अशाप्रकारचे विविध विषय त्या अहवालामध्ये आहेत. त्याबाबतीत माझा वेगळा प्रश्न आहे. "होय" या महाराष्ट्रामध्ये लोड शेडींगमुळे अंधार आहे . या सदनातील सर्व माननीय सदस्य आपल्या ग्रामीण भागामध्ये जात येत असतात, काम करीत असतात. त्यामुळे राज्याच्या काही भागामध्ये 16 तास भार नियमन आहे तर काही भागामध्ये 14 तास आहे, तर काही भागामध्ये 12 तास भार नियमन आहे. अशा या महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील लोकांमध्ये एक मानसिकता निर्माण झाली आहे. एखाद्या गावकऱ्याला मेडल द्यावे अशाप्रकारे सरकार जाहीर करते की, आज अमूक एका भागामध्ये दोन तासांनी लोड शेडींग कमी झाले आहे. त्यामुळे गावातील शेतकरी आनंदाने टाळया वाजवितो. त्याला केवढा मोठा आनंद होतो. म्हणजे 16 तासांचे लोड शेडींग 14 तास झाल्याबद्दल त्यांना आनंद होतो. हे लोडशेडींग त्यांच्या किती अंगवळणी पडले आहे? या लोड शेडींगबद्दल आपण त्यांना वर्षानुवर्षांची सवय करुन दिली आहे. म्हणजे घरामध्ये जर उजेड पडला तर त्यांना धक्का बसेल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यांच्या घरामध्ये उजेड नसेल तर त्यांना चिंता वाटत नाही, परंतु शेती पंपाला वीज मिळाली नाही तर चिंता वाटते. घरामध्ये दिवा पेटविण्यासाठी घासलेट पाहिजे असेल तर ते सुध्दा आज काळया बाजारामध्ये विकले जाते.

सभापती महोदय, हे विचार याठिकाणी मांडीत असतांना माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी एक चांगला मुद्दा मांडला. त्यांनी असे सांगितले की, 10 हजार मेगावॅटचा जैतापूरचा प्रकल्प होणार असेल तर आमच्या कोकणामधील बाकीचे काहीही हटता कामा नये. सभापती महोदय, आदरणीय मुख्यमंत्री हे या प्रकल्पाचे प्रणेते आहेत. ज्या अणु ऊर्जा करारावरुन दिल्लीचे सरकार पडण्याची परिस्थिती निर्माण झाली होती. त्या कराराचे शिल्पकार आजचे आदरणीय मुख्यमंत्री आहेत, ही कौतुकाची बाब आहे. त्यांचे ते कसब आहे. तो अणु करार योग्य की अयोग्य हा राष्ट्रीय स्तरावरील नेत्यांचा, खासदारांचा विषय आहे. त्यावर भाष्य करण्याचा माझा विषय नाही. परंतु पंतप्रधान कार्यालयाचे मंत्री पद संभाळीत असतांना त्यांनी एक कर्तृत्ववान असा अव्दितीय करार केला. त्याचे एक फळ म्हणून हा अणु ऊर्जा प्रकल्प कोकणामध्ये येत आहे. अणु ऊर्जा प्रकल्प

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ ST/

श्री. दिवाकर रावते....

करार वीजेकरिताच आहे ही त्यावेळची घोषणा होती.

सभापती महोदय, मला एका गोष्टींचे ज्ञान होणे आवश्यक आहे. ते माननीय ऊर्जामंत्र्यांकडून नव्हेतर माननीय मुख्यमंत्र्यांकडून हवे आहे. याचे कारण त्यावेळचे अणु ऊर्जा कराराचे ते प्रणेते आहेत, त्यांना दिल्लीमधील संपूर्ण माहिती आहे. त्यांनी कालच्या चर्चेला उत्तर देतांना उत्कृष्ट भाषण केल्यामुळे आम्ही बहिर्गमन केले नाही. कारण पंतप्रधान कार्यालयामध्ये काम करीत असतांना आणि त्यांच्याकडे सी.बी.आय. असल्यामुळे या राज्यातील सर्व पुरुषांचे कर्तृत्व त्यांना तोंडपाठ आहे. त्यामुळे त्यांनी "आदर्शच्या भ्रष्टाचाराबद्दल"या वाक्याने भाषणाला सुरुवात केली. अशी कर्तृत्ववान, विद्वत्ता असलेली व्यक्ती मुख्यमंत्रीपदी असल्यामुळे मला त्यांच्याकडून माहिती घ्यावयाची आहे. आतापर्यंत अमेरिकेने सुध्दा अणु ऊर्जा निर्माण केलेली नाही. त्यांच्याकडे जास्तीत जास्त 100 मेगावॅटचा एकच प्रकल्प आहे. त्यांच्याकडे एवढी अणु असतांना स्वत:करिता अणु ऊर्जा निर्माण करावी असे त्यांना वाटत नाही आणि अप्रगत असलेल्या हिंदुस्थान या राष्ट्रामध्ये ही अणु ऊर्जा निर्माण करण्याकरिता ओबामा येतात. दुसरीकडे आम्ही मात्र सांगत आहोत की, सन 2020 मध्ये आम्ही समर्थ राष्ट्र म्हणून उभे राहू. परंतु ओबामा म्हणतात की, तुम्ही आताच समर्थ झालेले आहात.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

तुम्ही आमचा 10 हजार मेगावॅटचा प्रकल्प घेतला. तुम्ही आताच समर्थ झालेला आहात.

**उप सभापती** : आता 7.00 वाजलेले आहेत. ही चर्चा आता येथे थांबविण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे भाषण अपूर्ण आहे. ही चर्चा माननीय सभापतींच्या अनुमतीने सोमवारी किंवा मंगळवारी घेण्यात येईल.

सभा□ापुढील □म□ज संपलेले आहे. सभा□ाची बैठ□ आता स्थगि□ होऊ□ उद्या शुक्रवार, दि□□ 10 डिसेंबर, 2010 रोजी स□ळी 11.00 वाजता पु□ भरेल.

( सभा□ाची बैठ□ सायंकाळी 7 वाजता, शुक्रवार, दि□□ 10 डिसेंबर, 2010 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही